भारतामध्ये 1985 नंतर सार्वजनिक उद्योगावरील खर्चात कपात करण्यास सुरुवात झाली परिणामी सरकारची भांडवली तूट कमी झाली 1991 नंतर सार्वजनिक उपक्रमावरील खर्चात अधिक कपात करण्यात आली आणि खाजगीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यात आली. भारतामध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया सुरुवात करत असताना प्रतिराष्ट्रीयकरण वगळता खाजगीकरणाच्या सर्वच पद्धतीचा जवळपास अवलंब करण्यात आला आहे. परवाना धोरणाचे उच्चाटन, नवीन औद्योगिक धोरणाद्वारे खाजगी क्षेत्राचा विस्तार करणे, FERA कायद्याचे उच्चाटन हे खाजगी क्षेत्राचे महत्त्व वाढविणारे उपाय देखील खाजगीकरणाचे मार्ग आहेत. निर्गुंतनुक हा भारतातील खाजगीकरणाचा प्रमुख मार्ग राहिला आहे.

भारत सरकारने 1993 मध्ये रंगराजन समिती, 1996 मध्ये पहिला निर्गुंतवणूक आयोग, 1999 मध्ये निर्गुंतवणूक विभाग, 2001 मध्ये दुसरा निर्गुंतवणूक आयोग, 2016 मध्ये दीपम(Department of investment and public asset management) विभाग, याद्वारे खाजगीकरणाच्या प्रक्रियेला गती दिली आहे.

भारतातील खाजगीकरणाची 1) सार्वजनिक उद्योगांची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढविणे व व्यवस्थापन सुधारणा करणे2) सार्वजनिक उद्योगांमध्ये खाजगी उद्योगाचे गुणधर्म रुजविणे. प्रामुख्याने बाजार शिस्त,स्पर्धात्मकता, आधुनिकता, विविधिकरण इत्यादी गुणधर्मांचा विकास करणे.3) सार्वजनिक उद्योगांना आर्थिक संकटातून बाहेर काढणे बिन महत्वाच्या सार्वजनिक उद्योगांमध्ये अडकलेला निधी खुला करणे.4) सार्वजनिक उद्योगांना अधिक स्वायत्तता देणे.5) सार्वजनिक उपक्रमांमधील राजकीय हस्तक्षेप कमी करणे व भ्रष्टाचाराला आळा घालणे. 6)सार्वजनिक उपक्रमांमधील कर्मचारी टिकवून ठेवणे. 7)ग्राहकांना चांगल्या सेवा प्रदान करणे. 8)सार्वजनिक उपक्रमातील निर्गुंतनुकीच्या रकमेचा वापर करून सरकारचे सार्वजनिक वित्त सुधारणे व राजकोषीय तूट कमी करणे. 9)सार्वजनिक उपक्रमामुळे सरकारवर पडणारा आर्थिक भार व कर्ज कमी करणे. ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. अलीकडे सार्वजनिक उपक्रमातील संरक्षण व न्यायव्यवस्था सोडून इतर उपक्रमात मात्र निर्गुंतनुकीची मर्यादा काही विभागात 51 टक्के पेक्षा अधिक करण्यात आली आहे. तसेच कायम तोट्यात चालणारे सार्वजनिक उपक्रम पूर्णतः विक्री करणे असे उद्दिष्ट सरकारद्वारे ठेवण्यात आले आहे. खाजगीकरणाच्या या उद्दिष्टामुळे देशाच्या आर्थिक विकासाची गती निश्चितच सुधारू शकते. वर्तमानातील जागतिक स्पर्धात्मकतेचा व आर्थिक मक्तेदारीचा सामना करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत बनणे गरजेचे आहे या दृष्टीने खाजगीकरण निश्चितच मदत करत आहे. खासगीकरणातून स्पर्धात्मकता व यातून नफा केंद्रित अर्थव्यवस्था निर्माण होईल परंतु भारतात 142 कोटी वास्तव्य करणाऱ्या सामान्य भारतीयांचे जीवनमान उंचविण्यासाठी गाभाभूत असणाऱ्या सार्वजनिक उपक्रमाच्या विकास वाहिन्या बंद होणे हे धोकादायक आहे. यातून एकाधिकारशाही निर्माण होऊन सर्वसामान्यांचे जगणे कठीण होऊ शकते. परिणामी विविध आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण होऊ शकतात.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच द्वितीय माहिती सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निम शासकीय प्रकाशनाद्वारे

प्रकाशित ग्रंथ, मासीके,साप्ताहिके, वर्तमानपत्रे, शासनाचे संबंधित विभागाचे विविध अहवाल इत्यादीचा अवलंब केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला योग्य दिशा प्राप्त करण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ते पुढील प्रमाणे..

1) भारतातील खाजगीकरणाचा शोध घेणे.
2) खाजगीकरणातून निर्माण होणाऱ्या संधीचा अभ्यास करणे.
3) खाजगीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या आव्हानांचा शोध घेणे.
4) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व उपयोजनात्मक शिफारशी करणे.

**भारतातील खाजगीकरणाची स्थिती**

भारतामध्ये प्रामुख्याने 1991 मध्ये खाजगीकरणाला सुरुवात झाली. 1991 पासून ते आजतागायत पर्यंत देशातील कोणकोणत्या सार्वजनिक उपक्रमांमधून किती रुपयाची निर्गुंतवणूक केली आहे याचा शोध पुढील सारणी द्वारे घेण्यात आला आहे.

| अनु.क्र. | वर्ष | सुरुवातीचे निर्गुंतवणूक लक्ष | पुनर्निर्धारित निर्गुंतवणूक लक्ष | वास्तविक निर्गुंतवणूक | व्यवहारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 43,425 | 26,353 | 24,349 | 8 |
| 2 | 2015-16 | 69,500 | 25,313 | 23,997 | 9 |
| 3 | 2016-17 | 56,500 | 45,500 | 46,247 | 21 |
| 4 | 2017-18 | 72,500 | 1,00,000 | 1,00,057 | 36 |
| 5 | 2018-19 | 80,000 | 80,000 | 84,972 | 28 |
| 6 | 2019-20 | 1,05,000 | 65,000 | 50,300 | 15 |
| 7 | 2020-21 | 2,10,000 | 32,000 | 32,885 | 18 |
| 8 | 2021-22 | 1,75,000 | 78,000 | 13,534 | 10 |
| 9 | 2022-23 | 65,000 | 50,000 | 35,293 | 10 |
| **Source- Gov. of India,Ministry and Finance, Annual Report-2022-23,p.no.225** | | | | | |

वरील सारणी वरून भारतातील सार्वजनिक उपक्रमातील खाजगीकरणाचा कल लक्षात येतो वरील सारणी मध्ये, आर्थिक वर्ष 2014- 15 ते 2022- 23 या कालावधीतील केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमातील निर्गुंतनुक दर्शविण्यात आलेली आहे. या अगोदर म्हणजे नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर 1991- 92 ते 2013- 14 या कालावधीत देशातील केंद्रीय सार्वजनिक उपक्रमातील एकूण 1,96,250 कोटी रुपयाची निर्गुंतणूक करण्यात आली होती. तर सन 2014- 15 ते 2022- 23 या कालावधीत एकूण 4,11,634 कोटी रुपये निर्गुंतवणूक करण्यात आली. म्हणजेच देशात सन 1991 -92 ते 2022- 23 या कालावधीत एकूण 6,07,859 कोटी रुपयाची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची निर्गुंतवणूक करण्यात आली हे निदर्शनास येते.

**खाजगीकरण द्वारे निर्माण होणाऱ्या संधी**

खाजगी क्षेत्रामध्ये आत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे तसेच उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे स्पर्धात्मकतेतून वस्तूची गुणवत्ता सुधारते व ग्राहकांना चांगल्या सेवा व दर्जेदार वस्तू उपलब्ध होतात. नव्याने ग्राहक उपयोगी संशोधने होतात पर्यायाने विकासाची गती वाढते व अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणात्मक बदल घडून येतात.

1) उत्पादकता आणि उत्पन्नामध्ये वाढ.:- खाजगीकरणामुळे जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्यासाठी उद्योजक प्रयत्न करीत असतात तसेच कामगार अधिक मोबदला मिळविण्यासाठी जास्तीत जास्त कार्य करतात. उद्योजक आणि कामगार यांची कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्पादनाच्या सर्व संसाधनाची उत्पादकता लक्षणीयरीत्या वाढते. परिणामी आस्थापने मधून उत्पादन वाढते व आर्थिक विकासाला गती मिळते.

2) संसाधनाचा कार्यक्षम वापर:- उत्पादनाची सर्व संसाधने आर्थिक दृष्ट्या कार्यक्षमपणे वापरली जातात. या संसाधनाचा कोणताही भाग टाकून दिला जात नाही. संसाधनाचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी कटाक्षाने प्रयत्न केले जातात. त्याचा परिणाम किमान उत्पादन खर्चावर होतो. खाजगी क्षेत्रातील उत्पादक नेहमीच अपव्यय कमी करण्यासाठी तत्पर असतात. परिणामी संसाधनाचा कार्यक्षमपणे वापर होतो.

3) अधिक कार्यक्षमता व कठोर परिश्रम:- खाजगी क्षेत्र हे नफा केंद्रित असल्यामुळे सातत्याने उद्योजक व कामगार दोघेही पूर्ण क्षमतेने कार्य करतात. तसेच वस्तू व सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी कठोर परिश्रम घेतात. भांडवलदाराकडून सातत्याने कामगारांना उत्कृष्ट कार्यक्षमतेसाठी व कठोर परिश्रमासाठी प्रोत्साहन दिले जाते. परिणामी कार्यक्षमता सुधारते.

4) आर्थिक वाढ आणि संपन्नता:- जलद आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी खाजगीकरणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. खाजगी क्षेत्रात सातत्याने नवनवीन संशोधने केले जातात. त्यामुळे आर्थिक विकासाची व्याप्ती व गुणवत्ता सुधारते यामुळे संबंधित देशाची आर्थिक वाढ व संपन्नता जलद गतीने साध्य करता येते.

5) जोखीम स्वीकारणे व अनिश्चिततेसाठी प्रोत्साहन:- खाजगी क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्यासाठी, आर्थिक विकासाची नवनवीन क्षेत्रे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मोठ्या प्रमाणात जोखीम स्वीकारून तसेच व्यवसायातील अनिश्चितता पत्करून अधिक नफा प्रयत्न करण्यासाठी भांडवलदार प्रयत्न करत असतात. यातून विकासाच्या नवीन संधी प्राप्त होतात. जोखिम पत्करण्याचे बक्षीस म्हणजेच नफा होय.

6) भांडवल निर्मितीचा उच्च दर:- खाजगी उद्योजक त्यांच्या व्यवसायात पुनर्गुंतवणूक करण्यासाठी त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग बचत करण्याचा प्रयत्न करतात. भविष्यात अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी जे कर्मचारी आता अधिक कमवतात ते देखील बचत करण्यास सक्षम होतात. यामुळे भांडवल निर्मितीच्या दर जास्त निर्माण होतो. खाजगी क्षेत्रामध्ये भांडवलदाराकडून नफ्याची पुनर गुंतवणूक केली जाते परिणामी भांडवल निर्मितीचा दर अधिक राहतो.

7) सरकार वरील भार कमी होतो:- सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात सरकारद्वारे होत असलेली गुंतवणूक तसेच देशातील बेरोजगारी ,दारिद्य कमी करण्यासाठी सरकारवर सातत्याने दबाव असतो. सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेमुळे हे योग्य रीतीने घडून येत नाही. त्यामुळे खाजगी क्षेत्रात सुधारणात्मक संधी आहेत. खाजगी क्षेत्रातील अचूक व्यवस्थापन ,उत्कृष्ट कार्यक्षमता, उच्चतंत्रज्ञान यामुळे आर्थिक विकास जलद साध्य करता येतो. परिणामी सरकार वरील भार कमी होतो. तसेच सरकारची वित्तीय व भांडवलीतून तूट कमी होते.

8) निष्पक्ष स्पर्धा:- खाजगीकरणामुळे उत्पादक आणि विक्रेत्यामध्ये मुक्त आणि निष्पक्ष स्पर्धा निर्माण होतात. स्पर्धात्मकतेतून वस्तूची गुणवत्ता सुधारते व उपभोक्त्याचे समाधान होते देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी हे खूप महत्त्वाचे आहे.

9) उत्पादनाची किमान किंमत:- खाजगी क्षेत्रामध्ये संसाधनाचा जास्तीत जास्त आणि कार्यक्षम वापर होत असतो. परिणामी त्यांचा उत्पादन खर्च कमी होतो. ग्राहकांना वाजवी दरात चांगल्या दर्जाच्या वस्तू निर्माण करून देणे शक्य होते.

अशाप्रकारे खाजगीकरणामुळे अर्थव्यवस्थेमध्ये बाजाराधिस्टीत, व्यवस्थापकीय नवप्रवर्तनीय, उत्पादनक्षम, वेगवेगळ्या संधी निर्माण होतात.

**खाजगीकरणातील आव्हाने**

भारत हे लोकशाही प्रधान गणराज्य आहे. भारतावर ब्रिटिशांनी दीडशे वर्ष राज्य केले. पारतंत्र्यानंतर 1947 ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने 1950 मध्ये मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतामध्ये राष्ट्र विकासाबरोबर सामाजिक कल्याणावर आजपर्यंत मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला आहे. आज ही भारतासमोर गरिबी, दारिद्य, बेकारी, उपासमार, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, लोकसंख्या वाढ संपत्तीक व आर्थिक विषमता असे अनेक गंभीर प्रश्न आहेत. सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनातील काही किमान गरजा भागविण्यासाठी सार्वजनिक उपक्रम अत्यंत महत्त्वाची भूमिका निभवतात. अशा या सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण केले तर एकाधिकारशाही निर्माण होऊन नफा केंद्रित खाजगी व्यवस्था निर्माण होईल व भांडवलदाराकडून सर्वसामान्यांची मोठ्या प्रमाणात लूट केली जाईल . खाजगीकरणामुळे देशाच्या सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेला तसेच अखंडतेला तडा जाऊ शकतो. व यातून अनेक संभाव्य आव्हाने निर्माण होऊ शकतात.

1) उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण:-खाजगीकरणामुळे संपत्तीचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणात होऊ शकते. उत्पन्न आणि संपत्ती मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित होण्यास प्रोत्साहन मिळते. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात. आणि गरीब अधिक गरीब होतात. परिणामी सर्वसामान्यांचे हाल होतात.
2) सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष:-खाजगीकरणातून भांडवलदार जास्तीत जास्त नफ्याच्या हेतूने कार्य करत असतात .ते त्यांच्या व्यवसायात व्यवस्थापकीय कौशल्य वापरून अधिकाधिक उत्पादन करतात व त्यामधून वस्तू व सेवांचा दर्जा सुधारून जास्तीचा नफा प्राप्त करण्यासाठी कार्य करतात. त्याशिवाय अधिकाधिक बचती करून भांडवलात कशी वाढ करता येईल व नफा अधिक कसा कमवता येईल हा त्यांचा शुद्ध हेतू असतो. लोकांच्या गरजा आणि इच्छा पूर्ण करण्याकडे त्यांचे दुर्लक्ष असते. परिणामी सामाजिक कल्याणाकडे दुर्लक्ष होते.
3) वर्ग संघर्ष:- खाजगीकरणातून वर्ग संघर्ष मोठ्या प्रमाणात निर्माण होतो. यातून भांडवलदार व कामगार यांच्यात वाद निर्माण होतात. समाज दोन वर्गात विभागला जातो. एक म्हणजे श्रीमंत लोकांचा वर्ग तर दुसरा गरीब लोकांचा वर्ग.त्यांचे हितसंबंध नेहमी एकमेकांशी भिडतात आणि हे अंतर सातत्याने वाढत जाते. संपत्तीची विभागणी अशा प्रकारे होते की, श्रीमंत अधिक श्रीमंत होतात तर गरीब अधिक गरीब होत जातात. म्हणून गरीब आणि श्रीमंत यांच्या मनातील भेदभाव वाढत जातो व वर्ग संघर्ष निर्माण होतो.
4) संसाधनाचा अपव्यय:- खाजगी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धात्मकता असते. त्यामुळे कठोर स्पर्धेचा सामना करावा लागतो. या स्पर्धेसाठी कंपन्या जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात. परिणामी मोठ्या प्रमाणावर आर्थिक संसाधने वाया जातात. आर्थिक संसाधनाचा उत्पादन क्षेत्रात किफायतसिरपणे वापर केला जात नाही. त्यामुळे वस्तूच्या किमती वाढतात व ग्राहकांना किंमत वाढीचा नाहक त्रास सहन करावा लागतो. परिणामी संसाधनाचा दुरुपयोग होऊ शकतो.
5) आर्थिक अस्थिरता:- मुक्त बाजार यंत्रणेमुळे अर्थव्यवस्थेमध्ये तेजी आणि मंदीची चक्रे सातत्याने येतात. मोठ्या प्रमाणात महागाई वाढू शकते किंवा मंदिची स्थिती निर्माण होऊ शकते. बाजारात चढउतार हे सातत्याने येतात त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणे हे कठीण होते  व्यावसायिक, उत्पादक, तसेच ग्राहक यांच्यात अस्थिरता निर्माण होते. व्यवसायावर बाह्य वातावरणाचा परिणाम होतो.
6) आर्थिक विकास ही खाजगी क्षेत्राची जबाबदारी नाही:- समन्वयी आर्थिक विकास साध्य करण्यासाठी देशभरामध्ये पायाभूत सुविधा या मजबूत असल्या पाहिजेत. खाजगी क्षेत्र हे व्यावसायिक दृष्ट्या नफा केंद्रित असल्यामुळे त्याला राष्ट्राचे व जनतेचे काहीही दायित्व नाही. देशामध्ये  विकासात्मक असुविधा निर्माण होत असतील तर खाजगी क्षेत्र त्यामध्ये पडत नाही. उलट आपली गुंतवणूक काढून दुसऱ्या देशामध्ये जिथे चांगले सुविधा निर्माण आहेत तेथे, नफा प्राप्त करण्यासाठी असे उद्योग स्थलांतरित होतात. म्हणजेच आर्थिक विकासाबाबत खाजगी क्षेत्राला कसलेही दायित्व रहत नाही.
7) मक्तेदारीचा धोका:- खाजगी क्षेत्रामध्ये भांडवलाचे केंद्रीकरण निर्माण होऊन वस्तू उत्पादन व वितरणामध्ये मक्तेदारी निर्माण होऊ शकते. भांडवलदार अधिक नफा मिळविण्यासाठी, मनमानी किमतीला बाजारपेठेमध्ये वस्तू विक्री करणे, वस्तूचा साठा करणे, वस्तूचा तुटवडा निर्माण करणे, असे प्रयोग करू शकतात. या मक्तेदारीतूनच सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होतात.
8) बेरोजगारी:- अलीकडच्या काळात खाजगी क्षेत्रात अतिउच्च तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण होऊ शकते. भारतासारख्या बेसुमार लोकसंख्या असलेल्या देशाला खाजगीकरणाची ही संकल्पना किती पोषक ठरू शकते याचा अंदाज घेणे कठीण आहे.

अशा प्रकारे भारतासारख्या लोकशाही प्रधान देशांमध्ये खाजगीकरणामुळे अनेक निर्माण होऊ शकतात.

**निष्कर्ष :** प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष करण्यात आली आहे ती पुढील प्रमाणे.
1) भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची अकार्यक्षमता, उत्पादन व उत्पादकतेमध्ये घट, सदोष व्यवस्थापन, जबाबदारीचे अदायित्व, राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार ,सातत्याने वाढत चाललेला तोटा, कर्मचाऱ्यांची अकार्यक्षमता इत्यादीमुळे सार्वजनिक उपक्रमाच्या खाजगीकरणावर भर देण्यात आला आहे.

2) खाजगीकरणामुळे स्पर्धात्मकतेतून वस्तूचा दर्जा व गुणवत्ता सुधारून वाजवी किमतीमध्ये उपभोक्त्याला बाजारपेठेत वस्तू उपलब्ध होत आहेत. सातत्याने नवनवीन संशोधने यामुळे उद्योगाची वाढ होत आहे. परिणामी आर्थिक विकासात सातत्याने भर पडत आहे.
3) खाजगीकरणामुळे स्पर्धात्मकता निर्माण होऊन वस्तूचा दर्जा व गुणवत्ता सुधारत असली तरी, यामधून एखाधी कारशाही निर्माण होऊन अर्थव्यवस्थेचे भांडवलशाही कडे मार्गक्रमण झालेले आहे. गरीब व श्रीमंताची दरी वाढत आहे. संपत्तीक व आर्थिक विषमता निर्माण होत आहे. यातून वर्ग संघर्ष निर्माण होऊन सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचा भंग होऊ शकतो.
4) खाजगी क्षेत्रामध्ये अतिउच्च तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्यामुळे, मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे. बेरोजगारी कमी करणे हे खाजगी क्षेत्राची जबाबदारी नसल्यामुळे देशासमोर हे एक मोठे आव्हान आहे. यातून उपासमार व दारिद्र वाढतच चालले आहे.

**उपयोजनात्मक शिफारशी**

1) सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेमुळे सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण करणे हा योग्य पर्याय नाही. सरकारने पुढाकार घेऊन सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये व्यवस्थापकीय सुधारणा कराव्यात, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवावी, आत्याधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, भ्रष्टाचार मुक्त क्षेत्र ठेवावे, प्रशासकीय पारदर्शकता आणावी यामुळे निश्चितच खाजगी क्षेत्रातील स्पर्धात्मकतेला सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम स्पर्धा करू शकतील व आर्थिक विकासाला गती निर्माण होऊ शकते.
2) देशासमोर दारिद्र्य, बेकारी, उपासमार, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा ,नवतंत्रज्ञान ,अन्नसुरक्षा, बेसुमार लोकसंख्या वाढ, भांडवलाचा दर कमी अशा अनेक समस्या असल्या तरी या समस्या निर्मूलनासाठी राजकीय इच्छाशक्ती आवश्यक असते. भ्रष्टाचार मुक्त व्यवस्था ठेवून, भांडवलाची योग्य गुंतवणूक करून, पारदर्शक व्यवस्थापन व अचूक नियंत्रण, सार्वजनिक क्षेत्राला खाजगी क्षेत्रातील अतिउच्च तंत्रज्ञान व उत्कृष्ट व्यवस्थापन याची जोड देऊन, कायद्याची कठोर अंमलबजावणी केली तर निश्चितच आपण या आव्हानातून मुक्त होऊन देशाचा समन्यायी जलद आर्थिक विकास करू शकतो.

**संदर्भसूची**

1) Jalan, Bimal (1992), 'Balance of Payments: 1956 to 1991', in The Indian Economy: Problems and Prospects, Penguin Books India(P) Ltd., New Delhi
2) Misra, S.K. (2000). Indian Economy, Himalaya Publishing House, 18th Edition, p. 739 New Delhi
3) Awadalla, S.A. (2003).Privatisation and economic development: study on the effect of privatization on the economic efficiencies in developing countries: Egypt. Arab Law Quarterly, 18(1), 34-61
4) Mathews John" Performance of Public Enterprises in India" Quest Journals Journal of Research in Business and Management, vol. 07, no. 03, 2019, p.no. 65-69
5) Mishra R K (2007), "Performance of Public Enterprises", The Journal of Institution of Public Enterprise, Vol. 30, Nos. 1 & 2.
6) Annual Report-2022-23, Ministry of finance, Government of India
7) Department of Investment and Public Asset Management, ministry of finance,Government of India
8) https://en.wikipedia.org/wiki/Disinvestment_in_India
9) https://dipam.gov.in/strategic-disinvestment
10)वार्षिक अहवाल 2022- 23,रिझर्व बँक ऑफ इंडिया
11) योजना मासिक विविध अहवाल

# भारतातीय हरितक्रांतीचे जनक : डॉ.एम.एस.स्वामीनाथन

**प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, जिल्हा-लातूर

**सारांश**

*"भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये शेती क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. भारतीय कृषी क्षेत्र हे प्रथम व द्वितीय क्षेत्राचा प्रमुख मुलाधार आहे.स्वातंत्र्यापूर्वीपासूनच भारतामध्ये सातत्याने पडणारे दुष्काळ, पर्जन्यधारीत शेती, शेतीतील पायाभूत सुविधांचा अभाव, भांडवलाचा अभाव, योग्य वेळी वित्त पुरवठ्याची कमतरता, नवीन तंत्रज्ञानाचा अभाव, शेतकऱ्यांची निरक्षरता व शासकीय धोरणांच्या अंमलबजावणीतील मर्यादा इत्यादीमुळे कृषी क्षेत्रातून आपण भारतीय व्यक्तींना अन्नसुरक्षितता देऊ शकलो नाही.भारतामध्ये कृषी उपजाऊ सुपीक जमीन मुबलक आहे.भौगोलिक विविधता असूनही दुष्काळामध्ये अन्नावाचून प्रचंड लोकसंख्या देशांमध्ये गतप्राण झाली.याची अनेक उदाहरणे आहेत.1943 च्या बंगालच्या दुष्काळामध्ये लाखो लोक उपासमारीने मेली.याचा परिणाम डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्यावर झाला व त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याची कारकीर्द देशात अन्नधान्याची सुरक्षितता निर्माण करण्यात घालविली.आंतरराष्ट्रीय सहकार्याने भारतातील देशी वानाशी विदेशातील बुटक्या कृषी वानाचे संकरन करून, प्रतिकूल हवामानात, रोगराईजन्य परिस्थितीतही चांगली उत्पादकता देणारी नवीन संकरित बियाणे जागतिक हरित क्रांतीचे प्रणेते नॉर्मन बोरलॉग यांच्या सहकार्याने डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांनी निर्माण केली. संकरन केलेल्या नवीन बियाण्यांचा वापर हरितक्रांतीच्या रूपाने 1965 -66 मध्ये भारतामध्ये केला.परिणामी शेती क्षेत्रात अमुलाग्र उत्पादन निर्माण झाले व भारतातील अन्न समस्या हळूहळू कमी झाली.भारत हा कृषी आयात करणारा देश होता.कृषी मालाची निर्यात करणारा देश म्हणून नावारूपास आला. याचे सर्व श्रेय भारतातील हरित क्रांतीचे जनक डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांना जाते"*

**प्रस्तावना**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील अनेक देश अन्नधान्याच्या बाबतीत अनेक गंभीर प्रश्नांचा सामना करीत होते.त्यामध्ये भारत ही मागे नव्हता.सातत्याने पडणारे दुष्काळ, शेतीचे पर्जन्या वरील अवलंबित्व ,आधुनिक सोयी सुविधांचा अभाव, भांडवलाचा अभाव, शेती सिंचनाचा अभाव, गैरसंस्थात्मक कृषी वित्त पुरवठा यामुळे शेती क्षेत्रात उत्पादनाच्या बाबतीत नैराश्य होते. लोक आपल्या उपजीविकेपुरते अन्नधान्य निर्माण करत होते.तरी परंतु दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये लाखो लोक उपासमारीने मरत होते.परंतु तत्कालीन परिस्थितीत अन्नधान्य उपलब्ध होणे शक्य नव्हते.एकीकडे आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी यामुळे विदेशी मदतीची संभावना कमी व अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी नसणे यामुळे भारतासारख्या अनेक विकसनशील राष्ट्राची मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण होत असे. परिणामी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीमध्ये देशातील लोकांना वाचविण्यास/ जगविण्यास मर्यादा येत असे.

म्हणून अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनण्याचे उद्देश प्रत्येक राष्ट्राचे असते नेमके हे ओळखून डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी आपले जीवन भारतीय शेती क्षेत्रात हरित क्रांती घडविण्यासाठी व्यतीत केले.

डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी प्राणिशास्त्र या विषयात पदवी शिक्षण घेऊन तत्कालीन 1943 च्या बंगालच्या दुष्काळामुळे झालेले देशाचे हाल व अन्नावाचून मरत असलेली लोकसंख्या पाहून कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल करण्यासाठी त्यांनी कृषीचे उच्च शिक्षण घेतले. प्रामुख्याने वनस्पती, प्रजनन, जनुकीय संशोधन, कृषी संशोधन आणि विकास, नैसर्गिक संसाधनाची जपणूक इत्यादी मध्ये त्यांनी अधिक संशोधने केली.त्यांना त्यांच्या अथक प्रयत्नातून व कष्टातून यशस्वी फलप्राप्ती मिळाली. भारताच्या उत्पन्नापैकी 70% कृषी क्षेत्र पुरवत असतानाही अन्नधान्य आयात केल्याबद्दल स्वामीनाथन यांनी भारतावर

टीका केली. त्यानंतर भविष्यात भारत अन्न निर्यात करणारा देश बनेल या महत्त्वाकांक्षेने वेळेत अधिकाधिक कृषी उत्पादनांचे उत्पादन करण्यासाठी त्यांनी आपले संशोधन कार्य सुरू ठेवले.परिणामी भारत हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी देश बनला. भारतीय गरीब शेतकऱ्यांच्या शेतात गव्हाचे आणि तांदळाचे उच्च उत्पन्न देणारे वाण पेरुन त्यांनी हरितक्रांती घडवून आणली. याचे सर्व श्रेय स्वामीनाथन यांनाच जाते. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच गहू आणि तांदूळ यांच्या उत्पादनांत भारत स्वयंपूर्ण होऊ शकला.

जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.वर्तमानात भारताची लोकसंख्या जवळपास 142 कोटी इतकी झाली आहे. जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे 18% लोकसंख्या भारतात वास्तव्यास आहे. जागतिक एकूण भू- क्षेत्रफळाच्या केवळ 2.4% भू- क्षेत्रफळ भारताच्या वाट्यास आलेले आहे. एवढ्या बेसुमार व प्रचंड लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणे, रोजगार पुरवठा करणे,त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकल्पावर अमर्याद ताण पडत आहे.तरी परंतु डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या कृषी क्षेत्रातील संशोधनामुळे व नवीन तंत्रज्ञानामुळे, एवढ्या प्रचंड लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करून, कृषी मालाची निर्यात करण्यामध्ये भारताने एक नवी उंची गाठली आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. शोधनिबंधामध्ये प्रामुख्याने द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये विविध शासकीय व निम शासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे याचा आधार घेण्यात आलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

शोधनिबंधाला योग्य दिशा मिळण्यासाठी काही उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे.

1) डॉ. एम. एस.स्वामीनाथन यांची कृषी संशोधने अभ्यासणे.

2) डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचा हरितक्रांती मधील योगदानाचा शोध घेणे.

3) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

**जीवन आणि शिक्षण**

डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचा जन्म तामिळनाडूमध्ये कुंभकोणम या ठिकाणी सात ऑगस्ट 1925 रोजी झाला.स्वामीनाथन यांचे वडील पेशाने डॉक्टर होते ते गांधीवादी आणि स्वदेशीचे पुरस्कर्ते होते त्यांच्या विचारांचा स्वामीनाथन यांच्यावर चांगला प्रभाव पडला.त्यांचे प्राथमिक शिक्षण नेटिव्ह हायस्कूल आणि नंतर कुंभकोणम मधील लिटिल फ्लावर कॅथोलिक हायस्कूलमध्ये झाले.मॅट्रिक केल्यानंतर त्यांनी वैद्यकीय शाळेत प्रवेश घेतला.1943 च्या बंगालच्या दुष्काळामध्ये लाखो लोक उपासमारीने मरण पावल्याचे त्यांनी जवळून पाहिले.त्यामुळे त्यांनी आपले मत बदलून कृषी संशोधन करण्याचा विचार केला.त्रिवेंद्रमच्या महाराजा महाविद्यालयात त्यांनी प्राणीशास्त्र या विषयात पदवी(बी.एस्सी.) मिळविली. त्यांनी कृषी विज्ञान विषयात पदवी प्राप्त केली.यानंतर त्यांनी वनस्पती, प्रजनन आणि अनुवंशशास्त्र यामध्ये पदव्युत्तर शिक्षण भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली येथून पूर्ण केले.यानंतर नेदरलँडच्या वेगेनिंगेन कृषी विद्यापीठ, अनुवंशिकी संस्था येथे बटाटा अनुवंशशास्त्र विषयावर संशोधन सुरू केले आणि युनोस्कोची फेलोशिप घेतली. येथे त्यांनी सोलॅनमच्या जंगली प्रजातीच्या विस्तृत मशापासून लागवडीखालील बटाटा, सोलॅनम ट्यूबरोजममध्ये जीन हस्तांतरित करण्याच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करण्यात यश मिळविले. त्यानंतर ते केंब्रिज युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ अग्रिकल्चर मध्ये गेले. तेथे त्यांनी "प्रजाती, भेदभाव आणि सोलॅनम- सेक्शन टुबेरियम जनुकातील विशिष्ट प्रजातीतील पॉलीप्लॉईडी ऑफ नेपरी" या प्रबंधासाठी सन 1952 मध्ये पीएचडी मिळविली.

संशोधनाच्या कार्यात त्यांचे वैयक्तिक आणि व्यवसायिक समाधान असूनही त्यांनी तेथे पूर्ण वेळ प्राध्यापक सेवेची संधी नाकारली आणि देशसेवेसाठी सज्ज झाले. भारतीय शेतीच्या कार्यात स्वतःला सुसज्ज करणे हा त्यांचा हेतू होता आणि ते सन

1954 मध्ये भारतात परतले व आयएआरआय मध्ये त्यांनी कृषी विज्ञान आणि अनुवांशिक शास्त्रात आपले संशोधन कार्य चालू केले. भारताच्या अस्मितेसाठी,अन्न स्वालंबनासाठी, शेती क्षेत्रात नवनवीन वैज्ञानिक प्रयोग करून अन्नधान्य उत्पादकतेमध्ये अमुलाग्र वाढ करणाऱ्या महान कृषी वैज्ञानिकाने 28 सप्टेंबर 2023 रोजी चेन्नई येथे जगाचा निरोप घेतला.

**डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांना प्राप्त पुरस्कार**

डॉ. स्वामीनाथन यांनी आपल्या शिक्षण आणि संशोधनाचा उपयोग भारतात अन्न स्वावलंबन निर्माण करण्यासाठी पूर्ण शक्तीने केला. भारतात हरितक्रांतीच्या माध्यमातून स्वामीनाथन यांनी अन्नधान्य उत्पादनात कमालीची यशस्विता प्राप्त केली त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारतानेच नव्हे तर लंडनच्या रॉयल सोसायटी सह ,जगातील प्रमुख 14 विज्ञान परिषदानी त्यांना आपले मानद सदस्य म्हणून स्वीकारले. जगातील अनेक विश्वविद्यालयाने त्यांना डॉक्टरेट ही उपाधी बहाल केली. डॉ. स्वामीनाथन यांना 1)वर्ष 1971 मध्ये 'मॅग्सेसे पुरस्कार'2)वर्ष 1986 मध्ये 'अल्बर्ट आइंस्टीन वर्ल्ड साइंस पुरस्कार'3)1987 मध्ये पहिला'विश्व खाद्य पुरस्कार'4)1991 मध्ये अमेरिकेत 'टाइलर पुरस्कार'5)1994 मध्ये पर्यावरण तंत्रज्ञानासाठी जपानचा 'होंडा पुरस्कार'6)1997 मध्ये कृषी मधील योग्यता क्रमासाठी फ़्रँस चा 'ऑर्डर दु मेरिट एग्रीकोल' 7)1998 मध्ये मिसूरी बॉटेनिकल गार्डन (अमरीका) मध्ये 'हेनरी शॉ पदक'8)1999 मध्ये 'वॉल्वो इंटरनेशनल एंवायरमेंट पुरस्कार'9)1999 मध्ये ही 'यूनेस्को गांधी स्वर्ग पदक' ने सम्मानित10)'भारत सरकारने 1967 मध्ये-'पद्मश्री',11)1972 मध्ये 'पद्मभूषण' 12)1989 मध्ये'पद्मविभूषण' पुरस्कार देऊन सम्मानित केले.

**संशोधन आणि व्यावसायिक कारकीर्द**

डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी भारतातील अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी झाडे, प्रजनन,कृषी संशोधन आणि विकास आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनावरती अधिक भर दिला.वर्ष 1949 ते 55 या कालावधीत बटाटा (सोलॅनम ट्यूबरोजम),गहू (ट्रिटिकम एस्टिव्हियम), तांदूळ (ओरिझा सॅटीवा) आणि ज्यूट अनुवंशशास्त्र यावर संशोधन केले.वर्ष 1955 ते 72 या कालावधीत मेक्सिकन बौने गव्हाच्या वाणांवर ,सायटोजेनेटिक्स,रेडिएशन जेनेटिक्स आणि म्यूटेशन ब्रीडिंग इत्यादीबाबत संशोधने केले.वर्ष 1972 ते 79 या कालावधीत ते भारतीय कृषी संशोधन परिषदेचे (आयसीएआर) महासंचालक होते.तेथे असताना त्यांनी नॅशनल ब्युरो ऑफ प्लांट, ॲनिमल आणि फिश जेनेटिक रिसोर्स ऑफ इंडियाची स्थापना केली.भारतीय वन सर्वेक्षण (एफएसआय) च्या परिवर्तनातही त्यांनी भूमिका बजावली आहे.वर्ष 1979 मध्ये त्यांची भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाचे प्रधान सचिव म्हणून नियुक्ती झाली.वर्ष 1981 ते 85 या काळात ते अन्न व कृषी संघटनेचे (एफएओ) स्वतंत्र अध्यक्ष होते.वर्ष 2001 मध्ये ते सुंदरबन जागतिक वारसास्थळातील जैवविविधता व्यवस्थापनावरील बांग्लादेश संयुक्त प्रकल्प यावर भारत क्षेत्रीय सुकाणू समितीचे अध्यक्ष पदावर कार्य केले. भारतातील शेतकरी आत्महत्यांच्या महत्त्वपूर्ण प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सरकारने सन 2004 मध्ये स्वामीनाथन यांच्या अध्यक्षपदी राष्ट्रीय किसान आयोग (एनसीएफ) ची स्थापना केली. डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी भारतातील अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी झाडे, प्रजनन,कृषी संशोधन आणि विकास आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनावरती अधिक भर दिला.वर्ष 1949 ते 55 या कालावधीत बटाटा (सोलॅनम ट्यूबरोजम),गहू (ट्रिटिकम एस्टिव्हियम), तांदूळ (ओरिझा सॅटीवा) आणि ज्यूट अनुवंशशास्त्र यावर संशोधन केले.वर्ष 1955 ते 72 या कालावधीत मेक्सिकन बौने गव्हाच्या वाणांवर ,सायटोजेनेटिक्स,रेडिएशन जेनेटिक्स आणि म्यूटेशन ब्रीडिंग इत्यादीबाबत संशोधने केले. डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली 18 नोव्हेंबर 2004 ला 'राष्ट्रीय शेतकरी आयोग' केंद्र सरकारने स्थापन केला.स्वामीनाथन यांनी डिसेंबर 2004,ऑगस्ट 2005, डिसेंबर 2005, एप्रिल 2006 व आक्टोबर 2006 मध्ये प्रत्येकी एक असे पाच अहवाल शासनाला सुपूर्द केले. या अहवालाचा विषय अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या लक्ष्याशी समांतर म्हणजे गतिशील व समावेशक वाढ असा होता शेतकऱ्यांचा सर्वसमावेशक विकास करण्यासाठी त्यांनी शेतकरी क्लेश, जमीन सुधारणा, सिंचन, कृषी उत्पादकता, वित्त आणि विमा, अन्नसुरक्षा शेतकरी आत्महत्या शेतकरी स्पर्धात्मकता, रोजगार या अनुषंगाने महत्त्वपूर्ण शिफारशी सरकारकडे केल्या आहेत. हेक्साप्लॉइड गव्हाच्या सायटोजेनेटिक्सवर मूलभूत अभ्यास केला. स्वामिनाथन आणि बोरलॉग यांनी तांदूळ आणि धान्याच्या अनेक जाती विकसित करून हरित क्रांतीचा पाया रचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**हरितक्रांती मधील योगदान**

भारतातील कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी एम एस स्वामीनाथन यांनी उच्च उत्पन्न देणाऱ्या जाती HYV च्या विकासाकडे नेणाऱ्या सर्व प्रयोगांचे मार्गदर्शन केले एवढेच नव्हे तर शेतकरी समुदायांमध्ये व्यापक जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्व सरकारी यंत्रणांना, प्रशासनाला सोबत घेऊन सहकार्य केले. जस्ट ते 64 या कालावधीत HYV ची चाचणी घेण्यात आली आणि 1965 मध्ये तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जय जवान जय किसान या घोषणा केली भारतभर प्रसिद्ध झाली यामुळे 1967 पर्यंत अन्नधान्य उत्पादनात झपाट्याने वाढ झाली ज्यामध्ये पंजाब राज्यात कापणी केलेले धान्य साठवण्यासाठी पुरेशी जागा नव्हती त्यामुळे शाळांना सुट्टी जाहीर करून अन्नधान्य साठवले गेले.

स्वामीनाथन यांनी भारताच्या हरितक्रांतीमध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे हरित क्रांती म्हणजे कृषी क्षेत्रात आत्याधुनिक तंत्रज्ञानासह कृषीची उत्पादकता वाढविणे होय. धान्याचे उच्च उत्पादनक्षम प्रकार विकसित करणे, खते आणि कीटकनाशके वापरणे, कीटक प्रतिरोधक पिके विकसित करणे, बियाणामध्ये जनुकीय बदल घडवून आणणे व उत्पादकता वाढविणे,वर्धित अनुवंशशास्त्र असलेल्या संकरित बियाणे इत्यादीचा वैज्ञानिक पद्धतीने शेती क्षेत्रामध्ये वापर करणे म्हणजेच हरित क्रांती होय.

भारतामध्ये साधारणता 1960 च्या दशकात हरित क्रांतीची सुरुवात झाली या काळात उच्च उत्पादक विविधता HYV बियाणे, यांत्रिक शेती उपकरणे, सिंचन प्रणाली, तृणनाशके आणि खते यासारख्या नवकल्पनांमुळे,भारताची शेती आधुनिक औद्योगिक प्रणालीमध्ये बदलली गेली. हरितक्रांतीचा हा प्रवास डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या प्रयत्नाने अधिक यशस्वी झाला. भारतीय शेतीला चालना देण्यासाठी त्यांनी बियाणे कीटकनाशके आणि कृषी तंत्राचे नवीन प्रकार विकसित केले. 1960 च्या दशकात दुष्काळासारख्या परिस्थितीत शेतकरी आणि सरकारी धोरणासह सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी स्वामीनाथन यांनी हरितक्रांतीचे जागतिक प्रणेते नॉर्मन बोरलॉग आणि इतर शास्त्रज्ञ सोबत पूर्ण क्षमतेने काम केले यामुळे एम. एस.स्वामीनाथन यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते.

स्वामीनाथन यांनी 1950 ते 1960 या दशकामध्ये एक हेक्साप्लॉईड गव्हाच्या सायटोजेनेटिकवर मूलभूत अभ्यास केला. स्वामीनाथन आणि बोरलॉग यांनी तांदुळ, गहू,बटाटे आणि धान्याच्या अनेक पीक प्रजाती विकसित केल्यामुळे हरित क्रांतीच्या विकासाला मदत झाली.एम. एस. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्थेत (IRRI)C4 कार्बन फिक्सेशन क्षमता असलेल्या भात शेतीसाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. त्यामुळे प्रकाश संश्लेषण आणि पाण्याचा चांगला वापर होऊ शकेल स्वामीनाथन यांनी जगातील पहिला उच्च उत्पादक, दर्जेदार बासमती तांदूळ विकसित केला.

कृषी तंत्रज्ञान विकसित करून ते थांबले नाहीत तर या कृषी तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये कसा केला पाहिजे यासाठी, सामान्य शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनेक कार्यशाळांचे आयोजन केले. गव्हाच्या उच्च उत्पादक जाती, तांदूळ, खते आणि आधुनिक शेती पद्धती द्वारे त्याचे उत्पादन कसे वाढवायचे हे त्यांनी कार्यशाळेतून देशभरातील शेतकऱ्यांना शिकवले. जनुकीय बदल केलेले नवीन बियाणे किंवा पीक प्रजाती, आहे त्याच जमिनीमध्ये त्याची लागवड अथवा पेरणी कशा पद्धतीने करायची आणि उत्पादनामध्ये भरघोस वाढ मिळवायची पद्धत स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांना शिकविले. हरितक्रांती युगाच्या पहिल्या वर्षात पीक उत्पादन पातळी तिप्पट झाल्यामुळे ही कामगिरी आश्चर्यचकित करणारी होती. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या निरक्षतेचा अडथळा लक्षात घेऊन या नवीन पद्धती वापरण्याचे प्रशिक्षण दिले त्यांच्या प्रयत्नामुळे केवळ चार पीक हंगामात सरासरी कृषी उत्पादन 12 दशलक्ष टणावरून 23 दशलक्ष टणापर्यंत वाढल्याचे निदर्शनास आले.

डॉ.एम.एस.स्वामीनाथन आणि नॉर्मल बोरलॉग यांनी जपानी वानासह मेक्सिकन बौने गव्हाच्या विविध जातींच्या क्रॉस ब्रीड साठी पुरवठा करण्याचे एकत्र काम केले. प्रायोगिक तत्त्वावर त्यांचे प्रारंभिक निष्कर्ष फलदायी मिळाले.पीक उत्पादन जास्त मिळाले. गुणवत्ता चांगली होती आणि रोगमुक्त होते. या यशानंतर त्यांनी विविध संकरित पिकांचे बियाणे विकसित केले. त्यामुळे प्रामुख्याने तांदूळ, गहू, हरभरा, मका इत्यादी खाद्यपदार्थांची उत्पादकता वाढली.

आधुनिक संकरीत बियाणा बरोबरच स्वामीनाथन यांनी शेतीसाठी प्रगत कृषी उपकरणावर लक्ष केंद्रित केले. यंत्रसामग्री पुरवठ्याच्या औद्योगिक विकासावर ही त्यांनी भर दिला. 1966 मध्ये युनायटेड स्टेटस मध्ये आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी (IAEA)च्या बैठकीत कृषी क्षेत्रातील न्यूट्रॉन रेडिएशनवर स्वामीनाथन यांनी दिलेल्या अहवालाचे वर्णन रूढी रॉबिन्झ यांनी 'युग निर्मिती' असे केले आहे. स्वामीनाथन आणि त्यांच्या सहकार्याचा अभ्यास अन्न विकीरणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण होता.

शेतीमालांना आधारभूत किंमत MSP मिळाली पाहिजे, भूक दूर करण्यासाठी, गरीब ग्राहकापर्यंत अन्नधान्य पोहोचवणे गरजेचे आहे. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा सल्लाही स्वामीनाथन यांनी सरकारला दिला.

**अन्नसुरक्षा**

तत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व स्थानिक गव्हाच्या जाती उंच होत्या. त्यांचे कान जड धान्याने भरलेले असताना या लॉज्ड म्हणजे (जमिनीवर सपाट पडलेल्या) लागवड केलेल्या गव्हाच्या कोणत्याही जातीमध्ये उत्पादन कमी न करता, झाडाची उंची कमी करण्यासाठी जीन्स नव्हती. डॉ.एम. एस. स्वामीनाथन यांनी मेक्सिकन गहू बटूंची क्षमता ओळखली जे बौने आहेत, रोगांना प्रतिरोधक आहेत आणि खते आणि सिंचन यासारख्या पुरेशा निविष्ठासह योग्यरीत्या व्यवस्थापित केल्यावर उच्च उत्पादन देणारे आहेत. हे संशोधन भारतामधील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करणे, मोठ्या प्रमाणात कृषीची उत्पादन क्षमता वाढविणे यासाठी महत्त्वपूर्ण ठरले.

**ग्रामीण विकास आणि शाश्वत शेती**

डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी शेती क्षेत्रातील संख्यात्मक व गुणात्मक उत्पादकता वाढवण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले. ग्रामीण भागाचा संपूर्ण विकास करण्यासाठी तसेच शाश्वत शेतीचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनी पर्यावरण तंत्रज्ञानावर आधारित जैव गावे आणि आधुनिक माहिती आणि दळणवळण आधारित ग्राम ज्ञान केंद्र (VKCs) यासारख्या नाविन्यपूर्ण प्रतिमानांचा वापर करून शाश्वत शेती आणि ग्रामीण विकासाला चालना दिली. तसेच 'प्रोटेक्शन ऑफ प्लांट व्हरायटीज अँड फार्मर्स राइट्स ॲक्ट 2001'(PPVFRA 2001) विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. कारण TRIPS आणि WTO अंतर्गत वनस्पती जातींना सुई जेनेरिक संरक्षण प्रदान करण्याच्या भारताच्या दायित्वाला प्रतिसाद म्हणून हा कायदा अनन्यसाधारण आहे. कारण हा कायदा केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर आदिवासी आणि ग्रामीण शेतकरी महिला आणि पुरुषांच्या संरक्षण आणि कृषी जैवविविधतेचे संवर्धन म्हणून बजावत असलेल्या महत्त्वाच्या भूमिकेला मान्यता देतो.

**हवामानाला लवचिक शेती**

डॉक्टर स्वामीनाथन यांनी भारतातील भौगोलिक विविधता व शेत जमिनीची प्रत लक्षात घेऊन कृषी वैज्ञानिकेमध्ये काही महत्वपूर्ण प्रयोग केले. प्रगत विज्ञान आणि शेतकऱ्यांच्या सहभागाद्वारे हवामान प्रतिबंधक शेतीचा पुरस्कार त्यांनी केला. त्यांचे असे मत होते की, हवामानातील बदल आणि समुद्राची वाढती पातळी यामुळे किनारपट्टीच्या जमिनीचे क्षारिकरण होण्याची शक्यता आहे. तेथे भात हे प्रमुख पीक घेतले जाते. डॉ.एम.एस.स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन(MSSRF) येथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रज्ञांनी 'सहभागी प्रजनन' द्वारे मीठ सहिष्णू ट्रान्सजेनिक, भाताच्या वानांच्या विकासावर प्रयोग सुरू केले. मानवी आरोग्य आणि पर्यावरणाची सुरक्षितता व जागृतता ही समाजातील तळागाळात असायला हवी यावरही ते ठाम होते. जैविक प्रणालीसाठी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे ,ज्ञात नसलेले, कोणतेही ट्रान्सजेनिक पीक वातावरणात आणले जाऊ नये असे त्यांचे मत होते.

अन्नसुरक्षिततेचे भवितव्य मुख्यत्वे जैविक आणि अजैविक घटकासह हवामान बदलाच्या युगात पूर, दुष्काळ, उच्च तापमान, क्षारता,निकृष्ट माती, कीटक आणि रोग तसेच हवामान बदलापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी जीन्सच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे. असे स्वामीनाथन यांचे मत होते. इंटरनॅशनल बायोडायव्हर्सिटी, इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर द सेमी अरीड सेमी अरिड ट्रॅपिक्स (TCRISAT) हैदराबाद आणि इतर अनेक आंतरराष्ट्रीय संस्था विज्ञानाआधारित समावेशक कृषी विकासाला चालना देण्यासाठी सुरू करण्यामागे स्वामीनाथन यांचे योगदान होते. त्यांनी शेतकऱ्यांची हित लक्षात घेऊन प्रत्येक संस्था बांधली आणि या संस्थानी शाश्वतेची पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे पूर्ण केली.संशोधनाची फळे सर्व शेतकऱ्यांपर्यंत विशेषता लहान आणि सीमांत आणि महिला शेतकऱ्यापर्यंत पोहोचतील यासाठी विशेष खात्रीलायक प्रयत्न झाले.कृषी विज्ञानाच्या प्रगतीसाठी आणि अन्नसुरक्षा सुधारण्यासाठी त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना 1987 मध्ये जागतिक अन्न पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराच्या रकमेतून त्यांनी चेन्नई येथे एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन ची स्थापना केली. शास्वत ग्रामीण विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करणे हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**स्वामीनाथन आयोग**

डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली 18 नोव्हेंबर 2004 ला 'राष्ट्रीय शेतकरी आयोग' केंद्र सरकारने स्थापन केला. स्वामीनाथन आयोगाने आपला अहवाल पाच टप्प्यांमध्ये सरकारला सादर केला. स्वामीनाथन आयोगाने नोंदविलेली निरीक्षणे व शिफारशी

*** शेतकऱ्यांची उदासीनता व क्लेश**

भारतीय शेतीतील अडचणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत आहेत.भू-सुधारणांचा अपूर्ण राबविलेला कार्यक्रम, पाण्याची उपलब्धता आणि गुणवत्ता यांचा अभाव, तांत्रिक अडचणी, अपुरा पतपुरवठा,बाजार समितीची अनउपलब्धता आणि मृदे संबंधित त्रुटी ही शेतीच्या संकटाची कारणे आहेत. यावर उपाय म्हणून, शेतकऱ्यांना जमीन, पाणी, जैवस्त्रोत, वित्त, विमा, तंत्रज्ञान, बाजार आणि माहिती या मूळ स्त्रोतांच्या उपलब्धतेचे व नियंत्रणाचे आश्वासन मिळायला हवे. कृषी हा विषय राज्यघटनेच्या समवर्ती सूचीत समाविष्ट केला पाहिजे. अशी शिफारस स्वामीनाथन आयोगाने केली.

***जमीन सुधारणा**

पिके आणि पशुधन या दोघांसाठी जमीन सुधारणा गरजेच्या आहेत. 1991- 92 ची आकडेवारी पाहता 50% ग्रामीण गरीब कुटुंबाकडे एकूण जमिनीपैकी 3% जमीन होती. तर 10% श्रीमंत कुटुंबाकडे 54% जमीन होती. म्हणजे जमीन उपलब्धतेत तीव्र भिन्नता आहे. यासाठी,मर्यादेपेक्षा जास्तीच्या जमिनी व निकस भूमीचे वाटप करून टाकावे. कृषी व वन्य जमिनींचे औद्योगिक गैर कृषी वापरासाठी होणारे हस्तांतरण टाळावे. वन्य जमातीच्या चरही क्षेत्रांच्या हक्काचे जतन करावे. मृदा पर्यावरण बाजार हे घटक स्थान परत्वे व ऋतू परत्वे विचारात घेऊन, त्यांची जमीन वापराशी सांगड घालून, सुयोग्य निर्णय घेण्यासाठी 'नॅशनल लँड युज अडवायझरी सर्विस' ही यंत्रणा उभारावी. जमिनीची विक्री होताना खरेदीदाराचा वर्ग कशासाठी खरेदी करतोय, किती जमीन खरेदी करतोय, या बाबीवर देखरेख व नियमन करण्यासाठी एखादी यंत्रणा उभारण्यात यावी. या शिफारशी केल्या.

***सिंचन विकास**

देशामध्ये 192 मिलियन हेक्टर ढोबळ लागवड क्षेत्रापैकी 60% क्षेत्र पर्जन्यधारीत असून तेथून 45% कृषी उत्पादन निघते. यामुळे अन्नधान्याची टंचाई संभावते. यासाठी शेतकऱ्यांना शाश्वत व न्याय पाण्याचा वाटा मीळावा म्हणून सधन सुधारणांची गरज आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करणे सक्तीचे करण्यात यावे. दशलक्ष विहीर पुनर्भरण कार्यक्रम राबवून खाजगी विहिरीनाही प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी सिंचनासाठी लक्षणीय गुंतवणुकीची तरतूद केली पाहिजे.

***कृषी उत्पादकता सुधारणे**

इतर देशातील दर हेक्टरी उत्पादन विचारात घेता भारतात ते बरेच कमी आहे. भूधारणेनंतर दर हेक्टरी उत्पादन हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम करणारा दुसरा मोठा घटक आहे. यासाठी कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधा विशेषतः सिंचन, निचरा, जमीन विकास, जलसंधारण, संशोधन विकास, रस्ते विकास, यासाठीच्या सार्वजनिक खर्चात लक्षणीय वाढ केली पाहिजे. मृदेतील सूक्ष्म घटकाच्या अभावाचे परीक्षण करण्यासाठी आधुनिक मृदा चाचणी प्रयोगशाळांचे राष्ट्रीय जाळे विकसित केले पाहिजे.मृदा आरोग्य, पाण्याचा सुयोग्य संख्यात्मक व गुणात्मक वापर, जैवविविधता इत्यादी घटकाचे जतन करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

***वित्त आणि विमा सुविधा**

देशातील शेतीमध्ये वेळेवर आणि पुरेसा पतपुरवठा ही लहान शेतकरी कुटुंबाची मूलभूत गरज आहे.यासाठी औपचारिक पतपुरवठा यंत्रणेची व्याप्ती वाढवून खरोखर गरीब व गरजू शेतकऱ्यापर्यंत ती पोहोचली पाहिजे. शासकीय मदतीने पीक कर्जावरील व्याजदर 4% पर्यंत कमी केला पाहिजे. दुष्काळग्रस्त भागात तसेच संकट काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या क्षमता जोपर्यंत पूर्ण होत नाहीत तोपर्यंत त्यांनी घेतलेल्या संस्थात्मक तसेच गैरसस्थात्मक कर्जाची वसुली व व्याजआकारणी थांबविण्यात यावी. सततच्या दुष्काळाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याच्या उद्देशाने 'एग्रीकल्चरल रिस्क फंड' उभारण्यात यावा. पट्टीदार प्रकारची शेती करणाऱ्या महिला शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड वितरित करावेत. पिक विमा, पशु विमा आणि स्वतः शेतकऱ्यांचा आरोग्य विमा असे एकत्रित विमा पॅकेज विकसित केले पाहिजे. पिक विमा सुदूर देश व सर्व पिकापर्यंत

पोहोचवावा. त्यांचा हप्ताही कमी असावा आणि ग्रामीण विम्याची व्याप्ती वाढविण्यासाठी 'रुरल इन्शुरन्स डेव्हलपमेंट फंड' उभारण्यात यावा. वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि संस्थात्मक विकास सेवा या चार घटकाच्या माध्यमातून गरिबाच्या राहणीमानात शाश्वत सुधारणेसह प्रोत्साहन दिले पाहिजे.

***अन्नसुरक्षा**

दरडोई अन्नधान्य उपलब्धता घटने आणि अन्नधान्याचे असमान वाटप याबाबी ग्रामीण व शहरी क्षेत्रांमध्ये अन्नसुरक्षेस बाधक ठरत आहेत. ग्रामीण क्षेत्रात तसेच पर्जन्य आधारित प्रदेशात दारिद्य व उपासमारीचे प्रमाण जास्त आढळते.यासाठी वैश्विक सार्वजनिक वितरण व्यवस्था अमलात आणली पाहिजे. असे केले तर शासनाला अन्न सबसिडीवर जीडीपीच्या 1% खर्च येईल. पोषण सहाय्य योजनांची पुनर्रचना करून पंचायत व स्थानिक संस्थांच्या सहभागाने या योजना स्वयंअनुवर्ती कराव्यात. एकात्मिक अन्न योजना विकसित करून पोषणातील सूक्ष्म पोषण द्रव्यांचा अभाव( छुपी उपासमार) दूर करावा. अन्न व जल साठवण या तत्त्वावर 'सामुदायिक अन्न व जलकोष' कम्युनिटी फूड अँड वॉटर बँक निर्माण करावेत. या कोषांचे चालन महिला बचत गट करतील. शेती उपक्रमाची उत्पादकता, गुणवत्ता व नफ्यात वाढ करण्यासाठी लघु व सीमांत शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे, यासाठी 'रुरल नॉन फार्म लाईव्हलीहुड इनेशेटिव्ह' योजना राबविली पाहिजे. रोजगार हमी योजना आणि कामाच्या बदल्यात अन्न ही तत्वे चालू ठेवून त्यातून राष्ट्रीय अन्न हमी कायदा केला पाहिजे. अन्नधान्य उपभोगास चालना दिल्यास अन्न उत्पादनास अधिक प्रोत्साहन मिळेल.

***शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रतिबंध**

गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र,केरळ, पंजाब, राजस्थान, ओरिसा आणि मध्य प्रदेशात या राज्यात आत्महत्या वाढत्या स्वरूपात झालेल्या निदर्शनास आल्या.

शेतकऱ्यांना परवडेल असा आरोग्य विमा पुरविला पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुनर्जीवन दिले पाहिजे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची व्याप्ती वाढवून ते आत्महत्येचे प्रमाण अधिक असणाऱ्या क्षेत्रापर्यंत पोहोचविले पाहिजे. राज्यस्तरावर शेतकरी आयोग स्थापन करण्यात यावा. या आयोगात शेतकऱ्यांनाही प्रतिनिधित्व देण्यात यावे. या आयोगामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सरकार योग्य प्रतिसाद देईल. सूक्ष्म वित्त धोरणात सुधारणा करून ते जीवन्नोती वित्त धोरण बनवावे. जीवनोन्नती वित्त धोरण म्हणजे पत पुरवठा व त्यासोबतच तंत्रज्ञान व्यवस्थापन आणि बाजार यासारख्या सेवा पुरविणे. पिक विमा सर्वच पिकापर्यंत पोहोचविला पाहिजे. तसेच पिक विमा ठरविण्याचे एकक तालुक्याऐवजी खेडे असले पाहिजे. सामाजिक सुरक्षेच्या योजना पुरविल्या पाहिजेत. यात वृद्धासाठी सामाजिक सुरक्षा व आरोग्य विम्याचाही समावेश असावा. पाण्याचे जतन आणि पुनर्भरण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. पाणी वापराच्या नियोजनाचे विकेंद्रीकरण केले पाहिजे आणि प्रत्येक खेड्यांनी जलस्वराज्य हे ध्येय ठेवून ग्रामसभेत पाणीपंचायतला प्राधान्य दिले पाहिजे. गुणवत्तापूर्ण बियाणे व इतर आदाने परवडण्याजोगे दरात योग्य वेळी व योग्य ठिकाणी उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पीक नुकसान झाल्यास किंवा खर्चही न निघाल्यास शेतकऱ्यांची गुंतवणूक वाया जाऊन त्याचा शेतकऱ्यावर मोठा आघात होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी जोखीम व कमी खर्चिक असे तंत्रज्ञान पुरविले पाहिजे. काही महत्त्वाच्या पिकासाठी बाजार हस्तक्षेप योजनेची व्याप्ती वाढविली पाहिजे. किमतीच्या चढउताराचा फटका शेतकऱ्यांना बसू नये यासाठी किंमत स्थिरीकरण योजना सुरू करावी.आंतरराष्ट्रीय किमतींचा आघात देशी शेतकऱ्यावर पडू नये यासाठी आयात शुल्क स्तरावर कारवाई करावी. (आयात शुल्कात कपात करू नये किंवा त्यात वाढ करावी) आत्महत्याग्रस्त भागामध्ये ग्रामज्ञानकेंद्रे किंवा ज्ञान चौपाल उभारावेत.आत्महत्या पासून शेतकऱ्यांना परावृत करण्यासाठी जनजागृती अभियान राबविले पाहिजे.

***शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढविणे**

अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात स्पर्धकात्मकतेस प्रोत्साहन दिले पाहिजे. विक्री योग्य अधिशेषात वाढ करण्यासाठी भरवशाचा योग्य मोबदला देणाऱ्या बाजाराची आवश्यकता असते. यासाठी 'स्मॉल कॉटन फार्मर्स इस्टेट' यासारख्या शेतकऱ्यांच्या वस्तू आधारित संस्थांच्या स्थापनेस प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे शेतकरी ते ग्राहक थेट बाजार यंत्रणा विकसित होऊन मध्यस्थींची संख्या कमी होऊ शकते. किमान आधारभूत किंमत योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा कराव्यात. गहू आणि

तांदूळ वगळता इतर पिकांच्या किमान आधारभूत किंमत योजनेत सुधारणा करण्यास वाव आहे.सार्वजनिक वितरण व्यवस्थेत मिलेट व इतर पोषक तृणधान्याचा समावेश करावा. कृषी वस्तूंच्या चालू किमती व भविष्यकालीन अंदाजाची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध झाली पाहिजे. यासाठी वस्तू वायदे बाजार व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इलेक्ट्रॉनिक जाळ्यांची मदत घेता येईल. किमान आधारभूत किंमत ही उत्पादन मूल्याच्या 50% पेक्षा जास्त (दीडपट)असावी.राज्यांच्या कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यान्वये कृषी उत्पन्न बाजार समित्या या कार्य करतात. त्याचे कार्य कृषी बाजार साठवण व प्रक्रियेशी संबंधित आहे. याही पलीकडे या समित्याने ग्रेडिंग, ब्रॉडिंग, पॅकेजिंग वर काम करावे. स्थानिक उत्पादनासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजार निर्माण करावीत आणि एकल भारतीय बाजार स्थापन करण्याचे प्रयत्न करावेत.

***रोजगार उपलब्धता**

देशामध्ये 1961 मध्ये कृषीवर अवलंबून असणार्याचे प्रमाण 75.9% होते. ते 1999 ते 2000 मध्ये 59.9% वर आले. भारतात या रचनेत हळूहळू बदल होताना दिसत असले तरी कृषी हे रोजगार पुरविणारे मोठे क्षेत्र राहिलेले दिसते. भारतात रोजगार धोरण ठरविताना दोन गोष्टी केल्या पाहिजेत1}उत्पादक रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि 2} रोजगाराच्या गुणवत्तेत वाढ करणे.

यासाठी आर्थिक वृद्धी दरास चालना दिली पाहिजे. अधिक रोजगार निर्मितीक्षम क्षेत्र शोधून त्याच्या वाढीस प्रोत्साहन दिले पाहिजे. श्रम मानकांना धक्का न लावता श्रम बाजारात आवश्यक सुधारणा कराव्यात. गैर कृषी क्षेत्रामधील जसे व्यापार, हॉटेल, वाहतूक, बांधकाम, दुरुस्त्या, इतर सेवा यामधील रोजगार संधींना प्रोत्साहन दिले पाहिजे, एक साधारण सरकारी नौकर जितके कमावतो तितके शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न झाले पाहिजे.

***जैव स्त्रोत संरक्षण**

भारतातील ग्रामीण लोक पोषण व इतर बाबीसाठी मोठ्या प्रमाणावर जैवस्त्रोतावर अवलंबून असतात. यासाठी जैवविविधतेपर्यंत पोहोचण्याच्या काही परंपरागत हक्काचे जतन केले पाहिजे. जसे औषधी वनस्पती, मध्, डिंक, तेले इत्यादी गोळा करणे. संकरशास्त्राचा वापर करून विविध पिके, पशु व माशांच्या जातीचे जतन व सुधारणा केल्या पाहिजेत. देशी वाणांची निर्यात व परदेशी वानांची आयात करून प्राण्यांची उत्पादकता वाढविता येऊ शकते.

अशाप्रकारे डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या आयोगाने भारतातील शेती व ग्रामीण विकासासाठी विविध शिफारशी व सुधारणा केल्याच्या दिसून येतात म्हणून डॉ. स्वामीनाथन यांचे हरित क्रांतीतील व शेती विकासातील योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष कढण्यात आले आहेत ते पुढील प्रमाणे.

1) डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांची कौटुंबिक परिस्थिती व शैक्षणिक स्थिती व व्यावसायिक स्थैर्यता चांगली असूनही त्यांनी राष्ट्रप्रेम व देशसेवा यासाठी स्वतःला वाहून घेतले व भारताला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनविण्यासाठी आपल्या संशोधनाचे अनेक प्रयोग भारतीय शेतीमध्ये केले.
2) डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी भारतातील अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेसाठी झाडे, प्रजनन,कृषी संशोधन आणि विकास आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनावरती अधिक भर दिला.वर्ष 1949 ते 55 या कालावधीत बटाटा (सोलॅनम ट्यूबरोजम),गहू (ट्रिटिकम एस्टिव्हियम), तांदूळ (ओरिझा सॅटीवा) आणि ज्यूट अनुवंशशास्त्र यावर संशोधन केले.वर्ष 1955 ते 72 या कालावधीत मेक्सिकन बौने गव्हाच्या वाणांवर ,सायटोजेनेटिक्स,रेडिएशन जेनेटिक्स आणि म्यूटेशन ब्रीडिंग इत्यादीबाबत संशोधने केले.
3) जनुकीय बदल केलेले नवीन बियाणे किंवा पीक प्रजाती, आहे त्याच जमिनीमध्ये त्याची लागवड अथवा पेरणी कशा पद्धतीने करायची आणि उत्पादनामध्ये भरघोस वाढ मिळवायची पद्धत स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांना शिकविले. हरितक्रांती युगाच्या पहिल्या वर्षात पीक उत्पादन पातळी तिप्पट झाल्यामुळे ही कामगिरी आश्चर्यचकित करणारी होती.

4) तत्कालीन परिस्थितीमध्ये सर्व स्थानिक गव्हाच्या जाती उंच होत्या.गव्हाच्या कोणत्याही जातीमध्ये उत्पादन कमी न करता, झाडाची उंची कमी करण्यासाठी जीन्स नव्हती. डॉ.एम. एस. स्वामीनाथन यांनी मेक्सिकन गहू बटूंची क्षमता ओळखली जे बौने आहेत, रोगांना प्रतिरोधक आहेत आणि खते आणि सिंचन यासारख्या पुरेशा निविष्ठासह योग्यरीत्या व्यवस्थापित केल्यावर उच्च उत्पादन देणारे आहेत. हे संशोधन भारतामधील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करणे, मोठ्या प्रमाणात कृषीची उत्पादन क्षमता वाढविणे यासाठी महत्त्वपूर्ण ठरले.
5) आधुनिक संकरीत बियाणा बरोबरच स्वामीनाथन यांनी शेतीसाठी प्रगत कृषी उपकरणावर लक्ष केंद्रित केले.यंत्रसामग्री पुरवठ्याच्या औद्योगिक विकासावर ही त्यांनी भर दिला.
6) डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली 18 नोव्हेंबर 2004 ला 'राष्ट्रीय शेतकरी आयोग' केंद्र सरकारने स्थापन केला.स्वामीनाथन यांनी डिसेंबर 2004,ऑगस्ट 2005, डिसेंबर 2005, एप्रिल 2006 व आक्टोबर 2006 मध्ये प्रत्येकी एक असे पाच अहवाल शासनाला सुपूर्द केले. या अहवालाचा विषय अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या लक्ष्याशी समांतर म्हणजे गतिशील व समावेशक वाढ असा होता शेतकऱ्यांचा सर्वसमावेशक विकास करण्यासाठी त्यांनी शेतकरी क्लेश, जमीन सुधारणा, सिंचन, कृषी उत्पादकता, वित्त आणि विमा, अन्नसुरक्षा शेतकरी आत्महत्या शेतकरी स्पर्धात्मकता, रोजगार या अनुषंगाने महत्त्वपूर्ण शिफारशी सरकारकडे केल्या आहेत.

## शिफारशी

1) डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी कृषी विज्ञान मध्ये केलेली संशोधने, शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून, या संशोधनाचा उपयोग पूर्ण क्षमतेने संपूर्ण भारतभर करण्यात यावा. यासाठी सरकारने अल्पभूधारक शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानाच्या स्वरूपात हे तंत्रज्ञान पुरवठा करावे.
2) डॉ.एम.एस.स्वामीनाथन आयोगाने भारतीय शेती विकासासाठी केलेल्या शिफारशी संपूर्णतः स्वीकारून शेती क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी, शेती बारमाही सिंचनाखाली खाली आणण्यासाठी, कृषी मालाला उत्पादन खर्चावर अनुसरून आधारभूत किमती मिळण्यासाठी, शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी व राष्ट्राचे उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारने शेती क्षेत्राला भरघोस अनुदान द्यावे व हे अनुदान लाभार्थ्यापर्यंत पारदर्शकपणे पोहोचत आहे किंवा नाही याची खात्री करावी.

## संदर्भसूची

1) इंडियन इकॉनोमी, गौरव दत्त/ अश्विनी महाजन, 71 वी आवृत्ती, एस चांद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्ली.
2) कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, डॉ. विजय कवी मंडन , श्री मंगेश प्रकाशन नागपूर.
3) भारतीय अर्थव्यवस्था, प्रा. रायखेलकर /रामजी, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद.
4) इकॉनॉमिक्स, डॉ. किरण देसले, 9 वीआवृत्ती जानेवारी 2020, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव.
5) https://en.wikipedia.org/wiki/M._S._Swaminathan
6) https://www.thehindu.com/sci-tech/agriculture/agricultural-scientist-architect-of-green- revolution-ms-swaminathan-passes-away/article67356103.ece
7) https://www.britannica.com/biography/M-S-Swaminathan

# आदिवासी मराठी कवितेतील स्त्रीजीवन

**प्रा.डॉ.बबन अण्णासाहेब गित्ते**
मराठी विभाग,
कै.सौ.शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड,
जि.परभणी
baban.gitte12@gmail.com

**प्रस्तावना**

इ.स. १९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यविश्वात विविध प्रवाह जोरकसपणे सामील झाले. त्यातील आदिवासी साहित्य हा प्रवाह महत्त्वाचा वाङ्मय प्रवाह होय. समाजातील वेगवेगळ्या समूहांना आलेल्या नव्या आत्मभानामुळे दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी या प्रवाहांतून साहित्यनिर्मिती होऊ लागली. आदिवासी साहित्य हे मुळात आदिवासी समाजाच्या व्यापक परिवर्तनाच्या चळवळीतून निर्माण झालेले साहित्य होय. इथल्या भूमीचा मूळ रहिवासी असलेला आदिवासी आज डोंगरदऱ्यात, निसर्गाच्या सान्निध्यात वास्तव्याला आहे, तो केवळ इथल्या प्रस्थापित समाजव्यवस्थेमुळे. यासंबंधीच्या भावना आदिवासी कवितेतून व्यक्त होताना दिसतात. आदिवासी स्त्रियांनी लिहिलेली कविता मुळातच खोलवर आघात करणारी आहे. आदिवासी स्त्रियांनी फुले-शाहू-आंबेडकरांचे नाते फुलवत कविता रचली आहे.

आदिवासी कवितेतून स्त्रीजीवनाचे चित्रण आदिवासी कवयित्रिंनी जसे केले त्याप्रमाणेच पुरुष आदिवासी कवींनीही केल्याचे दिसते. कारण, स्त्री ही मुळातच शोषित, पुरुषी अहंकारात दबल्या गेलेली असल्याने तिच्या वाट्याला पुरुषांपेक्षा नक्कीच जास्त दुःख आले आहे. आज स्त्री 'सबला नारी' म्हणून घोषणा दिल्या जातात. मात्र प्रत्यक्षात तिच्यावर जास्त संकटे, वेदना, दुःख येतात. त्यातून ती आपल्या वेदना काव्यबद्ध करताना दिसते. दुःखावर फुंकर घालण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे या आदिवासी स्त्रियांच्या वेदनेला उजाळा मिळावा, तिचे दुःख जगाला अजून चांगल्या प्रकारे कळावेत म्हणून मी प्रस्तुत शोधनिबंधातून आदिवासी मराठी कवितेतील स्त्रीजीवनावर प्रकाश टाकणार आहे. अभ्यास करणार आहे

आदिवासी समाजामध्ये फार पूर्वीपासून मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात असल्याचे लक्षात येते. आदिवासी स्त्री ही कष्टाळू, मेहनती आहे. स्वतः कष्ट करून कुटुंबाला आधार देते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासी स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर अन्याय-अत्याचार सहन करावा लागला. त्यामुळे त्या भेदरलेल्या अवस्थेत जीवन जगताना दिसतात. जंगलात वाघाला न घाबरणारी स्त्री आज-काल सावकार, अधिकारी, शेठजी यांना घाबरते. वास्तविक पाहता स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासी स्त्रियांचे मोठ्या प्रमाणात शारीरिक, मानसिक, आर्थिक व लैंगिक शोषण केले गेले. पोटाची भूक, उपासमार, जंगल कायदे, दारिद्र्य, अज्ञान यामुळे आदिवासी स्त्रिया आधुनिक आणि प्रगत भोगवादी संस्कृतीना बळी पडताना दिसतात. लेखिका संघजा मेश्राम मराठी साहित्यातील आदिवासीचे स्त्री-जीवन चित्रणासंदर्भात म्हणतात की, "मराठी साहित्यात आदिवासी स्त्रीचे चित्रण असंस्कृत, लाचार, बलत्कारित, परित्यक्त्या अशा प्रकारचे दिसते. तर चित्रकलेतील आदिवासी स्त्री ही उत्तान, अर्धनग्न, स्वैर किंवा मुक्त अशी दाखविलेली आहे. हा एक फरक साहित्य व चित्रकलेच्या संदर्भात असला तरी दोन्ही प्रकार मी अत्याचारी समजते."[१] यावरून असे म्हणता येईल की, साहित्यात असो की प्रत्यक्षात आदिवासी स्त्रीची केवळ आणि केवळ उपेक्षाच झालेली दिसते.

आदिवासी स्त्री कवयित्रीमध्ये पहिल्या पिढीतील ज्येष्ठ कवयित्री उषाकिरण आत्राम (म्होरकी), सौ.कुसुम आलाम (रान आसवांचे तळे) या दोन कवयित्रीनी लेखन करून आदिवासी स्त्रीच्या वेदना, दुःख काव्यात मांडले आहे. त्याचबरोबर आदिवासी कवींनीही आदिवासी स्त्रियांचं जीवन चित्रण आपल्या कवितेत केले आहे. त्यात भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, कृष्ण कुमार चांदेकर यांच्यासह अन्य कवींनीही स्त्रीजीवनाला कवितेत वाट मोकळी करून दिली आहे.

**भुजंग मेश्राम**

भुजंग मेश्राम यांच्या 'उलगुलान' या कवितासंग्रहातील कविता ही प्रस्थापितांच्या सर्व प्रकारच्या आक्रमणाला, शोषणाला विरोध दर्शविणारी कविता आहे. किंबहुना अशा आक्रमणाविरुद्ध लढा उभारणारी, आवाज उठवणारी, एका नव्या क्रांतीला

आवाहन करणारी कविता आहे. त्यांनी आदिवासी स्त्रियांच्या व्यथा, वेदना कवितेत मांडून स्त्रियांच्या दु:खाला उजागर केले आहे. भुजंग मेश्राम म्हणतात-

*"गवताच्या भाऱ्याला खुपसलेला*
*ईळा काढला की,*
*काटा काढल्यावर सांडणाऱ्या रगता समान*
*एकेक आठवणींचा थेंब पडते टपटप."*[२]

कवितेच्या वरील ओळी वाचल्यावर असे लक्षात येते की, आदिवासी स्त्रियांचे जीवन हे दु:खांनी भरलेले आहे. त्यांचे आयुष्य हे रक्ताळलेल्या जखमांनी भळभळते. अपार कष्ट करून संसाराचा गाडा ओढताना तिची घालमेल होते. बाहेर पडल्यानंतर लोकांच्या वखवखलेल्या नजरा अंगभर दंश करतात. काही वेळा जबरदस्तीचे प्रसंगही ओढवले जातात. अशा विविध पातळ्यांवरील संघर्षाला सामोरे जात तिला जगावे लागते.

**वाहरू सोनवणे**

कवी वाहरू सोनवणे ही भिल्ल आदिवासी या जमातीत जन्मलेले. त्यांच्या कवितांमधून आदिवासी स्त्रीचे दु:ख वास्तव पातळीवरून प्रकट होताना दिसते. त्यांनी आदिवासी श्रमिकांच्या चळवळीत काम केले आहे. स्त्रियांवरील दडपशाही आणि शोषणाचे जीवनातील अस्तित्वही काही कवितांमधून व्यक्त झाले आहे. सोनवणे यांची स्त्रीमुक्तीची ही जाणीव समग्र मानुषतेच्या निर्मितीची आस घेऊन प्रकटते. आदिवासी स्त्री अपार दु:ख घेऊन जगते. त्याला अंत नाही. म्हणून त्यांच्या कवितांतून दु:खाने भरलेले स्त्रियांचे जग उभा राहते, 'गोधड' कविता संग्रहातील 'घायल तस्वीर' या कवितेत वाहरू सोलवणे म्हणतात की,

*"हँस बहनजी, हँस... थोडी हँस*
*कॅमेऱ्याने नजर भिडवून तिला हसण्याचा*
*आग्रह केला.*
*ती अशी घायल, की, बोललीच नाही*
*क्षणाच्या आधारावर*
*जन्मभरच्या दु:खाला धक्का देऊन*
*ओठावर मुस्कान आणू शकली नाही"*[३]

वरील कवितेच्या ओळी लक्षात घेतल्यावर असे म्हणता येते की, आदिवासी स्त्रियांना मोठ्या कष्टातून जीवन जगावे लागते. पिढयानपिढयाच्या वेदना, दु:ख घेऊन ती जगते. त्यामुळे तिच्या जीवनात सुखाचा दिवस कधी उगवलाच नाही. या दु:खमय परिस्थितीत कॅमेऱ्याकडे पाहून तिला हसणे कसे बरे येईल, तिच्या मनात जन्मभराचे दु:ख आहे. त्या दु:खाला मागे सारून हसणे तिला जमणार नाही. त्याचप्रमाणे आदिवासी समाजात जन्म होणे म्हणजे दु:खाचा डोंगर जन्मल्याबरोबर पेलणे होय. त्यामुळे आयुष्यभर तिला संघर्ष करावा लागतो. यासंदर्भात 'जिवंत सावली' या कथेत सोनवणे वाहरु म्हणतात की,

*"स्त्री पुरुषाची सावली*
*जाते मागे मागे*
*पाव पावलावर पाऊल टाकत,*
*माणुसकीचं स्वतंत्र अस्तित्व*
*नाकारलेल्या व्यवस्थेनं*
*तेव्हापासून डुबक्या खात*
*ती वाहत आली आहे*
*गुलामगिरीच्या पुरात*
*इथपर्यंत"*[४]

यावरून असे म्हणता येते की, आदिवासी स्त्री ही पुरुषाला सावलीसारखी साथ देते. आदिवासी समाजाने स्त्रीला स्वातंत्र्य दिले असले तरी हिंदू संस्कृतीने स्वातंत्र्य नाकारले आहे. हिंदू संस्कृतीची धारणा आहे की, स्त्री ही गुलाम असते. वाहरू सोनवणे

यांनी आदिवासी स्त्रियांच्या वेदनेला शब्दरूप दिले आहे. वास्तववादी जीवनात आदिवासी स्त्री अशाप्रकारे जीवन जगते. त्या स्त्रीच्या वेदना काय आहेत, त्यांना कोणत्या यातना सहन कराव्या लागतात, याचे चित्रण त्यांनी वास्तव पातळीवरून केले आहे.

**उषाकिरण आत्राम**

आदिवासी कवयित्रींमध्ये उषाकिरण आत्राम यांचे स्थान उच्च पातळीवरचे आहे. आदिवासी स्त्रियांच्या दुःखाला पाझर फोडताना त्यांची कविता डगमगत नाही तर, बिनधोकपणे पुरुषी अहंकारावर आसूड ओढते. १९९७ साली प्रकाशित झालेला त्यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह म्हणजे इथल्या समाजव्यवस्थेला दिलेले चोख उत्तर होय. आदिवासी स्त्रियांनी आता अन्यायाच्या विरोधात विद्रोह केला पाहिजे, ही भूमिका आत्राम घेतात. रडत, कुढत, अत्याचार सहन करीत बसण्यापेक्षा अत्याचार करणाऱ्यांना ठेचले पाहिजे, ही भूमिका घेऊन आत्राम यांनी आदिवासी स्त्रियांचे दुःख, वेदना यांना वाचा फोडली आहे. आदिवासी समाज वर्षानुवर्षे दारिद्र्यात जीवन जगतो आहे. म्हणून त्यांना मन, भावना, स्वातंत्र्य नाही का? असा प्रश्नही त्या उपस्थित करतात.

उषाकिरण आत्राम यांनी 'म्होरकी' या कथासंग्रहातील 'जखम' या कवितेत आदिवासी स्त्रीच्या वेदना प्रखरपणे मांडल्या आहेत.

*"माय! ते म्हणले*
*तूही जखम इतकी किती मोठी हाये?*
*तुझे दुःख इतके कितीक मोठे हाये ?*
*जखमेची जात-जखमेची खोली*
*का कधी सांगता येते?"*[५]

वरील कवितेच्या ओळी वाचल्यानंतर लक्षात येते की, आदिवासी स्त्रियांचे दुःख हे फार मोठे आहे. आणि ते कित्येक वर्षांपासूनचे आहे. त्या वेदना, जखम आदिवासी स्त्रीच्या मनात एवढी खोलवर झाली आहे की, त्याचा अंत नाही.

'पयसाची लय आग व्हय' या कवितेतून आत्राम यांनी आदिवासी स्त्रियांनी खोट्या आमिषाला बळी पडू नये, असे सांगतले आहे. हे जग फार विचित्र आहे. त्यामुळे जपून वागलं पाहिजे. नराधम रस्त्या रस्त्यांवर टपून बसले आहेत. त्यामुळे आजन्म सावध राहा असे त्या म्हणतात,

*"वाटेने जातेस तर समद्या डोयाले आग लागण,*
*राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बापयाची*
*म्हणून म्हणते, तू रातराणी होऊ नगं*
*व्हसील तर पैशाची लाल तांबूटी आग व्हय!*
*नाहीतर बिब्याची फुल व्हय"*[६]

यावरून असे लक्षात येते की, आज आदिवासी स्त्री सुरक्षित नाही. या आधुनिक जगात सुधारणेच्या नावाखाली वखवखलेल्या नजरा आदिवासी स्त्रियांना त्रास देणाऱ्या आहेत. त्यामुळे या व्यवस्थेबरोबर नजरेला नजर भिडवून दोन हात करायला तयार राहणे गरजेचे आहे, हे लक्षात येते. असे आत्राम सूचवितात.

**कुसुम अलाम**

'रान आसवांचे तळे' हा कुसुम अलाम यांचा काव्यसंग्रह म्हणजे शतकानुशतके एकांत धारण करणाऱ्या परंतु आतल्या आत दुःखाश्रू ढाळणाऱ्या किर्र अबोल रानाची कैफियत आहे. मूळनिवासी समूहाच्या सर्वनाशावर उठलेल्या क्रौर्याला दग्ध करू पाहणारी ती वाङ्मयीन दाहकता आहे. अलाम यांनी आपल्या आदिवासी स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केले आहे. आदिवासी स्त्री अजूनही दुर्लक्षित आहे. समाजव्यवस्थेत तिला अजूनही मानाचे स्थान नाही. तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अद्याप बदललेला नाही.

तरुण देखण्या आदिवासी पोरींची 'किंमत' ठरविणारी इथली व्यवस्था आणि मानसिकता या दोहोंचाही धिक्कार 'कमला' या कवितेत अलाम यांनी केला आहे. आदिवासी स्त्रीच्या स्थितीगतीचे हे चित्रण फारच विदारक आहे.

*"दिसू लागल्या पडद्यावर आदिवासा पोरी*
*टांगेवाला त्यांची किंमत करी*
*दोनशे तिनशेला कमला ठरली*
*प्रेसवाल्याची कामगिरी फत्ते झाली."*[७]

अलाम यांच्या कवितेच्या ओळी वाचल्यानंतर लक्षात येते की, स्त्रीच्या दुःखाचा कैवार घेणारी ही कविता आहे. स्त्री जीवनातील दुःख, तिच्यापुढील आव्हाने आणि ती पेलण्याचे सामर्थ्य अंगी येण्यासाठी हवी असलेली सज्जता याचे वेधक चित्रण या कवितेल आढळते. त्यात कसलाही अतिरेक वा कृत्रिमता नाही. पुढे त्या म्हणतात की,

*"बलात्कार, विनयभंगाचे आक्रोश सुध्दा*
*आमच्या मनात जागवू नयेत!*
*मनू संस्कृतीला झुगारून*
*नव्या वाटा शोधण्याचे सामर्थ्य*
*आजच्या मर्दानीत नाहीत?*
*का या मातीचा गर्भच आता वांझोटा झाला ?"*[८]

यावरून हे लक्षात येते की, इथल्या समाजव्यवस्थेने आदिवासी स्त्रियांवर अनन्वित अन्याय- आत्याचार केले आहेत. त्यामुळे आता आपणास नवा विचार, नव्या वाटा शोधल्या पाहिजेत. त्या वाटा शोधण्याचे सामर्थ आदिवासी स्त्रीने अंगी बाणवले पाहिजे, तरच स्त्रियांना या जोखडातून बाहेर पडता येईल अन्यथा नाही. म्हणून आदिवासी स्त्रियांना त्यांनी हा संदेश दिलेला आहे.

**कृष्णकुमार चांदेकर**

कृष्णकुमार चांदेकर हे पुरोगामी चळवळीत संघटक म्हणून कार्य करीत असून ते संवेदनशील मनाचे आहेत. आपल्या सभोवताली असलेल्या विविध गटांतील लोकांची दुभंगलेली मानसिकता, असाहाय्यपणे, पांघरलेले कृत्रिम विचार, खोटेपणा व खोटा दंभ यावरही ते कोरडे ओढतात. त्यांच्या 'पतुसा' या कविता संग्रहातील काही कवितांमधून स्त्रियांची आक्रंदने ऐकू येतात. आपल्या भगिनींचे दुःख कवितेत मांडताना त्यांचे संवेदनशील मन जागृत होते. आदिवासी समाजातील स्त्रिया या समाजव्यवस्थेच्या कशा बळी ठरल्या आहेत, ते रोखठोक सांगतात. आपल्या कवितेतून आदिवासी स्त्रियांचे दुःख मांडताना म्हणतात,

*"व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या*
*माझ्या माय बहिणी*
*संस्कृतीच्या नावावर दंडी फंडी नेसतात*
*तेव्हा काही संधीसाधू*
*कलात्मकतेच्या नावावर कॅमेरा ऑन करतात."*[९]

यावरून हे लक्षात येते की, आदिवासी समाजात अठराविश्वे दारिद्रय असते. समाजव्यवस्थेच्या बळी ठरलेल्या या स्त्रिया आहेत. त्यामुळे त्यांना अंगभर वस्त्रही मिळत नाही. परिणामी अर्धनग्न राहावे लागते. मात्र, काही शेठजी कलात्मकतेच्या नावावर आदिवासी स्त्रियांचे असे फोटो काढून त्याचे प्रदर्शन भरवून अमाप पैसा मिळवितात. या सर्व गोष्टींना इथली समाजव्यवस्था जबाबदार आहे, असे दिसते. या समाजव्यवस्थेने आदिवासी स्त्रियांना कार छळले आहे. पुढे चांदेकर म्हणतात की,

"माझ्या आया-बहिणींनो!
तुम्ही रोज जळून राख होता...
टिमटिमत्या ठिणग्यांच्या ज्वाला व्हा
या संस्कृतीच्या विकृतीची धिंड काढा
ढोंगी महात्म्यांचे मुडदे पाडा"[१०]

यावरून असे म्हणता येईल की, चांदेकर हे आदिवासी स्त्रियांना अन्यायाच्या वणव्याने रोज रोज जळून मरण्यापेक्षा तुम्ही ज्वाला बना. आणि या विकृती संस्कृतीने जो तुमचा छळ मांडला आहे, त्याला एकदाचे जाळून टाका तसेच समाजातील ढोंगी व

स्वतःला महात्मा म्हणवून घेणाऱ्यांचे मुडदे पाडा. आणि निर्भयपणे जगा. असे ते कवितेतून आदिवासी स्त्रियांना सांगतात. किती दिवस हा अन्याय सहन करायचा? असा सवालही ते उपस्थित करतात.

**बाबाराव मडावी**

बाबाराव मडावी हे आदिवासी मराठी साहित्यातील आघाडीचे नाव. त्यांनी आदिवासी जीवन अनुभवले आहे. कितीही कष्ट केले तरी आदिवासी स्त्रियांच्या जीवनात प्रगती होत नाही. हे त्यांनी जाणलले आहे. आदिवासी स्त्री ही कष्टाळू आहे. पण तिच्या श्रमाला किंमत मिळत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करीत असले तरी आदिवासींच्या जीवनात विकासाचा, प्रगतीचा उजेड पडलाच नाही. म्हणून मडावी एका कवितेत म्हणतात,

"माय तू अशी कव्हर करत राहशील व,
कव्हर कष्ट करत राहशील व."[११]

यावरून असे लक्षात येते की, आदिवासी स्त्रियांना मरेपर्यंत कष्ट उपसत राहावे लागते. कष्टासाठी जगणे हा त्यांचा स्थायीभाव बनला आहे. या कष्टात ती आपली स्वप्ने विसरून जाते. संसारासाठी कष्ट उपसणे हेच तिच्या नशिबी असल्याने मडावी आईला विचारतात की, कुठवर करत राहणार ही कामे, कष्ट याला त्यांच्या दृष्टीने अंतच दिसत नाही.

दलित कवितेप्रमाणेच आदिवासी कविताही विपुल प्रमाणात बहरली आहे. नवनवे उन्मेष काव्याच्या माध्यमातून आदिवासी साहित्यप्रवाहाला संपन्न करीत आहेत. आदिवासी समाजातील शिकलेल्या पिढीतील आदिवासी कवी जीवनवास्तवाचे चित्रण करीत असल्यामुळे त्यांचे पृथक अनुभवविश्व, त्यांच्या भाषेची विशिष्ट मांडणी, अभिव्यक्तीच्या आगळ्या लकबी त्यांच्या लेखनातून साकारताना दिसतात. मराठी कवितेचे रुढ असलेले संकेत झुगारुन आदिम विश्वाची दखल घेणाऱ्या आदिवासी स्त्रीजीवनावरील कविता आहेत. नकार व विद्रोह हा आदिवासी कविताचा स्थायीभाव आहे. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाच्या व्यथा, वेदनांना वाट करून देणाऱ्या या कविता आहेत. आदिवासी स्त्रीची कविता ही स्त्री शोषणाचा इतिहास, तिची असहायता, अगतिकता, पुरुषांच्या वासनांध वृत्तीला बळी पडणाऱ्या आदिवासी स्त्रिया व त्यांच्या जीवनातील भूक आणि दारिद्र्याचे भीषण प्रश्न ही कविता मांडते, त्याचप्रमाणे या कवितेतून स्त्रीची अस्मिताही काही कवितांतून जागी झालेली आहे. आदिवासी कवितेतून स्त्रियांवरील होणाऱ्या अन्याय-अत्याचारा बरोबरच तिचे होणारे शोषण, दारिद्र्यामुळे तिची होणारी परवड समाजाच्या वखवखलेल्या नजरानी गांजून गेलेल्या आदिवासी स्त्रीला तिच्या सामर्थ्याचा झालेला साक्षात्कार अशा विविध भावजीवनाचे चित्रण अनेक आदिवासी कवी-कवयित्रींनी आपल्या कवितेतून केले आहे. हे करत असताना त्यांनी इथल्या समाजव्यवस्थेला, विकृत संस्कृतीला अक्षरशः झोडपून काढले आहे. संस्कृतीवर प्रश्नांचा भडीमार करून आदिवासी स्त्री ही सामान्य माणूस असताना तिचे जगण्याचे अधिकार काढून घेण्याचे पाप ज्या समाजव्यवस्थेने केले आहे, त्याचा जाब कवी कवितेतून विचारतात.

आदिवासी कवी कवयित्री यांनी स्त्रीजीवनाचा कवितेतून भावाविष्कार घडवताना भाषेची कुठलीही मर्यादा न पाळता विद्रोही भाषाशैलीतून संस्कृतीवर आसूड ओढले आहेत. हे करताना त्यांची लेखणी कुठेच कमी पडत नाही. आदिवासी समाजाची बोली भाषा असलेल्या भाषेत काही कविता लिहिल्या आहेत.

**समारोप -**

एकंदरीत प्रस्तुत शोधप्रबंधातून ज्या आदिवासी कवी-कवयित्रींच्या स्त्री जीवनाबद्दल लिहिलेल्या, त्यांचे दुःख, वेदना, अन्याय - अत्याचार, पुरुषी अहंकारी वृत्ती, सुधारणेच्या नावाखाली ढोंगी महात्म्यांनी केलेला अनन्वित अत्याचार या सर्व बाबी या कवितेत आल्या आहेत. हे सर्व कवी आदिवासी मराठी कवितेच्या क्षेत्रात मान्यता पावलेले आहेत. या सर्व कवींनी आपल्या कवितेतून आदिवासी स्त्रियांचे दुःख, वेदना मांडून खऱ्या अर्थाने संस्कृतीचे, समाजव्यवस्थेचे वाभाडे काढले आहेत. तसेच आदिवासी कवितालेखनाच्या क्षेत्रात मोलाची भरही टाकली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनमर्यादेमुळे त्यांच्या अनेक कवितांतून आलेले स्त्रीजीवन शोधनिबंधात घेता आले नाही. याव्यतिरिक्त अन्य आदिवासी कवींनी केलेल्या स्त्रीजीवनावरील कवितेमुळे आदिवासी कविता समृद्ध झाली आहे, हे विसरून चालता येणार नाही. उपरोक्त कवी-कवयित्रींच्या कवितेमधून स्त्रीजीवनाच्या व्यथा, वेदनांना संक्षिप्त स्वरूपात यथोचित न्याय देण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केलेला आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१) संघजा मेश्राम, आदिवासी साहित्यातील स्त्रीजीवन, हाकारा, संपादन मुटाटकर, जानेवारी ते जून, १९९१, पृ.क्र.४६
२) भुजंग मेश्राम, उलगुलान, साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९५, पृ.क्र.११०
३) वाहरू सोनवणे, गोधड, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मार्च २००६, पृ.क्र.४०
४) तत्रैव, पृ.क्र.१३
५) उषाकिरण आत्राम, म्होरकी, प्रकाशक, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर, प्रथमावृत्ती, फेब्रु- १९९७, पृ. क्र. ६२
६) तत्रैव, पृ.क्र. ११
७) कुसुम अलाम, रान आसवांचे तळे, प्रकाशक कुसुम अलाम, अलापल्ली, गडचिरोली, प्रथमावृत्ती-१९९८ पृ.क्र. ५३
८) तत्रैव, पृ.क्र.८५
९) कृष्ण कुमार चांदेकर, पतुसा, देवयानी प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती मे २०११, पृ.क्र.२१
१०) तत्रैव, पृ.३५
११) सुमन मुठे, आदिवासी स्त्री जीवन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१, पृ.कृ. ४

# मराठी भाषा संधी व आव्हाने

**डॉ.शरद आर.बोराडे**
मराठी विभाग,
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
परतुर.जि.जालना.

आजचे युग हे स्पर्धेचे आहे. आणि स्पर्धेच्या युगामध्ये आपल्या भाषेचे म्हणजे मराठी भाषेचे नेमके स्थान कुठे आहे? हा अत्यंत अस्मितेचा विषय बनलेला आहे.स्पर्धा ही केवळ शिक्षण,खेळ,नोकरी,उद्योग,व्यवसाय,वाढते तंत्रज्ञान इत्यादी बाबतीतच नव्हे तर आपल्या भाषेवर होत असलेल्या परकीय भाषेचे आक्रमण थोपवणे, संस्कृती संक्रमणाच्या या काळामध्ये मराठी भाषा टिकवून ठेवणे,हाही एक स्पर्धेचा विषय बनला आहे.

मराठी भाषा ही हजारो वर्ष जुनी आहे.तिला एक स्वतःची परंपरा,संस्कृती,व्याकरण व्यवस्था,खूप मोठा बोलणारा समूह आहे. तिच्यामध्ये नऊ रास, वृत्त,अलंकार,छंद आहे.तिच्यामध्ये माधुर्य आहे,ती लवचिक आहे,या भाषेचं कौतुक करत असताना संत ज्ञानेश्वर म्हणतात की,

*माझा मराठीची बोलू कौतुके ।*
*परि अमृतातेहि पैजासी जिंके ।*
*ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।*

म्हणजे अमरत्वाचे असलेल्या अमृताशी जरी स्पर्धा लावली तरी मराठी भाषात जिंकेल.एवढे सामर्थ्य हे मराठी भाषेमध्ये आहे. म्हणूनच शक,हुन,मोगल,डच, पोर्तुगीज,इंग्रज आदींचे आक्रमण पचवूनही मराठी भाषेने आपले अस्तित्व जपले आहे.नुसते अस्तित्व जपलेच नाही तर इतर भाषेतून काही शब्द संपदा व संस्कृतीचे लेणे स्वीकारून स्वतःची श्रीमंती वाढवलेली आहे.

मराठी भाषेच्या अनेक उपबोली आहेत.भारतीय भाषांची लोक सर्वेक्षण या महाराष्ट्र खंडामध्ये (पद्मगंधा २०१३) मराठीच्या साठ बोलीची माहिती दिलेली आहे.डॉ.अरुण कृष्ण शिंदे यांच्या मते,"बोलीचे प्रदेशवार जिल्हावार भेद आढळतात.जात तत्वावरही बोलीचे भेद अवलंबून असल्याने एकंदर मराठी बोलीची संख्या शंभरहून अधिक असण्याची शक्यता आहे.वऱ्हाडी,हळबी, कुवारी,नागपुरी, अहिराणी,कोकणी, वारली,ठाकरी,डांगी, सामवेदी,कोल्हापुरी, नागरी,सोलापुरी, पुणेरी, चितपावणी असे बोलीचे अनेक उपप्रकार आढळतात".१

मराठी बोलीची अधिकृत संख्या आजही निश्चित सांगता येत नाही.पण मराठी भाषा संपूर्ण महाराष्ट्रभर बोलली जाते.महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व मराठी भाषिक माणसांवर मराठीचा प्रभाव पडलेला आहे. एवढेच नव्हे तर ते अस्खलितपणे मराठी भाषा बोलतात. आणि महाराष्ट्राच्या बाहेर अनेक राज्यांमध्ये,देशांमध्ये मराठी भाषिक पोहोचला आहे व तेथेही तो मराठी भाषिकांना एकत्रित करून काही उत्सव साजरे करताना दिसत आहे.म्हणजेच मराठी भाषा ही खूप प्रभावशाली आहे.ती लोप पावणे आजपर्यंत तरी शक्य झाले नाही.पण जेव्हा जेव्हा मराठी भाषेच्या अस्मितेचा विषय येतो.तेव्हा तेव्हा मराठी भाषा संकटात असल्याची भाषा बोलली जाते.आणि विशेष करून इंग्रजी भाषेच्या वाढत्या प्रभावातून मराठी भाषेवर संकट आले असे बोलले जाते.इंग्रजी माध्यमाच्या शाळेमुळे मराठी भाषेच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत आहे.हा एक मुखी स्वर आपणाला ऐकायला मिळतो. पण यावर भाषणबाजी खेद,चिंता,तळमळ व्यक्त केल्याशिवाय मराठी भाषेची अस्मिता असणाराही काहीच करत नाही.उलट स्वतःचीच मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकताना दिसतो आहे.मराठी माणसाचे ही दुटप्पी धोरण, स्वतःच्या भाषेला कमी समजण्याचा पूर्वग्रह,काही मराठी भाषिक उच्चशिक्षित एकत्र आल्यानंतर मराठीत न बोलता हिंदी किंवा इंग्रजीत बोलणे प्रतिष्ठेचे मानतात,शासन पातळीवरही मूलभूत प्रयत्न होताना दिसत नाही.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठीच्या सर्व अटी,शर्ती मराठी भाषेने पूर्ण करूनही अभिजात भाषेची मान्यता देण्यासाठी शासन का इच्छुक नाही आहे.हा मोठा संशोधनाचा विषय होऊन बसला आहे.

एखादी भाषा बोलणाऱ्या समाजाला जर ती भाषा रोजगार देऊ शकत नसेल तर तो समाज ती भाषा सोडून देण्याचा प्रयत्न करतो.तेव्हा भाषेमध्ये रोजगार निर्मितीची,अर्थोत्पादनाची क्षमता असणे खूप गरजेचे असते. त्यासाठी ती भाषा बोलणारा समजणारा समूह हा मोठ्या प्रमाणात असायला हवा.हे मराठी भाषेच्या बाबतीत शक्य आहे. कारण अमेरिकेतील इथनोलॉग(Ethnologue) या एस आयएल इंटरनॅशनल मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या अहवालामध्ये जगभरात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये मराठी भाषा ही पहिल्या १० मध्ये येते. त्या अहवालानुसार "मराठी ही जगभरात सर्वाधिक बोलण्या जाणाऱ्या भाषेच्या यादीमध्ये दहाव्या स्थानी आहे.प्रामुख्याने भारतामधील महाराष्ट्र मध्ये मराठी बोलल्या जाते.जगातील लोकसंख्येच्या१.०७९% लोक मराठी बोलतात.म्हणजेच जगातील ८ कोटी ३१ लाख लोक मराठी बोलतात".२ एवढ्या मोठ्या प्रमाणात बोलल्या जाणारी मराठी भाषा पैशाची, अर्थोत्पादनाची भाषा होऊ शकते. नव्हे आहेत.आजही मराठी भाषेतून रोजगाराच्या अनेक संधी तरुणांना उपलब्ध आहे.तरुण त्यातून अर्थोत्पादन करतात,व्यवसाय करतात.

**मराठी भाषेतून रोजगारांच्या संधी:**

वर्तमानपत्रे व नियतकालिके: वर्तमानपत्र,नियतकालिके, अनियतकालिके यामध्ये संपादक,बातमी,जाहिरात लेखन, अग्रलेख,विविध प्रकारचे संवाद लेखन करण्यासाठी भाषेवर प्रभुत्व असणे खूप गरजेचे असते. आणि असे प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तीला वर्तमानपत्रांमध्ये, नियतकालिकांमध्ये अर्थोत्पादनाची खूप मोठी संधी आजही उपलब्ध आहे.आज आंतरराष्ट्रीय घडामोडीवर मराठीतून चर्चा करण्यासाठी लेख लिहिण्यासाठी किंवा सविस्तर माहिती देण्यासाठी शैलेंद्र देवळांकरा व्यतिरिक्त फारसे विचारवंत दिसत नाहीत. आंतरराष्ट्रीय घडामोडीवर त्यांची मुलाखत लेख छापण्यासाठी वर्तमानपत्र व नियतकालेखाचे संपादक वेटिंगवर असतात. आणि त्यांचे लेख वर्तमानपत्रात छापून लेखकाला मोठ्या प्रमाणात मानधन देतात.मराठी भाषेबरोबर इतरही विषयाचे ज्ञान मराठी भाषेला असेल तर त्याचाही खूप मोठा उपयोग हा होत असतो.डॉ. केशव सखाराम देशमुख म्हणतात की,"'स्काय इन द लिमिट' या उक्तीप्रमाणे ज्ञान माहिती मिळविण्यात आज मोकळीकता अधिक ओवाळलेली दिसून येते.व्यक्तिमत्व,भाषा,कौशल्य हे आणि इतर गुण तुम्ही छान आत्मसात केले तर संधीचे दरवाजे आपल्यासाठी नेहमी उघडे राहणारच आहेत.त्यासाठी जरा संयम हवा.जरा जास्त सकारात्मकताही हवी असते."३

**भाषांतर व अनुवाद:** इतर भाषेतील दर्जेदार साहित्यकृती मराठीत अनुवादित करणे.किंवा मराठीतील दर्जेदार साहित्य इतर भाषेत भाषांतरित करणे.हाही आज खूप मोठा विषय झालेला आहे.अशा प्रकारचे भाषांतरित पुस्तके जे ऑनलाईन प्रकाशणे असतात.त्यावर मोठ्या प्रमाणात वाचल्या जातात. व त्याचे मूल्य ही त्या प्रकाशकांबरोबरच भाषांतरकारालाही मिळत असते.म्हणून अनुवाद करणे किंवा भाषांतर करणे ही मराठी भाषेत खूप मोठी संधी आहे.

**दूरचित्रवाणी:** दूरचित्रवाणीच्या माध्यमातून ज्या काही चर्चा, मुलाखती,परिसंवाद,वृत्तांकन होते. त्यामध्ये मराठी तज्ञांना बोलवले जातात.त्यांच्याकडून विशिष्ट विषयावर माहिती घेतली जाते.तसेच ज्या काही मालिका, नाट्य,पटकथा,संवाद लेखन, जाहिरात,दूरचित्रवाणीवरून येतात.त्या सर्वांची संहिता मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या तज्ञांकडून लिहून घेतली जाते. तेव्हा आपल्या विषयावर प्रभुत्व निर्माण करून त्याचे व्यवसायात रूपांतर करणे ही एक व्यवसायाची खूप मोठी संधी आहे.या संदर्भात भाष्य करताना डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणतात की, "दूरचित्रवाणी हे माध्यम या ज्ञानशाखेत झालेल्या अनेक अध्ययनांनी बाजाराच्या अर्थव्यवस्थेच्या जागतिक विस्ताराचे साधन ठरल्याचे सिद्ध झाले आहे."४ थोडक्यात मराठी भाषिक दूरचित्रवाहिनी वरही मराठी भाषिकांना व्यवसायाच्या खूप मोठ्या संधी उपलब्ध आहे.

**चित्रपट व नाट्य क्षेत्र:** मनोरंजन क्षेत्राने आज मानवी जीवनाला गवसणी घातली आहे.मराठी भाषेतून अनेक वाहिन्या आपले कार्यक्रम प्रसारित करीत आहे. तेव्हा मराठी भाषेतून जे चित्रपट येतात.त्यांची पटकथा लेखन. तसेच त्या चित्रपटात काम करणारे नायक,नायिका,खलनायक यांचे भाषेवर प्रभुत्व असते.तेव्हा ते उत्तमरीत्या कार्य करतात.त्याच बरोबर नाट्याची पटकथा लेखनापासून तर ती सादरीकरण करणाऱ्या सर्व कलावंतांना भाषेवर प्रभुत्व असावे लागते.तेव्हा त्यांना दिलेल्या भूमिका त्यांना ताकतीने साकारता येतात.ही आज मनोरंजनातून अर्थोत्पादन करून देणारी खूप मोठी संधी मराठी भाषेचे ज्ञान आणि आवड असणाऱ्या व्यक्ती पुढे आहे.

**आकाशवाणी:** प्रसारमाध्यमाच्या वाढत्या प्रभावातून आकाशवाणी वरील कार्यक्रम आज कमी ऐकल्या जातात:पण तरीही तेथे उत्तम निवेदक,रेडिओ जॉकी, मुलाखतकार,जाहिरात लेखनासाठी मराठीचे उत्तम ज्ञान असणाऱ्या तज्ञांची गरज भासत असते.म्हणजेच आकाशवाणी या केंद्रावरही मराठी भाषिकांना व्यवसायाची संधी उपलब्ध आहे.

**मुद्रित शोधन:** वर्तमानपत्रे,नियतकालिके,मासिके, नव्याने छापली जाणारी पुस्तके, एम.फील,पी.एचडी.चे संशोधन प्रबंध इत्यादी कुठलाही मराठीतील मजकूर प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याचे मुद्रित शोधन होणे अनिवार्य असते.पण लेखन विषयक नियमांना अनुसरून मुद्रित शोधन करणारा तज्ञ मराठी अभ्यासक दूर दूर पर्यंत मिळत नाही.तेव्हा मराठीच्या लेखन विषयक नियमावर जर प्रभुत्व मिळविता आले.तर व्यवसायाची खूप मोठी संधी निर्माण होते. त्यासाठी कुठल्याही प्रकारची गुंतवणूक करण्याची गरज नाही.

**प्रभावी सूत्रसंचालन:** प्रभावी सूत्रसंचालन ही एक कला आहे. शिवाय मराठी भाषेवर प्रभुत्व,मराठीत चारोळी, शेरोशायरी,हजरजबाबीपणा, आवाजातील चढ उतार आणि आवाजाला जर सुंदर लय असेल.तर अशा सूत्रसंचालकाला २५ ते ३० हजार रुपये मानधन देऊन आमंत्रित केले जाते. वर्षभरामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम पुस्तक प्रकाशन, राजकीय,शासकीय,कार्यक्रम,वाहिन्यांवरील कार्यक्रम,होत असतात.त्यामध्ये अशा सूत्रसंचालकाला आमंत्रित केले जाते.डॉ.निलेश साबळे,भाऊ मराठे,स्वाती वाघ,जितेंद्र जोशी,सुधीर गाडगीळ इत्यादी अनेक सूत्रसंचालकांनी आपल्या वैविध्यपूर्ण शैलीतून वाचकांच्या मनावर सूत्रसंचालनाविषयी अधिराज्य गाजवले आहे.व चांगल्या पद्धतीने अर्थोत्पादन सूत्रसंचालनाच्या माध्यमातून ते करत आहे.

**कीर्तन सेवा:** कीर्तन सेवेलाही आजच्या काळामध्ये व्यवसायाचे रूप प्राप्त झाले आहे.भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या,वक्तृत्व कलेवर प्रभुत्व असणाऱ्या अभ्यासकाने जर संत साहित्य आणि समाज चिंतन या विषयावर थोडा अभ्यास वाढवला तर उत्तम कीर्तनकार म्हणून तो नावारूपाला येऊ शकतो.आणि त्यातूनही उत्तमरीत्या अर्थोत्पादनाची संधी निर्माण करता येते.

**अध्यापन सेवा:** पहिलीपासून ते एम.ए.,पी.एचडी.पर्यंत मराठीचे अध्यापन केले जाते.इंग्रजी माध्यमाच्या शाळेतही मराठी हा विषय आणि शिकविला जात असल्याने तेथेही मराठीचे अध्यापन केले जाते.याही व्यतिरिक्त व अमराठी भाषिक शाळेवर 'मराठी भाषा फाउंडेशन वर्ग' ही योजना महाराष्ट्र शासनाने सुरू करून ९ महिने हे वर्ग चालवले जाते व दरमहा ५ हजार रुपये वेतन मराठीच्या अध्यापकाला दिले जाते.म्हणजेच मराठी माध्यमाच्या शाळेबरोबर अमराठी भाषिक माध्यमाच्या शाळेवरही मराठीचे अध्यापन होते व तेथे ही व्यवसायाची संधी निर्माण झालेली आहे.

**ब्लॉग लेखन:** (संकेतस्थळ कट्टा) ब्लॉग लेखनाची नवीन संधी आजच्या तरुण पिढी समोर नव्याने निर्माण झाली आहे.संगणकाच्या माध्यमातून ब्लॉग निर्मिती करून त्यावर लिखाण केले जाते.डॉ. सुनिता सांगोले म्हणतात की, "अलीकडे पारंपारिक व्यवसायापेक्षा नवनवीन व अधिक पैसा व प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या नव्या स्रोतांकडे नव्या पिढीचा कल आहे."५म्हणजेच नवीन पिढी ब्लॉग लेखनाच्या माध्यमातून कला,साहित्य,संस्कृती,मनोरंजन,कृषी,उद्योग,व्यापार इत्यादी विषयावर ब्लॉक लेखन करून खूप मोठ्या प्रमाणात पैसा व प्रतिष्ठा मिळवत आहेत.

या व्यतिरिक्त पुस्तक परीक्षण, चित्रपट परीक्षण,स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांसाठी व्याकरणाचे वर्ग घेणे,संगणकावर मराठीतून टायपिंग करून देणे, संगणकावर मराठीतून कार्यालयीन काम करणे जसे की पत्र व्यवहार,इतिवृत्त,अहवाल,टिप्पणी तयार करून देणे यासारख्या छोट्या मोठ्या व्यावसायिक संधी आज मराठीचे उत्तम ज्ञान असलेल्या तरुणांना उपलब्ध आहे.मराठी भाषेमध्ये यासारख्या अनेक संधी जरी असल्या तरी जागतिकीकरणानंतर मराठी भाषेसमोर काही आव्हाने निर्माण झाले आहे.त्याचाही आढावा या ठिकाणी आपण घेऊ.

**मराठी भाषेसमोरील आव्हाने:**

आधुनिकीकरण, जागतिकीकरण,इलेक्ट्रॉनिक साधनाचा वाढता वापर,इंग्रजी माध्यमांच्या शाळेचे वाढते वर्चस्व, मराठी भाषकांचा मराठी भाषेबद्दल वाढत चाललेला न्यू गंड,शासन पातळीवरून मराठी भाषेच्या विकासासंदर्भातील नाकर्तेपणा इत्यादी अडचणीला मराठी भाषेला सामोरे जावे लागत आहे.

जागतिकीकरणातून उद्योग धंद्याबरोबर तंत्रज्ञानाचा वापरही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जसे की संगणक,इंटरनेट, मोबाईल आणि यासाठी वापरली जाणारी भाषा ही मोठ्या प्रमाणात इंग्रजी असल्याने मराठी भाषिक तरुणांना इंग्रजी भाषा शिकणे

गरजेचे झाले आहे.व त्यातून मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत आहे.तेव्हा या तंत्रज्ञानामध्येही मराठीचा वापर करून मराठी भाषा काळा बरोबर टिकवून ठेवणे हे भाषेपुढे एक आव्हान निर्माण झाले आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे प्रभुत्व मराठी मनावर अधिराज्य गाजवत आहे.त्यातून मातृभाषा मराठी असलेल्या मुलांना पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकत आहेत.मराठी माध्यमाच्या शाळेतील संख्या बोटावर मोजण्या इतकी झालेली आहे.एवढेच नव्हे तर शासनाने २० हजाराच्या जवळपास मराठी जिल्हा परिषद शाळेचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतलेला आहे.याचे कारण मराठी माणसांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळेकडे वाढल्यामुळे या शाळा बंद पडत आहे.आणि त्याचा परिणाम मातृभाषा मराठी असलेला मुलगा इंग्रजी शिकत असल्याने त्याला सराईतपणे मराठी बोलता येणे कठीण झाले आहे.हे एक मराठी भाषा समोर खूप मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हे मराठी भाषा समोरील खूप मोठे आव्हान आहे.आणि हे आव्हान पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या अटी, शर्ती मराठी भाषेने पूर्ण केल्या आहे.पण शासन व्यवस्थेच्या इच्छाशक्तीच्या अभावामुळे आज मराठी भाषा अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याच्या प्रतीक्षेत आहे.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास भाषेचा विकास साधने अत्यंत शक्य होते. शासनाने रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभिजात मराठी भाषा समिती २०१३ गठीत केली.त्या समितीने मराठी भाषा अभिजात आहे.हे सिद्ध करण्यासाठी सर्व पुराव्यानिशी शासनाला अहवाल सादर केला. त्या अहवालाच्या प्रस्तावनेत श्री रंगनाथ पठारे म्हणतात की," केंद्र सरकारने आजवर तमिळ,संस्कृत,तेलगू,कन्नड व मल्याळम या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.या दर्जामुळे त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळते व भाषेची प्रतिष्ठा वाढते. भाषेच्या श्रेष्ठत्वावर राजमान्यतेची मोहर उमटते.भाषेच्या विकास कार्यास अधिक चालना मिळते."६म्हणजेच मराठी भाषेला जर अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर इतर अभिजात भाषेसारखे भरीव अनुदान मराठी भाषेला मिळेल व मराठी भाषेच्या संशोधनाला,विकासाला,मराठी भाषेतून नवनवीन कोर्सेस सुरू करण्यासाठी चालना मिळेल.पर्यायाने भाषेची प्रतिष्ठा वाढेल.(अभिजात मराठी भाषा समिती अहवाल २०१३) ही काही मोठी आव्हाने आज मराठी भाषेसमोर निर्माण झाली आहे. इतर छोट्या मोठ्या आव्हानांना तर मराठी भाषा हजारो वर्षापासून तोंड देऊन आपले अस्तित्व टिकवत अभिमानाने डोलत उभी आहे.

**संदर्भ सूची:**

१)दैनिक सकाळ २७ फेब्रुवारी २०१८
२)दैनिक लोकसत्ता २७ फेब्रुवारी २०२०
३)डॉ. केशव देशमुख,'भूमिका', 'मराठी भाषा कौशल्य विकास' (संपा.)पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन धुळे,पृष्ठ क्र०६
४)डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी, जागतिकीकरण, संवाद माध्यमे आणि फेरमांडणीचे नवे आव्हान,स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद. पृष्ठ क्र.१०
५) डॉ.सुनिता सांगोले,'मराठी भाषा कौशल्य आणि व्यवसायाच्या संधी', 'मराठी भाषा कौशल्य विकास' (संपा.)पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन धुळे,पृष्ठ क्र.१०
६)रंगनाथ पठारे,अभिजात मराठी भाषा समिती अहवाल.२०१३

# योगा आणि शारीरिक शिक्षण

**प्रा डॉ उत्तम शेषराव देवकते**
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव,
ता.गंगाखेड जि.परभणी

**प्रस्तावना**

शारीरिक शिक्षण आणि खेळात योगाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. शारीरिक शिक्षण क्षेत्रात भारतामध्ये भारतीय योग पद्धतीला मुख्य स्थान आहे. व्यायाम विश्वातील सगळ्यात प्राचीन योगा आहे. शारीरिक शिक्षणाचा अर्थ शारीरिक व्यायाम व खेळ आहे. जो व्यक्तीला निरोगी बनवितो मानवाचे शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठीच्या शिक्षण प्रक्रियेस शारीरिक शिक्षण म्हणतात. या शिक्षणामध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त योग, प्राणायाम, व्यायाम, विविध खेळ आणि ध्यान यासारख्या क्रिया समाविष्ट असतात. या शिक्षणामध्ये स्वच्छता व नीटनेटकेपणा आणि वक्तशीरपणा या प्रक्रियांनाही महत्त्व आहे. विद्यार्थ्याला निरोगी, शरीर मन आणि आचरण यांकरिता प्रशिक्षण देणे; निरोगी शरीरात निरोगी मन ठेवण्यासाठी विद्यार्थ्याला नियमित शारीरिक व्यायामाची सवय लावणे ही शारीरिक शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत.

आजच्या आधुनिक युगामध्ये मानवाच्या जीवनशैलीमध्ये मोठा बदल झालेला दिसून येत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आजचे आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून या धावपळीच्या युगामध्ये मानव आपल्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी व्यायाम, आहार, विश्रांती आणि झोप याकडे दुर्लक्ष करत असून व्यायाम व खेळासाठी मैदानावर जाण्याऐवजी तंत्रज्ञानाच्या युगात तो मोबाईल, दूरदर्शनच्या समोर बसून आपले मनोरंजन करत आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे शारीरिक हालचाली मंदावलेल्या  असून त्यामुळे त्याचे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. यातून मानवाला जर सुटका करावयाची असेल तर व्यायाम, विविध प्रकारचे खेळ खेळणे व योगासने, प्राणायाम करून जीवन अधिक आनंदी व उत्साही बनवता येते.

सध्याच्या धकाधकीच्या युगामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक सुदृढता व निरोगी जीवन जगायचे असेल तर ताण-तणावातून मुक्त व्हायचे असेल तर खेळ व योगा शिवाय पर्याय नाही. रोग झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा रोग होऊच नये यासाठी अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपण जर खेळ व योगासने करण्यास अधिक वेळ देऊन जीवनात व्यायामाचे सातत्य ठेवले तर आपले जीवन रोगमुक्त व आनंदी राहण्यास मदत होईल. वास्तविक पाहता योग हे भारतीय तत्त्वज्ञानाचेच एक महत्त्वाचे अंग होय, प्राचीन काळी सर्वसामान्यांमध्ये योगाच्या संदर्भात असा समज होता की, सर्वसंगपरित्याग केलेल्या व्यक्तींनीच योगा केला पाहिजे त्यामुळे सर्वसामान्य समाज योगापासून दूर राहिला आणि ज्यावेळेस पाश्चात्त्य देशांनी योगाचे ज्ञान घेऊन त्याचा योग्य उपयोग जीवनात करू लागले व ते भारतीयांना योगाचे तत्वज्ञान शिकवू लागले. त्यानंतर खऱ्या अर्थाने योग गुरु रामदेव बाबाने योगाचा प्रचार आणि प्रसार देशभर केला आणि सर्वसांमान्या पर्यंत योगा पोहंचवला व त्यांना योगाचे महत्त्व पटवून सांगितले व सोप्या पद्धतीने योगा सर्वसामान्यांसमोर ठेवला.

**योगाचा अर्थ:-**

' योग' हा शब्द संस्कृत भाषेतील 'युज' या धातूपासून तयार झाला असून या शब्दांचा अर्थ जोडणे किंवा 'संयोग' होणे असा आहे. आत्मा व परमात्मा यांचा संयोग याची एकात्मता योगाद्वारे होते. अशा योगासंबंधी अनेक संकल्पना प्रस्तुत आहेत तरी शब्दकोश व इतर शास्त्रात मिळणाऱ्या 'योग' शब्दाच्या विभिन्न अर्थातून तीन अर्थ निघतात ते पुढील प्रमाणे आहेत.

1. योग म्हणजे जुळणे 2.योग म्हणजे ध्यान किंवा समाधी 3.योग म्हणजे उपाय साधना किंवा मार्ग

**योगाची व्याख्या:-**

" योग चित्तवृत्ती निरोध"- पतंजली योग सूत्र मनातील चितवृत्तीचा निरोध म्हणजे योग होय.

तसेच मानसिक व शारीरिक क्रियावर योग्य नियंत्रण ठेवणे हा योगाचा मुख्य उद्देश आहे.

" दु:ख संयोग वियोग योग संज्ञितम"- भगवत गीता भगवत गीतेच्या मतानुसार योग्य हे दु:ख व वेदनापासून मुक्तीची अवस्था होय असे म्हटले आहे.

**योगाभ्यासाचे ध्येय :-**

मनाची एकाग्रता साधून स्वतःच्या मूळ रूपाचे किंवा 'स्व'रूपाचे ज्ञान करून घेणे व मानसिक स्वास्थ मिळवणे.

**योगाभ्यासाची उद्दिष्टे :-**

1. शरीर ,मन ,भावना यांच्यात समन्वय साधणे
2 .दैनंदिन जीवनातील कार्यपद्धतीत सुधारणा घडवणे.
3 . आकलन क्षमता वाढविणे.
4 . विद्यार्थ्यांना चंचलतेकडून स्थिरतेकडे आणणे.

**योगाभ्यासाचे फायदे** :-

1.शरीराच्या अंतर्गत अवयवांची कार्यक्षमता वाढते. 2.रोगप्रतिकारक शक्ती वाढते.
3. रक्त शुद्ध व प्रवाही राहते.
4. पाठीचा कणा लवचिक राहतो.
5. शरीर लवचिक बनते.
6. काम करण्याचा उत्साह वाढतो.

**शारीरिक शिक्षणाची व्याख्या :-**

**आर कॅसीडा**:- विविध गतिमान शारीरिक क्रियेमधून मिळणाऱ्या अनुभवामुळे व्यक्तीमध्ये होणाऱ्या वर्तनातील बदलाच्या क्रियेस शारीरिक शिक्षण आसे म्हणतात.

**डॉ.जे.बी.नॅश**:- "शारीरिक शिक्षण हा संपूर्ण शिक्षणाचा एक भाग आहे ज्याचा संबंध महत्त्वाच्या स्नायू हालचालीसी आणि त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या क्रियांशी आहे."

**प्राचार्य डॉ. पी. एम. जोसेफ** :- "व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, नैतिक व सामाजिक उन्नतीमधून सर्वांगीण विकास ज्या विविध हालचालीतून घडतो, त्यास शारीरिक शिक्षण असे म्हणतात."

**शारीरिक शिक्षणाचे ध्येय** :-

" प्रत्येक बालकास शारीरिक, मानसिक व भावनिक दृष्ट्या समर्थ बनविणे आणि त्यास समाजामध्ये सुखाने जीवन जगण्यासाठी त्याच्यामध्ये व्यक्तिगत व सामाजिक गुणांचा विकास करून आदर्श नागरिक बनविणे." हे शिक्षणाचे ध्येय आहे.

" प्रत्येक बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शारीरिक, बौद्धिक, भावनिक, नैतिक व सामाजिक विकास घडवून व्यक्तिगत व सामाजिक जीवनात तो सुखासमाधानाने जगू शकेल असा चारित्र्यसंपन्न आदर्श नागरिक तयार करणे." हे शारीरिक शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे.

**निष्कर्ष** :-

शारीरिक शिक्षण व खेळात कौशल्याच्या सरावासाठी शारीरिक आवयव व मज्जारजू यांचा समन्वय योगासनामुळे साधला जाऊन खेळाडूंचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मानसिक एकाग्रता निर्माण होते.

शारीरिक समतोल ,आत्मविश्वास, चारित्र्यसंपन्नता तसेच शारीरिक शिक्षणात खेळासाठी लागणारी लवचिकता व मनाची एकाग्रता आणि निर्णयक्षमता या सर्व गोष्टी योगासनामुळे प्राप्त होतात. तसेच स्पर्धेमध्ये व क्रीडा प्रशिक्षणात पण योगाच्या वापरामुळे चांगला फायदा होऊ शकतो. योगासनाच्या नियमित सरावाने व व्यायामाने कोणत्याही प्रकारचा आजार होत नाही. जर पूर्वीचा आजार असेल तर तो बरा करता येतो. यासाठी योगविद्या ही भारतीयांना मिळालेली एक मोठी देणगी आहे.

**संदर्भ:-**

1. डॉ .पी.डी. शर्मा, योगासन ,नवनीत प्रकाशन,मुंबई.

2.व. ग. देवकुळ, योगासने,

3. प्रा. मोहनकुमार खडकीकर ,सहज योगदर्शन उपयोजित योगशास्त्र.

4.प्रा.के एन गंदगे,प्रा मारतळे, आरोग्य शिक्षण योग व प्रथमोपचार

5.इंटरनेट

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# भारतीय महिला सक्षमीकरण - एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ.जाधव अशोक काकासाहेब**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी

---

**प्रस्तावना :**

स्त्रीला भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातच कमी अधिक प्रमाणात आजही दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जात आहे. ही बाब नाकारता येत नाही. त्यामुळे आज ही लिंगभेद, स्त्री हिंसाचार, घटस्फोट, अपहरण, जाळून मारणे, ऍसिड फेकणे, स्त्री भ्रूणहत्या या सारख्या अनेक घटनातून महिला मोठ्या प्रमाणात मृत्यूला सामोऱ्या जाताना आपणास दिसून येतात. या वरून असे म्हणता येते की, स्त्री सुरक्षित नाही. आज आपण 21व्या शतकात वाटचाल करीत असलो तरी स्त्रीला अजूनही पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने माणूस म्हणून स्वीकारलेले दिसून येत नाही. या घटना गंभीर स्वरूपात समाजासमोर येत आहेत. याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाची वाटचाल आता भारततातही प्रबळ होऊ लागलेली आहे. इ. स. 2005 मध्ये महिला सक्षमीकरण कायदा पारित करून देशात महिलांच्या संदर्भात सुरक्षा कवच निर्माण करून महिलांना नवजीवन प्रदान करणारा कायदा निर्माण केला असेच म्हणावे लागेल. महिला सक्षमीकरणाच्या या कायद्याने खऱ्या अर्थाने स्त्रियांना माणूस म्हणून जीवन जगण्याचा अर्थ प्राप्त झाला आहे. या कायद्यामुळे महिलांना पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात वावरण्याची संधी मिळाली आहे. तेव्हा स्त्री जीवनातील महिला सक्षमीकरण कायद्याचे महत्त्व अभ्यासण्यासाठी प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

१) महिला सक्षमीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे
२) महिला सक्षमीकरणाचा इतिहास अभ्यासणे.
३) जागतिक स्तरावर महिला सक्षमीकरणाची वाटचाल कशी आहे हे पहाणे.
४)देशातील महिला सक्षमीकरणाच्या विविध शासकीय योजनांचा आढावा घेणे.

**गृहीतके :**

१) महिला सक्षमीकरणासाठी भारतात अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत.
२) महिला सक्षमीकरणासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.
३) महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन अनेक योजना राबवित आहे.
४) अनेक योजना यशस्वी ठरल्या आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन द्वितीयक साधनसामग्री वर आधारित असून यात ग्रंथ, मासिके, अहवाल, संकेत स्थळे, वृत्तपत्रे,संदर्भ ग्रंथ इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

महिला सबलीकरणाचा अर्थ :

महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया ही महिलांच्या विकासाशी संबंधित असणारी प्रक्रिया आहे. कमकुवत महिलांना सबल करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांमध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हा स्त्री सक्षमीकरणाचा मुख्य उद्देश आहे.

**व्याख्या –**

1) जागतिक बँक – च्या मते, व्यक्तींना आणि गटांना आपली पसंती ठरविण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फल प्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय.

2) व्हिनेसा ग्रिफेन – यांच्या मते, महिला सक्षमीकरण म्हणजे, स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मत प्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, संस्था संपर्क, आर्थिक व्यवहार इ. करण्याची क्षमा व आवड निर्माण होणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

**महिला सक्षमीकरणाची वाटचाल :**

20 शतकात महिलांना सामाजिक समता, न्याय, स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, वैचारिक, कौटुंबिक, व्यावसायिक, सांस्कृतिक क्षेत्रात स्थान मिळाले पाहिजे या दृष्टीने महिला सक्षमीकरणाची वाटचाल सुरू आहे. क्लाराझेटकीन यांनी 1907 मध्ये स्टुअर्ट गार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरवली त्यात महिलांना मतदानाचा हक्क मिळाला पाहिजे, कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता मिळाली पाहिजे, कामाचे तास निश्चित झाले पाहिजे. यासाठी ही परिषद घेण्यात आली होती.. ग्रेगरियन कॅलेंडर नुसार 8 मार्च हा जागतिक महिला दिवस म्हणून साजरा करण्यात आला तर रशियामध्ये जुलियन कॅलेंडर नुसार 23 फेब्रुवारी हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात आला. 1910 मध्ये कोपेन हेगन येथे दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद भरली त्यात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरले. भारतात मुंबई येथे 1943 पासून 8 मार्च हा दिवस महिला दिन म्हणून साजरा होऊ लागला. युनो या संघटनेने 1975 हे वर्ष जागतिक स्तरावर महिला वर्ष म्हणून जाहीर केले. भारतानेही 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. महिला व बालकल्याण विभाग, महिला आयोग महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील आहेत. एकविसावे शतक महिलांचे आहे. शिक्षण विशेषतः मुस्लिम मुलींना शिक्षण घटनेनुसार न्याय मिळाला पाहिजे. त्यांना धर्मानुसार नव्हे तर राज्यघटनेनुसार घटस्फोट मिळाला पाहिजे यासाठी विविध योजनांना प्रारंभ झाल्याचे दिसून येते.

**महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशातील सर्वच समाज घटकांना सामावून घेताना समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल, सामाजिक दृष्ट्या शोषित, पीडित, मागास, आदिवासी, भटक्या जमाती, अपंग महिला व दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांचाही सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार यांच्या सामूहिक प्रयत्नातून विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या गेल्या. यात समाज व्यवस्थेतील महिलांचे महत्त्व लक्षात घेऊन महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महिलांचे सबलीकरण करण्यासाठी केंद्र व राज्यस्तरावर महिला सक्षमीकरणाच्या विविध शासकीय योजना तयार करण्यात आल्या त्या थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत.

१) कुटुंब कल्याण योजना :

राज्य सरकारने 1966 मध्ये कुटुंब कल्याण योजना देशातील वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी तसेच बालक व मातेला आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यासाठी सुरू करण्यात आली.या योजनेमुळे महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे.

२) विशेष आहार कार्यक्रम :

राज्य सरकारने 1970 - 71 मध्ये ही योजना सुरू केली. या योजनेचा प्रमुख उद्देश गर्भवती व प्रसूत महिला तसेच बालकांना पोषक आहार पुरविणे व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हा होता.

३) ग्रामीण महिला व बाल विकास योजना :

ग्रामीण भागात राहणाऱ्या महिलांचा आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचावण्यासाठी 1982 मध्ये राज्य सरकारने ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ग्रामीण महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

४) देवदासी पुनर्वसन योजना :

सन 1980 ते 1987 मध्ये समाजातील देवदासी प्रथेची परंपरा नाहीशी करण्यासाठी व देवदासींचे पुनर्वसन करण्यासाठी म्हणजेच त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल पुरवठा करणे, त्यांच्या मुला मुलींना प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह उभारणे यासाठी ही योजना सुरू करण्यात आली.

५) हुंडाग्रस्त महिलांसाठी माहेर योजना :

हुंडा बळीने पीडित असलेल्या महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सन 1987 मध्ये ही योजना सुरू करण्यात आली.

६) महिला समृद्धी योजना :

केंद्र सरकारने 2 ऑक्टोबर 1993 रोजी ही योजना सुरू केलेली असून महिला व बालविकास विभागामार्फत ही योजना चालविली जाते. या योजनेअंतर्गत 18 वर्षावरील महिलांना पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाते उघडून देण्यात आले. या खात्यात जमा झालेल्या बचतीवर पंचवीस टक्के बोनस वर्ष अखेर दिले जाते. या योजनेचा उद्देश ग्रामीण व शहरी भागातील महिलांना बचतीची सवय लावणे हा होता.

७) देवदासी विवाह अनुदान योजना :

देवदासींचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारने 1997 मध्ये ही योजना सुरू केली. याअंतर्गत 40 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या देवदासींना दरमहा 300 रुपये अनुदान दिले जाते.

८) कस्तुरबा गांधी शिक्षण योजना :

केंद्र सरकारने 1997 मध्ये ही योजना सुरू केली. या योजनेचा प्रमुख उद्देश स्त्रियांच्या साक्षरतेचा दर वाढविणे त्यांच्यासाठी नवीन शाळा उभारणे हा होता.

९) जिजामाता महिला आधार योजना :

1 मे 1999 रोजी राज्य सरकारने ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत कमी उत्पन्न गटात असलेल्या कुटुंबातील कर्तव्यक्तीचे अकाली अपघाती व इतर कारणांनी निधन झाल्यास त्याच्या पत्नीला आपला चरितार्थ भागविता यावा म्हणून आर्थिक सहाय्य देण्यात येते.

१०) जननी सुरक्षा योजना :

राज्य सरकारने 12 एप्रिल 2005 रोजी ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात बाळंतनीस पाचशे रुपये अनुदान देण्यात येते.

११) आशा योजना :

सन 2009 मध्ये राज्य सरकारने ही योजना सुरू केली. आदिवासी महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करणे हा या योजनेचा उद्देश होता.

१२) महिला शेतकरी सबलीकरण योजना :

राज्य शासनाने एक जानेवारी 2011 रोजी ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक, सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.

महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत करत आहे. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामांत सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात. याशिवाय सर्वसमावेशक अशा महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात येत आहेत.

**१) बालिका समृध्दी योजना**
**२) इंदिरा गांधी महिला संरक्षण** योजना
३) देवदासी पुनर्वसन योजना
४) महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना
५) सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

**सारांश :**

वर्तमान भारतीय समाज व्यवस्थेत आजही कौटुंबिक हिंसाचार, स्त्री भ्रूणहत्या, लिंगभेद, स्त्री - पुरुष विषमता या बाबी पहावयास मिळतात. आता त्यासाठी केवळ महिला सक्षमीकरणाचा कायदाच उपयुक्त ठरणार नाही तर शिकलेल्या, समाज बांधिलकी असणाऱ्या, सामाजिक जाणीव असणाऱ्या लोकांनी पुढाकार घेऊन जिजाऊ आणि सावित्रीच्या लेकींना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्राचार्य डॉ संभाजी देसाई - महिला सबलीकरण,
२) प्रा. संजय खंदारे, प्रा. शैला थोरवे - पंचायत राज संस्था आणि विकासाच्या योजना
३) लोकराज्य, एप्रिल 2012
४) डॉ. लीला पाटील - भारतीय स्त्री जीवन, मेहता पब्लिशिंग हाऊस
५) सक्षम महिला : प्रगत महाराष्ट्र, लोकराज्य, मार्च 2010
६) http.mahilasabalikaran.in.c
७) https://mr.vikaspedia.in/social-welfare/

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# चिरस्थायी विकास काळाची गरज

**प्रा. डॉ. अंगद केशवराव फाजगे**
**(अर्थशास्त्र विभाग)**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जिल्हा. परभणी

**प्रस्तावना**

शाश्वत विकास ही संकल्पना सर्वसाधारणपणे चार पैलुशी संबंधित आहे पर्यावरण आर्थिक सामाजिक आणि संस्थात्मक शाश्वतता यापैकी एका जरी घटकाकडे दुर्लक्ष झाले तरी एकंदरीत समाजाची मोठ्या प्रमाणात हानी होते सर्वसाधारणपणे शास्त्र सुद्धा म्हणजे अशी अवस्था जी थोड्या किंवा अनंत काळापर्यंत टिकून राहते sustainable हा शब्द sustanere या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे याचा अर्थ धरून ठेवणे सहन करणे सहाय्य करणे पुरविणे चालू ठेवले टिकून ठेवणे आयुष्याला हातभार लावणे एखाद्या समाजाची सांस्कृतिक व आर्थिक अवस्था टिकून राहणे यालाच शाश्वत ता असे म्हणतात शाश्वत विकासामध्ये पुनर्निर्मिती सक्षम संसाधनाचा निर्मितीचा वेग त्याच्या वापराच्या वेगापेक्षा जास्त असावा तसेच पुनम निर्मितीक्षम पर्यायाच्या विकासाचा आलेख वापरापेक्षा जास्त असावा आणि प्रदूषण कमीत कमी असावे जगातील औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात वाढले आहे त्याचे दुष्परिणाम जाणवत आहे त्यामुळे चिरंतन विकासाचे महत्व वाढले आहे आणि नियोजनामध्ये त्याचा समावेश सर्व देशांनी कमी-अधिक प्रमाणात केला आहे club of Rome यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की साधनसंपत्तीच्या अतिवापरामुळे आपले भविष्य अंधकारमय झाले आहे म्हणून शाश्वत विकासामध्ये पुढील भावी पिढीसाठी विकास समृद्ध आणि यावर लक्ष दिले पाहिजे पर्यावरणाचे संवर्धन हा चिरस्थायी विकासाचा महत्त्वाचा भाग आहे

आर्थिक विकास ही संकल्पना बहु व्यापी आणि बहुआयामी आहे विकास आणि वृद्धी यामध्ये आहे चिरस्थायी विकास त्यामधील एक महत्त्वाचा भाग आहे वास्तविक सर्वांगीण विकास हा चिरस्थायी विकासा मधून होत असतो म्हणून तुझ्या गावांमध्ये चिरस्थायी विकास आला महत्वाचे स्थान आहे सर्वसाधारणपणे विकास हा मानवाकडून जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक घडवून आणला जातो त्याचप्रमाणे आर्थिक वृद्धी मध्ये संख्या दर्शवली जाते आकाश दर्शन ला जातो म्हणून राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आर्थिक वृद्धी समजली जाते ज्यामध्ये वास्तव दरडोई उत्पन्न दिल दीर्घकाळ पर्यंत वाढत असते म्हणून हिंदी मध्ये सतत आणि नियमित पणा असतो दरडोई उत्पन्नात वाढ होते दीर्घकालीन सोबत असते स्वरूप असते तसेच व्यक्ती ही संकल्पना संख्यात्मक आहे यामध्ये संघटनात्मक बदल होत नाही आणि समस्या फारश्या सोडवल्या जात नाहीत आर्थिक वृद्धीचा फायदा असा की यामध्ये स्तूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ होते उत्पादनात वाढ होते दरडोई उत्पन्नात वाढ होते आणि त्याच बघ दरडोई उपभोगत वाढ होते जगातील सर्व देशांचे उद्दिष्ट सर्वांगीण आर्थिक विकास हाच आहे दुसऱ्या महायुद्धानंतर या संकल्पनेला बळ मिळाले ही संकल्पना व्यापक स्वरूपाचे आहे यामध्ये आर्थिक वृद्धीचा समावेश आहे मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांमध्ये प्रगतिशील सभाचे बदल घडून आणणे म्हणजे आर्थिक विकास होईल किंवा चिरस्थायी विकास होईल या विकासाला गुणात्मक बाजू आहे यामध्ये लोकांच्या बहुतेक कल्याणात वाढ होते तसेच दारिद्र्य निरक्षरता हो ग आई बालमृत्यू घट इत्यादी उपाय केले जातात बेकारी कमी केले जाते त्याचप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन आणि संवर्धन केले जाते म्हणून चिरस्थायी विकास ही काळाची गरज आहे

**अभ्यासाचे उद्दिष्ट**

1 आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या संकल्पना व त्याचा अभ्यास करणे
2 चिरस्थायी विकास ही संकल्पना समजावून घेणे
3 चिरस्थायी विकासाचे घटक घटकांचा अभ्यास करणे
4 पर्यावरण आणि विकास यामधील संबंध अभ्यास करण

आर्थिक वाढीचा उच्च आणि स्थिर स्तर राखणे हे शाश्वत विकासाच्या मुख्य उद्दिष्टांपैकी एक आहे, आर्थिक वाढ सोडून देणे हा पर्याय नाही परंतु शाश्वत विकास हा आर्थिक वाढीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे, वाढीचा दर्जा तसेच प्रमाण महत्त्वाचे आहे.

जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग यांनी चिरस्थायी विकास या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात प्रसार आणि प्रचार केला आहे

I पर्यावरण - निसर्गाचे कायमस्वरूपी दुष्काळ व शाश्वत विकास करता येणार नाही त्यासाठी प्रत्येकाने जीवनशैली मध्ये बदल केला पाहिजे आपली जीवनशैली पर्यावरण पूरक असली पाहिजे पर्यावरणाचे संतुलन आणि संवर्धन कसे होईल याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे आपली वसुंधरा म्हणजे पृथ्वी तिला सुजलाम सुफलाम करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे आपले सर्व आधुनिक उद्योग धंदे नैसर्गिक साधन संपत्ती व अवलंबून आहे ते जतन करणे पुन्हा निर्मिती करणे तसेच पर्यावरणात सोडणारे वायू याचे नियंत्रण करणे महत्त्वाचे आहे औद्योगिक क्रांतीमुळे विविध उद्योगधंद्यांचा हे काय झाला आहे परंतु वातावरणामध्ये हरित वायूंचे प्रमाण त्याचे उत्सर्जन वाढले आहे त्याचा गंभीर परिणाम विविध रोग आणि नैसर्गिक संकटे होत आहे त्यामुळे चालू पिढीबरोबर भावी पिढीचे आयुष्य धोक्यात आले आहे त्यामुळे त्यामुळे पर्यावरण संवर्धन करणे प्रत्येकाचे काम आहे

2 आर्थिक- देशातील शास्त्रात विकास हा आर्थिक सामाजिक आणि पर्यावरण दोघं व उपाय योजना यांच्याशी संबंधित असतो ज्या वेळी देशातील असंख्य लोकांना त्यांच्या आवडीच्या वस्तू विकत गेले मोठ्या प्रमाणात शक्य होते त्यामुळे आर्थिक विकास झाला असे समजण्यात येते आर्थिक प्रश्न आणि पर्यावरण घटक यांचा जवळचा संबंध असतो म्हणून आर्थिक नियोजन करताना नवीन बाजारपेठांची निर्मिती विक्रीची संधी कार्यक्षम सुधारणा खर्चामध्ये बचत ऊर्जेमध्ये बचत इत्यादींचा मार्ग अवलंबन केला जातो म्हणून शाश्वत विकास करताना नैसर्गिक घटकांमधील समतोल ठेवणे व पर्यावरणाचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे पर्यावरण रहासास आर्थिक विषमता कारणीभूत आहे कारण यामुळे लोकांमध्ये भेदभाव निर्माण होतो समाजामध्ये श्रीमंत आणि गरीब असा वर्ग निर्माण होतो श्रीमंत लोकांमुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर गरजेपेक्षा जास्त होतो कारण ते लोक मोठ्या प्रमाणात स्वयंचलित वाहने वापरतात त्यामुळे त्यांना इंधन आणि ऊर्जा जास्त प्रमाणात वापर होतो त्यामुळे पर्यावरणाचा नाश झपाट्याने होतो याउलट गरीब लोकांना नैसर्गिक साधन संपत्ती साधन संपत्ती नैसर्गिक साधन संपत्ती यांचा पूर्णपणे पैशाच्या अभावामुळे वापर करता येत नाही तसेच दारिद्र्यामुळे निर्णय क्षमता वाढते आरोग्याचे ज्ञान नसल्यामुळे लोकसंख्यावाढीला सहाय्य ममिळते म्हणून चालू पिढीला पर्यावरण सर्वेक्षण नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर दारिद्र्य निर्मूलन लोकसंख्या नियंत्रण इत्यादी क्षेत्रांमध्ये काम करावे लागेल शाश्वत विकास करणे म्हणजे सर्वांगीण विकास करणे आणि पर्यावरण संवर्धन हे फक्त शास्त्र नसून ते एक बहुअंगी शाश्वत विकासाचे शास्त्र आहे

3 ऊर्जा विकास

कार्य करण्याच्या क्षमतेला ऊर्जा म्हणतात. ऊर्जा विकास. विजेचा वापर ऊर्जेवर अवलंबून असतो अणुऊर्जा सौर ऊर्जेतून निर्माण होते इ. अक्षय आणि अक्षय ऊर्जा उर्जेद्वारे निर्माण होते ज्यामुळे हवा आणि जल प्रदूषण टाळले जाते परंतु त्याच वेळी I तेल इत्यादींचा वीज निर्मितीसाठी वापर केला जातो. . इ. प्रदूषण हा शेती आहे - हा दुसरा सर्वात महत्वाचा घटक आहे ज्याशिवाय शाश्वत विकास इत्यादींचा विकास करणे अर्थव्यवस्थेसाठी अशक्य आहे. औद्योगिक क्षेत्राचा विकास शेतीच्या विकासाचा मधून होत असतोआणि म्हणून शेतीकडे दुर्लक्ष होता कामा नये, भारत, कृषी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे शेतीद्वारे लोकसंख्येसाठी अन्न निर्माण करते. विविध कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी निघते उपाय केले पाहिजे वास्तविक.

4 कृषी - सर्वात महत्वाचा घटक आहे शेती हा कणा आहे ज्याशिवाय अर्थव्यवस्थेचा विकास होणे अशक्य आहे उदाहरणार्थ, इंग्लंड, फ्रा रशिया, इस्रायल इ. औद्योगिक क्षेत्राचा विकास कृषी क्षेत्राद्वारे झाला आहे आणि म्हणूनच विकास करताना शेतीकडे दुर्लक्ष होता कामा नये. भारतासारख्या देशात, शेती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करते आणि शेतीद्वारे लोकसंख्येला अन्न पुरवते. साखर, कापड, कागद, रसायने, विविध उद्योगांना पुरवठा केला जातो.

आधुनिक यंत्रसामग्रीसह मोठ्या सघन शेतीमुळे कृषी उत्पादकता वाढण्यास मदत झाली. याचे कारण म्हणजे उत्पादकाचा वापर आणि

**शाश्वत विकास विविध व्याख्या**

1 "अर्थव्यवस्थेच्या विकासाची उच्च आणि स्थिर पातळी राखणे. आर्थिक वाढ सोडून देणे म्हणजे केवळ आर्थिक वाढ होय.

2 प्रॉम कमिशन. व्याख्या - पर्यावरण विकासाच्या क्षमतेशी तडजोड न करता शाश्वत विकास म्हणजे नैसर्गिक आणि पर्यावरणीय लोकसंख्या इत्यादींचा अभ्यास. कालांतराने उत्पादनाचा शाश्वत विकास आणि त्याची क्षमता आणि आवश्यक असल्यास ते दुसऱ्या प्रणालीमध्ये बदलणे. संसाधनांची दीर्घकालीन उत्पादकता आणि सध्याची गरज धोक्यात न येता शाश्वत असणे

3 शाश्वत विकास म्हणजे अशी प्रक्रिया की यामुळे पर्यावरणाचा त्रास होत नाही आणि त्यामुळे भावी पिढ्यांचे उत्पादन क्षमता कमी होत नाही याचा सार्थ शाश्वत विकास म्हणजे जीवनाच्या सर्व पैलू मधील बदल लोकांच्या त्यांच्या आजूबाजूच्या सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणीय परिस्थितीबद्दलची त्यांची धारणा बदलण्याची इच्छा आणि नैसर्गिक संसाधनाचा सध्याचा वापर बदलण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची तयारी यालाच शाश्वत विकास म्हणतात

4 शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याचा गर्जा पूर्ण करणारा विकास होईल याचा अर्थ शाश्वत विकास हा संसाधनाचा वापर विवेक पूर्ण करणारे एक प्रारूपआहे ज्याचा उद्देश पर्यावरणाचे लक्ष्मण करताना मानवी गरजा पूर्ण करणे आहे जेणेकरून वर्तमान काळातील गरजा पूर्ण होऊन भावी पिढीसाठी सुद्धा गरजांची पूर्तता होईल असा विकास करणे होय.

म्हणून शाश्वत विकासामुळे भावी पिढ्यांना धोक्यात न आणता सध्याची आर्थिक स्थिती टिकाऊ आहे आणि म्हणूनच शाश्वत हा चार-पायांचा दृष्टिकोन आहे

**शाश्वत विकासाची वैशिष्ट्ये**

1 पर्यावरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करणे तसेच हरितवायू कमी करणे जागतिक हवामान उष्णता कमी करणे त्यासाठी प्रयत्न करणे

2 पर्यावरणाला अनुकूल बांधकामे इमारती बांधणे नैसर्गिक बायोडिग्रेडेबल साहित्याचा वापर करणे

3 पाण्याचा विवेकाने वापर करणे

शाश्वत विकासासाठी दारिद्य निर्मूलन आवश्यक आहे गरीब लोकांच्या जगण्या साठी च्या गरजा भागवताना नैसर्गिक साधन संपत्ती ची आणि पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात आणि होते दारिद्य आहे भूक आणि कुपोषण यांची समस्या वाढवते त्यामुळे अन्नधान्य मिळवताना अनेक अडचणी येतात म्हणून सार्वजनिक सार्वजनिक सार्वजनिक वितरण व्यवस्था भक्कम करणे कार्यक्षम करणे महत्त्वाचे आहे शाश्वत विकासामध्ये नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत असतात त्यासाठी पारंपारिक कौशल्य नवीन पद्धतीने अमलात आणण्याची गरज आहे तसेच आर्थिक सुधारणा आणि बाजारातील संधी याचा लाभ मिळवण्यासाठी गरिबांना साक्षर आणि मूलभूत शिक्षण मिळणे महत्त्वाचे आहे शाश्वत विकासासाठी मुलभूत शिक्षण ही पूर्व आहे जीवन निर्वाहाची खात्री देणे हे चिरंतन विकासासाठी महत्त्वाचे आहे.

विकासामुळे क्रय शक्ती वाढते आणि बाजार भिमुख ग्राहक असल्यामुळे उपभोगत मोठ्या प्रमाणात वाढ होते त्याचा परिणाम देशातील साधनसंपत्तीवर डबा पडत आहे शिक्षण आणि सार्वजनिक जागृती द्वारे त्याला मदत करण्यासाठी नियंत्रित करण्यासाठी विविध उपाय केले पाहिजे उपभोगाच्या अपेक्षित मर्यादा व मापदंड निर्माण करणे महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी शिक्षण कायदे करून त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे शाश्वत विकास हा प्रत्येक व्यक्ती आणि राष्ट्र त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे पर्यावरण समाज आणि अर्थव्यवस्था यांच्या योग्य समन्वय यामुळे शाश्वत विकास साध्य करणे शक्य झाले आहे आज जागतिक हवामानाच्या बदलामुळे प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाच्या रहसमुळे शाश्वत विकासाला महत्त्व आहे आज जगात ज्या वेगाने आर्थिक विकास होत आहे तोच उकल करण्यासाठी शाश्वत विकास शिवाय पर्याय नाही.

जागतिकीकरणामुळे सर्व जगाच्या अर्थव्यवस्था मुक्त झाले आहेत त्यांचा विकास होत आहे त्यामुळे शाश्वत विकासाला जागतिक पातळीवरील महत्त्व प्राप्त झाले आहे भारताने याविषयी बांधिलकी दाखवण्यासाठी GATT करारावर सही केली आहे भारताचा शाश्वत विकासाच्या संदर्भात पर्यावरण पर्यावरण संरक्षण संबंधात आंतरराष्ट्रीय यांच्यामध्ये सक्रिय सहभाग आहे आणि जवळपास सर्व प्रमुख पक्षीय पर्यावरण करारात सामील आहेत भारताने राष्ट्रीय कर्तव्य आणि प्रतिज्ञपत्राद्वारे स्थानिक धोरण आणि कायदे केले आहे.

वास्तविक निसर्गाने मानवाला अनेक नैसर्गिक संसाधने मुक्तहस्ताने दिले आहेत उन वारा पाऊस जमीन इत्यादी दिले आहेत आणि हे सर्व विनामूल्य आहे त्याच्या उपयोगा मधून मानवाच्या मूलभूत दर्जा अन्न वस्त्र निवारा भागवल्या जातात नैसर्गिक संसाधने एक निका वन अवलंबून असतात याचा विचार करणे महत्त्वाचे आहे सुरुवातीच्या काळामध्ये नैसर्गिक संसाधने विपुल प्रमाणात होती परंतु जलशी लोकसंख्या वाढली तसे नैसर्गिक साधन संपत्ती कमी पडू लागली मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गावर अतिक्रमण केले त्यामुळे नैसर्गिक संसाधनाची अपरिमित आणि झाली त्यातून विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या वास्तविक पृथ्वीवरील सर्व लोकांचे भवितव्य पर्यावरणाच्या संवर्धनामध्ये आणि जतना मध्ये अवलंबून आहे यामधूनच चंतल विकासाची कल्पना निर्माण झाली म्हणून चिरंतन विकास ही एक परिवर्तनशील प्रक्रिया आहे त्यामध्ये साधनसंपत्तीचा पूर्ण उपयोग गुंतवणूक दिशा तांत्रिक विकास तसेच संघटनात्मक व संस्थात्मक बदल त्याच प्रमाणे मानवी गरजा आणि महत्वकांक्षा महत्वकांक्षा लग्नकार्यासाठी प्रयत्न करणे भावी सामर्थ्य वाढवणे याचा समावेश होतो म्हणून मानव मानवता आणि निसर्ग यांच्या नावे संतुलन ठेवणे शाश्वत विकासाचे मुख्य ध्येय आहे त्यामुळे चिरंतन विकासामध्ये पूर्नाविनिकरणीय साधनसंपत्तीवर त्यासाठी छोटे छोटे प्रकल्प राबवले जातात त्यामध्ये व्यवस्थित असते आणि प्रतिकारक्षमता असते त्याचप्रमाणे प्रकल्प राबवताना परंपरागत मूल्य व त्याचे ज्ञान वापरले जाते मानवाची प्रतिष्ठा जपली जाते त्यामधून सार्वजनिक जीवनाची देखबाल आणि सन्मान होत असतो राहणीमानाचा दर्जा सुधारतो तसेच खत्रीच्या सहन क्षमतेचे व विविध गतीचे संवर्धन केले जाते जी साधनसंपत्ती पुन्हा पुन्हा निर्माण केली जात नाही अशा आमचा वापर विवेक पूर्ण पद्धतीने केला जातो त्यामधून पृथ्वीची पोषण क्षमता कायम तिथून ठेवली जाते तसेच पर्यावरणाची देखभाल केली जाते अशाप्रकारे विकास करताना पर्यावरणाला कमीत कमी हानी होईल हे पाहिले जाते लोकसंख्या नियंत्रण केले जाते नैसर्गिक साधन संपत्तीचे जाणीवपूर्वक संवर्धन केले जाते जतन केले जाते यामधून आर्थिक वृद्धी साधने व काय वाढवणे तसेच समाजाची गरज ओळखून विकास करणे विशेष म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण करणे नैसर्गिक साधन संपत्तीचा कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावणे तसेच कचरा निर्माण होऊ नये म्हणून विविध उपाय लोकांच्या क्षमतेनुसार त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण करणे आणि यामधून लोकांच्या आरोग्याची पातळी सुधारणे यामुळेच शाश्वत विकासाचे महत्व अधोरेखित होते.

**शाश्वत विकासाचे निर्देशांक**

1 सामाजिक निर्देशांक यामध्ये शिक्षण आरोग्य रोजगार पाणीपुरवठा स्वच्छता घरबांधणी दर्जेदार जीवन पद्धती सांस्कृतिक विकास आर्थिक विषमता दूर करणे गुन्हेगारीचे उच्चाटन करणे लोकसंख्या नियंत्रण करणे सामाजिक आणि नैतिक मूल्य जपणे महिलांना समाजामध्ये प्रतिष्ठेची वागणूक देणे इत्यादी सहाय्याने चिरंतन विकासाचे मोजमाप केले जाते यालाच सामाजिक निर्देशांक असे म्हणतात

2 पर्यावरण विषयक निर्देशांक यामध्ये शुद्ध पाणी भूगर्भातील पाणी शेतीचा विकास सुरक्षित आणि विपुल प्रमाणात अन्नधान्य सागवी पर्यावरणाचे रक्षण माशांमधील जैवविविधता जैवतंत्रज्ञान प्रदूषित हवामान जागतिक हवामानातील बदल समुद्रपातळी मधील बदल नैसर्गिक साधन संपत्तीचा विवेकी वापर पीक बदल तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संतुलनासाठी विविध निर्णयांचा समावेश होतो आणि या बघ विकासाचे मोजमाप केले जाते

3 संस्थात्मक निर्देशांक यामध्ये सर्वसमावेशक निर्णय सहकार संस्थांची निर्मिती विकास कायदेशीर चौकट नैसर्गिक आपत्तीचे योग्य व्यवस्थापन त्यामध्ये लोकांचा सहभाग विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विकास लोक जागृती तसेच नागरी भागातील समाजाची भूमिका इत्यादींचा समावेश होतो वास्तविक शाश्वत विकास ही संकल्पना सर्वसमावेशक आहे ती जीवनाच्या सर्वांना स्पर्श समाजाची संस्थात्मक बांधणी करत असताना या निर्देशांक वापरला जातो

4 आर्थिक निर्देशांक मध्ये आर्थिक स्वावलंबन कर्जमुक्त ता ऊर्जेचा योग्य वापर उपभोग आणि उत्पादनाच्या वेगवेगळ्या पद्धती वाहतूक खाणकाम आर्थिक संघटना विकास आणि व्यापार उत्पादकता इत्यादींचा वापर होतो त्यामुळे आर्थिक विकास मोजता येतो सर्वसाधारणपणे बेकारीचे प्रमाण लोकसंख्या वाढीचा दर दरडोई सकल देशी उत्पादन देशांतर्गत दरडोई पाण्याचा वापर जमिनीचा वापर खतांचा वापर शहरातील प्रदूषण पातळी विजेचा वार्षिक उपभोग या वरून चिरंतन विकास बोलला जातो त्याचप्रमाणे पर्यावरणाच्या संबंधित आजाराचे प्रमाण आरोग्य सुविधा रस्त्यावरील अनाथ मुले शहरी भागातील वृक्षारोपण भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण शेती क्षेत्रातील धारणक्षमता बचतीचे प्रमाण वाहतुकीची सक्षमता इत्यादी गोष्टींचा विचार चिकन विकास करताना केला जातो

**संदर्भ**

1 विकास आणि पर्यावरणाचे अर्थशास्त्र डॉक्टर वसुधा पुरोहित विद्या बुक्स औरंगाबाद
2 आर्थिक विकासाचे नवे पर्व प्राध्यापक सी प खेर
3 विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र डॉक्टर इंगळे अरुणा प्रकाशन लातूर
4 विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत डॉक्टर मनाली फडणवीस
5 शाश्वत विकास दत्ता वानखेडे पी बी डी प्रकाशन पुणे
6 www sustainable development.in

# हिंदी भाषा, संस्कृति और जीवन-दर्शन

**प्रा. डॉ.गनी गफूर साहब शेख .**
(हिन्दी विभाग)
स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद,
तहसील , मुखेड़ जिला, नांदेड़
महाराष्ट्र 431719.
shaikhgg5555@gmail.com

आज हिंदी किसी प्रांत की भाषा न होकर अखिल भारतीय राष्ट्रभाषा के समृद्ध स्वरूप को प्राप्त कर चुकी है। सभी उपभाषाओं एवं बोलियां से सहयोग देकर हिंदी आगे बढ़ बढ़ी है। विद्वानों ने सिंधु शब्द से ' हिंदू 'का विकास माना है। हिंदू का ' हिंद' हो गया और हिंद में रहने वालों की भाषा को हिंदी कहा जाने लगा। हिंदी का महत्व हिंदी का महत्व राजभाषा राष्ट्रभाषा एवं अंतर्राष्ट्रीय भाषा के कारण ही नहीं बल्कि यह भारतीय संस्कृति की वाहक एवं पहचान है। "साहित्य को संस्कृति का दर्पण कहा जा सकता है। "1जैसे साहित्य को समाज का दर्पण कहा जाता रहा कुछ लोगों को साहित्य को समाज का दर्पण मानने में इसलिए आपत्ति है कि वह साहित्य को समाज की फोटोग्राफी अर्थात वह चित्रण नहीं मानते। साहित्य का संस्कृति से घनिष्ठ संबंध है। सांस्कृतिक परंपरा से साहित्य बहुत कुछ लेता है और उसमें बहुत कुछ जोड़ता भी है। दोनों एक दूसरे के पूरक है।साहित्य की भाषा उसके मुहावरे ,लोकोक्तियां ,लोक कथाएं और लोक गाथाएं और अप्रस्तुत विधानआदि ।वह सांस्कृतिक परंपरा से द लेता है और सांस्कृतिक चेतना के विकास में साहित्य भी सहायक होता है।भारतीय संस्कृति हमारी राष्ट्रीय एकता का आधार है ।

इस संस्कृति के निर्माण में केवल आर्यों का ही नहीं बल्कि द्रविदों एवं पूर्व के अन्य आदिवासियों का भी महत्वपूर्ण योगदान रहा है । हमारा भारतीय साहित्य का सामासिक संस्कृति के अनु प्रणीत है। जिसकी परंपरा लगभग 5 -6000 वर्षों से आज तक सतत विद्यमान है ।संस्कृति अपनी व्यापक अर्थ में संपूर्ण मानव सभ्यता की उपलब्धियां का संयुक्त खजाना है। आचार्य हजारी प्रसाद द्विवेदी जी ने लिखा है-" मनुष्य की श्रेष्ठ साधनाओं का ही दूसरा नाम संस्कृती है ।भारत जैसे बहुभाषी ,बहू जातीय है देश में एक साथ इतनी संस्कृतियों धर्म और आचार्य विचार का आज का समन्वय हुआ है कि इस देश में संस्कृतीका समन्वित और मिश्रित को रूप अब स्थिर हो गया है। जिस तरह सागर अनंत नदियों की जल राशि को समाहित कर विशालता अर्जित करता है, उसी तरह भारतीय संस्कृति ने भी कई चिंतन धाराओं ,कई विचार, शैलियों और न जाने कितनी व्यवहारगत और असमानताओं को अपने भीतर पचाकर अनूठी समनवयात्मकता का परिचय दिया है। भारत की इस बहुआयामी संस्कृति को ही सामाजिक कहा गया है जिसमें चिंतन ,सृजन ,भाषा, कल्पना और आचरण की तमाम विभिन्नताओं के बावजूद एक अद्भुत सामासिकता लक्षित होती है।"2 भारतवर्ष की एकता इसकी अनेकता में निहित है ।भारत बहू विशाल देश है ।यहां अनेक जातियों के लोग रहते हैं। अनेक भाषाएं बोलते हैं ।उनके रहन सहन के तरीके भी अलगअलग है। इन विभिन्नताओं के बीच - भारत की सांस्कृतिक एकता छीपी है ।भारतीय संस्कृति एक महासागर के समान है ।जिसमें अनेक संस्कृतियों की नदियां आकर व विलीन हो गई है। लोक संस्कृति से काव्य में सत्य, शिवम, सुंदरम की रक्षा होती है। लोक सस्कृति के माध्यम से भारत के संपूर्ण समाज का प्रतिनिधित्व किया जा सकता है। हिंदी विश्व की तीसरी महान भाषा है। राष्ट्रीय एकता एवं जन जागरण में हिंदी का महत्वपूर्ण योगदान रहा। यह भारत के सभी राज्यों में बोलीऔर समझी जाती है। हमारी राष्ट्रीय स्वतंत्रता एवं एकता हिंदी की गरिमा के कारण ही संभव है। वस्तुत: हिंदी भारत की आत्मा है। जन साधारण की अभिव्यक्ति का आधार है ।व्याकरण सम्मत होने के कारण यह मानक भाषा है , किसका अपना समृद्ध साहित्य है। हिंदी एक अखिल भारतीय भाषा के रूप में राष्ट्रीय एकता को परिपुष्ट करती रही ।जहां हिंदी केंद्र सरकार की कामकाज की भाषा है वहां यह संस्कृत भाषा के रूप मेंआध्यात्मिक, राजनीतिक, आर्थिक, व्यापारिक एवं सामाजिक संपर्क को बढ़ाने में महत्वपूर्ण भूमिका रखती है। सरल भाषा होने के कारण अधिकांश भारतीयों द्वारा बोलीऔर समझी जाती है ।सामान्य ज्ञान की भाषा होने के कारण भारत के अधिकांश भागों के निवासी प्रचलित हिंदी में अपने विचारों को अभिव्यक्त कर गौरव का अनुभव करते हैं।हिंदी के माध्यम से राजनीतिज्ञ अपनी पार्टी की

नीतियों को सामान्य जनता को सरलता पूर्वक समझाते रहे हैं । इतना ही नहीं आज के बदलते हुए सामाजिक परिवेश के अनुरूप हिंदी को रोजी-रोटी की भाषा बनाना होगा। हिंदी में सॉफ्टवेयर का आधिकारिक विकास करना होगा जिसके हिंदी में ईमेल करना और अधिक सहज हो सके। आज युवाओं को यह समझना होगा कि हिंदी हमारे राष्ट्रीय गौरव की प्रतीक है। हिंदी में वार्तालाप कर हम गौरव का अनुभव करें इसी में हिंदी के उज्जवल भविष्य की घोषणा नहीं है निहित है। वस्तुत: हिंदी को प्रतिष्ठित करने का दायित्व आज नवयुवकों पर है। हिंदी किसी एक प्रदेश ,किसी एक संप्रदाय ,किसी एक जाति की भाषा नहीं बल्कि इस भाषा को पंथनिरपेक्ष रूप देने में अमीर खुसरो , कबीर ,अब्दुल रहीम , रसखान आदि का योगदान स्मरणीय है ।जहां यह संतों और फकीरों के प्रवचन की भाषा रही वहां नानक, दादू , सुर ,तुलसी, मीरा ने काव्यात्मक अभिव्यक्ति देकर संवारा । स्वामी दयानंद ने हिंदी गद्य के माध्यम से जनमानस को जगायाऔर हिंदुस्तानी का प्रबल आग्रह लेकर महात्मा गांधी ने सत्याग्रह का शंखनाद किया।जहां यह सुभाष चंद्र बोस का आजादी का संदेश देने वाली जन जन की भाषा रही। वहीं भारत भारती के रूप में मानव अधिकारों का दमन करने वालों के विरुद्ध हुंकार भरती दिखाई पड़ी और भारतीयों को उनके प्राचीन गौरव का स्मरण कराती रही ।"आज हिंदी भाषा में लिखा गया साहित्य विभिन्न विषयों में हिंदी में किया गया शोध साहित्य एक बहुत बड़ा भंडार बन गया है ।आज इसके उच्च कोटि के साहित्य पर हिंदी भाषाओं को गर्व है।"3

हिंदी साहित्य का मूलाधार साहित्यकार का जीवन दर्शन होता है और इसलिए ही साहित्यकार अपने दर्शन के अनुकूल अपनी साहित्य में जीवन मूल्यों का निर्धारण करता है। जीवन की दृष्टि विशेष से देखना परखना ही जीवन दर्शन है।जीवन दर्शन का दर्शन शब्द दृश्य धातु में लयुट प्रत्यय लगने से बना है। जिसका अर्थ है देखना।साहित्य में दर्शन के दो रूप होते दृष्टिगत होते हैं प्रथम शास्त्रीय दर्शन ।द्वितीय जीवन दर्शन। शास्त्रीय दर्शन के तात्पर्य है दर्शन के शास्त्रीय दृष्टिकोण को प्रस्तुत करना अर्थात जीव, आत्मा ,परमात्मा ,जगत ,माया आदि पर विचार करना।शास्त्रीय दर्शन में किसी प्रसिद्ध दार्शनिक द्वारा स्थापित विशेष मत की गणना की जाती है जैसे अद्वैत वेदांत सांख्य दर्शन आदि ।जीवन दर्शन के अंतर्गत प्रत्येक व्यक्ति का जीवन के प्रति दृष्टिकोण चित्रित किया जाता है ।इसमें साहित्यकार के मत ,विश्वास ,नैतिक आदर्श ,मूल्य ,मान्यताएं और धारणाएं आती है।प्रत्येक साहित्यकार एक विशिष्ट दृष्टिकोण से जीवन का अध्ययन करता है वह अपने मनोभावों के अनुसार जीवन की समस्याओं संघर्षों और गति को देखता है ,तद् नुसार ही अपनी रचनाओं में जीवन की व्याख्या एवं आलोचना करता है ।अतः साहित्यकार का जीवन को दृष्टि विशेष से देखना परखना ही जीवन दर्शन है ।साहित्य पर साहित्यकार के संपूर्ण चिंतन एवं मनन की छाप पड़ती है ।

डॉ, सर्वपल्ली राधाकृष्णन ने जीवन को संयोग ,भाग्य और चरित्र के ताने-बाने से ग बुना रहस्यमय कपड़ा कहा है। जीवन में प्रेम की भी आवश्यकता है परंतु जीवन में केवल प्रेम की ही नहीं और न प्रेम जीवन का एकमात्र आधार है। प्रेम के साथ जीवन में संघर्ष एवं कर्म भी अनिवार्य हैं ।संघर्षों से विजय प्राप्त की जा सकती है कर्म द्वारा। संघर्ष ही मनुष्य को खरा बनाते हैं। अतः समस्त जीवन ही संघर्ष है। पग पग पर हमें लड़ना पड़ता है, युद्ध करना पड़ता है कायम रहने के लिए। जीवन के संघर्ष कल और परिस्थिति के अनुसार बदलते रहते हैं।संघर्ष में यह निश्चय नहीं किया जा सकता कि किसकी विजय हो ।संघर्ष अनादि एवं अनंत है।मानव सृष्टि में जब तक विषमता।संघर्ष निरंतर चलता रहेगा। "टेढ़े मेढ़े रास्ते का उमानाथ भी जीवन में संघर्ष को महत्व देता है।"4 जीवन में सुखदुख दोनों आते हैं किंतु सुख-दुख के संग्राम से भयभीत नहीं होना चा-हिए वरना दृढ़ता पूर्वक कर्म करते रहना चाहिए क्योंकि चलते रहना ही जिंदगी है और वह भी बिना यह जाने हुए कि हम कहां चलते हैं, किस तरफ चलते हैं ,किस लिए चलते हैं।प्रेम संगीत में भी कवि निरंतर कर्म की प्रेरणा देता है। कर्म जीवन का अभिन्न अंग है। जीवन की सफलता श्रेष्ठ कर्म करने से है।प्रत्येक व्यक्ति को अन्याय का शमन तथा न्याय का समर्थन करना चाहिए। समाज की कुरूपता को दूर करना भी जीवन का उद्देश्य है ।टेढ़ेमेढ़े रास्ते का उमानाथ यही कहता है सभी को सत्कर्म करने चाहिए- । मनुष्य कर्मानुसार फल प्राप्त करता है। बहुमूल्य जीवन का प्रत्येक क्षण काम में लाना चाहिए। अपने उद्देश्य तक पहुंचाने के लिए मनुष्य को मार्ग की बाधाओ तृष्णा एवं वासना का शमन करना आवश्यक है। जीवन नश्वर है ,क्षणभंगुर है ,यह सोचकर मनुष्य को मनुष्यता का व्यवहार करना चाहिए ।सेवा ,दया, प्रेम ,ममता, सहानुभूति,सहयोग आदि भावना को धारण करके मानव को जीवन की पूर्णता प्राप्त करनी चाहिए। वासुदेव दत्त का चित्रलेखा का भिक्षु उप गुप्त यही संदेश देता है।

प्राणी मात्र के साथ मानवता का व्यवहार करते हुए निरंतर आगे बढ़ते जाना ही जीवन का उद्देश्य है। इस प्रकार जीवन का उद्देश्य एहिक एवं पारलौकिक के प्रति है, जिसे मनुष्य कर्म ,परिश्रम एवं मानवचित गुणों द्वारा ही प्राप्त कर सकता है। भारतीय समाज में पाप पुण्य को विशिष्ट स्थान दिया गया है।भारतीयों का मत है कि जो पाप करता है वह नरक का भागी होता है और जो पुण्य करता है वह स्वर्ग का। अतः सर्वप्रथम पाप पुण्य के स्वरूप को समझ लेना आवश्यक है। पुण्य से तात्पर्य है पवित्र कार्य, श्रेष्ठ कर्म, समाज द्वारा मान्यता प्राप्त उचित कर्म अथवा कर्निय मानवीय कर्म। इसके विपरीत समाज के प्रतिकूल और अकर्निय कार्य एवं आचरण ही पाप है ।डॉक्टर राम रतन सिंह भ्रमर ने पाप पुण्य के स्वरूप की ओर संकेत करते हुए कहा है "यदि मनुष्य की आंतरिक प्रवृत्तियां विषय ऐसे कर्मों को रोकने की प्रेरणा देती है जो समाज के लिए अत्यंत घातक और गरहीत है तो उसका यह कृत्य कुकृत्य ही कहा जाएगा उसे पाप कहा जाएगा पुण्य नहीं ।"5 सामान्यतः सत्य ,अहिंसा, प्रेम ,असत ,सेवा ,दया तथा सहानुभूति आदि पुण्य कर्मों के अंतर्गत आते हैं तथा इसके विपरीत भाव पाप में।भारतीय इहलोग तथा परलोक दोनों में आस्था रखते हैं।उनका विश्वास है कि जो व्यक्ति श्रेष्ठ आचरण करता है उसका इह लोक तो बनता ही है ,परलोक भी सुधर जाता है।

नैतिकता समाज की आधार शिला है । प्रत्येक समाज अपने अंदर शांति तथा व्यवस्था स्थापित करने के लिए एक विशेष आचार्य पद्धति का निर्धारण करता है ।इस अचार पद्धति का उद्देश्य सामाजिक जीवन को व्यवस्थित तथा समृद्ध बनाना होता है ।समाज के कभी व्यक्ति परस्पर स्नेह, सहानुभूति ,दया ,करुणा ,सहयोग ,मित्रता ,त्याग एवं सेवा भाव रखकर व्यवहार करें तो इससे समाज में सु व्यवस्था आ जाती है। समाज का ऐसा सु व्यवस्थित रूप ही नैतिकता के नाम से अभिहित किया जाता है। अतः सामाजिक जीवन में शांति, सु व्यवस्था, समरुद्धि एवं समानता उत्पन्न करने वाली नैतिकता ही है।नैतिकता के तात्पर्य है जो नीति के विभूषित हो, मर्यादित हो और आदर्श की ओर संकेत करता हो ।प्रत्येक समाज की नैतिकता कीअपनी भिन्नभिन्न - कसौटी होती है ।एक समाज में जीस व्यवहार की प्रशंसा की जाती है, भिन्न स्तर वाले दूसरे समाज में उसकी निंदा हो सकती है।

इस प्रकार नैतिकता का स्वरूप देश का समाज वातावरण तथा विभिन्न परिस्थितियों के अनुसार भिन्नभिन्न होता है ।इसे - स्थाई सार्वो भौतिक सर्वकालिक एवं सर्वो लौकिक नहीं माना जा सकता। नैतिकता में मानव मात्र के कल्याण के साथसाथ - मानव मात्र की स्वतंत्रता और समता के आदर्शों को प्रमुख स्थान दिया जाता है । इसमें रंग जाति तथा विशिष्ट धर्म को ही नहीं अपनाया जाता,वरना समता को ध्यान में रखते हुए उच्च आदर्शों की कल्पना की जाती है। नैतिकता की सीमा में अबाध हो जाने पर मनुष्य परस्पर हितों का ध्यान रखते हुए सभी कार्य करते हैं ।भारतीय संस्कृति में परहित को सर्वाधिक महत्व दिया गया है।"नैतिकता मानव सभ्यता का मूलाधार है।"6 इसलिए समाज में नैतिकता की अत्यधिक आवश्यकता होती है। समाज में फैली विश्रृंखलता ,स्वेच्छाचरितता ,दुराचारिता एवं अ व्यवस्था को दूर करने में नैतिकता का विशेष सहयोग रहता है ।नैतिकता के माध्यम से ही जीवन की विषमताओं विफलताओं तथा कठौताओं को दूर करने का प्रयास किया जा सकता है नैतिकता का चरम लक्ष्य सामाजिक सामंजस्य को बनाए रखना है।नैतिक मान्यताओं के पीछे प्रत्येक युग की अर्थव्यवस्था और सांस्कृतिक मान्यताओं का हाथ होता है। भारतीय संस्कृति के अनुसार नारी की रक्षा का उत्तरदायित्व पुरुष पर होता है। स्त्री को आश्रय देना ,उसकी रक्षा करना यह पुरुष का कर्तव्य है और स्त्री को अपनाकर अपने को पूर्ण बना ले ।सृष्टि में पुरुष अपूर्ण है क्योंकि उसके म मत्व पर केंद्रीयभूत होने के कारण उसमें दया, त्याग , सहानभूति,आदि की कोमल भावनाओं का अभाव है ।स्त्री और पुरुष के मिल जाने से जीवन पूर्ण होता है। फिर कामवासना का भी प्रश्न स्त्री और पुरुष के साथ होने से हल हो जाता है, इसीलिए विवाह का जन्म हुआ है ।विवाह एक पवित्र बंधन है जिसमें स्त्री पुरुष सदा सदा के लिए बंध जाते हैं ।

संक्षेप में हिंदी भाषा हमारी निश्चित रूप से राष्ट्रभाषा होकर सभी भारतीयों की शान है।और भारतीय संस्कृति यह गंगा जमुना संस्कृति मानी जाती है।अर्थात विविधता में एकता यही भारतीयों की विशेषता रही है ,उसी प्रकार अनेक भाषा भाषीयो को लेकर चलने वाली हिंदी यह प्रमुख भाषा है ।और उस भाषा में एकता का बोध कराना यही जीवन दर्शन है ।और यही जीवन दर्शन हिंदी साहित्य में विपुल मात्रा में बिखरा पड़ा है।आशा है, इसका दर्शन हमें हिंदी साहित्य पढ़ने से निश्चित रूप से होगा।

**पाद टिप्पणी :**

1) डॉक्टर सुदेश, भाषा साहित्य और संस्कृति :सार्थक प्रकाशन नई दिल्ली पृ-95
2)डॉक्टर रविंद्र नाथ मिश्रा , साहित्य विविध परिदृश्य:विशाल प्रकाशन दिल्ली पृ-20

3) डॉ नरेश कुमार ,मानक भाषा :रितिका प्रकाशन दिल्ली पृष्ठ 35
4) भगवती चरण वर्मा, टेढ़े-मेढ़े रास्ते: पृ 190
5) रामयतन सिंह , हिंदी दस सर्वश्रेष्ठ कथात्मक प्रयोग :भ्र म र संपादक अरविंद गुर्टू, : पृ-103
6) डॉक्टर विदूला सिंह ,भगवती चरण वर्मा साहित्य और जीवन दर्शन: शिरीष प्रिंटर्स दिल्ली 7.

# समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे अलिप्ततावादी धोरण

**प्रा. डॉ. कदम एच. पी.**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
श्री. पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा ता.परळी (वै.) जि. बीड

**प्रस्तावना**

जागतिक राजकारणात अपरिहार्यपणे अनेक राष्ट्रांचे परस्परांशी संबंध व संघर्ष निर्माण होत असतात. केवळ स्वत:च्या भौगोलिक मर्यादेत राहून कोणत्याही राष्ट्राला अलिप्तपणे सुखी व संपन्न जीवन जगणे शक्य नसते. परंतु या सिद्धांताला छेद देत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले, रुजविले असे म्हणता येईल. अलिप्ततावादाचे तात्पर्य आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय. भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सूत्रे हातात घेतली तेव्हा त्यांच्यासमोर अनेक आव्हाने होती. देशाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधरवणं हे मोठं आव्हान तर होतंच, पण जगभरात ब्रिटीश इंडिया ही जी ओळख निर्माण झाली होती. ती मिटवून स्वतःचं अस्तित्व निर्माण करणं ही सर्वात मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. कारण, सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधरवण्याचा मार्ग यातूनच तयार होतो. अलिप्तता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम पंडित नेहरूंनी 1954 मध्ये कोलंबोतील एका भाषणात केला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरूपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय. म्हणजेच 'होकारात्मक तटस्थता' असा अलिप्ततेचा अर्थ लावला जातो. अशाप्रकारच्या भारताचे परराष्ट्र धोरण यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टीने अलीप्ततावादाच्या माध्यमातून झालेल्या प्रयत्नांचा अढावा घेण्याच्या उद्देशाने हा शोधनिबंध प्रस्तुत करण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :**

1. भारताच्या परराष्ट्र धोरण विषयक तत्वे आणि विचारसरणीचा अभ्यास करणे.
2. अलिप्ततावादाची भारताच्या परराष्ट्र धोरणातील भूमिका जाणून घेणे.
3. समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे अलिप्ततावादी धोरण अभ्यासणे.
4. अलिप्ततावादी धोरणाचे भारताच्या समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध व शांतता प्रस्थापनेतील योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

कोणत्याही विषयाचे किवा घटनेचे अध्ययन करीत असताना ते वैज्ञानिक पद्धतीने होणे आवश्यक असते. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन करण्यात आला आहे. सामाजिक संशोधन पद्धतीत सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे तथ्य संकलन करणे होय. प्रस्तुत संशोधनासाठी समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे अलिप्ततावादी धोरण याचे अध्ययन करण्यासाठी हा विषय निश्चित करण्यात आला आहे. प्रस्तूत संशोधनात द्वितीयक स्त्रोतांद्वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. द्वितीयक तथ्य संकलनासोबतच विशेषतः प्राथमिक तथ्य संकलन आणि निरीक्षण पद्धतीवर अधिक भर देण्यात आला आहे. समकालीन आंतरराष्ट्रीय संबंध आणि भारताचे अलिप्ततावादी धोरण याचे अध्ययन पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात आले आहे.

**आंतरराष्ट्रीय संबंधातील मित्रत्वाचे व संघर्षाचे संबंध**

आधुनिक यंत्रयुगात आर्थिक विकास व अधिकाधिक उत्पादन यांचा अवलंब केल्या खेरीज कोणत्याही राष्ट्राला सामर्थ्यसंपन्न होता येत नाही. सुसज्ज प्रयोगशाळा, अलौकिक बुध्दीचे शास्त्रज्ञ, उत्कृष्ट शिक्षणव्यवस्था व सिद्ध झालेल्या प्रयोगांचा व्यापारी उपयोग करण्याची तयारी इ. गोष्टी राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय संबंधातील स्थान ठरविण्याला कारणीभूत ठरतात. विशेषत: प्रचंड कारखान्यांसाठी लागणारा कच्चा माल व उत्पादन केलेल्या मालासाठी बाजारपेठा आंतरराष्ट्रीय संबंधात संघर्ष

निर्माण करण्याला कारणीभूत होतात. लष्करी सुसज्जता, संहारक शस्त्रांचा शोध, उत्कृष्ट शिक्षण दिलेले खडे व राखीव सैन्य, युद्धविशारद सैन्याधिकारी इत्यादींची राष्ट्रसामर्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यकता असते. पहिल्या महायुद्धात इंग्लंडने तयार केलेले रणगाडे, जर्मनीच्या पाणबुड्या व दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने वापरलेला अणुबाँब, ही त्या राष्ट्रांना जागतिक राजकारणात निर्णायक महत्त्व मिळवून देण्याला कारणीभूत ठरली. त्याशिवाय स्थिर शासन व कठीण परिस्थितीतही राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाचा पाठपुरावा करणे यांतच राष्ट्राच्या मनोधैर्याची कसोटी असते; तर अंतर्गत बंडाळी, अस्थिर शासनसंस्था, रक्तपात, लुटालूट, राष्ट्राला जागतिक राजकारणात मागे पाडण्यास कारणीभूत होतात. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या जागतिक परिस्थितीत जीवनविषयक तत्वज्ञानाच्या वैचारिक संघर्षाला अधिकच तीव्रता व कटुता प्राप्त झाली आहे. कोणत्याही राष्ट्राला जगात आज मान्यता पावलेल्या लोकशाही व साम्यवाद ह्या दोन विचारसरणींपैकी कोणती जवळची वाटते, यावरूनच त्याचे आंतरराष्ट्रीय संबंधातील मित्रत्वाचे व संघर्षाचे संबंध प्रस्थापित होतात. वैचारिक दृष्टीकोन समान नसल्यास केवळ समान संकटामुळे परस्परांच्या निकट आलेली राष्ट्रे अधिक काळ मित्रत्वाने राहू शकत नाहीत, हे मागील काही वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झाले आहे.

**अलिप्ततावादी धोरणाचे महत्त्व**

भारताच्या बाबतीत आजही अलिप्ततावाद परराष्ट्र धोरणाचा गाभा आहे. त्यामुळेच भारत इतर राष्ट्रातील प्रश्न, शांततेच्या चर्चेन्या मार्गाने सोडवणे संयुक्त राष्ट्र संघटनेला समर्थन देणे ही तत्वे आजही भारत अनुसरुन आहे. परराष्ट्र धोरणातील स्वायत्तता हा अलिप्ततावादी विचारसरणीतील महत्वाचा मुद्दा आहे. भारतासह इतर देशासाठीही महत्वाचा आहे. त्यामुळे विचार म्हणून किंवा चळवळ म्हणून उद्दिष्टांमध्ये फारकत केल्यास अलिप्ततावादाची राजकीय स्वरुपाची उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत. पण आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे आजही साध्य झालेली नाहीत. तिसऱ्या जगातील देशांना आजही गरिबी उपासमार लोकसंख्या, निम्न जीवनस्तर, बेकारी, निरक्षरता अशा प्रकारच्या समस्या भेडसावत आहेत. आज चीन व अमेरिका जगावर अन्याय कारक धोरणे लादत आहेत. त्यांचीच मनमानी चालवीत आहेत. थांबविण्यासाठी आज अलिप्ततावादी चळवळीची गरज भासत आहे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अलिप्ततावादी धोरणानुसार वसाहतवादाचे चटके बसलेल्या आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया आणि आफ्रिका खंडातील देशांचा आता पुन्हा महासत्तांच्या नादी नं लागता एकेमेकांना साहाय्य करून पुढे जाण्याचा हा प्रयत्न होता. साधनसामुग्री, शस्त्रास्त्रे यांचं पुरेशी भांडवल नसतानाही केवळ एकजुटता आणि निषेध याच्या जोरावर या देशांनी अनेक आफ्रिकन देशांना पारतंत्र्यातून बाहेर पडण्यासाठी मदत केली होती. सुरवातीच्या काळात शीतयुद्धाच्या राजकरणात अडकून नं राहता आपले इन्टेरेस्ट जपण्याचा भारताचा प्रयत्न सुरवातीला चांगलाच चालला. अवघ्या दशकापूर्वी स्वतंत्र झालेल्या देशाचा पंतप्रधान त्यावेळेला जागतिक स्तरावरचा नेता झाला होता.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरुपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय. अलिप्ततावाद म्हणजे तटस्थ राहणं नव्हतं तर मोठ्या देशांच्या प्रभावाखाली नं येता निर्णय स्वतः घेण्याचं स्वतंत्र होतं. याही परिस्थितीत नाटो सारखी लष्करी युती नं करता भारत आपले इंटरेस्ट जपत होता. 1965 च्या पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात जेव्हा अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांनी शस्त्रात्रे पुरवण्यास बंधनं घातली तेव्हा भारतानं लगेच रशियाबरोबर युद्ध विषयक करार करत हत्यारांचा आणि पाठिंब्याचा बंदोबस्त केला होता. हा करार अलिप्ततावादाचेच एक महत्वपूर्ण फलित होते. दुसरे महत्व असे आहे की, अशाप्रकारचा करार करताना दोन देश समान पातळीवर येऊन करार करतात. मात्र संरक्षण विषयक करारात कोणतातरी एक पावरफुल देश तुमच्या संरक्षणाची जबाबदारी घेतल्यासारखं वागतो. भारताच्या अलिप्ततावादी धोरणामुळे रशिया आणि अमेरिका हे दोन्ही देश भारताला आपल्याकडे वळवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असत यामुळे भारत आपल्या गरजेनुसार दोघांशी संबंध प्रस्थापित करू शकत होता. याव्यतिरिक्त भारताला जगात मान होता त्याच कारण म्हणजे भारताची बाजू नैतीकतेची होती.

तत्कालीन परिस्थितीत नवीन स्वतंत्र झालेल्या देशांच्या स्वातंत्र्याचे व सार्वभौमत्वाचे रक्षण भारताच्या अलिप्ततावादाचे धोरणाने झाले पाहिजे असे नेहरूंचे होते. कारण शांततेच्या धोरणामुळे भारताला आपला सर्वांगिण विकास करता येईल. शिवाय भारतीय स्वातंत्र्याला व लोकशाहीला अंतर्गत धोक्यापासून संरक्षण मिळेल असे त्यांचे स्पष्ट मत होते. कोणत्याही देशातील अंतर्गत धोरण आणि परराष्ट्रीय धोरण या दोन्हीचा आद्य हेतू देशाचे आणि देशांतर्गत जनतेचे हिस साधण्याचे असतो. त्यादृष्टीने

संरक्षण विषयक धोरण, भौगोलिक, लोकमत आणि आपल्या परंपरा सगळेच विचारात घ्यावे लागते. पं. नेहरूंना जागतिक शांतता अपेक्षित होती. याकरीता अंतर्गत शांतता बरोबर बाहय शांतता अपेक्षित होती याकरीता सीमेवरील सीमाबाहय देशांत शांतता राखण्यासाठी अनेक देशांना धोरणात समाविष्ठ करणे नेहरूंना अपेक्षित होते. भारताला यामुळे शांतता व सहकार्य देशांचा सर्वांगिण विकास करणे शक्य होईल व अधिक काळ देशांचा सामाजिक, आर्थिक, व सर्वांगिण विकास करणे अधिक सोईचे होईल. असा त्यांचा आशावाद होता. याबरोबरच त्यांना अमेरिका, रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल असाही आशावाद होता. अशाप्रकारे महासत्तांच्या बलाढय शक्तींशी तोंड देण्यासाठी अलिप्ततावाद या माध्यमातून तिसऱ्या शक्तीच्या निर्मितीची आवश्यकता तत्कालीन परिस्थितीत व्यक्त करण्यात आली.

**समारोप**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू भारताच्या अलिप्ततावादाची धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणतात की, "कोणत्याही राष्ट्राचे अंकित म्हणून न राहता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊ; आम्ही सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या महासत्तांच्या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल." त्यामुळेच विधायक क्रियाशील व निश्चित स्वरूपाचा नीतीप्रवाह म्हणून अलिप्ततावादी धोरणास महत्त्व आहे. आजही या धोरणाचे अंतरराष्ट्रीय स्तरावर असणारे एक महत्वपूर्ण धोरण मानले जाते. हेन्री किसिंजर यांनी त्यांच्या 2014 च्या वर्ल्ड ऑर्डर या पुस्तकात भारत आणि यूएसच्या सुरुवातीच्या इतिहासामधील धागा पकडून भारताच्या अलिप्ततावादाचे धोरण मान्य केले होते. या धोरणाचे कौतुक करताना अमेरिकेचे हेन्री किसिंजर म्हणतात की, "या धोरणाचा सार असा होता की यामुळे भारताला शीतयुद्धाच्या काळात दोन्ही ब्लॉकमधून पाठिंबा मिळू शकला अमेरिकेकडून विकास सहाय्य आणि अमेरिकेच्या बौद्धिक वर्गाचा नैतिक पाठिंबा मिळवला तर सोव्हिएत गटाकडून लष्करी मदत आणि राजनैतिक सहकार्य मिळवले." भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर अलिप्ततावादाला महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. हे धोरण विधायक क्रियाशील व निश्चित स्वरुपाचे आहे. शेवटी असे म्हटले जाऊ शकते की, आंतराष्ट्रीय क्षेत्रातील एक कायम टिकणारा नीती प्रवाह म्हणून अलिप्ततावादी धोरणास महत्व आहे.

**संदर्भग्रंथ सूची:**

1. हॅन्स कोचलर - लोकशाही आणि कायद्याचे आंतरराष्ट्रीय नियम
2. अँड्र्यू लिंकलेटर -आंतरराष्ट्रीय संबंधांचे सिद्धांत
3. प्रा. जे. एन. दिक्षित - भारतीय विदेश नीती, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली.
4. प्रा. पवन कुमार - भारत की विदेश नीती, ओमेगा पब्लिकेशन. नई दिल्ली.
5. डॉ. बी. डी. तोडकर - भारत आणि जग, डायमंड पब्लीकेशन, पुणे.
6. डॉ. शैलेंद्र देवळाणकर - भारत आणि जग, सकाळ पेपर्स, जून 2005
7. व्ही. बी. पाटील - भारताचे परराष्ट्र धोरण, के. सागर पब्लिकेशन, पुणे 2005.

# कृषी पर्यटन : महत्व, आवश्यक सुविधा,फायदे आणि अडचणी

**प्रोफेसर डॉ. एम.डी.कच्छवे**
वाणिज्य विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जिल्हा परभणी.

**प्रस्तावना :-**

अति प्राचीन काळापासून मनुष्यला भूतकाळातील ऐतिहासिक घटना, किल्ले ,मंदिरे ,राजवाडे, लेण्या इत्यादीचे त्याला कुतूहल वाटत असते. जे भूतकाळात झाले ते जाणून घेण्यासाठी तो नेहमी धडपडत असतो. मानवाची ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. म्हणून माणूस त्या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी प्रवास करतो. त्यांनी केलेल्या प्रवासास पर्यटन असे म्हणतात .जी व्यक्ती असा प्रवास करते त्या व्यक्तीला पर्यटक असे म्हणतात. पर्यटनाचा मुख्य उद्देश मानवी जीवन आनंददायी बनविणे आहे. पर्यटनाची व्याप्ती ही काळानुरूप बदलत असते. प्राचीन काळी पर्यटन हे देवधर्म,यात्रा, जत्रा इत्यादीसाठी पायी किंवा बैलगाडीने प्रवास करीत करण्यात येत होते.आजच्या आधुनिक काळात पर्यटनाची व्याप्ती पूर्णपणे बदलत गेली आहे .मनोरंजनासाठी फिरायला जाणे ,आनंद मिळविणे मौजमजा करणे इत्यादीसाठी पर्यटन केले जात आहे. पूर्वी पर्यटन हे पायी बैलगाडी, घोडागाडी इत्यादीने देखील जात होते .मुक्काम हा ठराविक गावात किंवा धर्मशाळेत असायचा .तिथे राहण्याची व जेवणाची पर्यटकाला चिंता नसायची. अलीकडच्या काळात मोटार गाडी रस्ते वाहतुकीमुळे प्रवास केला जात आहे. हॉटेल, लाॅज, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी राहण्याची व जेवणाची सोय उपलब्ध होत आहे. या सर्व गोष्टी घरबसल्या बुकिंग करूनच मनुष्य प्रवासाला बाहेर पडत आहे.पर्यटनाला आलेल्या पर्यटकाला सेवा पुरविण्यासाठी रोजगार निर्मिती होत आहे. उदा. वस्तूंची विक्री, भाजीपाला व फळे ,दूध, मार्गदर्शक इत्यादी पर्यटन हा एक प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटन व्यवसायापासून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते व रोजगाराच्या संधी प्राप्त होताना पाहावयास मिळतात. पर्यटक आपल्या आवडीनुसार पर्यटन स्थळाची निवड करतो .21 व्या शतकात पर्यटन हा व्यवसाय सर्वात जलद गतीने विकसित होत आहे. या व्यवसायात भांडवल गुंतवणूक कमी आणि फायदा जास्त असल्यामुळे विकसित आणि विकसित देशाचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. मानवाला त्याच्या दैनंदिन जीवनातून विरंगुळा मिळावा म्हणून तो पर्यटनासाठी बाहेर पडत आहे. कोणत्याही प्रदेशातील पर्यटन व्यवसायाचा विकास हा वाहतूक सेवा निवासी सेवा मनोरंजनाचा ती बाजारपेठ इत्यादी घटकावर अवलंबून असते.आर्थिक विकास साधणारा व्यवसाय म्हणून पर्यटन हा जागतिक उद्योग बनला आहे.

'पर्यटन ' संज्ञा प्रवास (Tour)या शब्दाशी संबंधित आहे. प्रवास (Tour)हा शब्द लॅटिन भाषेतील(Tornos) या शब्दापासून आलेला आहे.(Tornos) शब्दाचा मूळ अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार असा आहे. या शब्दापासून वर्तुळाकार प्रवास हा शब्द रूढ झाला. एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अभ्यासासाठी मनोरंजनासाठी किंवा इतर कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय .पर्यटन हे पूरस्थितीच्या वेळ घालवण्याचे एक साधन म्हणून जगभरात लोकप्रिय झाले आहे .निसर्गाची ही विविध रूपे पर्यटकांसाठी आकर्षणाचा बिंदू ठरत आहे.(Tourist) हा शब्द लॅटिन भाषेतील(Tourn) या शब्दापासून आलेला आहे.पर्यटना जी व्यक्ती प्रत्यक्षात पर्यटन करते त्या व्यक्तीला पर्यटक (Tourist)असे म्हणतात. पर्यटनाचा मुख्य उद्देश मानवी जीवन आनंददायी बनविणे आहे. पर्यटनाची व्याप्ती ही काळात बदलत असते प्राचीन काळी पर्यटन हे देवधर्म यात्रा जत्रा इत्यादीसाठी पायी किंवा बैलगाडीने प्रवास करीत करण्यात येत होते. पर्यटन ही एक प्रक्रिया आहे. कृषी पर्यटन हे कृषी व पर्यटन या विभागाचा समन्वय आहे .पर्यटक शेताला भेट देतील शेतीच्या विविध पैलूचे दर्शन व अनुभव घेतील .ताजा भाजीपाला फळे खरेदी करून प्रदर्शन मुक्त वातावरणाचा आनंद घेतील तसेच ग्रामीण भजन ,जागरण, गोंधळ, भारुड ,कीर्तन, प्रवचन अशा विविध लोककलांचा आनंद घेतील यामुळे ग्रामीण व शहरी भागातील दरी कमी होईल. ग्रामीण माणूस शहरी भागाला जोडला जाईल. आनंद मिळविण्यासाठी मनोरंजनासाठी प्रवासी संकल्पना सर्वप्रथम युरोपमधील रोमन लोकांनी रुजवली .ग्रामीण भागात नैसर्गिक साधन संपत्तीची श्रीमंती आहे. ती शहरातील लोकांना सारखी आकर्षक करत असते. शेती ही संकटात

सापडली असून शेतीत राबणारा शेतकरी हा संकटात आहे .संकटातून बाहेर पडण्यासाठी त्यांना स्वतःलाच मार्ग काढावा लागतो .कृषी आधारित व कृषी प्रक्रिया उद्योगाबरोबरच शेतकऱ्यांनी कृषी पर्यटनाचा विचार केला तर निश्चितच त्याच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांना या व्यवसायाची कल्पना यावी म्हणून कृषी पर्यटनामधून देशातील ग्रामीण भागाचा विकास होण्यास त्यांना मिळते .कृषी पर्यटन हा एक कृषीवर आधारित व्यवसाय असून तो सर्वांसाठी खुला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून पर्यटकांना कृषी क्षेत्रात संबंधी माहिती मिळतेच तेथील हस्तकलेच्या वस्तू ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनाचे तसेच सांस्कृतिक व परंपरांची देखील माहिती मिळते बंदिस्त शहरी जीवनाला कंटाळून मुक्तपणे नैसर्गिक जीवनाचा आनंद घेण्यासाठी उत्सुक असणारे पर्यटन एखाद्या शेतकऱ्याच्या शेतात किंवा निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या गावात राहण्यासाठी वेळ घालवण्यासाठी येत असतात .त्यांची जेवणाची राहण्याची करूणुकीची फिरण्याची सोय केलेली असते .ही पर्यटक तेथे आपल्या वेळेनुसार आनंदाने राहता राहतात.

• **संशोधनाचे उद्देश :-**

खालील गृहीतके निश्चित करून संशोधनाचे उद्देश निश्चित करण्यात आलेली आहेत.

1)पर्यटन आणि पर्यटक यांची संकल्पना स्पष्ट करणे

2)कृषी पर्यटनाचे महत्त्व शोधणे

3) कृषी पर्यटना साठी आवश्यक बाबी शोधणे

4) कृषी पर्यटनाचे फायदे जाणून घेणे

5) कृषी पर्यटनासमोर येणाऱ्या अडचणी शोधणे

6) निष्कर्ष काढणे.

• **संशोधनाची गृहीतके :-** संशोधनाची गृहीतके खालील प्रमाणे आहेत.

1)अलीकडच्या काळात शहरी भागातील लोक ग्रामीण भागात जाऊन आपला वेळ घालवताना दिसत आहेत .

2) कृषी पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत बनत आहे कृषी पर्यटनाच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असल्यामुळे दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत आहे.

• **संशोधन पद्धती :-** वरील उद्देश गृहीत धरून शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी शोधनिबंध, क्रमिक पुस्तके, मासिके, इंटरनेट , संदर्भ ग्रंथ इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

• **पर्यटनाची व्याख्या :-**

1) "शेती आणि शेतीशी संबंधित उपक्रम पाहण्यासाठी केलेला प्रवास म्हणजे कृषी पर्यटन होय." 2) "पर्यटनातून रोजगार निर्माण करणे गरीबी दूर करणे यासारख्या मानवी प्रयत्नांची एक ठोस अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजे कृषी पर्यटन होय. "

• **भारतीय पर्यटन विकास महामंडळ :-** पर्यटन उद्योगाच्या भारतातील विकासाबाबत इसवी सन 1963 मध्ये समिती नेमण्यात आली होती या समितीने 1965 मध्ये पर्यटन खात्याअंतर्गत हॉटेल महामंडळ भारतीय पर्यटन महामंडळ व भारतीय पर्यटन वाहतूक महामंडळ अशी स्वतंत्र महामंडळ स्थापन केली तिन्ही महामंडळी विसर्जित करून एका मंडळात दिलेलीकरण करण्याचे ठरले त्यानुसार ऑक्टोबर 1966 मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

• **कृषी पर्यटनाचे महत्त्व :-** शेती संदर्भात माहिती व मनोरंजनासाठी कृषी प्रवचन आवश्यक आहे. सध्याच्या या बदलत्या काळा शेतीकडे पाण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे .प्रयोगशील व प्रगत शेतकरी आपल्या शेती व्यवसायाला कृषी पर्यटनाची जोड देताना दिसून येतात .कृषी पर्यटनामुळे समाजातील लोकांचे मनोरंजन होते .नवनवीन शेतीचे उत्पादन, तंत्र उत्पादन रचना माहिती, शेती उपशागतीचे आधुनिक लहान-मोठे यंत्र ,अवजारे ,सिंचन पद्धती ,पिकांची माहिती इत्यादी कल्पना येण्यास मदत होते यामुळे व्यावसायिक दृष्टिकोनातून शेतकऱ्यांमध्ये वाढ होते .याचा परिणाम म्हणजे ग्रामीण भागात लोकांचे उत्पन्न शेतमाल

उत्पादन उत्पादकता पूरक उद्योग विकास रोजगार व राहणीमान इत्यादी मध्ये वाढ होण्यास मदत होते. ग्रामीण भागामध्ये पर्यटकांना शेतावर प्रत्यक्ष चालणाऱ्या सर्व कामांमध्ये समाविष्ट केले जाते. यामध्ये दूध काढणे, भाजीपाल्याची लागवड करणे, मिरचीची तोडणी करणे ,शेतावर नांगर करणे ,एखाद्या पिकाची काढणी करणे इत्यादी सर्व कामांमध्ये त्यांना समाविष्ट केले जाते .यामुळे त्यांना ग्रामीण कृषी कार्याचा अनुभव मिळतो .ग्रामीण भागातील विविध यात्रा, सण-उत्सव ,आठवडी बाजार व त्यातील विविध वस्तू त्यांना विकत घ्याव्या वाटतात .ग्रामीण भागातील विविध खेळ ,विटी दांडू लंगडी ,लपंडाव यांचा ते मनसूक्त आनंद घेतात तसेच कृषी पर्यटन केंद्रात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर गवळणी, भारुड, जागरण, गोंधळ ,लावणी इत्यादी ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन केलं जाते.कृषी पर्यटनामध्ये शेतावरील विविध जनावरे ,शेळ्या ,मेंढ्या ,गाई, म्हशी आणि बैल तसेच शेतीपूरक व्यवसाय यामध्ये कुक्कुटपालन, मच्छी पालन ,शेळीपालन, ससे पालन ,वराह पालन इत्यादीची माहिती देणे तसेच वस्तू खरेदी करणे .मळ्यातील बैलगाडीमध्ये सफर करणे, ट्रॅक्टर वर फेरफटका मारणे इत्यादी गोष्टीतून त्यांना खूप आनंद मिळतो.

1) शेतावरील मुक्काम त्यांना नेहमीच्या शहरी वातावरणापासून दूर घेऊन जातो.
2) ग्रामीण भागातील वेगवेगळ्या पदार्थांची चव त्यांना अधिक चांगली वाटते चुलीवरची ज्वारीची भाकरी त्यांना चांगली वाटते .
3) अशा वातावरणात एक दोन दिवसाच्या मुक्कामामध्ये ते शहरी भागातील वातावरण विसरून जातात. निसर्गाच्या सानिध्यात एकरूप होऊन जातात.
4) ताण-तणाव विसरून जातात आणि ग्रामीण जीवनामध्ये रमून जातात त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारत जाते .
5) शेतीपूरक उद्योगाचा विकास करणे व नवीन शेतीविषयक तंत्राची माहिती उपलब्ध करून देणे
6) कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक विकास होतो
7)कृषी पर्यटनामुळे व्यवसाय नियोजनबद्ध पद्धतीने व योग्य व्यवस्थापन तत्त्वाचा अवलंब करून यशस्वी करता येतो
8) पारंपारिक शेतीचा त्याग करून आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य होते
9) कृषी पर्यटनामुळे उत्पादन, उत्पन्न, रोजगार इत्यादीमध्ये वाढ घडून आणता येते
10) कृषी पर्यटनामुळे प्रयोगशील व प्रगत शेतकऱ्यांना आपल्या शेती व्यवसायाला कृषी पर्यटनाची जोड देता येते
11) कृषी पर्यटन केंद्र सुरू करताना कृषी पर्यटनाकडे एक व्यवसाय म्हणून पहावे डोंगराच्या कुशीत किंवा कमीत कमी अंतरावर दर्या खोऱ्यात नदी नाले जंगल इत्यादी ठिकाणी पर्यटकांना पोहोचण्यासाठी रस्ते असावे.
12) कृषी पर्यटन केंद्रासाठी निवडलेल्या ठिकाणी हे निसर्गरम्य असावे .

**• कृषी पर्यटन केंद्रावरील सोयी सुविधा :-**

पर्यटन केंद्र सुरू करण्याचा निश्चय झाल्यानंतर पर्यटन केंद्रावर खालील सुविधा असणे महत्त्वाचे असते. त्या सुविधा कमीत कमी खर्चामध्ये कशा देता येतील याकडे विचार करणे महत्त्वाचे असते .

1) रस्त्याची सुविधा :-पर्यटकांना पर्यटन केंद्रावर पोहोचण्यासाठी रस्ता असावा.
2) झाडे व फुले लावावी :- रस्त्याच्या दोन्ही कडेला सुंदर फुलांची व फळांची झाडे असावीत
3) स्वागत कक्ष उभारावा :- पर्यटक पर्यटन केंद्रावर पोहोचल्यानंतर स्थानिक परंपरेनुसार त्याचे स्वागत करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी. स्वतः उपस्थित राहिल्यास अधिक चांगले.
4) स्वच्छ व सुंदर घरकुल :- पर्यटन केंद्रावर पर्यटक आल्यानंतर त्याला राहण्यासाठी स्वच्छ व सुंदर घरकुल असावे. या घरकुलासाठी लाकूड ,बांबू ,गवत व स्थानिक साधनांचा वापर करावा. नैसर्गिक साधनांचा वापर केल्यामुळे पर्यटकांना त्या ठिकाणी प्रसन्न वाटते.
5) पोहण्यासाठी सुविधा :- पर्यटन केंद्रावर किंवा आसपास तलाव ,नदी ,कालवे, विहीर ,स्विमिंग पूल असावा त्यामुळे त्यांना पाण्यात पोहण्याचा ,उड्या ,डुबक्या मारण्याचा आनंद मिळतो त्यामुळे ते आपला जास्तीचा वेळ घालतील.

6) घोडा गाडी व बैलगाडीची सोय :- पर्यटन स्थळावर लहान मुलांना फिरण्यासाठी वेगवेगळ्या साईट पाहण्यासाठी बैलगाडी, घोडा गाडी ,घोडा स्वारीची, उंटासह सवारी ची सोय असावी.

7) पशुपक्षी व प्राणी संग्रहालय :- कृषी पर्यटन स्थळावर कुकुट पालन, शेळी पालन ,मेंढी पालन, जनावरांचा गोठा ,ससे पालन, कबूतर पालन ,मोर ,बदक, चिमण्या इत्यादी पशु पक्षी असावेत त्यामुळे पर्यटकांच्या आनंदात भर पडेल.

8) शेतीची अवजारे :- पर्यटकांना नेहमी शेतकरी व शेतीच्या कामाबद्दल माहिती करून घेण्याची उत्सुकता असते. त्यांना शेतातील नांगरणी, पेरणी, खुरपणी ,पिकाला पाणी देणे पिक कापणे ,हुरडा पार्टी , गुरे राखणे इत्यादी गोष्टी त्यांना प्रत्यक्ष दाखवाव्यात त्यामुळे ते वारंवार येतील.

9) संग्रहालयाची सुविधा :- पर्यटन केंद्रावर संग्रहालय असावे त्यामध्ये शेतीची अवजारे व त्यांची माहिती परिसरात उपलब्ध असणारे प्राणी, पशुपक्षी यांची चित्रे व माहिती गावांची ऐतिहासिक ,सामाजिक, धार्मिक पार्श्वभूमी चित्ररूप असावे. सांस्कृतिक सण ,समारंभ इत्यादी गोष्टी संग्रहित असाव्या.

10) स्थानिक खेळ :- पर्यटकांच्या मनोरंजनासाठी स्थानिक खेळ उदाहरणार्थ  विटी दांडू ,लपंडाव , कबड्डी, कीर्तन ,भजन , कथाकथन, भारुड गवळण ,पोवाडा कार्यक्रमही त्यांच्या इच्छेनुसार आयोजित करावीत.

11) विक्री केंद्र :-पर्यटकांना स्थानिक वस्तूंची खरेदी करता यावी म्हणून पर्यटन केंद्रावर वेगवेगळी फळे, भाजीपाला ,फुले,कंदमुळे ,औषधी वनस्पती ,लोणचे पापड, हस्तकलेच्या वस्तू इत्यादी.

12) हाॅटेल व निवासाची सोय :- कृषी पर्यटन केंद्रावर पर्यटकांना स्थानिक भोजन व नाश्त्याची मेजवानी मिळावी म्हणून त्यांच्या आवडीनुसार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी रेस्टॉरंट असावे.

13) संरक्षण यंत्रणा :- आपल्याकडे आलेल्या प्रत्येकांची त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे हे आद्य कर्तव्य असते म्हणून त्यांना जंगली प्राणी किंवा पाळीव प्राण्यांपासून इजा होणार नाही याची काळजी घ्यावी त्यांचे साहित्य चोरीला जाणार नाही याची दक्षता घ्यावी अचानक उद्भवणारे आपत्तीला सामोरे जाण्यासाठी संरक्षण यंत्रणा असावी.

14 ) नोंदवही व सूचनापेटी :- पर्यटन केंद्रावर येणाऱ्या पर्यटकांच्या प्रतिक्रिया नोंदविण्यासाठी नोंदवही असावी.त्यात पर्यटकांचा पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर लिहिण्यास सांगावे किंवा तशी व्यवस्था नोंद करावी .त्यांच्या काही सूचनांचा स्वीकार करण्यासाठी सूचना पेटी ठेवावी.

15) विविध भाषा येणारा नोकरदार नियुक्त करावा :-   पर्यटक हे काही जाणून घेण्याच्या उद्देशाने पर्यटन केंद्रावर येत असतात त्यांची भाषा वेगवेगळी असते. त्यांच्याच भाषेमध्ये संवाद साधण्यासाठी तशी यंत्रणा असावी .त्यांच्या शंकांचे समाधान करावे त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अभ्यासपूर्ण उत्तरे द्यावी.

16) झोपाळ्याची सुविधा :- पर्यटन केंद्रावर झोक्याचा आनंद घेण्यासाठी झोपाळा ,झोका झाडावर बांधलेला असावा तलावातील पाण्यामध्ये फिरण्यासाठी बोट किंवा होडी असावी .

17) निरोप समारंभ घ्यावा :- पर्यटक पर्यटन केंद्रावरून जात असताना त्यांच्यासाठी पारंपारिक पद्धतीने छोटेखानी निरोप समारंभ घ्यावा. त्यांचे फोटो घ्यावेत व आपल्याला परवडेल व त्यांच्या कायम आठवणीत राहील अशी एखादी भेट वस्तू त्यांना द्यावी.

- **कृषी पर्यटनाचे फायदे :**

पारंपरिक शेतीचा आर्थिक चेहरा बदलून टाकण्याचे सामर्थ्य कृषी पर्यटन व्यवसायात आहे .त्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळू शकते.

1) ताजा शेतमाल तसेच प्रक्रिया केलेला शेतमाल यांना चालती फिरती बाजारपेठ मिळते. आपण पिकलेल्या मालाची किंमत स्वतःलाच ठरविता येते. पर्यटकांना हे सगळं ताजा ताजे मिळते

2) ग्रामीण आणि शहरी संस्कृतीची एकमेकांना ओळख होते. शेती अनुभवायला मिळते आपण खातो ते कुठून येतं किती मेहनतीतून बनत हे समजते त्यामुळे शेतकऱ्यांचं वास्तव जीवन शहरी लोकांना समजतं

3) शेती पूरक व्यवसायामुळे शेतीचा विकास होतो. शेतकऱ्यांना जोड व्यवसाय असल्याशिवाय त्यांचा सर्वांगीण विकास होत नाही
4) कुटुंबातील सदस्य व तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. आपण तयार केलेल्या वस्तूला तिथेच बाजारपेठ मिळते
5) ग्रामीण व शहरी लोकांतील संस्कृती व नैतिक मूल्याची देवाणघेवाण होते.
6) तयार केलेल्या मालाला तेथेच बाजारपेठ मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांना मिळते आणि शेतीवरचा ताण कमी होतो.
7) कृषी पर्यटनामुळे ताणतणाव कमी होतो . पर्यटक हे आपल्या वेळेनुसार तान तणाव घालवण्यासाठीच पर्यटन निवडत असतात
8) शेतकऱ्यांना व पर्यटकांना नवनवीन माहिती मिळते.
9) पर्यटकांच्या ज्ञानात भर पडते : ग्रामीण भागातील तरुण-तरुणी महिला बचत गट यांच्या व्यक्तिमत्व विकासात मदत होते त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो .
10) वेगवेगळ्या ठिकाणचे लोक व त्यांची जीवन व संस्कृती यांची माहिती होते .
11)शहरी लोकांच्या संपर्कामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानांचा दर्जा सुधारतो.
12)महिला बचत गटांना स्थानिक कारागिरांना कलाकारांना त्यांनी तयार केलेल्या वस्तू व सेवेला बाजारपेठ मिळते त्यामुळे प्रसिद्धी होते .
13) गावची लोककला खाद्य संस्कृती यात्रा उत्सव परिसरातील पर्यटन वैभव यांचे जतन व संवर्धन होते.

• **कृषी पर्यटना समोरील येणाऱ्या अडचणी :-** ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कृषी पर्यटन महत्त्वपूर्ण ठरत आहे. कृषी पर्यटन चांगले असले तरी खालील प्रमाणे काही अडचणी दिसून येतात.
1) शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाचे अपुरे ज्ञान आहे.
2) पर्यटक आणि शेतकरी यांच्यातील सुयोग्य संभाषण कौशल्याचा अभाव आहे.
3) कृषी पर्यटन केंद्राच्या उभारणीसाठी भांडवलांची कमतरता आहे.
4) कृषी पर्यटन हा संघटित क्षेत्रातील व्यवसाय आहे.
5) शहरी पर्यटकांच्या गरजा व आवडीनिवडी हे शेतकऱ्यांमधील अज्ञान आहे.

• **निष्कर्ष :-**

ग्रामीण भागातील संस्कृती नैसर्गिक साधन संपत्ती टिकवून आहे. शहरी भागांमध्ये विकासाबरोबरच काही समस्या निर्माण झालेल्या असल्या तरी शहरी भागातील लोक आपला वेळ घालवण्यासाठी ताण तणाव दूर करण्यासाठी ग्रामीण भागांमध्ये येत आहेत. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून नवयुवकांना रोजगाराच्या संधी आहेत.ग्रामीण भागातील युवक महिला तसेच महिला बचत गटातील महिलांना बनवलेले पदार्थ यांना गावातच बाजारपेठ उपलब्ध होत आहे. कृषी पर्यटन केंद्राचे मार्केटिंग शासन स्तरावर होणे महत्त्वाचे आहे .शेतात जाऊन शेती व स्वतः शेती पूरक अवजारे चालविणे, चुलीवरच्या जेवणाचा आस्वाद घेणे ,निवांत झाडाखाली झोपणे, रात्री मोकळ्या आकाशातील चांदण्यांचा अनुभव घेणे ही कृषी पर्यटनामुळे शक्य होते. शहरा जवळची गाव झपाट्याने शहरीकरणात घुसत आहेत. नैसर्गिक वातावरण नेहमी व्यस्त जीवनापासून दूर असते. आधुनिक जीवनात ताण तणाव प्रचंड वाढलेले असल्यामुळे शांत ठिकाणी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) प्रा नानासाहेब पटनुरे व इतर : ग्रामीण अर्थशास्त्र अरुणा प्रकाशन लातूर
2) पांडुरंग तावरे कृषी व ग्रामीण पर्यटन समृद्ध शेतीचा राजमार्ग 3) मनोज हाडवळे : कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास
4) डोंगळे बी.के. : कृषी पर्यटन महासंघ कोषाध्यक्ष

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांचे योगदान

**डॉ.मोहन मिसाळ,**
इतिहास विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ जिल्हापरभणी .

भारतीय स्वातंत्र्याची दोन आंदोलने स्पष्टपणे दिसून येतात. .एक ब्रिटिशांच्या जोखंडातून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झालेली स्वातंत्र्ययुद्ध तर दुसरे सवर्णांच्या सामाजिक मानसिक,आर्थिक,गुलामगिरीतून,मुक्त होण्यासाठी झालेले सामाजिक आंदोलने होत. या दोन्हीही आंदोलनाचा मूलभूत गाभा हा भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हाच होता. फक्त त्यांचे मार्ग भिन्न होते.अशा पद्धतीने दोन विचार प्रवाह या काळा मध्ये अस्तित्वात असलेले आपल्याला दिसून येतात. या दोन्ही मतप्रवाहाचा विचार आजच्या लेखात आपण करणार आहोत.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१) सामाजिक व स्वातंत्र्य लढ्यात कामगिरी करणाऱ्या स्त्रियांचा आढावा घेणे.
२) भारतीय स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा नवीन पिढीस देणे.
३) सामाजिक व राजकीय इतिहासाचा आढावा घेणे.

ब्रिटिशांनी सातासमुद्रापार येऊन भारतावर राज्य प्रस्थापित केले. ब्रिटिश लोक हे अल्पसंख्याक होते परंतु बहुसंख्यांक लोंकावर त्यांनी राज्य केले.आमच्यातील फुटीरताही भारतीय स्वातंत्र्य गमाविण्यास कारणीभूत ठरली.या दीडशे वर्षाच्या कालखंडामध्ये ब्रिटिशांच्या विरोधामध्ये अनेक उठाव झाले.त्यापैकी सर्वात मोठा उठाव हा 1857 चा होता. या उठावात अनेक राजेमहाराजे,संस्थानिक आणि सामान्य जनता सहभागी झाली होती. याचबरोबर अनेक स्त्रियांचा सुद्धा सहभाग होता . भारतीय धर्मग्रंथांनी स्त्रीला अबला म्हणून तिचे चित्रण केले होते. याचीपरिणीती स्त्रियांच्या गुलामगिरीत झाली असे असताना स्त्रियांनी घराबाहेर पडून या स्वातंत्र्य लढ्यात आपला सहभाग दर्शविला. याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**स्त्रियांचा सामाजिक सुधारणा चळवळीतील सहभाग-**

तथागत गौतम बुद्धापासून सामाजिक उत्थानाचा प्रयत्न भारतात सुरू झाल्याचे दिसून येते. तथागत गौतम बुद्धांनी वर्णव्यवस्थेला तडा देण्याचे काम केले .पुढे भारतात महात्मा ज्योतिबा फुले यांनी ई.स.1848 मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढली .आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवून भारताची प्रथम महिला शिक्षिका बनविण्याचे काम केले. याची प्रेरणा पुढे घेऊन शशिकांत बॅनर्जी यांनी इसवीसन 1865 मध्ये आपल्या पत्नीच्या सहकार्याने मुलींचे हायस्कूल काढले.इसवी सन 1871 मध्ये त्यांनी दुसरी मुलीची शाळा काढली .इसवीसन 1871 मध्येच स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी संस्था स्थापनकेली. इसवी सन१८८७ मध्ये त्यांनी विधवासाठी विधवागृह स्थापन केले .याच बरोबर त्यांनी ब्राह्मो समाजाच्या वतीने आठ पुनर्विवाह घडवून आणले. स्वतःच्या पुतणीचा विवाह सुद्धा त्यांनी अशाच पद्धतीने केला.

**न्यायमूर्ती रानडे आणि स्त्रियांची चळवळ-**

रानडे यांनी इसवी सन1887 पासून भारतीयराष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाला लागून अखिल सामाजिक परिषद भरवण्याचे काम सुरू केले या समाज परिषदांच्या माध्यमातून मुंबई व मद्रास प्रांतामध्ये महिलांच्या सभा घेण्यास सुरुवात झाली.संमती वयाच्या वादात तोंड देण्यासाठी अहमदाबाद व सिंधमध्ये समाज सुधारणा मंडळे स्थापन झाली.इसवीसन1895 मध्ये पुण्यात काँग्रेसचे अधिवेशन भरले असता टिळकांच्या अनुयायांनी सामाजिक परिषद परिषदेस काँग्रेस अधिवेशनाचा मंडप वापरू द्यायचा नाही म्हणून भांडण सुरू केले. शेवटी न्यायमूर्ती रानडयांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सामाजिक परिषदेचे अधिवेशन भरवले. परंतु इसवीसन 1890 मध्ये पुण्यात मिशनरी लोकांच्या हातची बिस्किटे, चहा न्यायमूर्ती रानडे इतरांसोबत घेतली असता सवर्णांनी ग्रामण्याची धमकी न्यायमूर्ती रानडेंना दिली.अशा वेळेस न्यायमूर्ती रानडेयांनी घाबरून जाऊन प्रायश्चीत घेतले.याचबरोबर

इसवीसन 1873मध्ये विधवा विवाहास पाठिंबा देणाऱ्या न्यायमूर्ती रानडे यांनी स्वतः मात्र अकरा वर्षाच्या कुमारी मुलीशी विवाह केला.हे पण त्यांच्या तत्त्वाशी विसंगतच होते.

**सामाजिक परिषद –**

1904 पासून रमाबाई रानडे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक परिषदेत स्त्रियांनी स्त्री जीवनाचे प्रश्न ,विवाह, वारसाहक्क यावर चर्चा सुरू केली . यामुळे अनेक परिणाम घडून आले. स्त्रियांनी पडदा पद्धत फेकून दिली .

**राजकीय चळवळीत सहभाग-**

1) *बेगम हजरतमहल –*

1857 मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात आगडोंब पेटला होता. या युद्धा मध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाईया सुद्धा सामील झाल्या होत्या. मेरी झाशी नही दूंगी असे म्हणत त्यांनी ब्रिटिशा विरोधातलढाईकेली .या मध्ये त्यांना वीर मरण प्राप्त झाले. याचाच पुढील भाग अवधची राणी हजरत महल बेगम यांनी पुढे सुरू केलेला दिसून येतो. स्वतःहातात तलवार घेऊन त्या लढत होत्या. त्यांनी मंदिर मस्जीदच्या ऐवजी देशाच्या स्वातंत्र्याला प्रथम मानले.

2) *मॅडम भिकाजी कामा –*

यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोठा सहभाग घेतलेला दिसून येतो. त्यांनी सर्वप्रथम भारताचा ध्वज निर्माण केला. परदेशात जाऊन त्यांनी भारतीय तरुणांना स्वातंत्र्य निर्माण करण्याचे प्रेरणाही दिली.

3) *कर्नाटकातील कित्तूरमधील राणी चेन्नम्मा –*

यांनी देखील भारती यस्वातंत्र्य चळवळीमध्ये मोठा सहभाग घेतलेला दिसून येतो. ब्रिटिशा विरोधात वयाच्या 33 व्यावर्षी त्यांनी सैन्याचे नेतृत्व केले .त्यांच्या नेतृत्वाची प्रेरणा तत्कालीन स्त्रियांनी घेतलेली दिसून येते.

4) *कमलादेवी चट्टोपाध्याय-*

कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी सामाजिक सुधारणा सोबत राष्ट्रीय स्वातंत्र्य संग्रामात सुद्धा सहभागघेतला. मूळच्या त्या नाटक कलाकार होत्या .परंतु गांधीजीच्या चळवळीमध्ये त्या ओढल्या गेल्या. ब्रिटिशांनी अटककेलेल्या त्या पहिल्या महिला क्रांतिकारक होत. स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी प्रयत्न केला त्यासाठी अनेक छोटे-मोठे लघुउद्योग त्यांनी सुरू केले. महात्मा गांधीच्या सविनयकायदेभंगाच्या चळवळीत इसवीसन 1930 मध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. त्या विधान सभेच्या पहिल्या आमदार होत.

5) *कॅप्टन लक्ष्मी सहगल-*

सुभाषचंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या आझाद हिंद फौजेच्या त्या महिला विंगच्या कॅप्टनहोत्या. त्यांनी दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता.आझाद हिंद फौजेच्या माध्यमातून त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला.अपुऱ्या सैन्यानिशी, अपुऱ्या साधनामुळे आझाद हिंदसेनेचा पराभव झाला.सर्व लोकांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटला सुद्धा दाखल करण्यात आला होता. यावेळेस पंडित जवाहरलाल नेहरूंनी वकिली करून या सर्व युद्ध कैद्याची सुटका करण्याचे काम केले.

6) *अरुणा असफ अली-*

अरुणा असफ अली यांनी गांधीजींच्या भारतछोडो चळवळीमध्ये भाग घेतला होता. त्यांनी अवघ्या वयाच्या सोळाव्या वर्षी आझाद मैदानावर ब्रिटिशांच्या विरोधात तिरंगाध्वज फडकवण्याचे काम केले होते. त्यांच्या विरोधामध्ये अटक वारंट सोडले होते .अशावेळेस त्यांनी गुप्तपणे प्रचार प्रसार केला. यासाठी गुप्तपणे रेडिओस्टेशन सुरू ठेवले. या माध्यमातून अनेक तरुणांना त्यांनी क्रांती करण्यास प्रवृत्त केले.

7) *मातागिनी हाजरा-*

घर असो की युद्ध असो प्रत्येक ठिकाणी स्त्री हिरीरी ने भाग घेत असते. मातागिनी हाजरा याचे एक उत्तम उदाहरण आहे. मातागिनी हाजरा यांनी महात्मा गांधीच्या असहकार चळवळीत आणि भारतछोडो चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. भारत छोडो चळवळीमध्ये आंदोलन करीत असताना कलकत्ता येथे त्यांच्या उजव्या हातामध्ये तिरंगा होता आणि

वंदेमातरम त्या त्या मोठमोठ्याने गर्जना करत असताना पोलिसांनी त्यांना तिरंगा सोडण्यास सांगितले परंतु त्यांनी तिरंगा सोडण्यास नकार दिला. अशा वेळेस पोलिसांनी त्यांच्या उजव्या हातावर गोळीबार केला.असेअसताना त्यांनी डाव्या हातामध्ये तिरंगा हातात घेऊन पुन्हा ब्रिटिशांच्या विरोधात घोषणा देण्यास सुरुवात केली. शेवटी एक गोळी त्यांच्या हृदय स्थानी लागल्यामुळे त्यांच्या मृत्यू झाला. तरी सुद्धा त्यांनी तिरंगा ध्वज हातातून खाली पडू दिला नाही.

इतर स्त्रियांची कामगिरी- अशाप्रकारे सार्वजनिक व राजकीयचळवळीत भाग घेण्यास स्त्रियांनी सुरुवात केली. यामध्ये सरोजनी नायडू,हिराबाई ,टाटा आणि बेझंट यांनी स्त्रियांना कायदेमंडळात राखीव प्रतिनिधीत्व असावे. अशी मागणी माटेग्यू यांच्या जवळ केली. लंडन मधील गोलमेज परिषदेत ही भारतीय स्त्रियांची बाजू मांडण्यासाठी सरोजिनी,नायडू,हिराबाई,टाटा आणि ॲनी बेझंट यांनी पुढाकार घेतला.सरोजनी नायडू 1925 च्या काँग्रेसचे अध्यक्ष होत्या. स्वतंत्र भारतात उत्तरप्रदेशच्या पहिल्या हिंदू भारतीय स्त्री गव्हर्नर म्हणून काम करण्याचा बहुमान त्यांना मिळाला. पद्मजा नायडू,विजयलक्ष्मी पंडित यांनी पण स्वतंत्र भारतात बंगाल महाराष्ट्रात गव्हर्नर म्हणून काम केले.श्रीमती विद्यालक्ष्मी पंडित व राजकुमारी अमृतपुर यांनी सक्रिय भाग घेऊन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानाची स्थान भारताची मान उंचावली. श्रीमती विद्यालक्ष्मी पंडित यांनी रशिया.अमेरिका या देशात भारताच्या राजद ूत म्हणूनही उत्तम काम केले. भोपाळच्या बेगम यांनी भारतीय स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले.त्यांनी सामाजिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या मुंबईत बद्रुद्दिन तैयबजी यांनीगोषा पद्धतीविरुद्ध चळवळ सुरू केली होती. मुस्लिम स्त्रियांनी पण स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी अखिल भारतीय मुस्लिम महिला परिषद भरण्यास सुरुवात केली. 1919 च्या अखिल भारतीय मुस्लिम महिला परिषदेत मुस्लिम स्त्रियांनी बहुपत्नीत्वाच्या चालीचा निषेध केला. याच बरोबर अखिल भारतीय महिला परिषदेने शिक्षण फंड सुरू केला. या संघटनेच्या प्रयत्नाने 1936 मध्ये दिल्लीस लेडी आर्यविन कॉलेज स्थापन करण्यात आले. 1930 मध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी लेडीआय र्विन कॉलेज मध्ये व्यवस्था करण्यात आली.अशा प्रकारे भारतीय स्त्रियांनी त्यांची उन्नती करण्यासाठी सामाजिक परिषदेच्या माध्यमातून हे सर्व उपक्रम राबविले.

**निष्कर्ष**

वरील बाबीवरून हे स्पष्ट होते की ज्या स्त्रिया केवळ चूल आणि मूल यामध्येच अडकल्या होत्या. विविध समाज बंधनांनी जखडलेल्या होत्या.त्या स्त्रियांनी सामाजिक स्वातंत्र्याची आणि राजकीय स्वातंत्र्याची लढाई लढली.यासाठी आपल्या प्राणांचे बलिदानही दिले. हे सामाजिक आणि राजकीय स्वातंत्र्य टिकविण्याचे काम आता आपल्या शिरावर आले आहे. याची जाणीव प्रत्येक भारतीय स्त्रीने जर ठेवली तर निश्चित पणे भारताचे स्वातंत्र्य कायम अबाधित राहील.

**संदर्भ ग्रंथ.**

१) आधुनिक भारताचा इतिहास -र.म.लोहार
२) आधुनिक भारताचा इतिहास- डॉ. अनिल कटारे
३)भारतीय स्वातंत्र्याची दोन आंदोलने -डी.आर.ओहाळ

# भारतीय महिलांची ऐतिहासिक स्थिती व मानवी हक्क

**डी.एस.पटवारी**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
श्री कुमारस्वामी महाविद्यालय,औसा

**प्रस्तावना**

"स्त्रियांची स्थिती सुधारल्याशिवाय समाजाच्या कल्याणाची कोणतीही संधी नाही. पक्ष्याला फक्त एका पंखाने उडणे शक्य नाही"..... स्वामी विवेकानंद

एखाद्या राष्ट्राचा दर्जा ठरवायचा असेल तर त्या राष्ट्रातील स्त्रीयांचा समाजातील वास्तविक दर्जा कसा आहे? यावरून राष्ट्राच्या दर्जाची कल्पना करता येते. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीयांचा दर्जा, हा राष्ट्राचा दर्जा ठरवण्याचे मापदंड ठरत आहे, त्यामुळे प्रत्येक राष्ट्र महिला सक्षमीकरणास पुरस्कृत करत आहे. विकसनशील राष्ट्रे महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात घटनेच्या माध्यमातून आणि कायदेशीर मार्गाने वाटचाल करत आहेत. तर अविकसित राष्ट्रे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हळूहळू पावले टाकत आहेत. जागतिक स्तरावर अन्य जागतिक प्रश्नाप्रमाणे महिलांचे अधिकार, त्यांचा दर्जा व त्यांचे सक्षमीकरण आदी प्रश्न जागतिक चर्चेचा विषय ठरत आहेत. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र महिलांच्या अधिकारासाठी, त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय दर्जा उंचवण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे.

भारताच्या बाबतीत स्त्रीयांचा कायदेशीर दर्जा व वास्तविक स्थिती यात अंतर आहे, कायद्याने स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने समानत्व तर दिले आहे, परंतू वास्तविक स्थिती मात्र अगदी वेगळी आहे. ही बाब अगदी अलीकडची वा सद्यस्थितीत जरी जाणवत असली तरी लिंग भेदाच्या आधारावर स्त्रीयांना नेहमी विषमतापूर्ण वागणुक देण्याचा प्रयत्न येथील समाजव्यवस्थेने वा राज्यव्यवस्थेने केला हा इतिहास नाकरता येत नाही. किंबहुना आज स्त्री सक्षमीकरणा संदर्भात जे अडथळे येत आहेत, त्यामागील कारणांचा शोध घेण्याच्या पार्श्वभूमीवर एकुणच स्त्रीयांच्या स्थितीबाबतचा ऐतिहासिक आढावा घेणे महत्वपुर्ण ठरते. भारतीय स्त्रीयांच्या स्थितीबाबत अभ्यास करणा-या अनेक विचारवंतांनी, लेखकांनी भारतीय स्त्रीयांच्या दर्जाबाबत विविध कालखंडात कसा बदल होत गेला याबाबत आपली निरीक्षणे नोंदविली आहेत.

त्यांच्यामते वर्तमान काळातील भारतीय महिलांच्या स्थितीला ऐतिहासिक संदर्भ जबाबदार आहेत. यास धर्म, रुढी, प्रथा, परंपरांची बंदिस्त चौकट आहे. या चौकटीत स्त्रीयांचे स्वातंत्र्य, हक्क, विचार व भावना यांना बंदीस्त करण्यात आले आहे. चेतन मेहता यांनी आपल्या 'महिला एवम् कानून' या ग्रंथात "इतिहासाच्या एका टप्यावर अगदी निर्भळ स्वातंत्र्य उपभोगणारी भारतीय स्त्री आज सामाजिक संकेत, पितृसत्ताक समाज व्यवस्था, धार्मिक रुढी आणि मानसिक दुर्बलतेमुळे, दुय्यम हतबल व परावलंबी जीवन जगत असल्याचे मत नोंदवले आहे.

एकुणच अगदी प्राचीन धर्मग्रंथ असोत की, इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात विचारवंतानी व्यक्ती केलेली मते असोत, ब्रिटीशपूर्व अथवा ब्रिटीशकाळ असो की, स्वातंत्र्योत्तर काळ असो भारतीय स्त्रीयांची स्थिती ही नेहमीच वर्तुळाच्या परिघावर राहिलेली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय स्त्रीयांबाबत असणा-या सामाजिक वा अन्य परिस्थीतीचे विवेचन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

**भारतीय महिलांची ऐतिहासिक स्थिती :**

इतिहासाची कालगणना ज्या कालखंडापासून सुरु होते, तो कालखंड इसवी सन म्हणून गणला जातो. यापूर्वीचा कालखंड इसवी सन पूर्व असा गणला जातो. परंतु "इतिहासाच्या पूर्वी देखील इतिहासपूर्व असा एक कालखंड होता, जेव्हा मनुष्य हा केवळ 'मानव' म्हणून राहत असे, त्याच्या बुद्धीचा फार विकास झालेला नव्हता, त्यामुळे निसर्ग नियमाप्रमाणे व इतर प्राण्याप्रमाणे तो जीवन व्यतित करत होता. या काळात निसर्गाच्या सानिध्यात राहत असलेल्या मानवी समुहात मातृवंशीय सत्ता उदयास आली."*

मातृसत्ताक कुटुंबातील स्त्री ही कुटुंबाची प्रमुख, अपत्याची पालक आणि नंतर कालांतराने उदयास आलेल्या टोळ्यांची किंवा गणाची प्रमुख होती. "मनुष्याच्या पृथ्वीवरील पदार्पणापासून ते इ.स.पूर्व ३ हजार वर्षापर्यंत, मातृवंशीय समाजव्यवस्था

लाखो वर्षे टिकून होती, हे आज मान्य झालेले संशोधन आहे." "शेतीचा शोध स्त्रीयांनी लावला, त्यामुळे स्त्री ही पुरुषाच्या आधी स्थिर झाली. "" निसर्गतः पुर्नोत्पादनाची जबाबदारी स्त्रीवर असल्यामुळे याकाळात अपत्यांच्या संगोपनाची पूर्ण जबाबदारी मातेवर असे. त्यामुळे अपत्य जगविण्यासाठी तिला प्रयत्नशील व विचारशील रहावे लागे. "स्वतःच्या मुलाशी संवाद साधण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आवाज स्त्री काढत असे तिच्या या आवाजातूनच पुढे शब्द व भाषेची निर्मिती झाली. यावरून प्राचीन स्त्रीचे भाषेमधील कार्य लक्षात येते. "

"नांगर शेतीच्या तंत्राचा शोध लागल्यानंतर शेतीची अवजड कामे करण्यासाठी स्त्रीयांच्या बरोबरीने किंबहुना अधिक प्रमाणात पुरुषांचा सहभाग होऊ लागला आणि त्या अवस्थेपासून स्त्री-पुरुष सहभागाचा समतोल ढळू लागला"" तरी परंतु पुढील काही काळ मातृसत्ताक व्यवस्था टिकून होती, ज्यात कुंटुंबाची प्रमुख स्त्री होती. कालांतराने जमीनदारी व्यवस्था निर्माण झाली आणि शेतीच्या कामातील स्त्रीयांचा प्रत्यक्ष सहभाग कमी झाला. केवळ घरातील गृहकृत्यांची जबाबदारी आणि त्याच्या व्यवस्थापनामध्ये ती बंदिस्त झाली. वेदांच्या निर्मितीनंतर स्त्रीयांच्या उपजत नैसर्गिक स्वातंत्र्यावर बंधने येण्यास सुरुवात झाली.

**वैदिक कालखंडातील स्त्रीयांचे सामाजिक, आर्थिक स्थान :**

इसवी सन पूर्व ३००० ते इसवी सन पूर्व २५०० ऋग्वेदिक काल म्हणून ओळखला गेला. आर्यांचे भारतात आगमन होईपर्यत भारतात मातृसत्ताक व्यवस्था टिकून होती परंतु पुरूषप्रधान आर्यांनी भारताची मुळ मातृसत्ताक कुंटूब समाजव्यवस्था व गणपध्दती संपुष्टात आणली.

आर्याच्या टोळ्या या पुरुषप्रधान होत्या. त्यांची कुटुंब व्यवस्था, समाजव्यवस्था पुरुषप्रधान व्यवस्थेबर आधारित होती. ज्यात कुटुंबाचा व राज्याचा प्रमुख केवळ पुरुष असे. आर्यांच्या भारतात आगमनानंतर मूळ भारताचे रहिवासी ज्यांना 'द्रविडियन किंवा अनार्य' म्हणून ओखळले जाऊ लागले. या आर्य-अनार्य संघर्षातून, युध्दातून आर्य जेते ठरले आणि अनार्य म्हणजेच द्रविडियन पराभूत झाले. त्यामुळे आर्याची संस्कृती, मुल्य व देवतांच्या कल्पना यांचा प्रसार करणे व तो जित लोकांवर बिंबवणे त्यांना शक्य झाले. आर्यांना लिपी आवगत होती. त्यामुळे साधारणतः इ.स.पू. २५०० ते इ.स.पू. १५०० या कालखंडा दरम्यान आर्यानी पहिला वेद ऋग्वेद लिहीला, आर्य पुरुषप्रधान व्यवस्था मानणारे होते. परंतु स्त्रियांना या काळात अनेक स्वातंत्र्य त्यांनी मान्य केले होते. त्यांच्यावर फार कठोर बंधने या काळात नव्हती. उलट ऋग्वेदातून या काळात स्त्रीयांच्या तत्कालीन अधिकारांचा संदर्भ मिळतो. "याकाळातील मुलींना मुलांच्या बरोबरीने शिक्षण दिले जाई. साधारणतः वयाच्या आठव्यावर्षी मुंज होऊन त्या देखील गुरुगृही शिक्षण घेत असत." या काळात बालविवाह अस्तिवात नव्हते. "साधारणतः सोळाव्या वर्षी मुलींचा विवाह होत असे व त्यांना 'सद्योवधू' म्हणून संबोधले जात असे." विवाहाबाबत स्वतः जोडीदार निवडण्याचे स्वांतत्र्य स्त्रीयांना होते. काहीं स्त्रिया विवाह न करता उच्चशिक्षणाने पंडिता बनत. ऋग्वेदातून अशा स्त्रीयांच्या नावाचा उल्लेख आढळतो. घोषा, बिश्ववरा या स्त्रीयांनी ऋग्वेदातील काही सुक्ते लिहिलेली आहेत. त्या काळातील स्त्रीया सार्वजनिक तसेच बौद्धिक चर्चामध्ये सहभागी होत. धार्मिक कृत्यात पुरुषाप्रमाणे स्त्रीया देखील सहभागी होत. याकाळातील स्त्रीयांना 'अग्निहोत्राचा' देखील अधिकार होता.

"ऋग्वेदकालीन समाज आर्थिक अधिकाराबाबत स्त्रीधनावर स्त्रीचा पूर्ण हक्क मान्य करत असे, पतीकडून, कुटुंबियांकडून किंवा भेट म्हणून मिळणा-या दागिने पैसा इत्यादीवर स्त्रीयांची मालकी असे. या संपत्तीचा वापर करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य स्त्रीयांना असे या संपत्तीवर तिचा पती किंवा इतर कुटुंबीय अधिकार सांगु शकत नसत."

मुलींना देखील बडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क मिळत असे विशेषतः जर पुत्र नसेल तर वारसाहक्क पूर्णतः कन्येला प्राप्त होत असे. "अविवाहित मुलीला पित्याच्या मृत्युनंतर त्यांच्या संपत्तीत वारसा हक्काने हिस्सा मिळत असे."

ऋग्वेद काळात घटस्फोटासंबंधी संदर्भ आढळत नाहीत. विवाह हा पवित्र धार्मिक संस्कार समजला जात असे, ऋग्वेद काळातील महिलांचा दर्जा कुटुंब आणि समाज दोन्ही ठिकाणी उच्चप्रतीचा होता. याकाळातील पुरुषप्रधान व्यवस्थेने त्यांचे अस्तित्व, अधिकार नाकारलेले नव्हते. त्यांच्याविषयी द्वेष, वैरभाव किंवा दुय्यम स्थानाची भावना रुजलेली नव्हती. विवाह संस्काराने त्यांच्या अधिकारात, दर्जात कोणताही बदल होत नसे, याउलट विवाह उपरान्त त्यांना गृहलक्ष्मी, स्वामिनी अर्धांगिनीचा दर्जा बहाल होत असे. विवाहामुळे त्यांना कोणताही त्याग करावा लागत नसे. 'हुंडा' प्रथा देखील उदयास आलेली नव्हती. या काळात एकपत्नीत्व तसेच बहुपत्नीत्वाची प्रथा अस्तिवात होती. परंतू याचा परिणाम स्त्रीयांच्या अधिकारावर व स्थानावर होत

नसे. कुटूंबात तिला आदराचे स्थान होते. कुटूंबातील प्रत्येक सदस्य तिच्यावर अबलंबून असे. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग असे. कुटूंबात व राज्याबाबत सल्ला देण्याचे कार्य ती करत होती.

"वैदिक काळात मातेला आदराचे स्थान होते. अपत्यासाठी ती निर्माती संरक्षक व पहिला गुरु असे." सावत्र मातेला देखील आदराचे स्थान असे, "याकालखंडात विधवांबाबत कोणत्याही कुप्रथा समाजात रुजल्या नव्हत्या विधवांना पुर्नविवाहाचा अधिकार होता." पुर्नविवाह करणा-या स्त्रीस मात्र इतर स्त्रीयांप्रमाणे कुटुंबात व समाजात फार आदराचे स्थान नसे. "पुर्नविबाहीत स्त्रियांचा उल्लेख 'पुर्नभा' असा केला जात असे. " वैदिक काळात सतीप्रथेचा उल्लेख आढळत नाही. याचा अर्थ याकाळात सतीप्रथा अस्तिवात आलेली नव्हती. "आर्यामध्ये द्रविडियन लोकांच्या संकरातून 'नियोग' पद्धतीचा स्वीकार झालेला होता. विधवा स्त्रीस व ज्या स्त्रीचा पती संतती निर्माण करण्यास अकार्यक्षम असे अशा स्त्रीया नियोगाद्वारे पुत्र प्राप्ती करू शकत असत. नियोगाद्वारे झालेल्या संततीला 'दत्तक' मुलाचा दर्जा प्राप्त होत असे."

ऋग्वेदातील सुक्तामध्ये कुठेही मुलगी होऊ नये यासाठी उल्लेख आढळत नाही.परंतू ऋग्वेदानंतर लिहीलेल्या अथर्ववेदामध्ये मात्र पुत्रप्राप्तीसाठी प्रार्थना आढळुन येतात. ऋग्वेदोत्तर कालखंडात पुरुषप्रधान व्यवस्था, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अशा सर्व क्षेत्रात स्थिरावली होती आणि स्त्रियांकडे पाहण्याचा ऋग्वेदकालीन दृष्टीकोन या काळात बदलला होता.

एकंदरीत वैदिक काळातील स्त्रीयांसाठी हा कालखंड त्यांच्या अधिकारांच्या दृष्टीने अतिशय अनुकूल होता. शिक्षणामुळे स्त्रीयांचा दर्जा व अधिकाराबाबत जागृतता होती. काही प्रमाणात आर्थिक अधिकार देखील या काळातील स्त्री उपभोगत होती, स्त्रीयांबाबत, विधवांबाबत कोणत्याही कुप्रथा या काळापर्यंत समाजात रुजल्या नव्हत्या, असे अनेक अभ्यासकांचे, इतिहासकारांचे मत आहे.

**वैदिक उत्तरोत्तर काळातील स्त्रीयांची सामाजिक स्थिती (इ.स.प १५००- इ.स.पू.५००)**

"बैदिकोत्तर कालखंड हा साधारणतः इ.स.पूर्व १५०० ते इ.स.पू. ५०० हा गृहीत धरला जातो. " वैदिकोत्तर कालखंडात अनेक स्मृती, उपनिषदे, अरण्यके, ब्राम्हण्यके, यांचे लिखाण झाले होते. याकाळातील सर्व ग्रंथातून स्त्रीयांबर अनेक बंधने सांगितलेली आहेत. तात्पर्य वैदिकोत्तर कालखंडातील स्त्रीयांवर या काळात अनेक बंधने आली होती. त्यांचे स्वातंत्र्य संकुचित होण्यास सुरुवात झाली होती. त्यांचा सामाजिक दर्जा दुय्यम होण्यास हा कालखंड ब-याच अंशी जबाबदार आहे. "या कालखंडात विधवा स्त्रीयाबाबत सती सारखी कुप्रथा रुजण्यास सुरुवात झाली होती. "

"वैदिकोत्तर काळात मुलींच्या शिक्षणाच्या स्वांतत्र्याबर सर्वप्रथम निबंध आले. मुलींना गुरुगृही जाऊन शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला गेला. "

उच्च वर्णातील व सधन घरातील मुलींना मात्र घरी शिक्षण दिले जात असे. या काळात स्त्रीयांनी बेदांचे अध्ययन करण्यावर निबंध लादले गेले. स्त्रीया व शुद्र या दोघांना वेदाध्ययन निषिद्ध ठरवण्यात आले. तसेच सभांमधून स्त्रीयांच्या सहभागावर बंधने घातली गेली. स्त्रीयांचा शिक्षणाचा अधिकार नाकारल्यामुळे केवळ कौटुंबिक कर्तव्य त्यांना पार पाडणे अपेक्षित होते. "बहुपत्नीत्वाची प्रथा याकाळात अधिक दृढ झाली. पत्नीबर पतीची पूर्ण मालकी प्रस्थापीत झाली. " समाजात त्यांचे स्थान जरी या काळात दुय्यम होते, परंतु तरी कुटुंबात मात्र त्यांना आदराचे स्थान व गृहस्वमिनीचा दर्जा कायम होता. "वैदीकोत्तर काळात आर्य व द्रविडीयन यांच्यातील बिबाह संबंध या काळातील स्त्रीयांचा दर्जा घसरण्यास मुख्यतः कारणीभूत होता." कारण आर्य हे पुरुषप्रधान व्यवस्था मानणारे ब द्रविडीयन मातृसत्ताक व्यवस्था प्रमाण मानत असत. त्यामुळे द्रविडीयन संस्कृतीतील मातृसत्ताक व्यवस्था संपण्यासाठी स्त्रीयांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने जाणिवपूर्वक या काळात घालण्यात आली या कालखंडातील निर्मित सर्व साहित्य व ग्रंथ याची साक्ष आहेत.

स्त्रीयांच्या आर्थिक हक्काबाबत त्यांच्या स्त्रीधनावर असणारा मर्यादित हक्क या काळात देखील मान्य करण्यात आला होता. परंतु वडिलोपार्जित संपत्तीत त्यांना वारसा हक्क नव्हता. तसेच पतीच्या संपत्तीमध्ये देखील तो जिवंत असेपर्यंत तिला 'बारस' म्हणून हक्क नसे. पतीच्या मृत्युपश्चात आणि जर संपत्तीची बाटणी झाली तर बिधवा स्त्रीस मुलाच्या बरोबरीत हिस्सा मान्य केला जात असे. वैदिकोत्तर काळात वैदिक काळातील स्त्रीयांना असणा-या स्वातंत्र्यावर बंधने येण्यास सुरुवात झाली होती. परंतु त्यांचे काही अधिकार मात्र या काळात देखील संरक्षित होते. धार्मिक कृत्यात पतीच्या बरोबरीने त्यांचा सहभाग महत्वाचा

मानला जात होता, विधवा स्त्रीयांवर मात्र या काळात अनेक बंधने आली. "आर्य संस्कृतीने विधवा पुर्नविवाह नाकारले. तसेच विधवांचे स्थान कुटुंबात, धार्मिक व सामाजिक कार्यात अशुभ समजले जाऊ लागले. नियोग पद्धत संपुष्टात आली.

**स्मृती कालखंड - (इ.स.पू. ५०० ते इ.स.५००)**

"स्मृती कालखंडात साधारणतः इसवी सन पूर्व ५०० ते इसवी सन ५०० याकाळात अनेक स्मृती पुराणे लिहिली गेली विशेषतः मनुस्मृती ग्रंथ व अर्थशास्त्र या दोन ग्रंथातून तात्कालीन स्त्रीयांच्या स्थितीबाबत अनुमान काढले जातात." अभ्यासकांच्या मते स्त्रीयांच्या अधिकाराबाबत अतिशय अधोगतीचा, प्रतिकुल काळ म्हणून स्मृती कालखंड ओळखला जातो. वैदिकोत्तर काळात जरी स्त्रीयांच्या शिक्षणांवर व विधवांवर बंधने आली होती. तरी कुटुंबात स्त्रीयांना आदराचे स्थान होते. मातेला समाजात मानाचा दर्जा होता. पत्नी या नात्याने ती पतीच्या बरोबरीने धार्मिक कृत्यात सहधर्मचारिणी होती. परंतू स्मृतीकाळात, विशेषत 'मनुस्मृती' द्वारे, मनुने स्त्रीयांसाठी सामाजिक, आर्थिक व अस्पष्टपणे राजकीय अधिकार ब स्वातंत्र्ये नाकरली. "मनुस्मृती ग्रंथाद्वारे मनु हा हिंदु धर्मियांसाठी पहिला कायदा निर्माता (First Law Giver) ठरला." मनुस्मृती हा ग्रंथ प्राचीन न मध्ययुगीन काळात हिंदूसाठी प्रमाणग्रंथ ठरला. मनुस्मृतीतील अनेक बचने ज्यांनी कालांतराने रुढी, प्रथांचे स्वरुप धारण केले व या रुढी, प्रथांनी भारतीय भूमीत कायमची मुळे रोवली. प्रथा या कायद्यापेक्षा अधिक ताठर असतात, या तत्वाप्रमाणे भारतात स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे असून देखील भारतीय सामाजिक व्यवस्था व लोकमानस मात्र आजही मनुस्मृतीस प्रामाणिकपणे आचरणात आणत आहे.

मनुच्या मनुस्मृतीने केवळ पुरुषप्रधान व्यवस्था घट्ट रुजबली असे नाही, तर 'स्त्रीयामध्ये देखील त्या पुरुषांपेक्षा दुय्यम आहेत' हा समज कायमस्वरुपी निर्माण करून ठेवला, त्यामुळे महिलांना स्वतःची तुलना पुरुषांच्या बरोबरीने करण्यासाठी वारंवार पहावयास मिळातात. एकीकडे मनु 'यत्र नार्यस्तू पुजन्ते रमन्ते तत्र देवता' असे म्हणून त्यांना आदराचे स्थान देतो तर दुसरीककडे 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' म्हणून स्त्रीयांना सर्व नैसर्गिक हक्क आणि स्वातंत्र्य नाकारतो. "मनुस्मृतीच्या दुस-या अध्यायातील ११३ व्या श्लोकात म्हटले आहे. 'पुरुषाच्या ठिकाणी अपवित्रता निर्माण करणे हा स्त्रीयांचा स्वभावच आहे."" "मनु स्त्रीयांची तुलना शुद्र व जनावरे यांच्याशी करून हे दोघेही समान मानतो. पत्नीला, तो पतीची वैयक्तिक मालमत्ता मानतो. " स्त्रीसाठी तिचा पती हाच सर्वस्व असला पाहिजे असे मनुस्मृतीत म्हटले आहे.

मनु हा बालविवाहाचा समर्थक होता. मुलींसाठी या कालखंडा दरम्यान विवाहाचे बय ८ वर्ष इतपत कमी झाले होते. मुलींना शिक्षणाचा अधिकार केवळ उच्चवर्णापुरता मर्यादीत राहून सर्व सामान्यासाठी बेदाध्याय व इतर धार्मिक शिक्षण पुर्णतः प्रतिबंधित करण्यात आले होते. "बिधबांच्या पुर्नविवाहावर पूर्वी आर्यवंशाच्या व ब्राम्हण वर्णातील स्त्रीयांवर असलेली बंदी इ.स. १०००. नंतर सार्वत्रिक झाली व विधवा विवाह पूर्णतः बंद झाले." विधवांवर अनेक निबंधे आली. या काळात त्यांचे खानपान, राहणीमान अत्यंत हीनदीन अवस्थेत पोहोचले. "बिधवांना सांभाळण्याच्या जबाबदारीतून व त्यांना मृत पतीच्या संपत्तीतून भागीदारी टाळण्याच्या हेतूने सती प्रथेचे स्तोम वाढवण्यात आले. अभ्यासकांच्या मते अकराव्या शतकापर्यंत सतीप्रथा भारतात सर्वत्र स्थिरावली होती." स्त्रीया आर्थिकदृष्ट्या पूर्णतः कुटुंबातील पुरुषांवर अवलंबून झाल्या स्त्रीचनावरची मालकी मान्य करण्यात आली. परंतु त्यासंबंधीचा उपयोग, विनियोग व प्रसंगी विल्हेवाट लावण्याचा अधिकार त्यांना नव्हता, सामाजिक क्षेत्रातील स्त्रीयांचे स्वातंत्र्य संपुष्ठात आले. कुटुंबात देखील त्यांना दुय्यमत्व प्राप्त झाले विवाहातील देवाण-घेवाणीचे प्रमाण बाहुन हुंडा प्रथा प्रस्थापित झाली. स्त्रीयांना आयुष्यभर पुरुषांच्या संरक्षणाची गरज मनुने प्रतिपादीत केली.

बाल्य अवस्थेत पिता, तारुण्यावस्थेत पती व वार्धक्य अवस्थेत पुत्र यांनी स्त्रीचे संरक्षण करावे असे मनुस्मृतीत नमुद केले आहे. त्यामुळे स्त्रीया या सर्वस्वी पुरुषांवर अवलंबून राहील्या. त्यांचे परावलंबन हा त्यांच्या अधिकारांचा उपभोग घेण्याच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा बनला. स्मृतीकाळात वंशशुद्धीसाठी वर्णअंतर्गत विवाहांना महत्व दिले गेले. त्यामुळे दोन वर्णातील विवाह संपुष्टात येऊन वर्णव्यवस्था ताठर झाली. "या वर्णव्यवस्थेतून कालांतराने इसवी सन दुस-या व तिस-या शतका दरम्यान भारतात जातीव्यवस्था निर्माण झाली. " ज्यातून शुद्र जाती व स्त्रीया यांचा समाजातील दर्जा अत्यंत हीन झाला. स्त्रीया या 'अबला' बनल्या.

मनुने स्त्रीयांवर लादलेली बंधने कालोघात अत्यंत ताठर बनली. मनुस्मृतीत मनुने स्त्रीयांसाठी काही विशेष अधिकार देखील दिले. परंतू स्त्रीयांना आदर, सन्मान द्यावा या मनुच्या बचनाकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले गेले. थोडक्यात मनुस्मृतीच्या

निर्मितीनंतर स्त्रीयांचे सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, धार्मिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्य संपुष्टात आले. मनुस्मृती तसेच इतर स्मृती व ग्रंथे यातील स्त्रीविषयी लिखाणाची अमंलबजावणी अधिक ताठर व तंतोतंत होत गेली, स्त्रीयांना कुटुंब, समाज, धर्म, निती, अर्थ, राजकारण कोणत्याही क्षेत्रात सहभाग राहिला नाही. त्यांचे क्षेत्र चार भिंतीमध्ये मर्यादित झाले.

वैदिक काळातील स्वतंत्रपणे अधिकार उपभोगणारी स्त्री, स्मृतीकाळातील गृहबंदीनी झाली. वैदिकोत्तर काळ, स्मृतीकारानंतर निर्माण झालेल्या रामायण, महाभारत व पुराणे यांनी देखील स्त्री अधिकार नाकारले. रामायण, महाभारत ही दोन महाकाव्ये व यातील आदर्श स्त्री चरित्रे रंगवून लेखकांनी भारतीय स्त्रीयांसाठी आदर्शत्वाची चौकट तयार केली, सीता, कौशल्या, तारा, मंदोदरी, सावित्री, कुंती, गांधारी, द्रौपदी इत्यादी स्त्रीचरित्रे पुढील काळातील स्त्रीयांचा आदर्श बनली आणि पतीव्रता व आदर्श स्त्री, माता, इत्यादी स्त्रीयांच्या आयुष्याचे लक्ष्य बनले. त्याग, ममता, सहनशीलता, लज्जा, मर्यादा, विचार व अभिव्यक्तीवर निबंध, कोमलता इत्यादी गुणांनीयुक्त स्त्री आदर्श म्हणून गणली जाऊ लागली. परिणामी स्वतःचे हक्क, स्वातंत्र्य, शिक्षण, विचार व निर्णयक्षमता यापासून स्त्रीयांची पिछेहाट झाली. परिस्थितीला विरोध करण्याची क्षमता त्यांच्या ठायी आलीच नाही. सर्व संकटाचे मूळ स्त्रीया गणल्या जाऊ लागल्या, सर्व संकटाचे प्रतिक स्त्री आणि यापुढे युद्धाचे मुळकारण म्हणून देखील स्त्री ठरली.

भारतात बौद्ध व जैन धर्माच्या उदयानंतर हिंदु धर्माला पर्याय निर्माण झाला. या दोन धर्मांनी स्त्रीयांच्या अधिकारांचा काही प्रमाणात पुरस्कार केला. गौतमबुद्धांनी स्त्रीयांना देखील पुरुषांच्या बरोबरीने संन्यासाचा अधिकार मान्य केला. परंतू हा धर्म व त्याची विचारसरणी मर्यादित राहीली. या काळात हिंदु धर्माने आपली पाळेमुळे समाजात घट्ट रुजवली होती. त्यामुळे सामान्य लोकांच्या जगण्यावर या धर्मानी फार मोठा बदल केला नाही. उलट या धर्माच्या विरोधातून हिंदु धर्म अधिक ताठर होत गेला. प्राचीन काळात हिंदु धर्मातील धार्मिक दुटप्पीपणावर व अतार्किक नियम, प्रथांवर टिका करणारा पहिला स्त्री दाक्षिण्य विचारवंत म्हणून चार्वाकाकडे पाहता येते. त्याच्या चार्वाक तत्वज्ञानात स्त्री पुरुष समतेचा पुरस्कार केला गेला आहे. वेदातील अनेक श्लोकांवर जी स्त्रीनिंदा करतात, त्यावर चार्वाकाने कडाडून टिका केली. परंतू या पुरोगामी विचारवंतास सनातनी धर्ममार्तण्डांनी जाळून मारले.

"इसवी सन पूर्व ५०० ते इसवी सन ५०० हा कालखंड स्त्री अधिकारांच्या अधोगतीच्या दृष्टीने अधिक अंधकारमय काळ होता. या काळाने स्त्रीयांसाठी अन्याय, असमानता व असहिष्णुतेची तत्वे काळाच्या पटलावर कायमची कोरून ठेवली. स्त्रीयाबाबत ही परिस्थिती भारतात मुस्लिमांच्या आक्रमणापर्यंत कायम होती. " मुस्लिम काळात स्त्रीयांची स्थिती व त्यांच्या बाबत अनेक वाईट प्रथा, रुढी अधिक फोफावत गेल्या.

ISSN 2349-638x
www.aiirjournal.com

**संदर्भ सूची :**

१) स्त्रीविषयक चितंन : गायकवाड प्रशांत (संपादक)आ.ह. सांळुखे लोकायत प्रकाशन, सातारा.
२) स्त्री पर्व : सांमत मंगला सुगावा प्रकाशन,पुणे.
३) महिला एवम कानून : मेहता चेतन आशिष पब्लिंसिग हाउस,नई दिली.
४) मनुस्मृती : दुसरा अध्याय ११३ श्लोक.

# लेखाकर्म व्यवसाय उद्योगाचा आत्मा

**प्रा.डॉ. बी.आर.शिंदे**
कै. रमेश वरपूडकर महा.
सोनपेठ जि. परभणी
( वाणिज्य विभाग )

**सार** :- *प्राचीन भारताचा व्यापार समृद्ध होता. तेव्हा व्यापारी नोंदी ठेवण्यासाठी "एक नोंद पद्धतीचा" उपयोग केला जात असे. याचाच अर्थ भारतात प्राचीन काळापासून व्यवहाराच्या नोंदी करण्याच्या पद्धती उपयोगात आणल्या जात असे. कालांतराने माणसाची दिवसेंदिवस प्रगती होत गेली. त्या प्रगती बरोबर व्यवसाय उद्योगाची प्रगती होत गेली, त्यातून आर्थिक व्यवहार वाढले त्यामुळे "एक नोंद पद्धती" कमी पडू लागली. म्हणजेच लेखाकर्माच्या विकासाची आवश्यकता होती. त्यातच 1994 मध्ये इटालियन "लुका पीसीओलो" नावाच्या व्यक्तीने "द्विनोंद पद्धती" व्यवसाय उद्योगातील होणाऱ्या आर्थिक व्यवहार व्यवस्थित लिहीण्यासाठी सर्वप्रथम शोधून काढली.*

प्राचीन काळी व्यापार, व्यवसाय, उद्योगाचे क्षेत्र मर्यादित होते. भांडवलाची गुंतवणूक मर्यादित होती. उत्पादनाचे प्रमाण कमी होते. वस्तूच्या विक्रीचेही प्रमाण कमी होते. त्याकाळी उत्पादन प्रक्रिया श्रम पद्धत अस्तित्वात होती. त्याकाळी अशा व्यवसायात व्यवसायाची सर्वच कामे त्या व्यवसायाचा मालक किंवा व्यावसायिक करत असत. म्हणून अशा स्थितीमध्ये व्यवसायिकाला किंवा व्यापाऱ्याला आपल्या व्यवसायातील होणाऱ्या आर्थिक व्यवहाराच्या नोंदी लेखाकर्माच्या नियमानुसार लिहिण्याची आवश्यकता नसे. परंतु, 18 व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. आणि व्यापार, व्यवसाय, उद्योगाचे स्वरूप बदलून एकच व्यापाऱ्याचे अस्तित्व संपले. प्रमंडळ पद्धती नावाचा व्यापार, व्यवसाय अस्तित्वात आला. कालांतराने तो व्यवसाय स्थिर झाला. आणि व्यापार, व्यवसाय, उद्योग यांच्या बद्दल त्या स्वरूपामध्ये मालक आणि चालक हे वेगळे झाले. म्हणजेच (भागधारक) आणि प्र मंडळाचा कारभार पाहणारे संचालक, व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी हे व्यवसायाचे दोन्ही घटक वेगळे झाले. त्यामुळे अशा व्यवसायाचे अस्तित्व बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी, उद्योगातील उत्पादनावर होणाऱ्या खर्चाचा हिशोब लिहिण्याच्या पद्धतीचा विकास झाला. म्हणजेच आर्थिक व्यवहाराबरोबरच उत्पादन आणि व्यवस्थापन याचे सुद्धा लेखांकन केले जात आहे. त्यामुळे लेखांकनाच्या तीन पद्धती निर्माण केल्या गेल्या जातींनी पद्धतीचा व्यवसाय, उद्योग, व्यापारात उपयोग करून यावर नियंत्रण ठेवण्यात व्यवस्थापकाला यश प्राप्त केले आहे. म्हणून खाली तिन ही पद्धतींचा अभ्यास आपणास लेखात केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

सदर शोध निबंधासाठी खालील संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

1) लेखाकर्मचा इतिहास पाहणे.
2) लेखाकर्माच्या पद्धती शोधणे.
3) लेखाकर्माचे निष्कर्ष काढणे.

## संशोधनाचे गृहितके

संशोधनाची गृहीतके खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

1) लेखाकर्माचा जगातील सर्वच देशात वापर केला जातो.
2) लेखाकर्म हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला असून त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख इंटरनेट आधीचा वापर करून निश्चित धोरणानुसार शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**लेखांकणाच्या पद्धती**

1) आर्थिक लेखांकन ( Financial Accounting )

व्यवसाय, उद्योग किंवा व्यापारी संस्था आपल्या उद्योगात चालू आर्थिक वर्षात भांडवलाची गुंतवणूक किती केली आहे. चालू आर्थिक वर्षात व्यवसाय उद्योगाची आर्थिक स्थिती कशी आहे नफा तोटा किती झाला याची सर्व माहिती मिळविण्यासाठी व्यवसायिक संस्था आर्थिक लेखांकनाचा उपयोग करतात. हे लेखांक व्यावसायिक आपल्या व्यवसाय, उद्योगाच्या उपयुक्ततेनुसार तयार करून, यात उद्योगाचे किंवा व्यवसायाचे नफातोटा पत्रक, व्यापारी पत्रक व स्थितीविवरण तयार करतात. या पत्रकावरून व्यवसायाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करता येतो.

हे लेखांकन लेखाकर्माच्या नियमानुसार तयार केले जातात. या लेखाकर्माचे तपासणी व करून व्यवसाय उद्योगाच्या आर्थिक स्थितीचे अध्यायन केले जाते. व्यय तपासला जातो, व्यवसायाचा नफातोटा, व्यवसायाची संपत्ती, देयता, कर्ज व व्यावसायिकांनी केलेली गुंतवणूक इ. माहिती या लेखाकर्मावरून उपलब्ध होते. या सर्व माहितीवरून व्यवसायाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जातो व व्यवसायाची सत्य माहिती यावरून मिळते.

2) परिव्यय लेखांकन ( Cost Accounting )

आर्थिक लेखाकर्मात आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जातो. तर परिव्यय लेखाकर्मा उत्पादनावर होणारा एकूण परिव्यय, एकक परिव्यय समजून घेण्यासाठी उद्योगात परिव्यय लेखांकनाचा उपयोग केला जातो. परिव्यय लेखन कणामुळे चालू स्थितीत उत्पादनावर होणारा खर्च व भविष्यात उत्पादनावर होणारा खर्चाची माहिती मिळविण्यासाठी या लेखांकनाची आवश्यकता निर्माण झाली. उद्योगात वेगवेगळ्या वस्तूचे उत्पादन केले जाते. वेगवेगळ्या वस्तूसाठी वेगवेगळ्या परिव्यय पद्धतीचा उपयोग करावा लागतो. त्यामुळे परिव्यय पद्धतीची आवश्यकता भासू लागली. म्हणून भारतात परिवेश लेखांकनाची सुरुवात 1965 रोजी झाली. या लेखांकनासाठी कंपनी कायदा 1956 च्या कायद्यात सुधारणा करून कलम 209 मध्ये उपकलम (डी) आणि कलम 233 मध्ये उपकलम (बी) चे प्रावधान जोडण्यात आले. परिव्यय लेखांकनाचा कायदा केलेला असला तरी, या लेखांकनाचा प्रत्येक उद्योगात उपयोग करून घेतलाच पाहिजे असे बंधन नाही. तरीपण प्रत्येक उद्योगात व्यावसायिकाला उद्योगातील उत्पादनावर होणारा परिव्यय माहिती करून घेण्यासाठी करावाच लागतो. परिव्ययाचा उपयोग केवळ उत्पादन कार्यापुरता मर्यादित नसून वस्तूचे उत्पादन झाल्यानंतर वस्तूची विक्री होईपर्यंत या लेखाकरणाचा उपयोग होतो. परिव्यय लेखाकर्मामुळे परिव्ययावर नियंत्रण ठेवता येते, प्रति एकक परिव्यय, अपव्यय, माहिती करून घेण्यासाठी महत्वपूर्ण आहे. त्याचबरोबर वस्तूची किंमत निश्चित करण्यासाठी या लेखाकर्माचा उपयोग होतो.

3) व्यवस्थापकीय लेखाकर्म ( Management Accounting )

व्यवसाय किंवा उद्योगात उद्योगाची आर्थिक स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी आर्थिक लेखांकनाचा उपयोग केला जातो तर परिव्ययावर नियंत्रण ठेवण्यासाठी परिव्यय लेखांकनाचा उपयोग केला जातो. त्याच पद्धतीने व्यवस्थापकीय लेखाकर्मात उद्योगातील आर्थिक व्यवस्थापन, वेळेचे नियोजन, खर्चाचे व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांच्या कार्याचे व्यवस्थापन करण्यासाठी या लेखाकर्माचा उपयोग केला जातो. व्यवस्थापकीय लेखक कर्म पद्धती ही औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झाली आणि भारतात या पद्धतीचा उपयोग 1960 पासून सुरू झाला. आज प्रत्येक व्यवसायात किंवा उद्योगात या लेखाकर्माला महत्त्वाचे स्थान निर्माण झाले आहे.

**निष्कर्ष**

व्यवसायात उद्योगात लेखाकर्माची पद्धत प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. परंतु पूर्वी उद्योग, व्यवसायाचे स्वरूप लहान होते. भांडवलाची गुंतवणूक मर्यादित होती. उत्पादन श्रमावर आधारित होते. परंतु 18 व्या शतकात औद्योगिक क्रांती झाली आणि जगातील प्रत्येक क्षेत्रात कमालीचा बदल झाला. त्याचप्रमाणे व्यवसाय उद्योगांमध्ये सुद्धा बदल होऊन श्रमावर आधारित

उत्पादन बंद होऊन ते यांत्रिक बनले. व्यवसाय उद्योगाच्या स्वरूपात बदल झाला. उत्पादन निर्मितीसाठी यंत्राचा उपयोग होऊ लागला. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढले. वाढत्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज निर्माण झाली त्यामुळे उपयोग व्यवसायात भांडवलाची उभारणी करण्यासाठी व व्यवसायासची आर्थिक स्थिती कशी आहे.

हे तपासण्यासाठी आर्थिक लेखांकन तर निर्मित उत्पादनावर होणाऱ्या खर्चाचा अभ्यास करण्यासाठी परिव्यय लेखांकन उपयोगात आणले आणि भांडवल, कर्मचारी याचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापकीय लेखाकर्माची निर्मिती केली. आज या तिन्ही लेखाकर्म पद्धतीच्या उपयोगाशिवाय कोणताही उत्पादक आपले उत्पादनाचे कार्य करू शकत नाही म्हणजेच या तिन्ही पद्धतीला उत्पादन निर्मिती महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

**संदर्भ :-**

1) परिव्यय लेखांकनाची मूलतत्वे प्रा.डॉ.बीरादार / प्रा. उदगारेकर / प्रा.भुरके.
2) अंकक्षेण - प्रा. डॉ. प्रभाकर हरकाळ
3) उच्चस्तर परिव्यय
लेखांकन डॉ. मेघा कानेटकर / डॉ. मिलींद पाटील.

Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www aiirjournal.com

# आंबेडकरवादी कादंबरी : एक दृष्टिक्षेप

**प्रो.डॉ. सा. द. सोनसळे**
मराठी विभाग
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीवादी तत्वज्ञानाचे पाठबळ घेऊन आंबेडकरवादी कवी, लेखक, नाटककार यांनी आंबेडकरवादी साहित्य वाङ्मयाची निर्मिती केली भारतीय समाजाची हरवलेली आणि हिरावून घेतलेली जीवनमूल्य साकल्याने आपल्या लेखणीतून अविष्कृत करण्याचा जोरकसपणे प्रयत्न ज्या महानुभवी प्रबुद्ध विचारवंतांनी केला .त्यांना इथल्या व्यवस्थेने प्रबुद्ध या ओळखीपासून दूर ठेवण्यासाठी नपुसकलिंगी "दलित" या संज्ञेने हिनविण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्म स्वीकाराचा अनुल्लेख करण्यासाठी धर्मांतराची चळवळ शोषिता पर्यंत जाण्यापासून रोखण्यासाठी दलित या संज्ञेची तातडीने योजना करण्यात आली. वास्तविक पाहता आंबेडकर पूर्व कालखंडात ब्रिटिशांच्या आगमना नंतर जे थोडे बहुत अस्पृश्य लिहीत होते त्यांना अस्पृश्यांचे साहित्य म्हणावे आणि बाबासाहेबांच्या वैचारिक क्रांतीच्या उदयानंतर जे बाबासाहेबांच्या विचारांना म्हणजेच स्वातंत्र्य ,समता, बंधुता आणि सामाजिक न्याय विश्वात्मकतेने जे साहित्यिक लिहितात त्यांना आंबेडकरवादी साहित्यिक आंबेडकरवादी साहित्य म्हणावे .ज्यांच्या वाङ्मयात लोकशाहीवादी मूल्य येत नाहीत, संविधानास जे अस्पृश्य मानत नाहीत ज्यांना बाबासाहेबांच्या नावाचा आणि तत्त्वज्ञानाचा तिटकारा आहे अशा मनुवादी गुलामांच्या साहित्याला व्यवस्था जे नाव ठेवील ते त्यांनी स्वीकारावे. परंतु मानव मुक्ती लढ्याच्या नायकाचे तत्त्वज्ञान त्यांनी गुलामीला लावलेला तुरुंग जगाने मान्य केले आहे. आंबेडकरवादी कवी ,लेखकांची साहित्यकृती "दलित" असू शकत नाही. जो दलित लेखक आंबेडकरवादी तत्त्वज्ञाना पासून वंचित आहे. त्याचा प्रवास दलिततत्त्वाकडून "हरिजन"या संकल्पनेकडे प्रवाहित होत असतो.

अस्पृश्य महारांच्या गळ्यात गाडगे आणि कमरेला झाडू बांधलेला होता ही शिक्षा केवळ पुणे परगण्यातच पेशव्यांनी दिलेली होती ही शिक्षा सर्वत्र नव्हती. निजाम राजवटीत अस्पृश्य महार निजामाच्या मंत्रिमंडळात होते.( बी .एस. व्यंकटराव आणि बी. शामसुंदर) जशी ही शिक्षा मराठवाड्यात आंध्र प्रदेश किंवा कर्नाटक गुजरात मध्ये नव्हती तशी ही शिक्षा नाग विदर्भात ही नव्हती या शिक्षेचा सर्वत्र संचार नव्हता. दुसरे असे की, प्राचीन काळात ज्यांनी शस्त्रांच्या जोरावर रणांगण गाजविले, जे ज्ञानी होते. आणि बहुजन समाजातील इतर जाती सारखे आर्थिक दृष्ट्या समान होते त्यांना दलित म्हणणे हा विषमतावादी व्यवस्थेचे राजकारण आहे अस्पृश्यातील कोणत्याही जातीने भीक मागितली नाही आहो रात्र कष्ट करणाऱ्या या माणसांना कष्टाचा त्याच्या श्रमाचा मोबदला म्हणून भीक दिली जायची एवढेच एरवी फुकटची भीक मागणाऱ्या समाजाला कुणी दलित म्हणत नाही. दैन्यावस्थेमुळे आत्महत्या करणाऱ्या समाजाला कुणी दलित मानत नाहीत .डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराला कवडीमोल समजणाऱ्या लोकांनी "दलित" या संज्ञेचा सामाजिक सांस्कृतिक आणि साहित्यिक परिप्रेक्ष्यात आग्रह धरलेला दिसतो. आंबेडकरवादी चळवळीवर मोठे झालेले लेखक, कवी, सवर्ण हिंदूंच्या सहानुभूती खातर दलित ही संकल्पना स्वीकारतात. म्हणजेच ते प्रबुद्ध जनतेला फसवितात. ज्या साहित्यिकांनी आंबेडकरवाद स्वीकारला नाही त्यांच्याकडून स्त्रियांच्या समानतेची अपेक्षाच नाही

आंबेडकरवादी कवींनी मोठ्या प्रमाणात कविता लिहिली आणि पुढे मग कथाकार, कादंबरीकार ही या चळवळीत निर्माण झाले. आंबेडकरवादी कादंबरी आज मोठ्या प्रमाणात येऊ लागली आहे. वंचित ,बहुजन प्रबुद्ध समाजावर आक्रमण होतात ते सातत्याने सलग होतात. त्या आक्रमणाविषयी ज्या पद्धतीचा राग चीड कादंबरीतून व्यक्त होते. अगदी त्याच पातळीवरून अंतर्गत कलह कार्यकर्त्यांचा लाचार, लूबरेपणा, दुभंगलेल्या निष्ठा, सत्ता, संपत्ती साठी केलेले समझोते, हे सुद्धा कादंबरीतून व्यक्त होताना दिसते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचे झालेले सार्वत्रिकरण आणि खा .ऊ .जा. धोरणांचा एकंदरच समाजावर झालेला परिणाम कादंबरीकार बऱ्यापैकी चित्रित करत आहेत.

डॉक्टर बाबासाहेबांच्या मानव मुक्ती लढ्यानंतर आंबेडकरवादी लेखकांनी कादंबरीतून स्त्रियांचे चित्रण कशा पद्धतीने झाले या विषयीचे चिंतन महत्त्वाचे आहे.

आंबेडकरवादी साहित्यिकांनी स्त्रियांना कसे व किती स्थान दिले आहे, यापूर्वी मराठी सारस्वतांनी पारंपरिक मराठी साहित्यातील कादंबरीत कसे चित्रण केले होते ?त्या तुलनेत नवविचार स्वीकारलेल्या लेखकांनी योग्य प्रकारे मांडले आहे काय, हा उद्देश आहे. या विषयांचे महत्त्व असे की आंबेडकरवाद स्त्री-पुरुष समान मानतो .समतेच्या पातळीवर स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे आधुनिक काळात शोधणे महत्त्वाचे आहे .ज्यांनी आंबेडकरवादी तत्त्वज्ञान स्वीकारले आहे त्या कादंबरीकारांनी स्त्रियांना समानतेचा दर्जा देणे गृहीत आहे. या कसोट्या मधून आंबेडकरवादी कादंबरीकार कसे लिहितात त्याचाच हा लेखाजोखा.

मध्यमवर्गीय मराठी कादंबरीत स्वातंत्र्य पूर्वीचा जो पारंपरिक दृष्टिकोन होता, तो दृष्टिकोन स्वातंत्र्यानंतरही बदललेला दिसत नाही. हिंदू धर्म व्यवस्थेने जे पुरुषप्रधान संस्कृतीचे समर्थन केले त्या नियमांना अनुसरूनच लेखन झालेले दिसते. स्त्री ही उपभोग्य वस्तू म्हणून लेखक तिच्याकडे पाहतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, पारंपरिकतेचा अभिनिवेश घेऊन कादंबरीकार लिहिताना दिसतात. 1885 मध्ये मराठीत हरिभाऊ आपटेंनी सामाजिक आशय कथा कादंबरीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आज घडीला प्रामुख्याने दखल घेण्याजोगे ग्रामीण साहित्य आहे. परंतु सरंजामदारी मानसिकता ग्रामीण साहित्यातून कमालीची डोकावताना दिसते. वंचित उपेक्षितांचे चित्र ग्रामीण कादंबरीतून अल्प प्रमाणात का होईना येताना दिसते. परंतु ग्रामीण साहित्यिक आणि क्रांतीबा जोतीराव फुले यांना पूर्णांशाने स्वीकारलेले नसल्याने या ग्रामीण कादंबरीतून सुद्धा स्त्री समानतेचा विचार उदार दृष्टीकोनातून आले नसल्याचेच दृष्टीपथास येते. आनंदाची बाब एकच की, 1990 नंतर च्या लेखकांच्या लेखनात सामाजिक दु:खाविषयी कादंबरीकार लिहित आहेत. हे चांगले लक्षण म्हणावे लागेल.

अस्पृश्य वंचित लेखकांच्या लेखनामागे डॉ बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे. आंबेडकरवादी लेखकांच्या पहिल्या पिढीतील लेखकांच्या लेखनात रंजन परता हा विशेष दिसतो. काही साहित्यकृती मधून मध्यमवर्गीयांच्या जाणिवा सुखदु:खे हलके फुलके विनोद येतात मध्यमवर्गीय कथा कादंबऱ्या प्रमाणेच चित्रण येतात. उदाहरणार्थ ना. रा. शेंडे अण्णाभाऊ साठे, शंकराव खरात या साहित्यिकांच्या साहित्यकृतींचे उदाहरण देता येतील. या बाबी गृहीत धरूनही अण्णाभाऊ साठे, शंकराव खरातांच्या कादंबरी लेखनाबद्दल डॉ भालचंद्र फडके लिहितात "दलितांची (अस्पृश्यांची) कादंबरी समृद्ध करणारे प्रमुख लेखक म्हणजे अण्णाभाऊ साठे आणि शंकराव खरात. अण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे. ते सामान्यतः लोकप्रिय कादंबरीचा फार्मूला माणसाच्या व्यथांना बोलके करू शकतात."1 अण्णाभाऊ साठे आणि शंकराव खरात यांनी अस्पृश्य समाजाचे जीवन जशी मांडले त्या प्रमाणे नामदेव होटकर हि. गो. बनसोडे यांनी या लेखकांनी 1960 पूर्वी कादंबरी लेखन केलेले आढळते. 1960 ते 1970 च्या दशकात आवर्जून उल्लेख करण्याजोगा लेखक दृष्टीस पडत नाही. 1970 नंतर मात्र अनेक लेखक कादंबरी लिहू लागलेले दिसतात. अण्णाभाऊंच्या फकीरा आणि वैजंता या कादंबऱ्यांमध्ये नव्या विचारांचे प्रतिबिंब पडलेले दिसते 1970 ते 1980- 85 दरम्यान कादंबरी लेखन करणाऱ्या लेखकांत शंकराव खरात, ना. रा. शेंडे, हि. गो. बनसोडे, ना. ब. जाधव, केशव मेश्राम, ज. वि. पवार, हरिभाऊ पगारे, निशिकांत शेंडे, भीमसेन देठे, भी. सी. शिंदे, सुधाकर गायकवाड, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, अशोक व्हटकर, मुरलीधर भोसेकर, बी. रंगराव, शंकर भाऊ साठे, सुधीर पवार हे लेखक लिहितात. आंबेडकरवादी लेखकांचा मुळादर्श डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. कष्टकरी कामगारांच्या प्रश्ना संदर्भात जेव्हा लेखनात संदर्भ येतात ते क्रांतीबा जोतीराव फुले यांच्या विचारातून घेतलेले दिसतात. त्या विचारांना कांही समीक्षक मार्क्सवाद म्हणतात. स्त्रिशुद्रातिशुद्रांच्या दु:खाबद्दल आधुनिक भारतात पहिल्यांदा फुल्यांनी विचार मांडलेले आहेत. त्यांचेच प्रतिबिंब आंबेडकरवादी साहित्यकृती मध्ये पडलेले आहेत. मनुवादी व्यवस्थेला नाकारणारे ज्योतिराव फुले हे आंबेडकरवादी कादंबरीचा आदर्श असताना त्या ठिकाणी मार्क्सवादाची रोपण केले जाते. मार्क्सला आमचा विरोध नाही. कारण कार्ल मार्क्स पाश्चात्य राष्ट्रातील प्रश्नावरचे तंतोतंत उत्तर आहे. परंतु भारतीय समाजाच्या जुनाट व्याधीवरचे ते औषध होऊ शकत नाही. त्या दुखण्यावर तथागत गौतम बुद्ध, जोतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरच इलाज करू शकतात. म्हणून आंबेडकरवादी साहित्यकृती मध्ये बुद्धापासून बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतच्या विचारवंतांचे विचार येत असतात. हरिभाऊ पगारे यांची 'युगप्रवर्तक' 1970 ही बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मागवा घेणारी कादंबरी आहे. यासारख्या लेखकांनी आंबेडकर

वादाची कास धरून स्त्रियांविषयी कसे चित्र केले आहे, त्या संदर्भात ही स्त्री कुटुंबाकडून कशी छळल्या गेली, समाजातील रूढी परंपरामुळे कशी छळल्या गेली, अस्पृश्य आणि पुढे बौद्ध झालेल्या कुटुंबा मध्ये स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य कसे आहे. धार्मिक रुढी परंपरा ने स्त्रीला कसे छळले आहे. आणि आंबेडकरवादी लेखकांचा या बाबतीत कोणता दृष्टिकोन आहे या बाबतीत कांही महत्त्वाचे उल्लेख पाहू.

स्त्रियां या गुलामांच्या गुलाम होत्या. अस्पृश्य पुरुष हिंदू धर्म व्यवस्थेचा गुलाम आणि या गुलाम यांच्या घरात राहणारी अस्पृश्य स्त्री पुरुषांची गुलाम अशी दुहेरी गुलामी भोगणारी स्त्री कादंबरीकारांनी चित्रित केली

**कुटुंबातील व्यक्तीकडून स्त्रियांचा होणारा छळ**

भारतीय इतिहास में हम देखते है ,की उन्नीसवी शताब्दी का उतरार्ध और 20 वी शताब्दी का पूर्वार्ध नारी जागरण की दृष्टि से महत्वपूर्ण है। 19 वी शती चेतना के उदय के लिये प्रसिद्ध है। 19वी सदी को स्त्रियों की शताब्दी कहना उचित होगा। क्योंकि इस सदी मे सारी दुनिया मे उनकी अच्छाई- बुराई ,प्रकृती, क्षमतायें गर्मा गरम बहस का विषय थे । युरोप में फ्रान्सी क्रांति औंर उसके बाद भी स्त्री जागरूकता का विस्तार होना सुरू हुआ और शताब्दी के अंत तक इंग्लंड फ्रान्स जर्मनी के बुद्धी जिवियोंने नारीवादी विचारों को अभिव्यक्ती दी । "19 वी सदी के मध्य तक ऋषी सुधारको के लिए महिला प्रश्न एक केंद्रीय मुद्दा बन गया था । जबकि भारत मे खास तौर पर बंगाल और महाराष्ट्र मे समाज सुधारकानें स्त्रिया मे फैली बुराईयों पर आवाज उठाना शुरू किया।"

हिंदी साहित्य के आदिकाल की सामाजिक स्थिती की समीक्षा करते हुए गोपाल शर्मा ने ।'दिनेश' लिखते है "नारी भी भोग्या मात्र रह गयी थी। वह क्रय विक्रय एवं अपहरण की वस्तू बनती जा रही थी।------- सती प्रथा भी इसी समय के समाज का एक भयंकर अभिशाप थी । फलत: सामान्य जाति कि नारी के लिए पुरुष का जीवन और मृत्यू दोनो ही भयंकर घटना बन जाते थे।" प्रस्तुत कथन से लगता है की अाधिकालीन साहित्य मे नारी का भोग्यारूप ही अधिक चित्रीत होता था। वज्रयान धर्म मे तो मोक्ष प्राप्ति के लिए श्री सेवन अवश्य अंग था ।रासो काव्य मे और विद्यापति की रचना मे नारी का प्रेयसी रूप ही अधिक वर्णित है ।

हिंदी की कृष्ण भक्ति कवित्री मीरा का स्थान स्त्री विमर्श में आज भी महत्वपूर्ण है। पितृसताक की व्यवस्था को ठुकराने का प्रयास मीरा के क्रियाकलापों में देखा जा सकता है । पति की मृत्यु के बाद सती होने के लिए वह तैयार नहीं हुई । विधवा वेश पहनने को भी वह तैयार नहीं हुई। श्रीकृष्ण की मूर्ति के सामने नाचती, गाती रहे। राजमहल छोड़ने का उसका इरादा भी उसके विद्रोह व्यक्तित्व का परिचयक है। मीरा के इस प्रतिरोध और विद्रोह के कारण सुकुमार मिश्रा जी इन्हें समकालीन स्त्री विमर्श का भागीदार मानते हैं " वस्तुतः मीरा हमारी समकालीन है और चल रहे स्त्री -विमर्श की भागीदार है ।अपने उसे प्रतिरोध का तथा विद्रोह के नाते जो उन्होंने अपने ऊपर लगाई गई पाबंदियों के खिलाफ किया। वे स्त्री विमर्श में इसलिए हमारे साथ है की सामंती जकड़बदी के बीच आपकी प्रेम पिपासा की उन्होंने निष्कुंठ अभिव्यक्ति की ।उनके विद्रोह का संबंध है ,लोक,राजपरिवार तथा संबंधियों द्वारा उन्हें दी गई यातना से उन पर थोपी गई पाबंदियों में जिसने मीरा अमान्य किया । यहां तक की राजभवन को लात मार कर वे उसे बाहर आ गई। ।" अपने नारी व्यक्तित्व के अपनी रचनाओं में उन्होंने प्रकट करने का प्रयास किया है। हिंदी साहित्य में एक औरत द्वारा अपनी आत्माभिव्यक्ति का प्रयास निश्चित रूप से सर्वप्रथम होगा इस संबंध में सुकुमार मिश्रा का विचार प्रस्तुत है "निश्चय ही ,संत और भक्त तो वह है, परंतु उनके साथ-साथ एक औरत होने का एहसास भी उनमें बरकरार रहा है ।उनके पदों में संत और भक्त होने के साथ उनके औरत होने लाचार और निरीही औरत होने की पहचान भी जुड़ी हुई है। वस्तुत औरत होने का वह एहसास ही मीरा को हमारे समय के स्त्री विमर्श से जोड़ता है। या औरत मीरा में बराबर जिंदा रही है मीरा ने उसे विचार के स्तर पर और संस्कार के स्तर पर अपने में शिद्दत से जलाए रखा है। जितना सच मीरा का संत या भक्त होना है, उनका औरत होना भी उतना ही बड़ा सच है।"

यह बात निर्विवाद सत्य है कि रीतिकाल में काव्य का मुख्य रस श्रृंगार था। राजश्रित कभी अपने आश्रय दाताओं को तृप्त करने के लिए ही काव्य सृजन करते थे । इस प्रकार के साहित्य में स्त्री का स्वरूप भोग्य के अलावा और कुछ होने की गुंजाइश नहीं थी । रीतिकाल के कवियों की नई संबंधी दृष्टि के बारे में डॉक्टर महेंद्र कुमार ने कहां है " वास्तव में नारी के प्रति कवियों की दृष्टि सामंतिय रही है ।ये उसे पुरुष के समकक्ष समाज की चेतन इकाई अथवा पुरुष का अर्ध्दांग न समझकर भोग्य संपत्ति के समान उसे भोग का मात्र उपकरण समझते हैं ।इनके लिए उनकी समस्त चेष्टाएं चेतन प्राणी की काम- भावना की अभिव्यक्ति न होकर पुरुष की उपभोग्य वस्तु की श्री वृद्धि मात्र है। इतना ही नहीं, वह मानते हुए भी की नारी में पुरुष की अपेक्षा काम की मात्रा अधिक होती है ,काम की अृतप्ति के कारण हुए उसके विरह तज्जन्य व्याधियों के प्रति मानव- सुलभ सहानुभूति के स्थान पर इनमें अपेक्षा अथवा कौतूहल का भाव ही अधिक रहा है ।"

हिंदी साहित्य के आधुनिक काल में नारी के प्रति दृष्टि थोड़ी परिवर्तित लगती है ।स्त्री शिक्षा का प्रसार, बाल विवाह, विधवाओं के दुर्दशा आदि विषयों को लेकर कविताएं लिखी गई और नारियों की स्थिति पर सहानुभूति प्रकट की गई ।द्विवेदी

युगीन कवियों ने विधवाओं के कष्टमय जीवन और शिक्षा विभिन्न नारी की दुर्दशा जैसे विषयों को लेकर कवियों ने काव्य लेखन किया है। मैथिलीशरण गुप्त ने यशोधरा, साकेत, विष्णु प्रिया, जयद्रथ वध आदि रचनाओं में नारी जीवन की दैनिक स्थिति का अंकन किया है। यशोधरा की पंक्तियों में नारी के प्रति सहानुभूति प्रकट हुई है।

***"अबला जीवन हाय !***
***तुम्हारी यही कहिनी***
***आंचल में दूध और***
***आखों में पानी ।"***

हिंदी साहित्य में नारी जीवन को लेकर पहली बार समग्रता से लेखन करने का श्रेय महादेव वर्मा को जाता है ।विभिन्न विषयों पर चर्चा करते हुए महादेवी ने ।'हमारी श्रृंखला की कड़ियां 'नामक शीर्षक के अंतर्गत नारी जीवन से जुड़ी समस्याओं को बड़े गौर से लिया है। इसमें एक नारी ने नारी समस्या को लेकर कलम चलाते समय नारी घर और घर के बाहर की भूमिका, आर्थिक स्वतंत्रता और नारी, वेश्या जीवन, नए दशक में महिलाओं का स्थान युद्ध और नारी जैसे विषयों के बारे में उन्होंने अपना विचार प्रकट किया है ।भारतीय नारी की स्वतंत्रता के बारे में महादेव वर्मा का कथन उल्लेखनीय है " उनके अनुसार पुरुष स्त्री का शत्रु नहीं है पुरुष से जय प्राप्त करना भारतीय स्त्री का लक्ष्य नहीं है उनका लक्ष्य मात्र अपने अस्तित्व की स्थापना है । " वह लिखते हैं "हमें ना किसी पर जय चाहिए , न किसी से पराजय न किसी पर प्रभुता चाहिए, न किसी का प्रभुत्व । केवल अपना वह स्थान वे विस्तृत चाहिए जिनका पुरुषों के निकट कोई उपयोग नहीं है, परंतु जिनके बिना हम समाज का उपयोगी अंग बन नहीं सकेगी। हमारी जागृत और साधन संपन्न बहाने इस दिशा में विशेष महत्वपूर्ण कार्य कर सकेगी, इसमें संदेह नहीं है।"

केवल हिंदी काव्य ही नारी विचारों से प्रभावित है ऐसी बात नहीं, हिंदी उपन्यासों में नारी का चित्रण हमेशा युग के अनुरूप हुआ है। हिंदी के प्रारंभिक नवजागरण वाले उपन्यास में स्त्री शिक्षा, और विधवा विवाह तथा बाल और वृध्द विवाह का विरोध इस उपन्यासों में नारी केंद्रित उपन्यासों का मुख्य विषय रहा है । प्रेमचंद के समय नारी जीवन के अनेक पहलुओं का यथार्थ चित्रण हिंदी उपन्यासों में हुआ है। नारी-जीवन को कष्टमय बनाने वाले तथ्यों के विरुद्ध इस समय के उपन्यासकारों ने आवाज उठाई ।स्वतंत्र्योत्तर उपन्यासों में अस्तित्व वाद का स्पष्ट प्रभाव है । नारी -जीवन की कुंठा, पीड़ा ,निराशा ,अकेलापन आदि का चित्रण इस समय के उपन्यासों में हुआ है। 1980 के बाद के उपन्यासों में नारीवादी आंदोलन की गूंज सुनाई देती है।

संक्षिप्त: में हम देखते हैं कि नारी मुक्ति संघर्ष का एक लंबा इतिहास है । इस लंबे संघर्ष से गुजरते भी है नारी आज की स्थिति में पहुंच गई है। वर्तमान समय में भी उसका संघर्ष जारी है। क्योंकि आज भी नई उतना स्वतंत्र नहीं जितना स्वतंत्र होना चाहिए ।

## संदर्भ ग्रंथ सूची

1)केंब्रिज डिक्शनरी
2) आॅक्सफर्ड डिक्शनरी
3) www.oup.com
4)मनुस्मृति - व्याख्याकार - पंडित श्री हरगोविंद शास्त्री श्लोक 50
5)वही श्लोक 3
6)स्त्री संघर्ष का इतिहास- राधाकुमार,पृ 23
7)हिन्दी साहित्य का इतिहास डाॅ. रामगोपाल शर्मा 'दिनेश' संपा - डाॅ.नगेंद्र पृ 56
8)स्त्री विमर्श मे मीरा-शिवकुमार मिश्र वाडमय जुलाई दिसंबर 2007पृ 30
9)हिन्दी साहित्य का इतिहास डाॅ.महेन्द्रकुमार संपा .डाॅ.नगेद्र पृ 306
10) मैथिलीशरण गुप्त यशोधरा पृ 12
11)महादेवी वर्मा महादेवी साहित्य समग्र 3 पृ 304

# मराठी ग्रामीण कवितेची भाषा व वैशिष्ट्ये ( कालखंड १९९० ते २०१०)

**प्रा.सखाराम बाबाराव कदम**
मराठी विभाग, कै. रमेश वरपूडकर,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनपेठ, जि.परभणी- ४३१५१६

**प्रस्तावना:-**

मराठी काव्यसमीक्षेत समकालीन कविता '**नव्वदोत्तर कविता**' म्हणून संबोधली जात आहे. 'साठोत्तर कविता' या संकल्पनेप्रमाणेच 'नव्वदोत्तर कविता' ही संकल्पनाही आपणाला विशिष्ट कालदर्शक अर्थाने जशी विचारात घ्यावी लागते, तशीच ती विशिष्ट मूल्यव्यूव्हदर्शक अर्थानेही विचारात घ्यावी लागते. १९९० ते २०१० या दोन दशकांच्या काळात जागतिक स्तरावरील व्यापार, अर्थकारण, राजकारण आणि दहशतवाद या सारख्या घटकांशी ग्रामीण माणसाचे जगणे, मरणे, विचार करणे वा गप्प राहणे, प्रतिक्रिया देणे वा काहीच न करता निष्क्रिय होणे असा या कालखंडाचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर पडलेला जाणवतो.

ग्रामीण भागात एकीकडे पावसाचे प्रमाण कमी होत असताना, भ्रष्टाचारामुळे नागरी सुविधांचाही बोजवारा उडालेला दिसतो. अन्नधान्य, दूध, फळे, भाजीपाला जरी ग्रामीण भागात पिकत असला तरी उत्पादकांना तो आवश्यक तेवढा मिळत नसल्याचे विपरीत वास्तव नजरेत भरल्याचे दिसते. राज्यकारभार करणारी मंडळी भ्रष्टाचाराने वेढली गेली, शासकीय अधिकारी कर्मचारी यांची नीतिमत्ता ढासळली आणि त्यामुळे शेतकऱ्याचे अधिकच पतन झाले. एकीकडे अन्नधान्याची साठेबाजी, रासायनिक खतांचे व बी-बियाणे यांचे वाढत जाणारे भाव, त्यांची अनुपलब्धता यामुळे हवालदिल शेतकऱ्यांनी अनेक बँका व सोसायटी यांच्याकडून तसेच खाजगी सावकाराकडून कर्जे घेतली. त्यातच निसर्गाची अवकृपा व सतत नापिकी, कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ, कधी गारपीट या सर्व कारणाने शेतीवरच ज्यांचे जगणे अवलंबून आहे तो शेतकरी पुरता खंगला. एकही आशादायक चित्र नसल्यामुळे निराशेच्या खोल गर्तेत अडकला. शेतकऱ्यांच्या घरातील मोठ्यांची दुखणी, उपवर होत चाललेल्या लेकीबाळी, हुंड्याची वाईट व जीवघेणी स्पर्धा यामुळे शेतकऱ्याचे पार कंबरडे मोडले. 'मरण सोपे पण जगणे अवघड बनले'.

या सगळ्या पार्श्वभूमीवर या वीस वर्षांच्या कालखंडातील कवींच्या काव्यातील भाषिक वैशिष्ट्ये शोधणे हे सोपे काम नाही. तरीही हा शोधनिबंध निमित्ताने छोटासा प्रयत्न . प्रकाश किनगावकर यांच्या 'गावाच्या आकाभोवती' या कवितासंग्रहात 'आजीची गोष्ट' सांगताना माय व आजीची गोष्ट एकच असल्याचे निरीक्षण कवी नोंदवतो. शेतकऱ्यांच्या जीवनात पात्रांची नावं बदलतात मात्र जीवन संघर्षात्मक नाट्य एकच राहते. आजीच्या गोष्टीत आजोबांच्या वाट्याला येणारे वावर तनाळ निघते, बाप पीक कोळपून कोळपून थकून जातो, आजीची बोटं निंदून निंदून दुखरी बनतात, बापाची टाळू तणकटाचे भारे वाहून दबून जाते, खांदे झुकतात, व्यसनांनी घर खचते, तरीही निसर्गाने दान दिले नाही अशी अनेक कारणं कवीला दिसत राहतात. याच कवितेत मायीने सांगितलेली 'लाकूडतोड्याची गोष्ट' मुलाला पटायची... पण नातवांना ती पटत नाही. माय गोष्ट मात्र बदलत नाही पुन:पुन्हा तीच सांगते, यातून शेतकऱ्यांच्या जीवनातील कष्टाचे चक्र तसेच आवर्त होताना दिसते.

'गावाच्या आकाभोवती' या संग्रहातील 'वडांग' ह्या कवितेतील प्रतिमा स्त्री चित्रणाचा अनोखा नमुना ठरते. कृषी जीवनातील संदर्भही प्रतीकात्मक रीतीने मांडणारी 'वडांग' म्हणजे शेताभोवतीचे काटेरी कुंपण.

"आता वाटा दाबून दाबून थकून गेला बाप
अन् वडांग ही विरत गेली दिवसेंदिवस
मायच्या लुगड्यासारखी".

शेताभोवतीच्या काटेरी कुंपणासाठी वापरलेली 'आईच्या लुगड्या'ची प्रतिमा ही तिचे शेतातील राबत असणे, शेतातील पिकाची डोळ्यात तेल घालून राखण करणे, तरीही स्वतः मात्र दुर्लक्षित होऊन झिजून झिजून संपणे हा सारा आशय समोर घेऊन येते. म्हणजेच शेतकऱ्याच्या परिस्थितीचे प्रतीक रूप हे वडांग ठरते. थकलेला बाप आणि विरलेल्या लुगड्याची माय यांची दुरावस्था मात्र थोपवता येत नाही, हा आशय ही कविता सांगते.

'तापलेल्या दूधावरची साय' अशी प्रतिमा, 'रान रांडमुंड बघवेना' अशा प्रतिमा मूळ कवितेतल्या अर्थवाहीपणाला अधिक उठाव देतात व ग्रामीण स्त्रीचे जगणे, भोगणे व सहनशीलपणे परिस्थितीला तोंड देणे आपल्यासमोर आणतात.

वरील प्रातिनिधिक कवितेव्यतिरिक्त सशक्त मराठी ग्रामीण भाषिक वैशिष्ट्य रेखाटणाऱ्या १९९० ते २०१० या दोन दशकाच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेत एकनाथ पाटील यांच्या 'खुंट्यावर टांगलेली दु:ख', संतोष पद्माकर पवार यांच्या 'पिढीपेस्तर प्यादेमात', अजय कांडर यांच्या 'आवानओल', प्रकाश होळकर यांच्या 'कोरडे नक्षत्र', शशिकांत शिंदे यांच्या 'शरणागताचे स्तोत्र', सदानंद देशमुख यांच्या 'गावकळा', रमेश चिल्ले यांच्या 'नांगरून पडलेलं शतक', उत्तम कोळगावकर यांच्या 'जंगलझडी' व 'तळपाणी', ललित अधाने यांच्या 'कुणबी बाप', नारायण सुमंत यांच्या 'सातबारा', श्रीराम गोविंद गव्हाणे यांच्या 'होऊ दे रे आबादानी', केशव खटिंग यांच्या 'सालोसाल' आदी कवितासंग्रहांचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. परंतु हा विषय स्वतंत्र प्रबंधासाठी संशोधनाचा आवाका कवेत घेणारा ठरेल.

**१९९० ते २०१० या दोन दशकातील मराठी ग्रामीण कवितेचा भाषिक अंगाने अभ्यास:-**

हा खरे तर स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरावा इतके व्यापक अभ्यासक्षेत्र आहे. एवढी भाषिक वैशिष्ट्ये व वेगळेपण या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेत असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. कारण या दोन दशकाच्या कालखंडात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लिहिली जाणारी ग्रामीण कविता तेथील स्थानिक भाषा वैशिष्ट्यांसह, बोली व प्रादेशिक रूपातून आकार धारण करताना दिसून येते. येथील कवींच्या काव्यजाणीवा ह्या अधिक वास्तवसन्मुख असल्याचे येथे दिसते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या आशयाची अपरिहार्यता म्हणून या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेची **थोडक्यात** भाषिक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे नमूद करत आहे.

खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे बदललेले ग्रामीण जीवनाचे वास्तव आपल्या बोलीतून मांडताना येथील प्रत्येक कवी या बदलत्या परिवेशाला कसा सामोरा जातो? याचे उदाहरण म्हणून काही प्रातिनिधिक कवींच्या काव्यसंग्रहाचा विचार येथे लक्षात घेणे आवश्यक ठरेल.

अजय कांडर यांच्या 'आवानओल' (२००५) या कवितासंग्रहातून कोकणी बोली व कोकणी मराठी भाषेचा हेल घेऊन येणारी बोली कोकणातील काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रीचे भावविश्व आणि कृषीजन व्यवस्थेचे ताणेबाणे शब्दबद्ध करते. निसर्ग, प्राणी, पशुपक्षी यांच्यासह वाढताना स्त्रीच्या जगण्यातील धारणा, समजुती यांना कवितारूप देण्यात अजय कांडर येथे यशस्वी होतात. समुद्राची अखंड गाज या कवितेतल्या शब्दकळेत काठोकाठ भरलेली असल्यामुळे विस्तीर्ण खुल्या अवकाशाला ती सतत साद घालते. कृषिजन व्यवस्थेतील जगण्यातील संकेत या कवितेत प्रतिमारूप धारण करतात. येथील झाडांनाच माणूसपण कवी प्राप्त करून देतो. मौखिक परंपरेतील सत्व घेऊन घनदाट होत जाणे हा या कवितेचा स्वभाव आहे.

प्रकाश किनगावकर यांच्या 'गावाच्या आकाभोवती' (२००६) कवितासंग्रहामधून ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदना, दु:खे यांची अनेकविध रूपे उत्तर महाराष्ट्रातील खानदेशी शेतकऱ्याच्या बोलीच्या वैशिष्ट्यांसह त्यांच्या शब्दकळेत अवतरले आहेत. तुकोबांनी शेतकऱ्यांविषयी व्यक्त केलेली ही दैना निरंतर सुरू असल्याचे तसेच सृष्टीचे पालनपोषण करणारा शेतकरी मरमर मरतो, कष्ट करतो; परंतु त्याच्या वाट्याला दु:खाचेच दान येते. ही परिस्थिती अजूनही बदललेली नाही. ही मध्यवर्ती जाणीव आणि केंद्र असलेल्या या संग्रहातील सगळ्या कविता आहेत.

संतोष पद्माकर पवार यांच्या 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' (२००३) व 'पिढीपेस्तर प्यादेमात' (२००८) या दोन्ही कवितासंग्रहातून येणारी शब्दकळा खास ग्रामीण आहे. स्त्री, मजूर, गावगाडा आणि कुणबी यांच्या सनातन दु:खाची अभिव्यक्ती गद्यसदृश्य वाटणाऱ्या रचनाबंधामधून दिसून येते. यातील 'झडती बाईपणाच्या मातीची' या भागातील स्त्रीविषयक कविता या दृष्टीने अधिक सत्वयुक्त जाणिवांनी संपन्न आहेत. माती आणि माते चा वेगळाच सर्जनशील संदर्भ येथे सापडतो. खटकेबाज

शब्द, दांभिकतेबद्दलचा अनावर राग,अंबाडी, घायपात, नारळ, मुसळ, इळा अशा कष्टकऱ्यांच्या हाती असणाऱ्या सगळ्या शेतातील अवजारांच्या उल्लेखासह ही भाषा मध्यवर्ती महाराष्ट्रातील भाषेला साजीवंत करते.

बालाजी मदन इंगळे यांच्या 'मेलं नाही अजून आभाळ' (२०१०) या कवितासंग्रहातून आलेली बोली उमरगा परिसरातील काठावरच्या मराठी भाषेला उजागर करते. त्यातही या भाषेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानविषयक शब्दांचा भरणा भरपूर केलेला दिसून येतो. त्यामध्ये इंटरनेट, डाटा स्पीड, मेमरी कार्ड, इमेजेस, करंट, आकडा, कार्बन,पॅकेज, मोबाईल टॉवर आदी शब्दकळा मराठीसाठी अभिनव प्रकारे उपयोजलेली आहे. कवितेतील आशयाची अपरिहार्यता समजून अनेक इंग्रजी शब्द व संकल्पना सुद्धा बिनदिक्कतपणे कवितेत वावरताना दिसून येतात. (उदा. क्लिक, कनेक्ट, माऊस, सीडी, कम्प्युटर, किक अँड स्टार्ट, फर्स्ट गियर, वन जीबी - टू जीबी, स्क्रीन, एक्झिट, इंडियन आयडॉल, थीम्स, राऊंड इ.). पारंपरिक वाक्प्रचार व म्हणींची नवी घडणही अनेक ठिकाणी केली आहे.

कैलास दौंड यांच्या 'भोग सरू दे उन्हाचा' (२००७) या काव्यसंग्रहातून आजच्या ग्रामीण वास्तवाचे प्रखर आणि जीवघेणे दर्शन घडते. नगर जिल्ह्यातील पाथर्डी परिसराचा दुष्काळी भाग असणाऱ्या प्रदेशातील उध्वस्त होणारा गावगाडा, शेतीची झालेली वाताहत, अवेळी पडणारा पाऊस व त्यामुळे पिकांची धूळधाण झाल्यामुळे देशांतराला जाणारा येथील शेतकरी दणकट असला तरीही कविता मात्र अष्टाक्षरी छंदातून लोकजीवनाला उजागर करते. संग्रहातील एकूण ग्रामीण कविता प्रासादिक भाषेत व्यक्त होते. ग्रामीण समाजाच्या वास्तववादी जीवनाचे भावनाशील वृत्तीने केलेले रेखाटन येथे दिसून येते. संग्रहातील २३ व्या क्रमांकाच्या 'आगोठ' नावाच्या कवितेत पावसासाठी एक छान रूपक येते. मेघांच्या गुरांना फिरायला नभ पुरत नाही म्हणून काही मेघगाई डोंगरावर चरायला उतरतात . भर दुपारची वेळ असूनही सूर्य गुराखी तेथे दिसत नाही. या गाईंना पाण्यावर नेत नाही, पण या मेघगाई सागराचे पाणी पिऊन आलेल्या आहेत व त्यातल्याच दुधाळ गाईंनी सोडलेल्या धारा म्हणजे पाऊस अशी ती प्रतिमा आहे.

शशिकांत शिंदे यांच्या 'शरणागताचे स्तोत्र' (२००५) कवितासंग्रहातून खेड्यामधल्या शेतीची शेतकऱ्याची व त्याच्या तळतळाटाची कहाणी फारच उत्कटतेने आली आहे. येथील उंबराच्या दोड्या, लेकीबाळींच्या माहेरपणाला 'वचनावर वाणी' गहाण ठेवणारे सगेसोयरे, नातेसंबंधात पूर्वी इतकी उष्णता न राहिल्याने मुलांचे फॉर्मल होणे व प्रेम, उत्कटता, माया या गोष्टी कॅज्युअल बनल्याचे कवी नोंदवतो. पाऊस, पेरणी, कळा, वंश इत्यादी शब्दकळा लक्षणीयपणे नजरेत भरते. हा कवी संपूर्ण शेतीशी, मातीशी व त्या जीवनातल्या सुखदुःखाची एकरूप झाल्याशिवाय असा अनुभव कवितेत उतरतच नसतो. हेच सत्य संपूर्ण कवितासंग्रहातून दिसून येते.

उत्तम कोळगावकर यांच्या 'जंगलझडी' **(१९८२)** काव्यसंग्रहातून अंधाराचा पदर, काळंशार पाणी, कडब्यासारखे पोकळ हात, अंधाराची पिलावळ, फुलाचे सरण, हरवलेल्या गाई, म्हाताऱ्याचं काळीज, सांधा निखळलेले हात, फुलांच्या किंकाळ्या, स्वप्नांचे मृत्यू, सायंकाळचे प्रश्न, मोडलेला नांगर, पोपट आणि कंदील या व अशांसारख्या आणखीही खूप साऱ्या प्रतिमा ग्रामजीवनाचा वेगळा पोत दर्शवितात. कोळगावकरांच्याच 'तळपाणी' (२०००) या कवितासंग्रहातील एकूण ८४ कवितांमधून आलेली भाषा समग्र कास्तकाराच्या जगण्याला कवेत घेणारी आहे. उदा.

" कुठनंतरी आय लगालगा आली
आन इनलेल्या टोपल्या घेऊन
गावात इकायला गेली
तवा सूर्य माझ्या डोक्यावर
टोपी सारखा येऊन बसला."…..

"सांजच्याला बा कुठनं तरी
तर्रऽ होऊन भेलकांडात आला
तवा सूर्य बाच्या डोक्यात उतरला व्हता.
आन् त्याचा लालभडक उज्याड
बाच्या दोन्ही डोळ्यातनं

भाईर सांडत व्हता."

(तळपाणी, पृ.४४,४५)

या कवितेतील 'सूर्य' प्रतिमा तारक व संहारक अशा दोन भिन्न अर्थाची निदर्शक म्हणून अतिशय संयतपणे येताना दिसते. याच संग्रहातील 'ताकीद' नावाच्या कवितेत मात्र नेहमी पूर्वेला उगवणारा सूर्य कवीच्या हलगर्जीपणामुळे पश्चिमेला उगवतो आणि कवीला लेखी ताकीद दिल्याचे नमूद आहे. याच संग्रहातील जंगलरान पेटल्याच्या 'बातम्या' असो की 'स्वप्नांचं महानगर' नजरेआड न करता येण्यासारखंच आहे. काळ्या ढगांचे कळप, झाडाने पसरलेले हिरवे तांबूस हात, पाखराची गाणी चुरगाळून फेकलेली, खोलवर वार झाल्यागत वारा तोंड खुपसून पडला आहे, खिळे ठोकून भिंतीवर बंद केलेलं आभाळ, शेतभर पसरत चाललेलं पिसाट गवत, धुळीचा फाटका पदर ऊनच ऊन पिणारा अफाट निर्जन माळ....ही काव्यभाषा आणि तिचा बदलता पोत वाचक मनाचा तळठाव घेतो.

श्रीकांत देशमुख यांच्या 'बळीवंत' ( आणि 'आषाढमाती'(२००३) या दोन्ही संग्रहातून पुढे आलेली कविता मराठी ग्रामीण जीवनाचा कथात्मक संवेदनेतून वेध घेते. पारंपारिक मिथकांचा नवा वापरही करतात. 'शेतीवाडीत रात्रंदिवस राबणं हाच विठ्ठल असं मानणाऱ्या श्रद्धाळू, कुणबाऊ मायमाऊल्यांना' कवीने संग्रह अर्पण केलाय. सातशे वर्षापासून साऱ्या कुणब्यांना आणि त्याच्या अठरापगड अलुत्याबलुत्यांना बांधून ठेवणारा, वर्षानुवर्ष स्वतःकडे यायला लावणारा अपरिहार्य विठोबा शेतात रात्रंदिवस राबाताना दिसतो. शेणामातीत कालवणं इथं जिव्हाळ्यात ओढणं असतं, पवित्र करणं असतं. देवाच्या पूजेसाठी हरळी कितीही पवित्र असली तरी कुणब्याला तापदायक असते जाणीव आहे. इथं आईच गुरुदेव त्यांना मुठीत सांभाळत घराचं गोकुळ सारवून घेत आपले लक्ष्मी असणं साकार करते. तिचं जगणं, सोशिकपण, ओटी पोटावरचे धुरेबंधुरे, रानात डसलेले विंचूकाटे आणि गोधडी शिवणं, मोडकळीला आलेल्या बैलगाडीसारखा तिचा देह उठताबसता करकर वाजत असतानाही राबणं चालू असल्याची नोंद कवी घेतो. उध्वस्त होत चाललेली खेडी, आत्महत्या करणारे कुणबी, त्यांच्या जगण्याची चाललेली ससेहोलपट यामुळे हा कवी अस्वस्थ आहे.

केशव सखाराम देशमुख यांच्या 'पाढा'(२००६), 'अथक' (२०१०) व 'चालणारे अनवाणी पाय' (२००८) या तिन्ही कवितासंग्रहातून येणारी कविता ही बापाचं काळभोर जमिनीसारखं दुःख, त्याचा राबण्याचा श्रमसिद्धांत मांडतच नांगराच्या फाळाचे धारदार गणित शिकवते. शेतकरी बाप व त्याला राबण्यासाठी मदत करणारे दावणीवरचे बैल, कष्टात राहणारी माणसं हा कवितेचा आस्थाविषय आहे. येथील 'पावसाचं रांगणं', कृपावंत आभाळ, अघोरी, प्रार्थनेची कोवळी पाने, 'जीभेतून सांडतो भाषेचा विस्तव' यासारख्या प्रतिमा कृषीवलांचे जगणेचं आपल्यासमोर मांडतात. तुकोबा विषयीचा नितांत आदर व्यक्त करतानाच हा कवी आईच्या कष्टवंत हाताचं बळ विसरत नाही. तर तो कवीच्या श्रद्धेचा विषय आहे. 'अथक' या केशव देशमुख यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहातून आलेल्या शब्दकळेचा विचार करतांना 'शेतांना सुगीची स्वप्न पडोत; पिकांना पाखरांचे स्पर्श लाभोत; चोराचिलटाची दृष्ट न लागो'(अथक, पृष्ठ १३७) असं मागणं मागते. भीषण दुष्काळाबद्दलही तक्रार न करणारा तरीही ढोर वासरू उपाशी राहू नये एवढीच काळजी करणारा शेतकरी येथे दिसतो. येथील प्रेतांवरच्या सत्काराच्या शाली, चाकू सु-यांची घट्ट मैत्री, कुऱ्हाडीचाच पाऊस, लिंगातले सर्जन, लोखंड पेरून कुऱ्हाडीचे पीक घेणारा शेतकरी, करवत आणि कुऱ्हाडीचा हंगाम यासारख्या प्रतिमांमधून अर्थवाही अभिव्यक्ती साधणारा हा कवी 'सोन्याच्या कळस' सारख्या कवितेतून शेतकऱ्याच्या घरात जन्मणाऱ्या अभावग्रस्त जगणाऱ्या मुलीचे शब्दचित्र लक्षवेधक रेखाटत आहे.

अनिल पाटील यांच्या 'मातेरं' या कवितासंग्रहात व-हाडी बोलीचा अस्सल नमुनेदार वापर केल्याचे पाहायला मिळते. खिराळ्याची, यीहीर, सनं, वसानं, घळीत, शितोळा, कटी, सोळून, कुकवाच्या, कपायी, झुलोती, गयात, सोताच, नाइतं, तुह्ये, ओयख, चइन, नोको, सरक्यातीर...

यासारख्या शब्दकळेमुळे आपणास विठ्ठल वाघ यांच्या 'काया मातीत मातीत' (१९९१) काव्यसंग्रहाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. विठ्ठल वाघांच्या कवितेतील बोलीभाषा वऱ्हाडी अकोला जिल्ह्यातील आहे. बहिणाबाई चौधरी नंतरची खरीखुरी ग्रामीण कविता म्हणून ज्या कवितेला गौरविण्यात आले आहे अशी वाघांची कविता शिवारात प्रतिमा पेरते तर ग्रामात प्रतीकाची पूजा बांधते. कृषी आणि कृषकांशी इमान बाळगणारी ही कविता लोकगीताची लय अंगीकारत लोकजीवनाचा गोडवा सांगणारी, तसेच लोकसंस्कृतीचा जोगवा मागत रानातील रानमेवा घेऊन, लोकतत्त्वीय धारणेतून निर्माण झालेली वाघांची

ग्रामीण कविता आजवरच्या मराठी कवितेला नवरसपूर्ण बनवते. राघू मैनेच्या प्रतीकांची मोठी बहारदार योजना विठ्ठल वाघ यांनी त्यांच्या कवितेतून केली आहे. भावकवितेचे सगळे गुणधर्म वाघांच्या कवितेत आढळतात. त्यामध्ये भुलाईच्या गाण्याचे स्वर जसे येतात तसेच अनेक लोकगीतांचा सुगंध दरवळत राहतो. लोकजीवनातील सांकेतिकतेचा पुरेपूर वापर, लोकसंस्कृतीचा घमघमाट त्यांच्या शब्दांना व अनेक ओळींना स्पर्शून जातो. वऱ्हाडी बोलीतील 'ळ' ऐवजी 'य' (डोळा- डोया, पोळा – पोया), 'ड' ऐवजी 'ळ' (जोडीने – जोळीने, जिकडे तिकडे – जिकळे तिकळे, मेढी – मेळी, सोड - सोळ), इथे तिथे - अथि तथि... अशा वेधक शब्दकळेमुळे कवितेतील गोडवा आणखी वाढतो. कळीचे फुलात रूपांतर होणे यासारख्या बहारदार कल्पना (येवय), प्रतिमा व्यक्त करतानाची विठ्ठल वाघांची प्रतिभा गगनाला गवसणी घालणारी ठरते. डांगोडांगी, अळीमिळी गुपचिळी, न्हातीधुती, आंगोपांगी, डुलुडुलु, घरीदारी, नातंगोतं, लाजसरम इत्यादी शब्दातून बोलीत अनेकदा पहिल्या शब्दाला जो अर्थ असेल तोच दुस-या शब्दाला जोडून येणा-या शब्दात आल्यास साद - प्रतिसाद देणाऱ्या ह्या शब्दामुळे कवितेची गोडी अधिक वाढीस लागली आहे. वाघांच्या कवितेत अंगभूत नाद आहे. या नादमयतेने रसिकांना नादी लावले. कवितेतील लयी चा लयदारपणा निर्माण करण्यात वाघांचा हातखंडा आहे. रंगारंगाईचे फुलं, जसे डुलतात डुलं, चंद्र चोरू चोरू पाहे, पान नाही पान; त्यात माहा मनं...अशा असंख्य ओळी ओळीतून शब्द शब्दातून लय, नाद, तालाची जुगलबंदी वाघांच्या कवितेत अनेक ठिकाणी आढळते. याशिवाय ईज नाचते थयथय, टारारून वर आले, माग फिरली गर्रकन, भिरभिरे पाखरू, अरमानानं खुळ्ळनं करा...अशा शब्दांनी वाघांच्या कवितेत गतिमानता येते. येनी कर फनी कर, फनफन वारा, लाजरी माही बुजरी काया, नवाई असी दिवाई जसी अशा अनेक प्रासयुक्त शब्दांमुळे विठ्ठल वाघ यांच्या कवितेला अमिट गोडवा लाभला आहे. एवढे असून सुद्धा वाघांच्या कवितेतील प्रखर सामाजिकता नजरेस भरल्याशिवाय राहत नाही. या दृष्टीने त्यांच्या 'काया मातीत मातीत' संग्रहातील 'ढगामुचूक अभाय', 'तिसरा डोया', 'खयवाळी', 'खापराचे दिवे', 'आक्के', 'म्हैस', 'मेंढरं' या कवितांचा विचार करावा लागतो.

ना.धों. महानोर यांच्या 'प्रार्थना दयाघना' (१९९१) तील कवितेत काव्यानुभव, मांडणी, प्रतिमा, लय आणि भाषा ही एकजीव झालेली आहे. कवितेतील अनुभवाला आणि लयीला साजरा असाच त्यांच्या एकूण कवितेतील भाषेचा पदन्यास असतो. लय हेच महानोरांच्या कवितेत प्राणतत्व मानावे लागते. महानोरांच्या कवितेचा अल्पाक्षरत्व हा सुद्धा मोठा गुण आहे. त्या भाषेला लोकगीताचे, लोकसंगीताचे वळण आहे. काही शब्द रूपांना भाषेच्या जुन्या रूपाचे वळण त्यांनी दिले आहे. महानोर ज्या प्रदेशात राहतात त्या प्रदेशाची भाषा कवितेच्या माध्यमातून सर्वसाधारण मराठी वाचकांना परिचित नसलेली आहे. महानोरांचे शब्द प्रादेशिक व अनोळखी असले तरी त्यामुळे त्यांची कविता दुर्बोध मात्र होत नाही. 'तिची कहाणी' कवितासंग्रहातून तर भाषेची नव्याने घडण करणारे महानोर स्त्री जीवनाच्या सर्व व्यथावेदनांना मुखर करतात. शोधनिबंधाच्या विस्तार भयास्तव येथेच थांबणे उचित ठरेल!.

**सारांश:-**

मला माझे लहानपण आठवते. माझ्या लहानपणी प्रत्येक गावखेड्यातून, वाडी तांड्यावरच्या गरीब, कष्टकरी स्त्रियांचे दळण 'जात्या'वर दळले जायचं. कांडण 'उखळ' – 'मुसळा'च्या सहाय्याने चालायचे. स्वयंपाक दगडाच्या वा मातीच्या 'चुली'वर केला जायचा. दह्यादुधातून लोणी काढण्याची किमया लाकडापासून बनवलेली 'रवी' करत असायची. घरातल्या सगळ्या माणसांसाठी केली जाणारी भाजी वा कालवण रुचकर व्हावे म्हणून 'पाटा-वरवंट्या'च्या साह्याने घरातील गृहिणी मीठ, मिरची, मसाला, काळे वाटण बारीक वाटून भाजीत टाकायची.... तरीही त्या स्वयंपाकाची लज्जत कुठल्याही केटरिंगवाल्याला लाजवणारी असे.घर स्वच्छ करण्यासाठी 'फडा' असायचा तर घरात वेगवेगळ्या टाइल्स बसण्यापूर्वी सारवणे, पोतेरणे यातून घरातील भिंती शुभ आकार घ्यायच्या, बोलक्या व्हायच्या. त्यावेळी कुठलेही मिक्सर, कुकर, हिटर, गिझर वा फ्रिज उपलब्ध नसायचे. तरीही 'मनगटाच्या बळावर घरातील कर्ती स्त्री आपला संसार तोलून धरायची'. जात्यावर बसले की तिला 'ओवी' सुचायची, दळण कांडणं करताना भगवंताचे नामस्मरण ती करायची. आपल्या लेकराला नीतीपाठाची शिकवण व माणूस बनवण्याचे संस्कार पौराणिक कथातून, जात्यावरच्या गाण्यातून, अंगाई गीतातून वा संतांच्या अभंग, ओव्यांमधून केले जायचे. या सगळ्यांचे संदर्भ पेरत जाणारी मराठी ग्रामीण कविता म्हणूनच लक्षणीयपणे नजरेत भरल्याशिवाय राहत नाही. १९९० ते २०१०

पर्यंतच्या काही प्रतिनिधिक कवी व कवितासंग्रहाच्या आधारे काव्यसंग्रहाची भाषा व भाषिक वैशिष्ट्यांबद्दलची अभ्यासमांडणी वरीलप्रमाणे करताना काही सूत्ररूप मुद्दे वरीलप्रमाणे नोंदवता येतील.

**संदर्भग्रंथ सूची :-**


1) शिंदे, शशिकांत: 'शरणागताचे स्तोत्र', मानसी प्रकाशन, नगर, पहिली आवृत्ती २००५.
2) देशमुख, केशव सखाराम: 'अथक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २०१०.
3) दौंड, कैलास: 'भोग सरू दे उन्हाचा', शब्दालय प्रकाशन, नगर, प्रथमावृत्ती, मे २००७.
4) किनगावकर, प्रकाश : 'गावाच्या आकाभोवती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००६.
5) देशमुख, केशव सखाराम : 'चालणारे अनवाणी पाय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती - २००८
6) देशमुख, श्रीकांत : 'बळीवंत' केदार सप्लायर्स (प्रकाशन), पुणे, प्र.आ. १९९७.
7) इंगळे, बालाजी मदन : 'मेलं नाही अजून आभाळ', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र.आ. २०१०.
8) पवार, संतोष : 'पिढीपेस्तर प्यादेमात' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. प्र.आ. २००८.
9) खेडेकर, जयराम: 'मेघवृष्टी', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती २००५.
10) कांडर, अजय : 'आवानओल', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती – २००५.
11) पाटील, अनिल : 'मातेरं', प्रतिभा साहित्य संघ, (विदर्भ) शाखा अचलपूर, पहिली आवृत्ती – मार्च २००६.
12) देशमुख, श्रीकांत : 'आषाढमाती', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, दुसरी आवृत्ती – २००६.
13) कोळगावकर, उत्तम : 'जंगलझडी', मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८२.
14) कोळगावकर, उत्तम : 'तळपाणी', मौज प्रकाशन गृह, मुंबई, पहिली आवृत्ती - २०००.
15) सार्वेकर, कैलास : 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९९.
16) कदम, महेंद्र : 'कवितेचे वर्तमान', दर्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,- २०१५.
17) कदम, महेंद्र : 'कवितेची शैली', भूमी प्रकाशन, लातूर, पहिली आवृत्ती, २००७.
18) गायकवाड, हेमलता : 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता: एक अभ्यास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती – १९९७.
19) जाधव, जयद्रथ (संपादित) : '१९९१ नंतरचे ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि संदर्भ', संस्कार प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती - २०१०.
20) बांदेकर, प्रवीण : 'समकालीन कविता : काही निरीक्षणे' उद्याचा मराठवाडा, दीपरंग, शिवाजी नगर, नांदेड.

# संयुक्त राष्ट्र संघटना सिद्धांत आणि व्यव्हार

**डॉ. सविता शिवनाथ झुंजारे (राज्यशास्त्र विभाग)**
शरदचंद्र पवार कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोलापूर.

**प्रस्तावना** :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्मितीचा मुख्य उद्देश, सिद्धांत आणि व्यावहार पाहता जागतिक पातळीवर शांतता ,सुव्यवस्था निर्माण करून परस्सपर सहकार्यातून युद्ध आणि संघर्षाचा नायनाट करणे, राष्ट्र - राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे, मानवी जीवनाचे संरक्षण करणे यासारखे प्रश्न सलोख्याने सोडविणे , राष्ट्रीय सहकार्याची भावना निर्माण करणे,मानवी हक्क व स्वातंत्र्याची जोपासना करणे, मानवाच्या विकासासाठी मदत पुरवणे, शाश्वत विकास संवर्धनासाठी कार्य करणे, जागतिक कायद्याचे अन्वयन करणे,या उदांत दृष्टिकोनातून उदयास आलेली जागतिक स्तरावर सिद्धांत आणि व्यवहारानुसार कार्य करणारी संघटना म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटना होय.

**प्रथम व द्वितीय विश्व युद्ध :-**

प्रथम व द्वितीय विश्व युद्धामुळे जागतिक क्षेत्रात झालेल्या दुष्परिणामातून निष्पाप मानव प्रचंड दु:ख ,दारिद्र्य, उपासमार रोगराईच्या समस्याचा सामना करू लागले. अशा समस्या जागतिक पटलावर पुन्हा उद्भवनार नाहीत.हाच उद्देश साध्य करण्यासाठी २४आक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटना उदयास येऊन काही महत्त्वाच्या अंगाची स्थापना करून त्या मार्फत संघटनेचे उद्देश साध्य करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. यामध्ये आमसभा, सुरक्षा परिषद, आर्थिक आणि सामाजिक परिषद, विश्वस्त परिषद ,आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि सचिवालय या संयुक्त राष्ट्राच्या प्रमुख घटक संस्था उभारण्यात आलेल्या आहेत. आता पुन्हा एकदा नको तर शांतता हवी या दृष्टिकोनातून जगातील काही महाशक्तीशाली राष्ट्रांनी एकत्रित येऊन या संघटनेची स्थापना केली. यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी रुझवेल्ट यांच्या पुढाकाराने या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेचे महत्त्वाचे ब्रीद वाक्य म्हणजे "युद्धाऐवजी शांतता" हे असल्यामुळे या संकल्पनेशी बांधील राहून ही जागतिक स्तरावर शांततेसाठीच कार्य करीत आहे. ही संघटना वाढता दहशतवाद, शस्त्र निर्मिती , युद्ध ,संघर्षाच्या विरोधात शांतता ,सहकार्य, विकास यावर अधिक लक्ष केंद्रित करून मानवी हक्काची पायमली होणार नाही या दृष्टिकोनातून ही संघटना आजपर्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. यात भारतासारखा लोकशाही प्रधान राष्ट्र संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सकारात्मक कार्यास सातत्याने पाठीशी राहीलेला दिसून येतो. पंडित नेहरू ते नरेंद्र मोदीनी सुद्धा या संघटनेला शांतता, सहकार्य, विकास याकरिता पाठिंबा दिलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघटना ही एक अशी यंत्रण आहे की जी यंत्रणा प्रत्येक क्षेत्रात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावून निर्माण झालेले समस्या पुन्हा निर्माण होऊ नयेत त्या दृष्टिकोनातूनच कार्य करण्यावर अधिक भर देत आहे.

**संघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेच्या निर्मितीचा नेमका इतिहास काय आहे? कोणती राष्ट्र पुढाकार घेतली आहेत? कोणते उद्देश डोळ्यासमोर ठेवून सर्वानुमत झाले? जगातील किती सदस्य राष्ट्र संघटनेच्या निर्मितीच्या वेळी उपस्थित होती ? कोनत्या राष्ट्रांना अधिक महत्त्व दिले गेले ? संघटना स्थापन करण्याच्या दृष्टिकोनातून कोणत्या राष्ट्राच्या राष्ट्र प्रमुखांनी पुढाकार घेऊन कोण कोणत्या ठिकाणी बैठका, संमेलने, परिषदा, घेऊन अंतिम या संघटनेची सनद तयार करण्यात सार्वामत झाले. याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**द्वितीय महायुद्ध :-**

द्वितीय महायुद्ध सुरू असताना युरोपातील काही राष्ट्रांनी नवीन जागतिक संघटना स्थापन करण्याचे ठरविले. तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी निर्माण केलेल्या 14 कलमी तत्त्वाचा आधार घेत निर्माण करण्यात झालेला राष्ट्रसंघ अनेक कारणामुळे अपयशी ठरला. आता पुन्हा तसे होणार नाही या दृष्टिकोनातून मित्र राष्ट्रांनी राष्ट्रसंघाचे संयुक्त राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संस्था व्यक्तीचे अधिकार , स्वातंत्र्य यांच्या रक्षणार्थ आणि युद्धाऐवजी शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने निर्माण

करण्याचे ठरविले. अर्थात संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती एकाएकी झालेली नसुन तीला अनेक प्रक्रियेतून बैठका,परिषदा,करार आणि मसुद्यांच्या प्रयत्नातून या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेच्या निर्मितीसाठी संघटनेची रूपरेखा कोणत्याही एका व्यक्तीने तयार केलेली नाही परंतु ही संघटना स्थापनेसाठी विशेष श्रेय इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रूझवेल्ट यांना दिले जाते. या दोन प्रमुख राष्ट्रांच्या राष्ट्र प्रमुखांनी प्रथमतः संयुक्त राष्ट्राची संघटना निर्माण करण्यासाठी सेंड जेम्स राजवाड्यात प्रथम बैठक घेतली ती महत्त्वाची ठरली.द्वितीय महायुद्धाच्या कालखंडात जर्मनी व इटली यांच्या आक्रमणामुळे ग्रीस ,बेल्जियम ,झेकोस्लोव्हाकीया नेदरलँड ,नार्वे ,पोलंड आणि युगोस्लोव्हाकीया या निर्वासित राज्यांचे प्रतिनिधी सेंट जेम्स राजवाड्यात एकत्रित आले . त्यांनी एका जाहीरनाम्यावर १२ जून १९४१ रोजी सह्या केल्या. या बैठकीतून जागतिक शांततेची तीव्र इच्छा सर्व राष्ट्राच्या सदस्यांनी मिळून व्यक्त केली. त्यांच्या या तीव्र इच्छेच्या घोषणेवर सर्वांचे एकमत झाले. ही घोषणा म्हणजेच शांततेसाठी संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच पहिलं पाऊल होय.त्यानंर काही दिवसांनी अटलांटिक समुद्रावर इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुजवेल्ट हे एकमेकांना एका युद्धनौकेवर भेटले रूझवेल्ट यांनी त्यावेळी "**संयुक्त राष्ट्र** " हा शब्द प्रथम वापरला. या घोषणेस "**वार टाईम स्टेटमेंट**"असे म्हटले जाते. या अटलांटिक समुद्रातील युद्धनौकेवर भेटल्यानंतर एक त्यांनी सनद जाहीर केली.त्यास अटलांटिक सनद म्हणून प्रसिद्ध आहे. हुकूमशाही वृत्तीला पायबंद घालण्यासाठी ही सनद महत्वाची ठरली.

**सेंट जेम्स राजवाड्यातील घोषणा :-**

सेंट जेम्स राजवाड्यात झालेली बैठकीतील घोषणा आणि **अटलांटिक सागरात झालेली सनद** या दोन्ही चा आधार तिसरा टप्पा हाती घेण्यात आला तो म्हणजे **संयुक्त राष्ट्र संघाचे घोषणापत्र** होय.१जानेवारी १९४२ रोजी अमेरिकेच्या वाईट हाऊस मध्ये तत्कालीन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट आणि इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यासोबत सोवियत संघ आणि चीनचे प्रतिनिधी संयुक्त राष्ट्राच्या घोषणा पत्रावर सह्या केल्या या पत्रकापुढे आणखी २२ राष्ट्रांच्या सह्या झाल्या.त्यामुळे संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीला मान्यता मिळाली. सह्या करणाऱ्या राष्ट्रांनी परस्परास सहकार्याने वागण्याची व शत्रू राष्ट्राची कोणतेही गुप्त करार न करण्याची शपथ घेतली. यालाच संयुक्त राष्ट्र संघटनेचे घोषणापत्र असे म्हटले आहे. **मास्को संमेलन**:- रशियाची राजधानी मास्को येथे ३० आक्टोबर १९४३ रोजी संमेलन घेण्यात आले यात असा निर्णय घेण्यात आला की, या संघटनेचे सदस्यत्व लहान मोठ्या सर्व राष्ट्रांना खुले राहील .जागतिक शांतता सुरक्षिततेचे कार्य या संघटनेवर सोपीवले जाईल.या संमेलनाला विशेष महत्त्व दिले जाते कारण सोव्हियत रशियाने यावेळी प्रथमच जागतिक संघटनेच्या स्थापनेत भाग घेतला असल्यामुळे मास्को संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते.

**तेहरान परिषद :-**

इराणची राजधानी तेहरान या ठिकाणी डिसेंबर 1943 रोजी तीन राष्ट्राध्यक्षांनी एकत्र येऊन मानवी भवितव्या सुरक्षित ठेवण्यासाठी जागतिक संघटना निर्माण करावी अशी संयुक्त घोषणा केली म्हणून या घोषणेला विशेष महत्त्व प्राप्त झाले ही परिषद जागतिक इतिहासात संयुक्त राष्ट्र संघटना स्थापनेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण समजली जाते **डंबार्टन ऑक्स संमेलन, याल्टा परिषद,आणि शेवटची सनफ्रान्सिस्को परिषद** ही शेवटची आणि महत्त्वपूर्ण परिषद घेण्यातआली.22 एप्रिल 1945 ते 26 जून 1945 या कालावधीत येथे परिषद घेण्यात आली या परिषदेला एकूण 50 राष्ट्रीय उपस्थित होते.ही परिषद म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संविधाना निर्मितीमधील एक महत्त्वपूर्ण आणि शेवटचा टप्पा मानला जातो. या परिषदेमध्ये संयुक्त राष्ट्र संघाची सनद तयार करण्यासाठी जवळपास दोन हजारांहून अधिक तज्ञ एकत्र आले होते डंबर्टन ओक्सचा ठराव, मसुदा या परिषदेत मांडण्यात आला होता, या ठरावाचा बराचसा भाग २/३ मताने सर्व सदस्यांनी मिळून संमती करून घेण्यात आला. समित्या आयोग व सुरक्षा मंडळाच्या रचनेचा विचार या परिषदेत करण्यात आला. पाच श्रीमंत व बड्या राष्ट्रांना सुरक्षा मंडळात कायम स्थान देण्याचे निश्चित करण्यात आले.पाच बड्या राष्ट्रांना नकाराधिकार देण्यासाठी मान्य करण्यात आले. या संमेलनातील ठरवायचे प्रती उपस्थित प्रतिनिधी राष्ट्राकडे पाठविण्यात आले व त्यांची मान्यता मागविण्यात आली.बहुसंख्य राष्ट्राकडून ही मान्यता मिळाल्यानंतर अधिकृतपणे संयुक्त राष्ट्र ही संघटना 24 ऑक्टोबर 1945 रोजी स्थापन करून घोषणा करण्यात आली.

**संयुक्त राष्ट्र संघाची सनद :-**

संयुक्त राष्ट्र संघाची सनद तयार करण्यात आली त्यात संघटनेची उद्दिष्टे आणि तत्वे स्पष्ट करण्यात आली. त्याचबरोबर संघटनेत भाषा कोणती असावी (चिनी इंग्रजी फ्रेंच रशियन आणि स्पॅनिश)ती सुद्धा स्पष्ट करण्यात आली. तसेच ही संघटना कशा पद्धतीने काम करेल आणि तिची कीती व कोणती अंग असावीत याचेही उल्लेख करण्यात आला. त्याचबरोबर उप अंगे किती असावीत याचाही उल्लेख करण्यात आला त्या महत्त्वाच्या अंगानुसार आणि उपांगानुसार ही संघटना वेळोवेळी आपापल्या विभागामार्फत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत असल्यामुळेच 1945 पासून आजपर्यंत ही संघटना यशस्वीरित्या आपली भूमिका बजावत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**एकविसावे शतक धोक्याची घंटा :**

एकविसावे शतक धोक्याची घंटा असल्याचे दिसून येत आहे.कारण अलीकडच्या कालखंडात शस्त्र निर्मितीमुळे विकसित राष्ट्रांचा व्यक्तिगत स्वार्थ,छोटे-मोठे युद्ध विचारधारेच्या संघर्षामुळे होताना दिसत आहेत. यामुळे काहीअंशी प्रमाणात संयुक्त राष्ट्राच्या कार्यात अडथळे निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. उदाहरणार्थ चिनने निर्माण केलेला कोरोनाचा व्हायरस त्याच बरोबर सध्या सुरू असलेले रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध तसेच ईराण- इराक युद्ध इस्रायल-हमास युद्ध 7 ऑक्टोबर 2023 पासून इस्रायल आणि हमासच्या नेतृत्वाखालील पॅलेस्टिनी अतिरेकी गटांमध्ये सशस्त्र संघर्ष मुख्यतः गाझा पट्टीमध्ये आणि आसपास होत आहे, ज्यामध्ये वेस्ट बँक आणि इस्रायल-लेबनॉन सीमेवर चकमकी देखील होत आहेत.

दक्षिण कोरिया युद्ध तसेच इजराईल पॅलेस्टाईन युद्ध आणि भांडवलशाही राष्ट्रा विरुद्ध साम्यवादी राष्ट्रे, भांडवलशाही व साम्यवादी राष्ट्र विरोधी मुस्लिम राष्ट्रे असा एक प्रकारच्या विचारधारेचा संघर्ष निर्माण झाल्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होत असल्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाचे शांततेसाठी करीत असलेल्या प्रयत्नाला एक अडथळा निर्माण येत असल्याचे वरील उदाहरणे आहेत.तरीही संयुक्त राष्ट्रसंघाची जी यंत्रणा आहे ती अतिशय महत्त्वपूर्ण काम करीत असल्याचे आपणास दिसून येते.

**जागतिक मानवाला महायुद्धाची भिती :**

सध्या जग युद्धाच्या छायेत जगत आहे. कारण, जगातील दोन क्षेत्रांत भीषण संघर्ष सुरु आहे. एका बाजुला रशिया आणि युक्रेनमध्ये संघर्ष सुरुं तर , दुसरीकडे इस्राइल आणि हमासमध्ये युद्ध सुरु आहे.जर कदाचित तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटलेच तर काही देश सुरक्षित राहतील तसेच ते सर्वाधिक सुरक्षित मानले जातील याबाबत आपण माहिती ज्ञान करून घेऊया. सगळ्यात सुरक्षित देश कोणता? ग्लोबल पीस इंडेक्स २०२३ च्या रँकिंगनुसार, तिसरे महायुद्ध सुरु झालं तरी काही देश अधिक सुरक्षित राहतील. या देशांमध्ये पहिला क्रमांक आईसलँडचा लागतो. तिसरे महायुद्ध सुरु झाले तर हा देश सुरक्षित राहण्याची सर्वाधिक शक्यता आहे. आईसलँड हा गेल्या काही वर्षांपासून टॉपवर आहे.डेन्मार्क तिसऱ्या महायुद्धात सुरक्षित राहील. ग्रीनलँड देखील याच देशाच्या ताब्यात आहे. डेन्मार्क नाटोचा सदस्य आहे. अशावेळी ग्रिनलँड जगातील युद्धादरम्यान स्वत:ला सुरक्षित ठेवण्याची शक्यता आहे.आयर्लंड इंग्लडच्या जवळ असणारा देश देखील सुरक्षित राहू शकतो. हा देश नाटोचा सदस्य देश नाही. नाटोचा सदस्य आणि अमेरिकेचा सर्वात मोठा सोबती देश ब्रिटेन याला लागून आहे. अशा परिस्थितीत आयर्लंड सुरक्षित राहील.कॅनडामध्ये यूरोपीय भाषिक लोक मोठ्या प्रमाणात राहतात. अमेरिकेचा हा शेजारी देश आहे. अशा परिस्थितीतही हा देश अमेरिकेवरील युद्धाच्या प्रभावापासून अलिप्त राहील.ऑस्ट्रेलिया देखील तिसऱ्या महायुद्धापासून दूर राहण्याची शक्यता आहे. देशाच्या भौगोलिक स्थानामुळे येथे युद्ध होण्याची शक्यता कमी आहे.ग्लोबल पीस इंडेक्स २०२३ नुसार, भारताचा या यादीमध्ये १२६ वा क्रमांक आहे. ग्लोबल पीस इंडेक्स देशांची रँकिंग ठरवत असताना विविध गोष्टी विचारात घेत असतो.देशाची लोकसंख्या, राजकीय स्थिरता, गुन्हेगारीचे प्रमाण, शिक्षण, भौगोलिक स्थान अशा अनेक गोष्टी विचारात घेतल्या जातात.

**श्रीमंत बड्या राष्ट्रांचे वर्चस्व :-**

संयुक्त राष्ट्र संघावर श्रीमंत बड्या राष्ट्राचे वर्चस्व आज दिसून येत आहे ते म्हणजे सुरक्षा समितीच्या माध्यमातून कारण सुरक्षा समितीमध्ये फक्त श्रीमंत बड्या राष्ट्रांनाच स्थान देण्यात आले आहे.त्याचबरोबर त्यांना विशेष नकाराअधिकार सुद्धा देण्यात आला आहे.त्या अधिकाराचा निश्चितच ती राष्ट्रे त्या अधिकाराचा वापर करून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या माध्यमातून करीत आहेत.यामुळे त्यांचा स्वार्थ सातत्याने पुढे येत असताना दिसून येतो मात्र ही एक धोक्याची घंटा

असल्याचे आपणाला दिसून येत आहे कारण राष्ट्रसंघामध्ये सुद्धा अशाच प्रकारची चढावढ झाली असल्यामुळे द्वितीय महायुद्धाला सुरुवात झाली. जरी श्रीमंत राष्ट्राचे वर्चस्व असले तरी मात्र त्यांनी आपला स्वार्थ बाजूला ठेवून शांततेसाठीच आणि संयुक्त राष्ट्राच्या उद्दिष्टयाशी बांधील राहून आपली भूमिका निभावणे गरजेचे आहे कारण संयुक्त राष्ट्रसंघाचा सिद्धांत आणि व्यवहार हाच जगाला युद्धाला तारू शकतो.

**विचारसरणीतील श्रेष्ठत्वाची लढाई :-**

विकसित भांडवलशाही विचारधारा आणि साम्यवादी विचारधारा राष्ट्रांची भूमिकेतील फरक आपणाला दिसून येतो. त्याचबरोबर दोन्ही राष्ट्रांपेक्षा आपली वेगळी भूमिका अविकसित राष्ट्रांची (तटस्थ )असल्याचे दिसून येते. कारण अविकसित, विकासनशिल राष्ट्रे सातत्याने लोकशाही विचाराचे आणि मानवी हक्काच्या संरक्षणाबाबत जागतिक पातळीवर आपली भूमिका स्पष्ट करून हुकूमशाही, सरंजामशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद ,नाझिवाद फॅशिस्टवादाविरोधात स्वातंत्र्याच्या हक्कासाठी सातत्याने ओरड करीत आले आहेत. अर्थात संयुक्त राष्ट्र संघाच्या तत्वे उद्दिष्ट्याशी अविकसित राष्ट्रे सातत्याने पाठिंबा दर्शवत असल्याचेच आपणास दिसून येत आहे.

**मानवी हक्क विषयीची जगातील राष्ट्रांची भूमिका :**

अलीकडच्या कालखंडात जगातील बहुतांशी राष्ट्रे मानवी हक्काविषयी जनजागृती निर्माण करीत आहेत त्यामुळेच खऱ्या अर्थाने जगामध्ये १० डिसेंबर १९४८ रोजी जागतिक मानवी हक्क आयोग निर्माण करण्यात आला आणि त्याच दिवशी मानवी हक्काची ३० कलमी जाहीरनामा प्रसिद्ध करून त्यानुसार जगातील मानवाला स्वतंत्रपणे जीवन जगता यावे त्याच्या अधिकार सुरक्षित रहावेत या दृष्टिकोनातून जागतिक मानवी हक्क आयोग भूमिका बजावत आहे. त्याचबरोबर जगातील बहुतांशी राष्ट्र आपापल्या देशात जागतिक मानवी हक्काच्या जाहीरनाम्याचा आधार घेत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची निर्मिती करून त्या माध्यमातून मानवी हक्काची पायमल्ली होणार नाही या दृष्टिकोनातून कार्य करीत आहे. अशा पद्धतीचे कार्य जगातील सर्व राष्ट्रांनी करीत असल्यास जागतिक मानवी हक्काचे उद्देश निश्चित सफल होतील आणि संपूर्ण जगामध्ये शांतता मुळे सहजीवन निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

**सारांश :-**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मितीचा उद्देश व संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी आणि तत्वे लक्षात घेतल्यास असे दिसून येते की,मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर परस्पर सहकार्यातून विकास आणि शांततेच्या माध्यमातून मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करून युद्धऐवजी कायमची शांतता प्रस्थापित करणे आणि या जागतिक पटलावरून वादविवादाचे प्रश्न सदस्य राष्ट्रांनी एकत्रित येऊन नायनाट करणे.विकास विविध माध्यमांतून चालना देणे, निशस्त्रिकरण सामूहिक प्रयत्न करणे ,शांतता प्रथम प्राधान्य देने,परस्परांमध्ये सहकार्य करणे, दहशतवादाचा बंदोबस्त करणे,इत्यादी उद्देश समोर ठेवून ही संघटना उद्यास आली. खरोखरच या संघटनेला अधिक मजबूत बनवायचे असेल तर जसे राष्ट्रसंघात काही चुका होत्या तशा पद्धतीच्या चुका विकसित युरोपीय अथवा श्रीमंत बड्या राष्ट्रांनी आपला स्वार्थ बाजूला ठेवून जर सहकार्यात्मक शांततेची भूमिका स्वीकारून जागतिक पटलावर मानवाचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घेतला तर निश्चितच या संघटनेचा सिद्धांत आणि व्यावहाराच्या भूमिकेला अतिशय महत्त्व प्राप्त होईल त्यासाठी श्रीमंत राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे अशा पद्धतीची दरी न ठेवता आपण सर्व एक आहोत ही भूमिका जर सिद्धांत आणि व्यावहाराच्या पद्धतीने स्वीकारली तर निश्चितच संयुक्त राष्ट्र संघाला उज्वल यश मिळेल.

**संदर्भसूची :-**

1) Andreas Wenger, International Relations: From Could War to the Globalized World,Viva Books,New Delhi.2004.
2) John Ballia :The Globalization of World Politics: Introduction to International Relations.,OUP,New Delhi.2005.
3) Jack Donnelly,Universal human right in Theory and practice 2002.

4) Narayan S ,Human rights : Dynamics in India,Kalpaz Publications, Publication Delhi 2016
5) Soli j.Sorabjee, constitutionalism human right and and The rule of law .
6)Jean-Marc Coicaud , Michael W. Doyle ,and Anne -Marie Gardner, The Globalization Human Rights, United Nations University Press,2003.
7) Narayan S ,Human rights : Dynamics in India,Kalpaz Publications, Publication Delhi 2016
8)रुकमी बसू ,आंतरराष्ट्रीय राजकारण -संकल्पना, सिद्धांत आणि समस्या ,साग पब्लिकेशन्स नई दिल्ली,२०११
9)दिनेश मांडोन,आंतरराष्ट्रीय संघटन ,अंकित पब्लिकेशन जयपूर .२०१०
10)डॉ.रुक्मी बसू -संयुक्त राष्ट्रसंघ सिद्धांत व व्यवहार ,जवाहर पब्लिकेशन नई दिल्ली ,२०११.
11)ए.के.मिश्रा -दक्षिण आशिया एवं भारत का विकास प्रिझम बुक्स जयपूर ,२०१२.
12)बी. सी. नरुला-प्रमुख राष्ट्रों की विदेश नीती,अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली,२०१२.
13) विवेक यश. राज -भारतीय विदेश नीती ,सिविल सर्व्हिसेज टाइम्स ,नवी दिल्ली ,२०११.
14) नीरज सिंह ,नेहरू- पटेल ,अग्रीमेंट विदिन डिफरनसेस सेलेक्ट डॉक्युमेंटस अॅन्ड करस्पाँडन्स (१९३३-१९५०),नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया ,२०१०.
15)अरुणा पेंडसे,आंतरराष्ट्रीय संबंध, शातयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंटल लाँगमन.मुंबई.2008.
16)दैनिक लोकसत्ता मधील अनेक लेख व संपादकीय लिखाण २०२२
17) गुगल सर्च २०२४.

# आदिवासींच्या भाषिक समस्या

**संशोधक विद्यार्थी**
**कु डवरे संजीवनी शिवाजी**
एम ए मराठी,नेट,बि एड,CTET
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**संशोधन मार्गदर्शक**
**डॉ. सोळंके नवीन केशवराव**
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औंढा नागनाथ, हिंगोली

भारताचे मूळ रहिवासी म्हणजे आदिवासी हो[1] या आदिवासी समुदायालाच आदींम जमाती, गिरीजन, वनवासी, वन्य प्रजाती, अशा अनेक नावांनी संबोधले जाते. तर डॉ. धुर्वे यांनी आदिवासी समुदायाला तथाकथित मूळचे रहिवासी व मागासलेले हिंदू असे म्हटले आहे[2]. पण भारतीय राज्यघटनेत त्यांना अनुसूचित जमात असे म्हटले आहे.

कुठलाही समुदाय म्हटलं की, त्या त्या समुदायाच्या स्वतःच्या स्वतंत्र चालीरीती, रीतीरीवाज, धार्मिक विधी, परंपरा, संस्कृती आणि भाषा असते. अगदी त्याचप्रमाणे आदिवासी समाजाचा अभ्यास करताना आदिवासींची ही स्वतंत्र व मूळची अतिप्राचीन संस्कृती आहे. व आदिवासींच्याही स्वतःची अशी स्वतंत्र चालीरीती, रितीरीवाज, धार्मिक विधी, परंपरा आणि भाषा आहेत. मूळतः आदिवासी लोक समुदाय हा अलिप्त, एकांत, वेगळा राहणं पसंत करतो. आणि म्हणूनच मूळ नागरी संस्कृती पासून दूर राहत असल्याकारणाने आदिवासी समुदायाची सांस्कृतिक जीवन पद्धती, धार्मिक विधी,आणि भाषा व भाषिक विविधता व सांस्कृतिक वारसा आणि जीवनशैली, सृष्टी सौंदर्य नेमकं कस आहे, हा पूर्वीपासून एक कुतूहल व उत्सुकतेचा विषय होऊन बसला आहे.

"एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरीवजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला "आदिवासी" समाज म्हणतात,"[3]

गिलीन व गिलीन: यांच्या मते एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."[4]

भाषा हे आपल्या मनातील भाव, भावना, विचार, संवादाच्या माध्यमातून इतरांपुढे मांडण्याचे महत्त्वाचे साधन आहे आणि या भाषेची थोरवी सांगताना ज्ञानेश्वरांनी सुद्धा, मराठी भाषेची गोडवी आपल्या ज्ञानेश्वरीत मांडली आहे. ते म्हणतात" माझा मराठीची बोलू, कौतुके परी !अमृता तेही पैजासी जिंके!!"[5] आजही सर्व महाराष्ट्रात सर्वत्र दैनंदिन व्यवहारासाठी मराठी, हीच अभिजात भाषा म्हणून सर्रास वापरली जाते.

आपला भारत देश, हा विविधतेने नटलेला देश आहे. आणि भारतातील विविध जिल्ह्यांमध्ये, डोंगरदरी, खोऱ्यात, रानमाळावर, पठारी प्रदेशात, टेकड्यांवर, जंगलात, बेटांवर, दुर्गम अशा ठिकाणी अनेक आदिवासी जमाती अलिप्त वास्तव्य करीत आहेत. त्यात अनेक विविध आदिवासी जमातींचा समावेश होतो.

महाराष्ट्रात आंध, भिल्ल, गोंड, कोकणा, कोकणी, महादेव कोळी, ढोर कोळी, टोकरे कोळी, वारली, ठाकर, कोलाम, कातकरी, माडीया, गौंड, या प्रमुख आदिवासी जमाती आढळून येतात. तर या आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात नंदुरबार, धुळे, नाशिक, जळगाव व ठाणे (सह्याद्री प्रदेशात), गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, नागपूर व यवतमाळ( गोंडवन प्रदेश) अशा पूर्व भागातील वनाच्छादित जिल्ह्यामध्ये मुख्यता जास्त आहे. आणि आजही या आदिवासी जमातीतील अनेक आदिवासींचा व्यवहार, त्यांच्या त्यांच्या बोलीभाषेतून होताना दिसून येतो, या आदिवासी समाजाला एकांतात राहण्याची सवय असल्या कारणास्तव, आपले मत मांडण्यासाठी, किंवा विचार व्यक्त करण्यासाठी, कधीही, प्रमाणभाषा वापरावी, असं वाटत सुद्धा नाही. त्यांची भाषा ही त्या आदिवासी समुदायाच्या जीवनाचा अविभाज्य घटकआहे. आशा आदिवासी समाजासाठी बाहेरील समाजाची संपर्क साधने, किंवा विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रमाण भाषेचा वापर करायला, व आदिवासी समुदायांच्या लहान विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमात प्रमाण भाषेचाच अवलंब करावा लागत असल्याकारणाने, त्यांच्यासमोर बोलीभाषा व प्रमाणभाषा वेगळी असल्याने, संभ्रम निर्माण होऊन त्यांच्यासाठी बोलीभाषेतून प्रमाणभाषेकडे वळणे व, प्रमाण भाषा अवगत

करून घेणे, ही एक मोठीकसरत व समस्याच जाणवते आहे. "आदिवासी समाज हा शैक्षणिक दृष्ट्या, आधीच अत्यंत मागासलेला असल्याकारणाने व अशिक्षित, व अडाणीपणामुळे अंधश्रद्धेकडे वळला असून, धर्मांधता, प्राचीन रूढी, परंपरा पूर्वापारपासून चालत आलेली बोलीभाषा व तिचा अत्यंत अधिक असलेला प्रभाव असल्याने ,आदिवासी विद्यार्थी प्रमाण भाषेत समन्वय साधू शकत नाहीत . इतर भाषांची विद्यारथ्यांबरोबरच सम्पर्क साधने हे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत कठीण व अन आकलनीय होऊन त्याच्यासोबत भाषेची ही स्थिती व परिणाम या आदिवासी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर दिसून येतो. ही एक समस्याच आहे. तसं खरं पाहिलं तर "आदिवासींच्या आदिम बोलीभाषा, म्हणजे जणू काही खरे खुरे सोनच आहे ".म्हणून त्या भाषा टिकायला हव्यात. परंतु या भाषा व प्रमाणभाषा या दोघांमध्ये समनवय न साधता आल्याने, त्याचा परिणाम आदिवासी समाजावर मोठ्या प्रमानात सर्वच अबाल वृद्धांवर झाल्याचा आपल्या निदर्शनास येते. भारतातील आदिवासी जमातींच्या भाषांना मुलता लोकभाषा, किंवा बोलीभाषा, पारंपारिक भाषा, सांस्कृतिक भाषा, म्हणून परिभाषित केलं जाऊ शकते. आणि आदिवासी दंतकथा व कथा लोकगीत हा सर्व सांस्कृतिक वारसा मौखिकपणे जतन केला असून, तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला तसाच, सुपूर्त केला जात असल्याने, यदाकदाचीत, कालांतराने ही मूळ वारसा, लोक लोप पावण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि म्हणून ही सुद्धा आदिवासी समाजाला भाषिक वारसा संस्कृती टिकवण,जोपासणे व तिचं सर्वधन, जतन करणे एक प्रकारे समस्याच ठरत आहे.

काही प्रमुख आदिवासी भाषिक गटांमध्ये खालील काही आदिवासी जमातींचा समावेश दिसून येतो. गोरा जमात, चकमा जमात, नागा जमात, गोंड जमात, मिझो जमात, मुंडा जमात, संथाली जमात, खासिया जमात, मनिपुर जमात आहेत. आदिवासी भाषांना भाषाशास्त्रज्ञांनी मुख्यतः तीन भाषा कुलामध्ये ठेवले आहे. ती म्हणजे गोंदी, द्रविड ऑस्ट्रिक आणि काही आदिवासी भाषा इंडो युरोपियन भाषा कुटुंबातही येतात. काहीच अत्यल्प आदिवासी समूहाकडून आदिवासी बोली भाषाचा प्रत्यक्ष वापर होत असल्याचे सध्या स्थितीत निदर्शनास येते. आणि त्यातही अनेक आदिवासी भाषांना लिपीत प्राप्त नसल्याने, त्या बोलीभाषा कालांतराने लोप पावणे किंवा विसरून जाणे व नामशेष होण्याच्याही आदिवासी बोलीभाषा भाषेच्या संदर्भात असणारी सर्वात मोठी समस्या आहे. तर काही आदिवासी बोलीभाषांचा विकास होऊन त्या आदिवासी जमातीने त्यांच्या त्यांच्या भाषेला लिपी प्राप्त करून त्या भाषा लिपीबद्ध केल्या आहेत. त्या भाषा म्हणजे उदा:- संथाली, गोंडी ही द्रविडी भाषा कुटुंबातील प्रमुख भाषा व समृद्ध बोलीभाषा म्हणूनही या भाषण कडे पाहिलं जाते. परंतु असं असूनही या भाषा बोलीभाषेपुरत्याच मर्यादितच वापरात असल्या कारणाने व ही आदिवासी लोक लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत अल्प असल्याकारणाने ही भाषा व ही लोक काळाच्या ओघात संपण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते.

आजचे बदलते पारंपारिक स्वरूप व प्रचलित शिक्षण पद्धती या अनुसार शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी अनेक आदिवासी जमाती स्थलांतर किंवा विभक्त कुटुंब पद्धती. किंवा आज-काल पूर्वीप्रमाणे घरातील थोर मोठी वृद्ध मंडळी सदस्य यांच्याशी मौखिक स्वरूपात आपला सांस्कृतिक वारसा घरातील लहान मुलांना पूर्वी जसा दिला जात असे, त्याप्रमाणे सुपूर्त करण्याचे प्रमाण कमी झाल्याने व बदलल्याने हा पूर्वापारपासून चालत आलेला भाषिक वारसा लुप्त होत आहे. तसेच बदलती प्रणाली अवगत करण्यासाठी इतर भाषांचे मोठ्या प्रमाणात जाणीवपूर्वक अनुकरण करणे, ती भाषा अवगत करून त्याच प्रमाण भाषेचा मोठ्या प्रमाणात सर्रास वापर केल्या जात असल्याने, आदिवासी जमातींना त्यांची सांस्कृतिक परिभाषा टिकवणे व तिचं संवर्धन करणे व स्वतःचे अस्मिता व भाषिक अस्तित्व संगोपन करणे हे जणू काही एक आव्हानच ठरत आहे. आजची स्थिती आशी झाली आहे, की आज आदिवासी जमातीतील युवा पिढीला आपल्या जमातीची संस्कृती आणि परंपरा व भाषा काय आहे? हे सुध्दा माहीत नाही. ही आदिवासी भाषेच्या संदर्भात एक मोठी समस्याच आहे. आज आदिवासींच्या अनेक प्राचीन भाषा लुप्त झाल्या आहेत. परंतु जर भाषिक अभ्यास करण्याच्या दृष्टीने विचार केल्यास, एक बोलीभाषा लुप्त झाली, म्हणजे त्या लोकांचे संस्कार, आहार, भोजन, खानपान, अनेक गोष्टी व म्हणी, लोकगीत, रुढी,परंपरा, सण, उत्सव, त्योहार, व्यवहार आणि अस्मिता व जागतिकीकरण, बाजारवाद यांचे शक्तिशाली तत्त्वांची भुरळ पडून अनेक आदिवासी बोलीभाषा दिवसेंदिवस लुप्त होण्याच्या स्थितीत आहे. ही एक भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने मोठी समस्या आहे.

एकंदरीतच काय तर आजही अनेक आदिवासी समाज अलिप्त एकांतात दुर्गम भागात असल्याकारणाने त्यांच्यासाठी त्यांची बोलीभाषा ही त्यांच्या आयुष्यातील अविभाज्य घटक बनला आहे. व हा समाज प्रगतीच्या प्रवाहात येत नसल्या

कारणास्तव त्यांची बोलीभाषा त्यांच्यासाठी इतर भाषिकांसोबत समणवय साधण्यासाठी एक मोठी अडसर ठरते आहे. तर या उलट परिस्थिती म्हणजे काही आदिवासी स्थलांतरित झाल्याने व ते नवीन समाज प्रवाहात येऊन, प्रमाण भाषेचे अनुकरण करून, ती पूर्णपणे बदलली आहेत. व पारंपारिक स्वरूप व प्रचलित समाज प्रवाहात आल्याने घरातील मोठ्या सदस्यांचा जनसंपर्क तुटल्याने, ती आपली मूळ बोलीभाषा व सांस्कृतिक वारसा विसरून बसले आहेत. आणि असेच चालत राहिले तर अनेक आदिवासींची आदिवासी भाषालिपी नसल्याकारणाने ती भाषा काळाच्या ओघात लुप्त होऊन तिचे अस्तित्व संपुष्टात येईल, अशी बोलीभाष्य संदर्भात भीती व ही फक्त नामशेष होण्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**संदर्भ :**

१) आंध आदिवासी जमात: इतिहास व सांस्कृतिक वारसा-श्री विश्वनाथ विठ्ठल धुमाळे-प्रकाशक सुवर्ण प्रकाशन१५४/३, पोकळे बिल्डिंग, दुसरा मजला, शेवटचा बसस्टॉप, धायरी गाव, पुणे-४१.पृ.क्र.१९
२) पूर्वोक्त; श्री विश्वनाथ विठ्ठल धुमाळे'पृ.क्र.२०
३)आगलावेप्रदीप;'आदिवास समाजाचे समाजशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै, २०१०,पृ.क्र.४
४)नाडगौंडे गुरुनाथ; 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३.पृ.क्र.३
५)श्री ज्ञानेश्र्‍ वरी गुढार्थदीपिका-प्रकाशक, गोबिन्दभवन कार्यालय, गीताप्रेस, गोरखपुर.
६) गारे गोविंद ; 'आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन' अमृत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४

# शारीरिक शिक्षणआणि खेळात योगाचे फायदे

**डॉ वाकनकर गोविंद बन्सीधरराव**
क्रीडा संचालक
कैरमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जिल्हा परभणी (महाराष्ट्र)

**प्रस्तावना:**

शारीरिक शिक्षण आणि खेळातील काही योग घटकांची भूमिका हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे. योग ही भारतीय तात्विक प्रणालींपैकी एक आहे जी निरोगी आचरण आणि विचार विकसित करण्यासाठी शरीरासह कामाच्या महत्त्वावर जोर देते. त्याच्या सर्व तंत्रांपैकी शारीरिक मुद्रा, ज्याला संस्कृतमध्ये आसने म्हणतात. आधुनिक समाजात शारीरिक शिक्षण हा शब्द वेगवेगळ्या प्रकारे समजला जातो. काहीच्यामते "शरीराचे शिक्षण"म्हणेज , जे शरीराला काही कौशल्ये आणि क्षमता प्राप्त करण्यासाठी शिक्षित करते, उदाहरणार्थ, खेळांबदल असे वाटते की ते "शरीराचे शिक्षण"होय. ते शारीरिक कार्य करत आहे.शारीरिक शिक्षण या अभिव्यक्तीचा मूळ अर्थ "शरीराद्वारे शिक्षण" असा होतो. हे शरीरासोबतच कामाचा उपयोग शिक्षणाच्या उदात्त उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी धोरण म्हणून करत आहे: एकमेकांशी आणि पर्यावरणाशी असलेल्या आपल्या नातेसंबंधांमध्ये स्वायत्तता आणि नैतिकता ह्या बाबी ही लक्षात ठेवणे आवश्यक आहे की खेळ आणि जिम्नॅस्टिक्स शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्राशी संबंधित आहेत. योग आणि शारीरिक शिक्षण दोन्ही त्यांच्या उत्पत्तीमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्य प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वृत्ती आणि क्षमता विकसित करण्यासाठी शरीराचा वापर करतात. हेशारीरिक व मानसिक दृष्या पुरक विषय मानले जाऊ शकतात.

**योग**

'योग' या शब्दाचा अर्थ "एकत्र जोडणे किंवा जोडणे" असा होतो. योगामध्ये शरीर आणि मन एकत्र आणते आणि एक सुसंवादी अनुभव मानव बनते. माणूस हा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक प्राणी आहे; योग तिन्हींचा संतुलित विकास करण्यास मदत करतो. योग ही शिकण्याची एक पद्धत आहे ज्याचा उद्देश "मन, शरीर आणि आत्मा" संतुलित करणे आहे. योग ही प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील ऐतिहासिक उत्पत्ती असलेली एक सराव पद्धती आहे. योग हा इतर प्रकारच्या व्यायामापेक्षा वेगळा आहे कारण तो शरीरात ताण आणि असंतुलन न आणता गती निर्माण करतो.

**योगाचे मानवी शरीरावर होणारे फायदे**

शारीरिक व्यायामाचे इतर प्रकार, जसे एरोबिक्स केवळ शारीरिक आरोग्याची खात्री देतात. त्यांचा आध्यात्मिक किंवा सूक्ष्म शरीराच्या विकासाशी फारसा संबंध नाही. योगिक व्यायाम शरीराला वैश्विक उर्जेने रिचार्ज करतात आणि सुविधा देतात. त्यांचा आध्यात्मिक किंवा सूक्ष्म शरीराच्या विकासाशी फारसा संबंध नाही. योगिक व्यायाम मानवी शरीराला वैश्विक उर्जेने रिचार्ज करतात आणि सुविधा देतात मानवाच्या शारीरिक मेंदूचे दोन्ही गोलार्ध समायोजित करणे विज्ञानानुसार, मानवाच्या मेंदूमध्ये उजवे आणि डावे असे दोन गोलार्ध आहेत. हे दोन गोलार्ध वेगवेगळे कार्य करतात. डाव्या गोलार्धाची कार्ये रेखीय, तार्किक आणि बौद्धिक आहेत. उजव्या गोलार्धातील ते कलात्मक, सर्जनशील आणि अंतर्ज्ञानी आहेत. जर आपण या तथ्यांचा विचार केला तर, शिक्षण प्रणाली मुलाला मेंदूच्या उजव्या आणि डाव्या गोलार्धांची पूर्ण क्षमता विकसित करू देत नाही. शिक्षणाचा कल पुस्तकांच्या माध्यमातून झाला आहे. तुम्ही वाचा, लक्षात ठेवा, परीक्षेला बसा आणि ग्रेड मिळवा. एकतर तुम्ही पास व्हा किंवा नापास. पुन्हा तुम्हाला वाचावे लागेल, लक्षात ठेवावे लागेल, परीक्षेला बसावे लागेल आणि तुमचा ग्रेड मिळवावा लागेल. जे विषय शिकवले जातात ते रेखीय, तार्किक प्रणालीचे अनुसरण करतात, मग ते गणित असो, इतिहास असो, भूगोल असो, भौतिकशास्त्र असो, रसायनशास्त्र असो किंवा वैद्यकशास्त्र असो, प्रगत शिक्षण असो किंवा माध्यमिक शिक्षण असो. या प्रक्रियेत मेंदूची फक्त एक बाजू उत्तेजित केली जाते - रेखीय, तार्किक बाजू. इतर बाबींचा समतोल साधण्यासाठी आम्ही मुलांना कला शिकवतो. आम्ही त्यांना संगीताचा सराव, रंगकाम, नाटके सादर करण्यास प्रोत्साहित करतो. आम्ही त्यांना त्यांच्या

सर्जनशी-लतेचा वापर करण्यास प्रोत्साहित करतो. परंतु जर तुम्ही मेंदूच्या वेगवेगळ्या लोबच्या प्रभावाची तुलना केली तर तुम्हाला कळेल की कलात्मक आणि सर्जनशीलतेपेक्षा रेखीय आणि तार्किक अधिक स्पष्ट आहेत

**योगाचे मानवी मनावर होणारे फायदे**

हा एक मुद्दा आहे.संपूर्ण मन तयार करणे दुसरा मुद्दा असा आहे की मेंदू हे फक्त एक माध्यम आहे ज्याद्वारे आपण आपल्या मनाला शिक्षित करतो. मन ही चार वेगवेगळ्या क्षमतांची रचना आहे, ज्याची योगिक परिभाषेत मानस, बुद्धी, चित्त आणि अहमकार अशी व्याख्या केली जाते. मानस या शब्दाचा अर्थ तर्कसंगत करणे, एखाद्या गोष्टीचा विचार करणे असा होतो. बुद्धीमानें बुद्धी । चित्त हे चेतनेचे एक क्षेत्र आहे जिथे ठसे साठवले जातात. अहंकार ही अहंकाराची संकल्पना आहे. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत आपण मनाचा एकच पैलू पुरवतो - बुद्धी. आम्ही मानस पैलू हाताळत नाही, जे योग्य आणि अयोग्य काय हे जाणून घेण्यासाठी मानवी संबंधित आहे. आपण चित्ताशी व्यवहार करत नाही, जिथे ज्ञानाचे ठसे स्मृती आणि अनुभवाच्या रूपात साठवले जातात. तसेच आपण अहंकाराशी, अहंकाराशी वागत नाही. उलट आपण आपल्या मनाच्या इतर पैलूंना चालना न देता माहितीने बुद्धीला वेड लावत आहोत. त्यामुळे, आपले सर्व शिक्षण असूनही, आपण ते आपल्या जीवनात रचनात्मक आणि सर्जनशीलपणे लागू करू शकत नाही. योग्य आणि अयोग्य या सर्व गोष्टी समजून घेतल्यानंतरही, आपल्याला काय करायचे आहे हे ठरवायचे असल्यास आपण गोंधळून जातो. त्याच वेळी, शिक्षक आणि पालक म्हणून, बहुतेक वेळा आपण मानसिक संस्कार आणि मुलाच्या मानसिक स्वभावाकडे दुर्लक्ष करतो.ज्यात म्हटले आहे, मुलाखती घेतल्या. आम्हाला असे आढळले की प्रत्येकामध्ये शिकण्यात, लक्षात ठेवण्यामध्ये आणि लक्षात ठेवण्यामध्ये एक मानसिक अवरोध आहे. स्वभावाने मुले त्यांच्या मोठ्या झालेल्या समकक्षांपेक्षा वेगळी असतात. अभ्यास करण्यासाठी, प्रौढांना पुस्तकांसह डेस्कवर बसण्याची आवश्यकता असू शकते, परंतु मुलांना याची आवश्यकता नाही. स्मृती, इच्छाशक्ती आणि वर्तन आढळले. योगाभ्यास न करणाऱ्या आणि अधिक विध्वंसक, अस्वस्थ, हिंसक आणि विचलित असलेल्या इतर वर्गातील त्यांच्या समकक्षांपेक्षा मुले अधिक आरामशीर, लक्ष केंद्रित, एकमुखी आणि शांत होती. अमेरिकेत आम्ही RYE कडून पॉइंटर्स आणि इशारे घेतल्या, परंतु आम्ही योगासह अतिरिक्त गोष्टींचा समावेश केला. आम्ही वर्गात मृदू पार्श्वसंगीत समाविष्ट केले जेणेकरून मुलांवर अभ्यासासाठी सतत मानसिक दबाव येऊ नये. आजूबाजूला संगीत असणे हे अवचेतन विचलित आणि अवचेतन विश्रांती आहे. आमच्या प्रयोगासाठी आम्ही बाखचे शास्त्रीय संगीत निवडले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्राणायाम शिकवण्यास सुरुवात केली. मोठ्या आजोबांच्या घड्याळाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना श्वासोच्छ्वास बाहेर काढण्यास सांगण्यात आले. पेंडुलम एका बाजूला झुलला की सगळ्यांनी श्वास घ्यायचा आणि पेंडुलम दुसरीकडे वळवला की सगळ्यांनी सुटकेचा श्वास घ्यायचा होता. काही क्षणांनंतर श्वासोच्छवासाची पद्धत नियमित झाली आणि पेंडुलमच्या स्विंगशी समन्वय साधला गेला. त्यानंतर शिक्षकांनी सूचना दिल्या आणि विद्यार्थी श्वास घेत असताना शांत झाले. आता याचा शिक्षणाशी काय संबंध असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. परंतु हे खूप महत्वाचे आणि संबंधित आहे कारण मानसशास्त्रज्ञांनी असे म्हटले आहे की जेव्हा आपण श्वास घेतो तेव्हा आपण आपल्या मनात मानसिक, भावनिक आणि तर्कशुद्ध अवरोध निर्माण करतो. शरीर, मेंदू आणि मनाची ऊर्जा काढून घेतली जाते. जेव्हा आपण श्वास सोडतो तेव्हा शरीरात, मज्जासंस्थेत, मनात आणि मेंदूमध्ये विश्रांती घेतली जाते. भौतिक प्रणाली शिथिल असताना आपण माहिती प्रदान केल्यास, ती मेंदूद्वारे ठेवली जाते आणि सहजपणे विसरली जात नाही.जागरूकता आणि संबंध विकसित करणे हे देखील जागरूकता संकल्पना आणण्यास मदत करते. जेव्हा मी शाळांना भेट देतो तेव्हा मला अनेकदा शिक्षक विद्यार्थ्यांना हा विषय शिकवताना जागृतीशिवाय आढळतात. वर्गात प्रशिक्षण सुरू असताना जागृतीचा अभाव आहे. विद्यार्थी त्यांना विषय समजत असो वा नसो, यांत्रिक पद्धतीने नोट्स काढत असतात. ती चिंता शिक्षकांना नाही. शिक्षकांना काळजी नाही हे विद्यार्थ्यांनाही माहीत आहे, मग त्यांनी कशाला त्रास द्यायचा? त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या नात्यात दरी निर्माण झाली आहे. ते अंतर हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे जो विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व घडवू शकतो, जो अस्तित्वात नाही. तथापि, जर तुम्ही एकाग्रतेच्या काही पद्धतींचा समावेश केला तर, सजगता तसेच जागरूकता विकसित होते. कृपया लक्षात ठेवा की वर्गात योग हा केवळ शारीरिक सराव आणि श्वासोच्छवासाच्या तंत्रांपुरता मर्यादित नाही. त्यापेक्षा केव्हा बोलायचे आणि कधी गप्प बसायचे याचे भान शिक्षकाला असायला हवे. भाषण हे शिक्षणाचे माध्यम आहे, परंतु त्याच वेळी मौन हे देखील शिक्षणाचे माध्यम आहे कारण शांतता आपल्याला नुकतेच ऐकलेल्या गोष्टी आत्मसात करण्यास अनुमती देते. त्यामुळे फक्त बोलू नका. दहा

मिनिटांनंतर मुलांना तीन मिनिटांचा ब्रेक किंवा पाच मिनिटांनंतर एक मिनिटाचा ब्रेक. शांत व्हा आणि सर्वांना गप्प बसण्यास सांगा. शांततेच्या काळात मुलांना स्वतःचा श्वास पाहण्याचा खेळ खेळायला लावा. त्यांना त्यांचे श्वास पंधरा ते एक पर्यंत मागे मोजण्यास सांगा. इनहेलेशन आणि उच्छ्वास एक गणना आणि एक श्वास म्हणून घेतले जातात. सुमारे एक मिनिट पंधरा श्वास समान आहे. मग पुन्हा तुमच्या सूचना सुरू करा. हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. बोलणे आणि मौन यांची सांगड घालावी लागते. निष्क्रीय व्हिज्युअलायझेशनसह सतर्कता आणि गतिशील सूचना एकत्र केल्या पाहिजेत. तुम्ही सूचना देता, तुम्ही त्यांची बुद्धी उत्तेजित करता, परंतु त्याच वेळी तुम्हाला त्यांनी नुकतेच जे ऐकले आहे ते निष्क्रीयपणे पाहण्याची संधी दिली पाहिजे ज्यामुळे त्यांच्या बुद्धीला चालना मिळते. तुम्हाला प्रत्येक विद्यार्थ्याशी नातेसंबंध निर्माण करावे लागतील - शिक्षकासारखे नाही तर एक विचारशील मित्र ज्याच्याकडे येऊन ते सांगू शकतील, "हे बघ, मला माझ्या अभ्यासात एवढी अडचण येत आहे, मी काय करू?" आपण त्यांना मार्गदर्शन करण्यास सक्षम असावे. सुफी संत मुल्ला नसरुद्दीन यांच्याबद्दल एक प्रसिद्ध कथा आहे. एके दिवशी तो एका विहिरीजवळ बसून मातीच्या भांड्यात पाणी भरण्याचा प्रयत्न करत होता. पण मातीच्या भांड्यात भेगा पडल्या होत्या. त्यामुळे त्याने त्यात ओतलेली प्रत्येक गोष्ट क्रॅकमधून बाहेर पडेल. लोक त्याची टर उडवत म्हणाले, "तू वेडाच असशील. हे भांडे भेगा पडून पाणी वाहून जात असताना त्यात पाण्याने भरण्याची अपेक्षा कशी करता येईल?" त्याने उत्तर दिले, "कोणाला काळजी आहे? मला फक्त भांडे भरण्याची काळजी आहे. भांडे फुटले की नाही याची मला पर्वा नाही." शिक्षक म्हणून आपण त्याच गोष्टींची पुनरावृत्ती करतो. आम्ही मुलांना माहिती देण्याशी संबंधित आहोत. त्यांनी ते कायम ठेवले की नाही याची आम्हाला चिंता नाही. मग परिणाम काय? तुम्ही रात्री इतिहास आणि भूगोल अभ्यासता आणि सकाळी तुम्ही ते विसरलात.

**योगासनातून खेळाडूंना खेळात मिळणारे शारीरिक फायदे :-**

**लवचिकता:-** अनेक क्रीडा व्यक्ती योगाभ्यास सुरू करण्याचे पहिले कारण म्हणून अधिक लवचिकता दर्शवतात. हे एक चांगले कारण आहे, कारण योगामुळे घट्ट असलेले स्नायू ताणले जातात, ज्यामुळे संबंधित सांध्यातील हालचालींची श्रेणी वाढते. वाढलेली लवचिकता कडकपणा कमी करते, परिणामी हालचाल अधिक सुलभ होते आणि अनेक त्रासदायक वेदना आणि वेदना कमी होतात.

**सामर्थ्य:-** जसे धावपटू धावण्याशी संबंधित मार्गाने मजबूत असतात. तथापि, धावण्याच्या स्ट्राईडमध्ये फक्त खालचे शरीर आणि एकाच विमानात हालचाल समाविष्ट असते-सागीटल (म्हणजे, पुढे आणि मागे). अशा प्रकारे, काही स्नायू मजबूत होतात तर काही कमी वापरतात आणि कमकुवत राहतात. धावपटूंना धावण्यासाठी मजबूत पाय असतात, परंतु जेव्हा उभे राहून योगासनांचा सामना करावा लागतो तेव्हा त्यांचे पाय जेलीसारखे वाटतात हे पाहून त्यांना आश्चर्य वाटते. हे फक्त कारण योग्यरित्या संरेखित योगासनामध्ये विविध विमानांमध्ये सर्व स्नायूंचा वापर करणे समाविष्ट आहे. जे स्नायू कमकुवत आहेत ते लवकर थकतात आणि जे घट्ट आहेत ते सोडण्यासाठी ओरडतात—अशा प्रकारे, जेली-लेग सिंड्रोम. याव्यतिरिक्त, मजबूत होण्याचे उप-उत्पादन म्हणजे स्नायूंचा टोन. योग लांब, दुबळे स्नायूंना आकार देण्यास मदत करतो जे सांध्यातील मुक्त हालचालींमध्ये अडथळा आणत नाहीत

**स्थिरता (ताकद) :- हात:** हात, मनगट, खालचे हात, ट्रायसेप्स, डेल्टॉइड्स मागे: लोअर ट्रॅपेझियस, सेराटस पूर्ववर्ती पाय: चतुर्भुज, टिबियालिस अग्रभाग (शिन्सचा पुढचा भाग)

**हालचाल (लवचिकता) हात:** बोटे, बायसेप्स पाठीमागे: लॅटिसिमस डोर्सी, पॅरास्पिनल्स (पाठीच्या स्नायूंचे दोन्ही वरवरचे आणि खोल थर) पाय: हॅमस्ट्रिंग, वासरे, अकिलीस टेंडन संतुलित योगासनासाठी शरीरातील बहुतेक स्नायूंना कार्य करण्याची आवश्यकता असते. काही क्रिया. त्याच वेळी, सांधे त्यांच्या संपूर्ण हालचालींमधून घेतले जातात कारण संबंधित स्नायू संकुचित होतात किंवा चळवळीला पाठिंबा देण्यासाठी ताणतात. याचा परिणाम म्हणजे स्नायूंचा समतोल सुधारला, जो चांगला फॉर्म, मजबूत धावणे आणि कमी दुखापतींमध्ये अनुवादित होतो.

**उर्जायुक्त शरीर:-** व्यायामाचे अनेक प्रकार शरीरातील उर्जा साठवून ठेवतात. तरीही योगाभ्यास रक्ताला ऑक्सिजन देते आणि अधिक ऊर्जा निर्माण करते, ज्यामुळे शरीर आणि मन पुनर्संचयित आणि उत्साही होते. योग एक असे वाहन प्रदान करतो ज्याद्वारे शरीर धावण्याच्या शारीरिक गरजांपासून सक्रियपणे पुनर्प्राप्त होऊ शकते.

**सुधारित श्वासोच्छ्वास :-**

खेळाडूंसाठी फुफ्फुसाची क्षमता मुख्य महत्त्वाची आहे, कारण ती धावण्याच्या सर्व टप्प्यांमध्ये श्वासोच्छवासाचा एक समान नमुना राखण्याची क्षमता निर्माण करते. फुफ्फुसाची क्षमता जितकी चांगली असेल तितका जास्त ऑक्सिजन प्रणालीद्वारे प्रसारित केला जातो, जो लांब आणि मजबूत धावण्यासाठी सर्वात उपयुक्त आहे. तथापि, धावणे आणि एरोबिक व्यायामाच्या इतर प्रकारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या श्वासोच्छवासाच्या पद्धतीमध्ये जलद आणि उथळ इनहेलेशन आणि उच्छवास यांचा समावेश होतो. हे फुफ्फुसाचा फक्त वरचा भाग वापरतो, सोडूनमधले आणि खालचे भाग अस्पर्शित. योगिक श्वासोच्छवासात फुफ्फुसाच्या वरच्या, मध्य आणि खालच्या भागांचा वापर करून, हळू, खोल इनहेलेशन आणि दीर्घ श्वासोच्छ्वास यांचा समावेश होतो. योगिक श्वासोच्छवासामुळे फुफ्फुसाची क्षमता वाढते आणि फुफ्फुसाची क्षमता वाढल्याने सहनशक्ती वाढते आणि एकूणच ऍथलेटिक कामगिरी सुधारते. संस्कृतमध्ये, प्राण म्हणजे "ऊर्जा" आणि योगिक श्वासोच्छवासाला प्राणायाम म्हणतात. श्वासाद्वारे, तुम्ही ऑक्सिजन आणता, तुमच्या पेशींना अन्न पुरवता आणि जीवनशक्ती निर्माण करता आणि कार्बन डायऑक्साइड काढून टाकता, विषारी पदार्थ काढून टाकता. योगामध्ये श्वासोच्छवासाचा उपयोग महत्त्वाचा आहे. श्वास रोखून ठेवल्याने अंतर्गत घट्टपणा, तणाव आणि चिंता निर्माण होते, खोल श्वास घेतल्याने तणाव सुटतो, तणाव आणि चिंता कमी होते आणि शारीरिकदृष्ट्या शरीराला पोझ बनवण्यास मदत होते, विशेषत: जेआव्हानात्मक असतात. या जाणीवपूर्वक श्वासोच्छवासाद्वारे, शरीराला त्याच्या सर्व प्रणालींमध्ये ऑक्सिजनचे परिसंचरण वाढल्यामुळे ऊर्जा मिळते.

**निष्कर्ष :-**

योग पारंपारिक खेळ किंवा फिटनेस अभ्यासक्रमापेक्षा विद्यार्थ्यांच्या मोठ्या गटाला नवीन शिकण्याची शक्यता प्रदान करतो, ज्यामुळे कोणत्याही शैक्षणिक कार्यक्रमात ती एक मौल्यवान भर पडते. याव्यतिरिक्त, शाळेच्या अभ्यासक्रमात योगाचा समावेश केल्याने एक दर्जेदार शारीरिक शिक्षण कार्यक्रम प्रदान करण्यात मदत होईल कारण खेळातील पारंपारिक शारीरिक शिक्षण योगामध्ये बदल करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच सर्वांनाच वाटते की ते आपल्याला क्रीडा पुरुषांच्या जीवनात वेगवेगळ्या मार्गांनी आणि विविध स्तरांवर मदत करते. मनावर नियंत्रण आणि एकाग्रता वाढवण्यात योग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो ज्यामुळे खेळाडूला त्यांच्या खेळात कामगिरी करण्यास मदत होते. हे मुलांना आणि प्रौढांना शारीरिक हालचालींमध्ये यश अनुभवण्याची संधी देते, जे जीवनाचा मजबूत पाया तयार करण्यात मदत करू शकते. तथापि, अभ्यासक्रमातील तज्ञ, शिक्षक, प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वर्गातील सेटिंग्ज आणि वास्तविक जीवनातील योगशिक्षणातील वास्तविक आव्हाने जाणून घेणे आणि त्यांचे गांभीर्याने विश्लेषण करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

1) योगाचे नियमावली. डब्ल्यू. फॉलोशन आणि सह. लि., लंडन, 1956, 144
2) योगाचा विश्वकोश. सोफिया:
3) बीएसएफएसची केंद्रीय परिषद. (1989). प्रोटोकॉल№ 22, निर्णय № 1/19.VI.1989.
4)बस्र्मा, डी. आणिविस्चर, एम. (२००३).
5) मुलांसाठी योगाचे खेळ: मुद्रा, हालचाल आणि श्वासोच्छवासासह मजा आणि फिटनेस. कॅलिफोर्निया: हंटर हाऊस फिंगर, ए. (2000).
6) योगाचा परिचय: आरोग्य, फिटनेस आणि विश्रांतीसाठी नवशिक्याचे मार्गदर्शक. न्यूयॉर्क, न्यूयॉर्क: थ्रीरिव्हर प्रेस

# मराठी भाषा: संधी व आव्हाने

**डॉ. मारोती बालासाहेब भोसले**
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख,
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा.
जि. परभणी-४३१५११.
drmbbhosle@gmail.com

**प्रस्तावना:**

१९६१ च्या जनगणनेनुसार भारतात १६५२ भाषा बोलल्या जात. जी भाषा दहा हजारांपेक्षा जास्त जनसमूहामध्ये बोलली जाते. त्या भाषेचा 'मातृभाषा' म्हणून समावेश केला गेला. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या १८व्या परिशिष्टात समाविष्ट केल्या गेलेल्या २२ भाषांपैकी मराठी ही एक महत्त्वाची भाषा आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या १० कोटींवर आहे. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या महाराष्ट्र खंडामध्ये मराठीच्या ६० बोलींची माहिती येते. परंतु त्यांच्या सर्वेक्षणात तत्कालीन निजाम संस्थांनाचा समावेश नसल्यामुळे 'मराठवाडी' बोलीच्या वस्तुस्थितीबद्दल फारशी माहिती मिळत नाही. १ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचना होऊन महाराष्ट्राची निर्मिती झाली. मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे. ६० वर्षे उलटून गेली तरीही अद्यापपर्यंत मराठी महाराष्ट्राची राजभाषा होऊ शकली नाही. आपल्या शिक्षण व्यवस्थेने मराठी भाषेला कायम दुय्यम स्थान दिले आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठीला स्थानच नाही. संत ज्ञानेश्वरांनी 'माझा मराठाचि बोलु कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके' अशी मराठी भाषेची महती सांगितली आहे. मराठी भाषा आजही तेवढ्याच ताकतीने आणि ताठ मानेने उभी आहे.

मराठी भाषेच्या माध्यमातून अभ्यासकांना खूप संधी उपलब्ध आहेत. आपण मराठी भाषिक कौशल्ये विकसित करून अध्यापनाचे कार्य करू शकतो. नियतकालिके, आकाशवाणी, दूरचित्रवाणी या प्रसार माध्यमात मराठी भाषेच्या अभ्यासाकांना कार्य करण्याची संधी उपलब्ध आहे. चित्रपट क्षेत्रात पटकथा, संवाद, गीतलेखन करता येते. प्रमाण मराठी भाषेचे नियम आणि व्याकरणाचा अभ्यास केल्यानंतर मुद्रितशोधन हे कार्य करता येते. मराठी भाषेच्या माध्यमातून भाषण आणि संभाषण कौशल्य विकसित केले तर अध्यापन, सूत्रसंचालन, कीर्तन, प्रवचन इत्यादी क्षेत्रात कार्यकरून अर्थार्जनाची उत्तम संधी आहे. अलीकडच्या काळात मराठी भाषेपुढे बरीच आव्हाने देखील उभी टाकली आहेत. त्यामध्ये इंग्रजी भाषेचे आक्रमण, हिंदी भाषेचा प्रभाव, व्हाट्सअप, फेसबुकच्या माध्यमातून होणारं मराठी भाषेचं विद्रुपीकरण, जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे बंद होणारे पारंपारिक व्यवसाय, त्यामुळे लोप पावत जाणारे मराठी ग्रामीण बोली भाषेचे शब्दभांडार या मराठी भाषेपुढील आव्हानांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**<u>मराठी भाषा आणि व्यवसायाच्या संधी:</u>**

'एखादी भाषा बोलणाऱ्या समाजास व्यवसाय देऊ शकत नसेल तर, ती भाषा तो भाषिक समाज सोडून देण्याचा प्रयत्न करतो.' अमेरिकेतील गणिताचे अभ्यासक डायनिएल एब्राम यांचे मत समजून घेणे यासाठी फार महत्त्वाचे आहे. आपण एखादी भाषा शिकतो. तेव्हा त्या भाषेतून व्यवसाय किंवा उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देण्याची ताकद त्याभाषेत असावी. ती भाषा शिकल्यानंतर व्यवसायाच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत. यावरून ती भाषा शिकण्याकडे लोकांचा ओढा असतो. समाजाकडून ती भाषा गांभीर्याने शिकण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक भाषेच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात संधी उपलब्ध असतात. मराठी भाषाही त्याला अपवाद नाही. परंतु मातृभाषा मराठी असणाऱ्यांचा कदाचित हा गैरसमज असू शकतो की, आपणास चांगल्या प्रकारे मराठी भाषा बोलता आणि लिहिता येते. त्याआधारे व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हावी. असे वाटत असेल तर ते चूक आहे. अर्धवट ज्ञान नेहमीच धोकादायक असते. जर तुम्ही मराठी भाषेकडे संधी म्हणून पहात असाल तर, तुम्हाला मराठी भाषा परिपूर्ण अवगत असावी. ती अस्खलितपणे बोलता यावी. निर्दोषपणे लिहिता यावी. मराठी भाषेवर तुमचे प्रभुत्व असावे. व्याकरण आणि प्रमाण मराठी भाषेचे लेखन विषयक नियम अभ्यासावे लागतात. त्यासाठी ती प्रयत्नपूर्वक शिकावी लागेल. तर मराठी भाषेत पुढीलप्रमाणे अनेक संधी उपलब्ध आहेत.

**१. अध्यापनात संधी:**

समाजात एककाळ शिक्षक आदर्श आणि शिक्षकीपेक्षा प्रतिष्ठाप्राप्त होता. शिक्षक पवित्र अशा विद्यामंदिरात ज्ञानदानाचे कार्य करीत होते. शिक्षकाला लोक गुरू मानत आणि गुरूजी म्हणत होते. अलीकडे शिक्षक शिकवणीच्या माध्यमातून भरमसाठ पैसा घेऊन विद्यार्थ्यांना शिकवीत आहेत. त्यामुळे त्याला व्यवसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. तरीही इतर नोकरी आणि

व्यवसायाच्या तुलनेत आजही शिक्षकाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन चांगला आहे. त्यामुळे मराठी विषयात पदवी, पदव्युत्तर, शिक्षण घेऊन डी.एड., बी.एड., एम.फिल., पी.एचडी., सेट., नेट पात्रता प्राप्तकरून जिल्हा परिषदेच्या शाळा, खासगी शिक्षण संस्था, महाविद्यालयामध्ये अध्यापनाचे कार्य करता येते. ज्यांना नोकरी नाही ते शिकवणीच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय उभा करू शकतात. त्यातूनही चांगले अर्थार्जन होत आहे. मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना अध्यापन क्षेत्रात चांगली संधी उपलब्ध आहे.

**२. वृत्तपत्र व नियतकालिकांमध्ये संधी:**

मराठी भाषा घेऊन पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी वृत्तपत्र, पाक्षिक, मासिक, वार्षिक अंक अशा प्रसारमाध्यमात कार्य करू शकतात. वृत्तपत्रांमध्ये सामाजिक, शैक्षणिक, राजकीय घडामोडीवर बातमी, लेख, अग्रलेख, सदर, समीक्षा लेखन करू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना श्रवण, वाचन, लेखन, संभाषण ही भाषिक कौशल्ये विकसित करावीत. त्यांच्या ठिकाणी सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, भाषेवर प्रभुत्व, लवचिक स्वभाव, संयम, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी आवश्यक असते. वृत्तपत्राचा वाचक हा भिन्नभिन्न स्वरूपाचा असतो. त्यामुळे नियतकालिकामध्ये कार्य करताना तुमची भाषा समजायला साधी, सोपी, सरळ आणि परिणामकारक असावी. वाचक उच्च शिक्षित असो अथवा अल्पशिक्षित सर्वांना ती कळली पाहिजे. वृत्तपत्र किंवा नियतकालिकामध्ये अक्षर छपाई, जाहिरात संकलन, वार्ताहर, पत्रकार, जिल्हा प्रतिनिधी, कार्यकारी संपादक, सहसंपादक, संपादक अशा कितीतरी पदावर कार्य करण्याची मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना संधी आहे.

**३. आकाशवाणी केंद्रात संधी:**

मार्कोनी नावाच्या शास्त्रज्ञाने रेडिओ लहरींचा शोध लावून प्रसारण क्षेत्रात खूप क्रांती घडवून आणली. भारतात २३ जुलै १९२७ रोजी मुंबई येथे पहिले रेडिओकेंद्र सुरू झाले. एकाचवेळी लाखोस्रोत्यांपर्यंत पोहोचता येऊ लागले. काळाबरोबर त्याची व्याप्ती वाढत गेली. केंद्र सरकारने रेडिओ प्रसारणाला 'आकाशवाणी' असे नाव दिले. राजकारण, समाजकारण, विज्ञान, साहित्य, संस्कृती, संशोधन याविषयीची सर्व माहिती सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य आकाशवाणी करते. भक्तीगीते, भावगीते, लोकसंगीत, चित्रपट संगीत प्रसारित करून स्रोत्यांचे मनोरंजन करते. आकाशवाणीवरून जाहिराती प्रसारित होतात. हे सर्व कार्य करण्यासाठी लेखन कौशल्य आणि भाषण कौशल्य अवगत असावे लागते. आकाशवाणीवर बोलला जाणारा प्रत्येक शब्द अगोदर लिहून काढावा लागतो. लेखनशैली साधी, सोपी, ओघवती असावी. त्यासाठी प्रमाण मराठी आणि मराठी बोलीभाषा दोन्हींचे ज्ञान असावे. बातमीपत्र, संभाषण, संवाद, रुपक, नाटिका, वृत्तांत लिहून काढावे लागतात. आकाशवाणीमध्ये कार्य करण्यासाठी उच्चार स्पष्ट असावेत. स्रोत्यांना खिळवून ठेवण्यासाठी बोलणाराच्या भाषेत माधुर्य असावे. मराठी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आकाशवाणीमध्ये सुवर्णसंधी आहे.

**४. दूरचित्रवाणीत संधी:**

दूरचित्रवाणी अर्थात टी. व्ही. हे सध्याच्या घडीचे अत्यंत प्रभावी प्रसारमाध्यम आहे. भाषेशिवाय संवाद शक्य नाही. 'बोलणाऱ्याच्या अंबाड्या विकतात आणि न बोलणाऱ्याचे गहूही विकत नाहीत' या म्हणीवरून लक्ष्यात येईल. सध्याचे युग हे जाहिरातीचे आहे. भाषेतवरील प्रभुत्व तुम्हाला दूरचित्रवाणीत संधी उपलब्ध करून देते. स्क्रीनवर दिसणारा निवेदक फक्त एक चेहरा असतो. त्याच्या पाठीमागे खूप मोठीयंत्रणा कार्यरत असते. बातमीदार बातमी लिहितो. बातमी लिहितेवेळी तुम्हाला तुमचा प्रेक्षक डोळ्यासमोर ठेवावा लागतो. प्रेक्षक तीन ते चार मिनिटापेक्षा अधिक वेळ एकच बातमी ऐकू व पाहू शकत नाही. प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यासाठी अनावश्यक शब्द, फापटपसारा टाळून मालिकांचे पटकथा, जाहिरात लेखन, वृत्तनिवेदन, संवादलेखन, मुलाखत हे सर्व घटक नेमकेपणाने लिहावे लागतात. सध्या प्रसारमाध्यमात मोठ्या प्रमाणात क्रांती झाली आहे. खासगी दूरचित्रवाहिन्यांचे जाळे झपाट्याने वाढत आहे. त्याकडे व्यवसायाची संधी म्हणून पाहता येईल.

**५. चित्रपट व नाट्य क्षेत्रात संधी:**

चित्रपट आणि नाटक लोकरंजन आणि लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. आपल्या देशात चित्रपटसृष्टीची सुररूवात महाराष्ट्रातून झाली. चित्रपट, लघुपट, माहितीपट यांची लिखित दृश्यसंहिता म्हणजे 'पटकथा' होय. पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, शंकर पाटील या साहित्यिकांनी मराठी चित्रपटासाठी लेखन केले. रंगनाथ पठारे, आनंद यादव, राजन खान, अण्णाभाऊ साठे या लेखकांच्या कथेवर अनेक मराठी चित्रपट निघाले. मराठी भाषेचे विद्यार्थी चित्रपट व नाट्य क्षेत्रात पटकथा लेखन, संवाद लेखन, गीत रचना करू शकतात. चित्रपटाची सुरूवात नाट्यमय असावी. मध्यंतर उत्सुकता ताणून ठेवणारे असावे. शेवटापूर्वी एक मोठा धक्का असावा. पूर्वी पटकथा लेखनासाठी ठराविक साच्याचं तंत्र वापरले जात असे.

मराठी चित्रपट क्षेत्रात लेखकांची खूप मोठी गरज आहे. चित्रपट, टी. व्ही. मालिका, प्रहसन, वेबसिरीजची लोकप्रियता प्रचंड वाढली. चित्रपट उद्योगाचा मोठा विस्तार झाला आहे. दरवर्षी शंभरापेक्षा जास्त मराठी चित्रपट निर्माण होतात. सतत

नवनव्या मालिका सुरू होत आहेत. नाटकांचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु महानगरांमध्ये कमी अधिक प्रमाणात सुरू आहेत. वऱ्हाडी, कोकणी, मराठवाडी, खानदेशी या बोली भाषेलाही मोठ्या प्रमाणात मागणी आहे. चला हवा येउ द्या प्रहसनच्या माध्यमातून निलेश साबळे, भाऊ कदम, श्रेया बुगडे, सागर करंडे आणि महाराष्ट्राची हास्यजात्राच्या माध्यमातून समीर चौघुले, शिवाली परब, गौरव मोरे, नम्रता संभेराव, अरुण कदम हे कलावंत यशस्वी झाले आहेत. नवनवे सुरू होणारे मराठी चॅनल मराठी लेखकांसाठी अतिशय चांगली संधी घेऊन येत आहेत.

**६. साहित्य लेखनात संधी:**

मानवाच्या विकासात साहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून तर 'ग्रंथ हेच गुरू' असे म्हटले जाते. ग्रंथ माणसाची वाचनाची भूक भागवतात. ग्रंथ माणसाला सुसंस्कृत आणि प्रगल्भ बनवितात. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजात घडणाऱ्या चांगल्या आणि वाईट घटनांचे प्रतिबिंब साहित्यिक उमटत असते. कवी आणि लेखक समाजात घडणाऱ्या घटनांचे बारीक निरीक्षण करतात. आपल्या प्रतिभेच्या बळावर कविता, कथा, कादंबरी, नाटक, गीतांच्या माध्यमातून साहित्य लिहितात. म्हणून तर 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हणतात. साहित्यिक समाज सुधारणेसाठी आणि समाजाला नवी दिशा देण्यासाठी लेखन करतात. समाजाचे काही चुकत असेल तर त्यावर सडकून टीका करतात आणी चांगले कार्य करणारास प्रोत्साहनही देतात. ज्या प्रमाणे वाहणे हा झऱ्याचा, फुलणे हा फुलाचा, त्याप्रमाणे लिहिणे हा साहित्यिकाचा धर्म आहे. साहित्यिक आपल्या दर्जेदार आणि सकस साहित्याच्या माध्यमातून अजरामर होतात. मराठी विषयाचे विद्यार्थी भरपूर वाचन व अभ्यास करून साहित्य लेखनाच्या माध्यमातून भरपूर मानधन मिळवू शकतात. साहित्य लेखनात मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी चांगली संधी आहे.

**७. मुद्रितशोधन कार्यात संधी:**

लेखकाकडून बारीक-सारीक त्रुटी राहून गेल्या असतील तर त्या दुरुस्त करणे. लिखाणातील चुका, ऱ्हस्व-दीर्घ, वेलांटी, उकार, विरामचिन्हे योग्य प्रकारे दिलेले नसतील, वाक्यरचना व्याकरणाच्या नियमाप्रमाणे नसेल तर त्यात दुरुस्ती करणे. बारकाईने काळजीपूर्वक तपासून पाहणे म्हणजे 'मुद्रितशोधन' होय. ग्रंथ प्रकाशन विश्वातील अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे मुद्रितशोधन होय. ग्रंथलेखन संहितेला जेवढे महत्त्व आहे. तेवढेच मुद्रितशोधन कार्याला आहे. पाहिजे तेवढे मुद्रितशोधक सध्या उपलब्ध नाहीत. मुद्रितशोधन करण्यासाठी प्रमाण मराठी भाषेचे लेखन विषयक नियम अभ्यासावे लागतात. मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांसाठी मुद्रितशोधन हे क्षेत्र खूप चांगले आहे. वृत्तपत्रं, नियतकालिके, ग्रंथनिर्मिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मुद्रितशोधकाची आवश्यकता आहे. शुद्धलेखनाची जाण, मराठी भाषा, व्याकरणाचे नियम, मराठी भाषेतील बारकावे माहीत असलेले मराठी भाषेचे विद्यार्थी मुद्रितशोधनाच्या माध्यमातून घरी बसून भरपूर कमाई करू शकतात. विद्यार्थी मुद्रितशोधण्याचे कार्य सहज करू शकतो. त्यांच्यासाठी ही उत्तम संधी आहे.

**८. अनुवाद कार्यात संधी:**

नाण्याला जशा दोन बाजू असतात तसे जागतिकीकरणाचे चांगले आणि वाईट दोन्ही परिणाम पहावयास मिळतात. जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणामुळे देशांतर्गत व्यापार विषयक देवाण-घेवाण वाढली. देशादेशांतील संबंध वाढले. विविध देशांतील भाषा आणि संस्कृतीचा परिचय एकमेकांना होऊ लागला. प्रत्येकाला विदेशात जाऊन विदेशी भाषा शिकून साहित्य वाचणे शक्य होत नाही. त्यांच्यासाठी अनुवादित साहित्य महत्त्वाचे ठरते. इतर देशांतील ज्ञान अनुवाद करून मराठी भाषेत आणणे आणि मराठी भाषेचे ज्ञान इतर भाषेत अनुवाद करून देणे आज काळाची गरज बनली आहे. कोणत्याही भाषेचा अनुवाद करण्यासाठी दोन भाषेचं व संस्कृतीचे ज्ञान असावे लागते. ज्या भाषेतून अनुवाद करायचा आहे ती भाषा व संस्कृती, आणि ज्या भाषेत अनुवाद करायचा ती भाषा व संस्कृती दोन्हींचे ज्ञान असावे लागते. इंग्रजी, रशियन, फ्रेंच, जर्मन, जपानी भाषेत ज्ञानाचा खजिना आहे. तो अनुवाद करून मराठी भाषेत आणला तर मराठी भाषा समृद्ध होईल. इतर भाषेतील दर्जेदार साहित्य मराठी भाषेत आणि मराठी भाषेतील दर्जेदार साहित्य इतर भाषेत अनुवादित करण्याची मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना संधी आहे. त्याचबरोबर दुभाषक म्हणूनही कार्य करता येते.

**९. सूत्रसंचालनात संधी:**

कार्यक्रम शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, असो वा कौटुंबिक त्या कार्यक्रमाचा महत्त्वाचा दुवा म्हणजे सूत्रसंचालक असतो. कार्यक्रम खुलविणे, यशस्वी करणे त्याच्याच हाती असते. अलीकडे सूत्रसंचालन हा मान्यताप्राप्त व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. कार्यक्रम शासकीय, खासगी, पुरस्कार वितरण सोहळा, विवाह, वाढदिवस, सभा, सूत्रसंचालक आवश्यक झाला आहे. सूत्रसंचालनाचा अर्थ दोन कार्यक्रमांमधील जागाभरून काढणे. एवढ्यापुर्ता मर्यादित राहिला नाही. त्यासाठी त्याने पुढील बाबींची काळजी घ्यावी. सर्व प्रकारचे वाचनकरून भाषण व संभाषण कौशल्य सूत्रसंचालकाने आत्मसात करावे. त्याचे भाषेवर प्रभुत्व असावे. प्रसंगानुरूप उदाहरण, हलके फुलके विनोद, किस्से, म्हणी, सुभाषिते, काव्यपंक्तींचा वापर करावा.

सूत्रसंचालकाच्या बोलण्यात नेमकेपणा असावा. समोर बसलेले श्रोतेपाहून, प्रसंगानुसार आकर्षक बोलावे. कार्यक्रमात अचानक गोंधळ झाला तर, स्त्रोत्यांना विश्वासात घेऊन त्यांना शांत करण्याचे कसब त्याच्याकडे असावे. त्याच्याकडे हजरजबाबीपणा असावा. सूत्रसंचालकाची देहबोली, चेहऱ्यावरचे हावभाव, अभिनय सुसंगत असावा. आज चांगल्या सूत्रसंचालकाला मोठमोठ्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. एखाद्या नेत्याची सभा, मुला-मुलीचा वाढदिवस, श्रीमंत व्यक्तीच्या मुला-मुलीचा विवाह अशा कार्यक्रमात नावाजलेल्या सूत्रसंचालकांना भरपूर मानधन मिळते. मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना सूत्रसंचालन क्षेत्रात सुवर्णसंधी आहे.

**मराठी भाषेपुढील आव्हाने:**

**१. इंग्रजी भाषेचे आक्रमण:**

इंग्रजांना राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी भारतीयांना इंग्रजी भाषा शिकवावी लागली. भारतावर दीडशे वर्षे राज्यकरून इंग्रज भारतातून निघून गेले. स्वतंत्र भारतात ७५ वर्षांनंतरही इंग्रजी भाषा आपल्याकडे अनिवार्य म्हणून शिकविली जाते. विदेशात नोकरी करण्यासाठी काही धनदांडग्यांनी आपली मुलं इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकविले. त्याचेच अंधानुकरण करून मध्यमवर्गीय सर्वसामान्य माणूस देखील आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे सध्या जणू पेव फुटले आहेत. इंग्रजी शाळांमध्ये मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जाते. त्या ठिकाणी मराठी संस्कृती, मराठी सणउत्सव यांना मुळीच स्थान नसते. परिणामी मराठी मुलं संस्कृती पासून दुरावत चालली आहेत. कॉम्प्युटरमुळे माऊस, सॉफ्टवेअर, कीबोर्ड, मेमरी, पासवर्ड आणि मोबाईलमुळे चार्जर, रिचार्ज, फोल्डर, ब्लूटूथ, फेसबुक, वाय-फाय, व्हाट्सअप, प्लेस्टोअर असे शेकडो शब्द मराठी भाषेत सहज शिरले आहेत. या इंग्रजी शब्दांना मराठी पर्यायी शब्द अद्याप आपण देऊ शकलो नाहीत.

इंग्रजी शाळांच्या गाड्या विद्यार्थ्यांची ने अन करण्यासाठी  घरापर्यंत येतात. शाळेतील रंगरंगोटी, विद्यार्थ्यांचे सारखे पोशाख याकडे आकर्षित होऊन खेड्यापाड्यातील पालक देखील पाल्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत पाठवीत आहेत. विद्यार्थी चौथी, पाचवीत शिकतो तोपर्यंत खर्च आवाक्यात असतो. तोपर्यंत पालकांना बरे वाटते.. खर्च आवाक्याबाहेर गेला असतो. मग मध्यमवर्गीय पालक विद्यार्थ्याला मराठी शाळेत टाकतात. तेव्हा त्याला धड इंग्रजीही येत नाही आणि मराठी पासूनही तो दुरावलेला असतो. अशी अर्धगाभूळी पिढी सध्या तयार होत आहे. कार्यकर्त्यांच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवायच्या आहेत. शासन मराठी माध्यमाच्या शाळा बंद करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांना प्रोत्साहन देत आहे. शासनाचे धोरण इंग्रजी धार्जिणे आहे. हे मराठी भाषेपुढे उभे टाकलेले मोठे आव्हान आहे.

**२. हिंदी भाषेचा वाढता प्रभाव:**

हिंदी ही भारताची राजभाषा मानली जाते. केंद्र सरकारच्या कार्यालयांची भाषा हिंदी आहे. करमणुकीचे माध्यम अर्थात हिंदी आहे. हिंदी चित्रपट सृष्टीने संपूर्ण देश व्यापला आहे. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. मुंबई तर मायानगरी म्हणून ओळखली जाते. चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथा लेखक, नायक, नायिका, गीतकार, संगीतकार सार्वजन नशीब आजमावण्यासाठी मुंबईत येतात. चित्रपटसृष्टीमध्ये जम बसला की मुंबईत स्थिरावतात. चित्रपट सृष्टीतील आघाडीचे नायक, नायिका, क्रिकेटर आजच्या तरूण पिढीचे आदर्श आहेत. चित्रपटातील नायक, नायिका, क्रिकेटर इंग्रजी बोलण्याचा केविलवाना प्रयत्न करतात. स्वतःच्या भवितव्याचा विचार न करता तरूण पिढी त्यांचे अंधानुकरण करीत आहे. त्यांन पूर्णपणे इंग्रजी भाषा बोलता येत नसेल तेव्हा ते मध्येच हिंदी भाषा सुरू करतात. अर्धवट इंग्रजी, अर्धवट हिंदी आणि मध्येच कुठेतरी मराठी अशी ते भाषेची खिचडी करीत आहेत. त्याचा वाईट परिणाम मराठी भाषेवर होत आहे. व्हाट्सअप आणि फेसबुकमधून लिहिली जाणारी भाषा अतिशय विचित्र अशी आहे. भावाला ब्रो, बहिणीला सीस, वाढदिवसाला एचबीडी, राजकारणासाठी पॉली, असे मराठी भाषेचे विद्रूपीकरण मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. हे देखील मराठी भाषेपुढे उभे टाकलेले मोठे आव्हान आहे.

**३. जागतिकीकरणाचा परिणाम:**

जागतिकीकरणामुळे प्रत्येक देशाच्या सीमा सर्वांसाठी खुल्या झाल्या आहेत. त्यामुळे देश विदेशातून लोक आपल्या देशात येऊ लागले. मुंबई ही तर भारताची आर्थिक राजधानी आहे. वेगवेगळ्या देशातून आणि वेगवेगळ्या राज्यातून व्यवसायासाठी, कामधंद्यासाठी, पोटभरण्यासाठी मुंबईमध्ये लोक येतात. त्यांची भाषा, संस्कृती, बरोबर ते घेऊन येतात. मुंबईमध्ये गुजराती, मारवाडी, पंजाबी, राजस्थानी, बिहारी, तेलगू, बिकानेरवाले, उत्तर प्रदेशी  अशा वेगवेगळ्या राज्यातून लोक येतात. त्यांचे मराठी भाषेचे उच्चार आणि त्यांच्या भाषेचा संकर होऊन मराठी भाषेवर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे मुंबईची मूळ मराठी भाषा, मूळ मराठी संस्कृती हळूहळू बदलत चालली आहे. मराठी माणूस आणि मराठी भाषा मुंबईतून हळूहळू हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. हे मराठी भाषेपुढे मोठे आव्हान उभे टाकले आहे.

**४. दर्जेदार पुस्तकांचा अभाव:**

मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा आहे. महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये दर्जेदार ग्रंथ, संदर्भग्रंथ असावे तेवढे उपलब्ध होत नाहीत. याला काही सन्माननीय अपवाद असू शकतील. अध्यापक आपला कार्यभार टिकवून ठेवण्यात आणि विद्यार्थी केवळ पदव्या मिळविण्यात धन्यता मानतात. विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनत आहेत. पदवीपास केलेल्या विद्यार्थ्याला पाच मिनिट सर्वांसमोर उभे राहून मराठी बोलू शकेल असे वाटत नाही. निर्दोष अर्ज लिहिता येईल असे खात्रीने म्हणता येणार नाही. याचे कारण सध्या अभ्यासक्रम म्हणजे केवळ ललित साहित्य शिकविल्या जाते. त्यामुळे व्याकरणाकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. इतर भाषेतील दर्जेदार पुस्तकांचा अनुवाद मराठी भाषेमध्ये फारसा होताना दिसत नाही. त्यामुळे वाचन संस्कृती दिवसेंदिवस कमी होत आहे. हे मराठी भाषेपुढील एक आव्हान आहे.

**५. मराठी बोली भाषेतील लोप पावणारे शब्दभांडार:**

मराठी ग्रामीण बोली भाषेतील अनेक शब्द नामशेष होत आहेत. गावगाडा नष्ट झाला आधुनिकरण आणि यांत्रिकीकरणामुळे विहिरीवर मोटार आली आणि मोट बंद झाली. त्यामुळे नाडा, सवंदर, बगाड, शिवळाटं, धाव, थारोळं, दांड, वाफा, मोटंवरचं गाणं लोप पावलं. मळणीयंत्र आले आणि खळं बंद झालं. त्यामुळे मेढ, मळण, मदन, वावडी, उधळणे, दाताळे, हातणी, रास, गोंडर, भुस्कट, मातरं हे शब्द काळाच्या पडद्याआड गेले. गावगाड्यातील बलुतेदार, आलुदार यांचे पारंपरिक व्यवसाय बंद पडले. कुंभाराचा आवा, झाकणी, वारले, गाडगे, बिनगी, परळी हे शब्द. सुताराचं लाकडी रुमणं, जोडणी, नाटी, वखर, दांडी, धुरे हे शब्द. चांभाराची मोट, खेटरं, वादी, चपली, पखाल, हे शब्द. लोहाराची इडी, पासा, धावा, फाळ, खुरपे, विळे, हे शब्द. क्रिकेट आला आणि विटी-दांडू, गोट्या, लगोरी, लपाछपी, भेंड्या, भोवरा, सुरपाट्या, फुगडी हे खेळ मागे पडले. मराठी ग्रामीण बोलीभाषेतील कृषी व्यवसाय आणि खेळाशी संबधित ज्ञानाची शिदोरी आणि शब्दभांडार पुढील पिढीतील अभ्यासकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी अनमोल ठेवा जपून ठेवले पाहिजे.

**निष्कर्ष:**

१. पालकांनी आपल्या पाल्यांच्या भवितव्याचा विचार करून प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच द्यावे.
२. महाविद्यालयीन ग्रंथालयात दर्जेदार पुस्तकं, संदर्भग्रंथ आणि इतर भाषेतील अनुवादित झालेले श्रेष्ठग्रंथ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत.
३. विज्ञान तंत्रज्ञानातील नवनव्या शोधांबरोबर कॉम्प्युटर, मोबाईल, इंटरनेटमुळे येणाऱ्या इंग्रजी शब्दांना मराठी भाषेत पर्यायी शब्द उपलब्ध करून द्यावेत.
४. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात विद्यार्थ्यांचे कौशल्ये विकसित करणारा आणि रोजगार उपलब्ध करून देणारा अभ्यासक्रम मराठी विषयात सुरू करावा.
५. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मराठी विषय अनिवार्य करावा आणि मराठी शाळांमध्ये इंग्रजी विषय ऐच्छिक असावा.
६. महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी कार्यालयांतील कामकाज मराठी भाषेतून असावे.
७. मराठी भाषेचं संवर्धन करण्यासाठी मोबाईलवरून गुड मॉर्निंग, गुड नाईट हे गुळगुळीत मेसेज पाठविण्याऐवजी मराठी भाषेतील सुंदर सुविचार किंवा बोधकथा पाठवाव्यात.
८. मराठी ग्रामीण बोलीभाषेतील कृषी व्यवसाय आणि मराठी सस्कृतीतील लोप पावणारे शब्दभांडार पुढील पिढीतील अभ्यासक आणि विद्यार्थ्यांना जतन करून ठेवावे.
९. मराठी भाषा आणि व्याकरणाचा अभ्यास चांगला असणाऱ्या विद्यार्थ्यांना वृत्तपत्र, नियतकालिके या प्रसारमाध्यमात बातमीदार, जिल्हा प्रतिनिधी, संपादक म्हणून भरपूर संधी उपलब्ध आहेत त्याचा लाभ घेता येतो.
१०. मराठी भाषा, साहित्याचा अभ्यास, वक्तृत्व शैली आणि भाषेवर प्रभुत्व असेल तर अध्यापन, सूत्रसंचालन, कीर्तन, प्रवचन या क्षेत्रात सुवर्ण संधी आहे त्याचा लाभ घेता येतो.
११. प्रमाण मराठी लेखन विषयक नियमांचा अभ्यास चांगला असेल तर मुद्रितशोधन कार्य करून मराठी भाषेचा विद्यार्थी घरी बसून कमाई करण्याची चांगली संधी उपलब्ध लाभ घेता येतो.
१२. इतर भाषेतील दर्जेदार साहित्य मराठी भाषेत आणि मराठी भाषेतील दर्जेदार साहित्य इतर भाषेत अनुवादित करण्याची मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना संधी आहे.
१३. मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांकडे सर्जनशीलता, कल्पनाशक्ती, भाषेवर प्रभुत्व, लवचिक स्वभाव, संयम, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी तर चित्रपट, प्रहसन, वेबसिरीज या क्षेत्रात पटकथा लेखक, संवाद लेखक, गीतकार म्हणून मोठी संधी उपलब्ध आहे लाभ घेता येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. तौर पृथ्वीराज (संपा. मराठी भाषिक कौश्यले विकास अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव.
२. केळकर अशोक वैखर मॅजेस्तिक प्रकाशन, मुंबई.
३. नसिराबादकर ल. रा. व्यावहारिक मराठी फडके प्रकाशन, कोल्हापूर.
४. सेनाड रमेश व्यावसायिक पत्रव्यावहार अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर
५. कालेलकर ना. गो. भाषा इतिहास आणि भूगोल मौज प्रकाशन, मुंबई.
६. मेदककर प्रकाश उपयोजित मराठी विद्या बुक्स, औरंगाबाद
७. शेख याश्मिन मराठी लेखन मार्गदर्शिका राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com